सत्यमेव जयते

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्था प्रकरण क्रमांक १ (परिच्छेद क्रमांक १.१ ते १.१३) यावरील

अडुसष्टावा अहवाल

[सदर अहवाल, मा. अध्यक्षांचे निदेश क्र.९ (सातवी आवृत्ती, २०१४) आणि मा. सभापती यांचे निदेश क्र. ९ (पाचवी आवृत्ती, २०११) अनुसार मा. अध्यक्ष आणि मा. सभापती यांना दिनांक ३ सप्टेंबर, २०१९ रोजी सादर करण्यात आला.]

(दिनांक नोव्हेंबर, २०१९ रोजी विधानसभेच्या/विधानपरिषदेच्या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

विधान भवन, मुंबई.

२०१९

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्था प्रकरण क्रमांक १ (परिच्छेद क्रमांक १.१ ते १.१३) यावरील

अडुसष्टावा अहवाल

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि. स. स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि. स. स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि. स. स.

(४) श्री. संजय सावकारे, वि. स. स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि. स. स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि. स. स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि. स. स.

* (८) श्री. योगेश सागर, वि. स. स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि. स. स.

* * (१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि. स. स.

(१०अ) ॲड. पराग अळवणी, वि. स. स.

(११) श्री. संजय केळकर, वि. स. स.

* * * (१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि. स. स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि. स. स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि. स. स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि. स. स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि. स. स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि. स. स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि. स. स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि. स. स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि. स. स.

**** (२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि. प. स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि. प. स.

***** (२३) श्री. हेमंत टकले, वि. प. स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि. प. स.

****** (२४) श्री. अमरसिंह पंडित, वि. प. स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि. प. स.

******* (२६) श्री. जयंत पाटील, वि. प. स.

निमंत्रित

******** (२७) श्री. प्रसाद लाड, वि. प. स.

*********(२८) श्री. रामदास आंबटकर, वि. प. स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(३) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(४) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(५) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(६) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* श्री. योगेश सागर, वि. स. स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्री मंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

** श्री. प्रशांत ठाकूर, वि. स. स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि. स. स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

*** श्री. सुरेश उर्फ बाळू धानोरकर, वि. स. स. यांनी दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी आपल्या सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

**** श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि. प. स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि. प. स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

***** श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि. प. स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

****** श्री. अमरसिंह पंडित, वि. प. स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.

******* श्री. जयंत पाटील, वि. प. स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि. प. स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.

******** श्री. प्रसाद लाड, वि. प. स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

********* श्री. रामदास आंबटकर, वि. प. स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी "विशेष निमंत्रित" समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्था अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा अडुसष्टावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक २८ मे, २०१९ रोजी प्रधान सचिव, वित्त विभाग, प्रधान सचिव, सहकार व पणन (सहकार) विभाग, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पदुम) विभाग, सचिव, कृषी व पदुम (कृषी) विभाग व सह सचिव, जलसंपदा विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या बैठकीत सन २०१६-१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्था या अहवालासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन :
मुंबई/नागपूर.
दिनांक २८ ऑगस्ट, २०१९.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ. क्र.	विभाग व तपशील	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना	
(१)	वित्त विभाग	
	(परिच्छेद क्रमांक १.१)	(१)
	(परिच्छेद क्रमांक १.२)	(६)
	(परिच्छेद क्रमांक १.३)	(९)
	(परिच्छेद क्रमांक १.४)	(२३)
	(परिच्छेद क्रमांक १.५)	(२५)
	(परिच्छेद क्रमांक १.६)	(२५)
	(परिच्छेद क्रमांक १.७)	(३८)
	(परिच्छेद क्रमांक १.८)	(५६)
	(परिच्छेद क्रमांक १.९)	(६५)
	(परिच्छेद क्रमांक १.१०)	(६७)
	(परिच्छेद क्रमांक १.११)	
	(परिच्छेद क्रमांक १.१२)	(६९)
	(परिच्छेद क्रमांक १.१३)	(७१)

वित्त विभाग

1.1 भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्था प्रकरण क्रमांक १, परिच्छेद क्र. १.१ ते १.१३ यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले :-

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	आभप्राय
२-४	१.१ (१.१.१)	प्रस्तावना (२०१६-१७ मधील राजकोषीय व्यवहारांचा गोषवारा)	मागील वर्षाच्या (२०१५-१६) तुलनेत २०१६-१७ मधील राजकोषीय व्यवहारांमधील मोठे बदल पुढीलप्रमाणे आहेत. महसुली जमा - ११ टक्क्यांनी वाढ झाली. - स्वत:चा कर महसूल ११ टक्क्यांनी वाढला. महसुली खर्च - १२ टक्क्यांनी वाढला. - योजनांतर्गत खर्च १७ टक्क्यांनी वाढला. भांडवली खर्च - १२ टक्क्यांनी वाढला. कर्जे व अग्रीमे - वसुली १०२ टक्क्यांनी वाढली. - संवितरणे ४६३ टक्क्यांनी वाढली. लोक ऋण - जमा २७ टक्क्यांनी वाढली. - परतफेड १८ टक्क्यांनी वाढली. रोख शिल्लक - २४ टक्क्यांनी वाढली.	पेट्रोलच्या दरात वाढ झाल्याने विक्री व व्यापार इत्यादीवरील कर, दुचाकी व तिचाकी वाहनांवरील करात दि. ७/६/२०१६ पासून सुधारणा झाल्याने वाहनावरील कराच्या महसुली जमेत वाढ झाली आहे.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
५	१.१.२	राजकोषीय स्थितीचे पुनर्विलोकन	वर्ष २०१६-१७ दरम्यान राज्यांनी, चौदाव्या वित्त आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तीन प्रमुख परिमाणांपैकी दोन साध्य केली होती, जसे की, (i) राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या १.५ टक्के असलेली राजकोषीय तूट आणि (ii) ऋणांचे राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाशी असलेले १७.५ टक्के गुणोत्तर हे प्रमाणकापेक्षा कमी होते. तथापि, तिसरे परिमाण व्याज प्रदाने/ महसुली जमा गुणोत्तर जे १४ टक्के होते ते चौदाव्या वित्त आयोगाकडे विहीत केलेल्या प्रमाणकापेक्षा (१२ टक्के) आणि राज्याच्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणाच्या निवेदनात विहीत केलेल्या प्रमाणकापेक्षा (१३ टक्के) जास्त होते.	सन २०१६-१७ मध्ये राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या प्रमाणात राजकोषीय तूट १.७१ टक्के होती. तसेच राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या प्रमाणात एकूण कर्जाचे प्रमाण १६.१६ टक्के इतके होते. हे विहीत मापदंडाच्या मर्यादेत आहे. तसेच राज्याच्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणाच्या निवेदनात व्याज प्रदाने /महसुली जमा गुणोत्तर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाजानुसार १२.७८% अपेक्षित होते व सन २०१६-१७ च्या सुधारीत अंदाजानुसार १३.१०% होते. तसेच सन २०१६-१७ मध्ये व्याज प्रदाने (रु. २८,५३२ कोटी)/ महसुली जमा (रु. २,०४,६९३) यांचे गुणोत्तर हे १३.९४ % इतके आहे. व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे पत्र दिनांक ३० एप्रिल २०१० मध्ये स्पष्ट केल्यानुसार ज्या राज्याच्या व्याज प्रदानाची महसुली जमेशी टक्केवारी २०% पेक्षा जास्त आहे ते राज्य कर्जबाधित राज्य होय, हा मापदंड निश्चित करण्यात आला आहे. सन २०१६-१७ मध्ये व्याज प्रदाने/महसुली जमा गुणोत्तर १३.९४% हे यानुसार विहीत मापदंडाच्या मर्यादेत आहे.

[illegible] अधिकारी
महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
५-७	१.१.३	अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष	जरी वर्ष २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा महसुली खर्च पाच टक्क्यांनी कमी होता, तरी अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा प्रत्यक्ष महसुली जमा ७.३ टक्क्यांनी कमी असल्यामुळे रु.८,५३६ कोटीची महसुली तूट होती. अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा भांडवली खर्च १७.६ टक्क्यांनी कमी झाला होता तर व्याज प्रदानात मात्र १.१ टक्के किरकोळ प्रमाणात वाढ झाली होती. • ब-याच महत्त्वपूर्ण परिमाणांच्या बाबतीत अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष आकडेवारीत मोठी तफावत होती. राज्य उत्पादन शुल्क, मुद्रांक आणि नोंदणी शुल्क आणि जमीन महसूल यावरील प्राप्ती अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कमी झाल्याने अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत महसुली जमांमध्ये तूट होती. (रु.१६,११७ कोटी : ७.३ टक्के) • कर महसुलातील ५ टक्के, करेतर महसुलातील ३६ टक्के घटीच्या निव्वळ परिणामी महसुली जमांमध्ये घट झाली होती. केंद्रीय कर व शुल्कांच्या हिश्श्यामध्ये सात टक्के आणि केंद्र शासनाच्या सहायक अनुदानामध्ये १३ टक्क्यांनी वाढ झाली. • महसुली जमांमध्ये झालेल्या रु. १६,११७ कोटींच्या	सन २०१६-१७ मध्ये राज्याचे एकूण महसुली उत्पन्न मागील वर्षाच्या उत्पन्नापेक्षा साधारणत: ११ टक्क्यांनी वाढले आहे. तथापि, करेतर उत्पन्नामध्ये घट झाल्याने महसूली तूट रु. ८५३६ कोटी इतकी झाली आहे. सन २०१७-१८ मध्ये महसुली तूट नियंत्रणात ठेवण्यात यश आले असून महसुली अधिक्य रु. २,०८३ कोटींचे राहीले आहे. राज्याच्या स्वत:च्या कर उत्पन्नापैकी राज्य उत्पादन शुल्क, मुद्रांक आणि नोंदणी शुल्क व जमीन महसूल यावरील प्राप्ती अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कमी होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत. i) **राज्य उत्पादन शुल्क** :-मा. सर्वोच्च न्यायालयाने महामार्गालगतच्या ५०० मीटरच्या आतील मद्य विक्री अनुज्ञप्त्या दिनांक ०१.०४.२०१७ पासून बंद करण्याचे आदेश दिनांक १५.१२.२०१६ रोजी दिले होते. सदर आदेशानुसार २५,००३ मद्य विक्री अनुज्ञप्त्यांपैकी १२,९५४ अनुज्ञपत्या बंद करण्यात आल्या होत्या. सदर अनुज्ञपत्या दिनांक ०१.०४.२०१७ पासून बंद होणार असल्याने त्यांना करण्यात येणा-या मद्याचा पुरवठा कमी करण्यात आला होता. त्यामुळे राज्य उत्पादन शुल्काच्या महसुलात सन २०१६-१७ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत रु.१८२ कोटींची (१.४६%) घट झाली.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
५-७	१.१.३	अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष	घटीमुळे , अर्थसंकल्पात अंदाजीत केलेल्या रु. ३,६४५ कोटीपेक्षा प्रत्यक्षातील रु. ८,५३६ कोटी महसुली तूट जास्त होती. • अर्थसंकल्पीय अंदजाच्या तुलनेत महसुली खर्चात ५ टक्के झालेली घट ही मुख्यत: सर्वसाधारण/सामान्य सेवा (सात टक्के) आणि सामाजिक सेवा (आठ टक्के) याखाली झालेल्या कमी खर्चामुळे होती. ही घट मुख्यत्वे शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती (सात टक्के) समाज कल्याण आणि पोषण (१५ टक्के) आणि अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण (१५ टक्के) याखाली झाली होती. • वर्ष २०१६-१७ च्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत प्रत्यक्ष भांडवली खर्च रु. ५,४५७ कोटी (१८ टक्के) एवढा कमी झाला होता. ही घट मुख्यत्वे ग्रामीण विकासं (६२ टक्के), अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण (७३ टक्के) आणि शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती (६४ टक्के) यामध्ये झाली होती.	ii) **मुद्रांक व नोंदणी शुल्क** :- सर्वसाधारण रिअल इस्टेट बाजारात मंदीचे वातावरण असल्याने, स्थावर मालमत्ताच्या खरेदी-विक्री व्यवहारांच्या दस्तांची संख्या व महसूल कमी होता. मुद्रांक शुल्क हे मिळकत हस्तांतरणाच्या दस्तांबाबत मुल्य निर्धारण पध्दतीने आकारले जाते व त्यावर कमाल मर्यादा नाही. मात्र नोंदणी फी वर रु. ३०,००० इतकी कमाल मर्यादा आहे. त्यामुळे मुद्रांक शुल्कामध्ये जेवढया टक्केवारीत वाढ होते तेवढया टक्केवारीत एकूण नोंदणी शुल्क वाढत नाही याचा परिणाम म्हणून एकूण संकलन देखील कमी टक्केवारीने वाढते. सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मध्ये महसूल जरी कमी असला तरी सन २०१७-१८ मध्ये ही तूट भरुन काढण्यात आली आहे. सन २०१६-१७ च्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये २५.८४ टक्के वाढ झाली आहे. iii) **जमीन महसूल:- अ)** कमी पर्जन्यमान, दुष्काळ, टंचाई परिस्थिती इ. कारणांमुळे ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांना जमीन महसुलात सूट दिल्यामुळे जमीन महसुलात घट झालेली आहे. उदा. राज्यातील खरीप व रब्बी हंगामातील ५० पैसेपेक्षा कमी आणेवारी असलेल्या दुष्काळसदृष्य परिस्थिती असलेल्या एकूण १४७०८ गावांना शासन निर्णय दि. २०/१०/१५ अन्वये जमीन महसुलात सूट

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
			• अर्थसंकल्पीय अंदाजात केलेल्या निर्धारणेपेक्षा (रु. ३५,०३१ कोटी) राजकोषीय तूट (उद्य व्यतिरीक्त रु. ३३,६५७ कोटी) प्रमुख्याने महसुली आणि भांडवली खर्चाच्या कमी वाढीमुळे चार टक्क्यांनी कमी होती.	दिली. त्याचप्रमाणे ज्या गावांत पर्जन्यमान ७५% पेक्षा कमी आहे अशा दुष्काळसदृष्य १९९१ गावांना शासन निर्णय दि. २७/०४/२०१६ अन्वये जमीन महसुलात सूट दिलेली आहे. ब) शासन अधिसूचना दि. ३१.१२.२०१५ अन्वये राज्य शासनाने रीतसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पांकरिता शासन जमीन संबंधित विभागास महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान करण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर माध्यमातून शासनास मिळणा-या महसुलात घट झाली आहे. करेतर महसुलातील घट ही प्रमुख्याने पाटबंधारे, शिक्षण, क्रीडा, कला व सांस्कृती आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवांमधील घटीमुळे झाली आहे.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
७-९	१.२	राज्याची साधनसंपत्ती	राज्याची २०१२-१३ मधील एकूण जमा रु. २,१३,४७० कोटी होती, जी २०१६-१७ वर्षात रु.३,३७.२४२ कोटी इतकी झाली म्हणजेच रु. १,२३,७७२ कोटीने (५८ टक्के) वाढली. राज्याच्या एकूण जमेतील महसुली जमेचा हिस्सा २०१२-१३ मधील ६७ टक्क्यांवरुन कमी होऊन २०१६-१७ मध्ये ६१ टक्के इतका झाला. तर वर्ष २०१२-१३ मधील राज्याच्या एकूण जमेतील लोकलेखा जमांचा हिस्सा २२ टक्क्यांवरुन वाढून २०१६-१७ मध्ये २४ टक्के झाला.	मागील १० वर्षाच्या कालावधीचा विचार केल्यास राज्याच्या महसुली उत्पन्नातील वाढीचा नैसर्गिक दर साधारणपणे सरासरी ११ ते १२ टक्के इतका राहीला आहे. राज्याची एकूण महसुली जमा सन २०१२-१३ मध्ये रु. १४२९४७ कोटी इतकी होती, जी सन २०१६-१७ मध्ये रु. २०४६९३ कोटी झाली. ही वाढ ४३% इतकी असून वार्षिक सरासरी वाढ ११% ही नैसर्गिक वाढीच्या सरासरी इतकी आहे.
	१.२.१	वार्षिक वित्तीय लेख्यानुसार राज्याची साधनसंपत्ती		
	१.२.२	राज्य अर्थसंकल्पाबाहेरील राज्य कार्यान्वयन अभिकरणांना हस्तांतरित केलेला निधी	केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०१४ पासून केंद्र पुरस्कृत योजना/अतिरिक्त केंद्रिय अर्थसहाय्य यांच्याशी संबंधित सर्व अर्थसहाय्य कार्यान्वयन अभिकरणांना मुक्त न करता राज्य शासनाला थेट मुक्त करण्याचे ठरविले. तथापि, वर्ष २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांच्या परिशिष्ट IV मध्ये दाखविल्यानुसार वर्ष २०१६-१७ दरम्यान केंद्र शासनाने रु. १५९२.११ कोटी रक्कम राज्य कार्यान्वयन अभिकरणांना मुक्त केली होती. अशाप्रकारे वर्ष २०१६-१७ मध्ये मुक्त केलेला निधी हा वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत (रु. ४५१ कोटी) ३.५ पट होता. केंद्र शासनाकडून हे निधी राज्य कार्यान्वयन अभिकरणांना थेट हस्तांतरीत होत असल्यामुळे विविध योजनांवर अभिकरणांकडून झालेल्या खर्चावर संनियंत्रण ठेवण्यात अपयश येते कारण हे निधी राज्याच्या अर्थसंकल्पात परिवर्तीत होत नाहीत.	केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०१४ पासून केंद्र पुरस्कृत योजना/अतिरिक्त केंद्रिय अर्थसहाय्य यांच्याशी संबंधित सर्व अर्थसहाय्य कार्यान्वयन अभिकरणांना मुक्त न करता राज्य शासनाला थेट मुक्त करण्याचे ठरविले. तथापि, केंद्र शासनाच्या दिनांक ०३/०२/२०१६ च्या पत्रावरुन असे दिसते की, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या सहमतीनेच केंद्र पुरस्कृत योजना/अतिरिक्त केंद्रिय अर्थसहाय्य यांच्याशी संबंधित अर्थसहाय्य कार्यान्वयन अभिकरणांना थेट मुक्त करण्यात येते.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१०	१.२.३	विधानमंडळाच्या नियंत्रणाबाहेर निधीचा वापर करणे	तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार, राज्याच्या एकत्रित निधीच्या बाहेर निधी निर्माण करुन त्यामधून सार्वजनिक खर्च करण्यास परावृत्त करावे. राज्याच्या एकत्रित निधीच्या बाहेर निधी निर्माण करुन त्यामधून सार्वजनिक खर्च केल्याची घटना भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या आधीच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालात नमूद केली होती. चालू वर्षातही हीच पध्दत सुरु होती. केंद्रीय सहय्याद्वारे वेगवेगळ्या गृहनिर्माण योजना हाती घेण्यासाठी शासनाच्या स्त्रोतांना पुरक ठरेल अशा उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने महाराष्ट्र निवारा निधी निर्माण केला (मे २०१०). महाराष्ट्र शासनाच्या एकत्रीकृत निधीच्या तसेच लोक लेख्यांच्या बाहेर महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) कार्यकक्षेमध्ये (म्हाडा अधिनियम १९७६ मध्ये दुरुस्ती न करता) हा निधी निर्माण करण्यात आला होता. निधीची स्थापना झाल्यापासून मार्च २०१७ पर्यंत महाराष्ट्र निवारा निधीला महाराष्ट्र शासन, महाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांकडून , प्राधिकरणाने संकलित केलेल्या ९० टक्के जमीन अधिमुल्याच्या आवर्ती अंशदानाचे रु. १७, २३७.९९ कोटी प्राप्त झाले होते. पुढे मार्च २०१७ पर्यंत महाराष्ट्र निवारा निधीतून रु. ३,९६८ कोटी	गृहनिर्माण विभागाच्या अखत्यारितील राज्यातील विविध गृहनिर्माण योजनांसाठी आवश्यक निधी उभारण्याकरिता म्हाडाच्या अधिनस्त शासन निर्णय क्रमांक नानिफं-२००८/प्र.क्र. २१३/गृनिधो-२, दिनांक ३१ मे, २०१० अन्वये महाराष्ट्र निवारा निधी निर्माण करण्यात आला आहे. म्हाडा अधिनियम १९७६ मध्ये दुरुस्ती न करता महाराष्ट्र निवारा निधीची निर्मिती केल्यामुळे म्हाडाबरोबरच महाराष्ट्र निवारा निधीचे लेखपरिक्षण करता येत नाही. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर अधिनियमात सुधारणा झाल्यानंतर, सदर निधीचे लेखापरिक्षण महालेखपाल कार्यालयाकडून करुन घेण्यात येईल व लेखापरिक्षणचा अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सदर करण्यात येईल.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१०	१.२.३	विधानमंडळाच्या नियंत्रणाबाहेर निधीचा वापर करणे	खर्च करण्यात येऊनही महाराष्ट्र निवारा निधीतील जमा आणि खर्चाचे वार्षिक लेखे व लेखापरिक्षा अहवाल राज्य विधानमंडळाला सादर करण्यात आले नव्हते (डिसेंबर २०१७). अशाप्रकरे शासकीय लेख्यांबाहेर महाराष्ट्र निवारा निधीची निर्मिती करुन त्यामध्ये व्यवहार करुनही प्राधिकृत करण्याच्या नियमीत प्रक्रियेद्वारे विधानमंडळाकडून त्याची तपासणी होऊ शकली नाही. महाराष्ट्र निवारा निधीमधील नियोजित व्यवहार सर्वसाधारण अर्थसंकल्पीय प्रक्रियेद्वारे केल्यास ते अधिक योग्य ठरेल. महाराष्ट्र निवारा निधीच्या प्रशासकीय आणि आर्थिक स्वातंत्र्याशी तसेच निधीची भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेकडून लेखापरीक्षा करुन घेण्याची सुनिश्चिती करण्यासाठी, म्हाडा अधिनियम १९७६ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याचे निर्देश (ऑगस्ट २०१७) वित्त विभागाने गृहनिर्माण विभागाला दिले आहेत.	

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१०-१२	१.३	महसुली जमा	महसुली जमेत शासनाचे स्वत:चे कर व करेतर महसूल, केंद्रीय कर हस्तांतरणे व केंद्र शासनाकडून प्राप्त सहाय्यक अनुदाने यांचा समावेश होतो. (परिशिष्ट १.७) २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ दरम्यान महसुली जमा रु. १९,६५७ कोटीने (११ टक्के) वाढली. ही वाढ म्हणजे कर महसूल रु. १०,००८ कोटी (आठ टक्के), केंद्रीय कर व शुल्क यांतील राज्याचा हिस्सा रु.५,६०९ कोटी (२० टक्के) आणि केंद्र शासनाचे सहाय्यक अनुदान रु.४,७५४ कोटी (२८ टक्के) यांतील वाढ आणि करेतर महसुलातील रु.७१४ कोटी (पाच टक्के) घट यांचा निव्वळ परिणाम होय. वर्ष २०१६-१७ मधील रु. २,०४,६९३ कोटी महसुली जमा ही राज्य शासनाने त्यांच्या राजकोषीय सुधारणा पथामध्ये केलेल्या निर्धारणेच्या (रु.२,२५,३८८ कोटी) जवळजवळ ९१ टक्के आणि मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनातील निर्धारणेच्या (रु. २,२०,८११ कोटी) ९३ टक्के इतकी होती. २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत कर महसुलात पाट टक्क्यांची घट झाली. २०१२-१४ या कालावधीत महसुली जमेतील राज्याच्या स्वत:च्या कराचा हिस्सा ७२ टक्के होता. जो २०१४-१५ दरम्यान ६९ टक्क्यांपर्यंत घटला आणि २०१५-१६ मध्ये तो स्थिर राहिला. वर्ष २०१६-१७ दरम्यान तो पुढे ६७ टक्क्यांपर्यंत कमी झाला. २०१३-१४ मध्ये करेतर महसुलच्या हिश्श्यात अल्पशी वाढ झाली आणि २०१४-	राज्याचा स्वत:चा कर महसूल सन २०१२-१३ मध्ये रु. १०३४४८ कोटी होता, जो सन २०१६-१७ मध्ये रु. १३६६१६ कोटी पर्यंत वाढला. ही वाढ ३२ % असून वार्षिक सरासरी वाढ ८% इतकी आहे. सन २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कर महसुलामध्ये प्रामुख्याने मुद्रांक व नोंदणी शुल्क, राज्य उत्पादन शुल्क व जमीन महसूल यांमध्ये घट झाली असून करेतर बाबींमध्ये प्रामुख्याने शिक्षण, क्रीडा, कला आणि सांस्कृती, मोठे पाटबंधारे आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा यामध्ये घट झाल्यामुळे एकूण महसुलामधील कर व करेतर महसुलाच्या हिस्स्यामध्ये घट झाली आहे. सन २०१५-१६ मध्ये महसुली जमेतील राज्याच्या स्वत:च्या कर व करेतर महसुलाचा हिस्सा ७६% एवढा होता. सन २०१६-१७ मध्ये कर व करेतर बाबींमध्ये झालेल्या घटीमुळे हा हिस्सा ७३% इतका कमी झाला होता. तथापि, सन २०१७-१८ मध्ये हा हिस्सा वाढून पुन्हा ७६% इतका झाला आहे. तसेच सन २०१६-१७ मध्ये राज्याची महसुली जमा राज्य शासनाने राजकोषीय सुधारणा पथामध्ये केलेल्या निर्धारणेच्या ९१% इतकी होती. सन २०१७-१८ मध्ये राज्याच्या महसुली जमेमध्ये राजकोषीय सुधारणा पथामध्ये केलेल्या निर्धारणेच्या ९६% एवढी वाढ झाली आहे. भारतीय रिझर्व्ह बँक यांच्याकडील राज्य वित्तीय अहवाल आणि महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय सांख्यिकी मधील माहितीवरुन असे स्पष्ट होते की, सन २००७-०८ ते २०१५-१६ या कालावधीत

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१०-१२	१.३	महसुली जमा	१५ मध्ये तो स्थिर राहीला. २०१५-१६ आणि २०१६-१७ मध्ये त्यात आल्पशी घट झाली. २०१२-१५ दरम्यान केंद्रिय हस्तांतरणाचा हिस्सा स्थिर होता ज्यामध्ये २०१५-१६ व २०१६-१७ दरम्यान अल्पशी वाढ झाली. सहाय्यक अनुदानाचा हिस्सा २०१२-१७ दरम्यान चढ-उताराचा कल दर्शवितो. वर्ष २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान महसुली जमेचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (११.१ टक्के) इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यातील वाढीच्या दरांपेक्षा (१४.६ टक्के) कमी होता. २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ मधील महसुली जमेतील वाढ (१०.६ टक्के) ही सर्वसाधारण प्रवर्ग राज्यातील वाढीच्या दरांपेक्षाही (११.५ टक्के) कमी होती. (परिशिष्ट १.१) महसुली जमेतील वाढीच्या दरात २०१५-१६ मधील ११.९ टक्केवरुन घट होऊन ती २०१६-१७ मध्ये १०.६ टक्के झाली होती. राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या संदर्भात राज्याच्या स्वत:च्या कर प्लावकतेचे गुणोत्तर २०१२-१३ मध्ये १.३१२ होते. त्यामध्ये घट होऊन २०१३-१४ मध्ये ते ०.३६५ झाले आणि २०१४-१५ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन ते ०.६८२ झाले. २०१५-१६ मध्ये गुणोत्तरात वाढ होऊन ते ०.८५७ झाले आणि २०१६-१७ मध्ये घट होऊन ते ०.५९० झाले.	राज्याच्या महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यातील वाढीच्या दरांपेक्षा कमी असला तरी सन २०१६-१७ च्या तुलनेत २०१७-१८ मध्ये राज्याच्या महसुली जमेतील वाढीचा वार्षिक दर १९% टक्के इतका आहे. महसुली जमेच्या बाबतीत व्यापक स्वरुपात विचार करता, देशामध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राच्या महसुली जमेची वाढ ही सातत्याने दोन अंकी राहिली आहे. याचा अर्थ स्पष्ट होतो की, राज्य शासनाने महसूल वाढविण्यासाठी जोरदार प्रयत्न केले आहेत. सन २०१६-१७ मध्ये राज्याच्या स्वत:च्या कर व करेतर महसुलात घट झाल्यामुळे महसुली जमेच्या वाढीचा दरात २०१५-१६ मधील ११.९ टक्केवरुन घट होऊन ती १०.६ टक्के इतकी झाली होती. तथापि, सन २०१७-१८ मध्ये त्यामध्ये पुन्हा वाढ होऊन महसुली जमेच्या वाढीचा दर सन २०१७-१८ मध्ये १९% इतका झाला आहे. राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या संदर्भात राज्याच्या स्वत:च्या कर प्लावकतेचे गुणोत्तर २०१६-१७ मध्ये ०.५९० हे त्यावर्षी कर व करेतर महसुलातील घटीमुळे झाले होते. तथापि, सन २०१२-१३ मधील कर प्लावकतेचे गुणोत्तरामध्ये १.३१२ वरुन सन २०१७-१८ मध्ये २.१६१ इतकी वाढ झाली आहे.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१२-१३	१.३.१	राज्याची स्वत:ची साधनसंपत्ती	केंद्रीय करातील राज्याचा हिस्सा हा वित्त आयोगाच्या शिफारशीच्या आधारे ठरविल जात असल्याने अतिरिक्त साधनसंपत्तीला चालना देण्याची राज्याची कार्यक्षमता ही कर आणि करेतर जमांचा समावेश असलेल्या स्वत:च्या साधनसंपत्तीच्या अनुषंगाने निर्धारित केली जाते. चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धरणेपेक्षा, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनामध्ये केलेल्या प्रक्षेपणांपेक्षा वर्षभरात प्रत्यक्ष प्राप्त झालेला कर महसूल कमी होता. शासनाचा करेतर महसूल सुध्दा चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा ४२ टक्क्यांनी कमी होता.	राज्याचा स्वत:च्या कर महसुल सन २०१६-१७ मध्ये रु.१,३६,६१६ कोटी इतका होता. त्यामध्ये सन २०१७-१८ मध्ये २३% वाढ होऊन तो रु. १,६७,९४७ कोटी इतका झाला आहे. तसेच राज्याचा करेतर महसूल सन २०१६-१७ मध्ये रु.१२,७०९ कोटी इतका होता. त्यामध्ये सन २०१७-१८ मध्ये ३१% वाढ होऊन तो १६,६९८ कोटी इतका झाला आहे. शासनाने अतिरिक्त साधन संपत्ती निर्माण करण्यासंदर्भात दिनांक १५.०४.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. महसुलवाढ व अतिरिक्त साधनसंपत्ती निर्माण करण्यासंदर्भात शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे सन २०१६-१७ च्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये राज्याच्या स्वत:च्या कर महसुलात २३% व करेतर महसुलात ३१% वाढ झाली आहे. परिणामी सन २०१६-१७ मध्ये चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा ४२ टक्क्यांनी कमी असलेल्या करेतर महसुलात सन २०१७-१८ मध्ये झालेल्या वाढीमुळे ही टक्केवारी २९% इतकी कमी झाली आहे. तसेच सन २०१६-१७ मध्ये चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा २३ टक्क्यांनी कमी असलेल्या कर महसुलात सन २०१७-१८ मध्ये झालेल्या वाढीमुळे ही टक्केवारी १७% इतकी कमी झाली आहे.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१३-१४	१.३.१.१	कर महसूल	मागील वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत कर महसुलात झालेली रु. १०,००८ (आठ टक्के) वाढ ही प्रामुख्याने (अ) मुल्यवर्धीत करांतर्गत संकलनात झालेल्या वाढीमुळे विक्री, व्यापार इत्यादीवरील करात रु. ११,५१३ कोटी (१७ टक्के) ; (ब) राज्य मोटार वाहन कराधान अधिनियम आणि पर्यावरण कर यातील अधिक प्राप्तीमुळे मोटार वाहन करात रु. ७२४ कोटी (१२ टक्के) याखाली झाली होती जी विजेचा वापर आणि विक्री यावरील कर आणि शुल्क यांच्या कमी संकलनामुळे कर व शुल्कात झालेल्या रु.१,८७३ कोटी (२२ टक्के) घटीमुळे कमी झाली.	सन २०१६-१७ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत राज्याच्या कर महसुलामध्ये प्रामुख्याने विक्रीकर, मोटार वाहन कर या मुख्य करांमध्ये वाढ झाली असून विजेचा वापर आणि विक्री यावरील कर आणि शुल्क यामध्ये घट झाली आहे. सदर वाढ/घट याबाबतची कारणे पुढीलप्रमाणे आहेत. i) **मोटार वाहन कर** :- २०१६-१७ या वर्षात मोटर वाहन कराच्या महसुली जमेत झालेली रु.७२४ कोटी एवढी वाढ ही प्रमुख्याने i) इंजिन क्षमतेनुसार दुचाकी-तिचाकी वाहनांवरील कराचे सुधारित दर दि. ७/६/२०१६ पासून राज्यात लागू करण्यात आल्याने, ii) दिनांक ०१/०९/२०१६ च्या शासन निर्णयान्वये रस्ते सुरक्षा निधी स्थापन करण्यात आल्याने व iii) वस्तु व सेवा कर लागू झाल्यानंतर शासन अध्यादेश दिनांक १४/०७/२०१७ अन्वये दुचाकी व चारचाकी वाहनांवर २ टक्के करवाढ लागू करण्यात आल्यामुळे झाली आहे. ii) **विक्रीकर**:- सन २०१६-१७ मध्ये विक्रीकरचे (००४०) या लेखाशीर्षांतर्गत महसुली जमेत झालेली रु. ११५१३ कोटी एवढी वाढ ही प्रामुख्याने कराच्या दरातील वाढीमुळे झाली आहे. परिशिष्ट "सी" अंतर्गत वस्तूंवर दि. १७.०९.२०१६ पासून ५% ऐवजी ५.५% दर आकारण्यात आला तर परिशिष्ट "ई" अंतर्गत वस्तूंवर १२.५% ऐवजी १३.५% दर आकारण्यात आला. तसेच पेट्रोलच्या किंमतीत १ जून २०१६ ला १.५ रुपये प्रति लिटर तसेच १७ सप्टेंबर, २०१६ ला १.५ रुपये प्रति लिटर वाढ करण्यात आली होती.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
				iii) **विजेचा वापर आआणि विक्री यावरील कर आणि शुल्क :-** वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मध्ये या कराचे संकलन कमी झाले कारण मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. मुंबई यांनी माहे ऑक्टोबर, २०१६ पासून शासनास देय असलेल्या विद्युत शुल्क व विजेच्या विक्रीवरील कराचा भरणा शासन कोषगारात केला नाही. सदर रकमेचा व्याजासहित भरणा मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांनी माहे ऑगस्ट-२०१८ मध्ये केला आहे.
१३-१४	१.३.१.१	कर महसूल	२००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान, कर महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (१३ टक्के) इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांमधील वाढीच्या दरापेक्षा (१४.८ टक्के) कमी होता. वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत वर्ष २०१६-१७ मधील स्वत:च्या कर महसुलातील वाढ (७.९ टक्के) देखील सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांतील वाढीच्या दरापेक्षा (१३.५ टक्के) कमी होती. (परिशिष्ट १.१) २०१६-१७ दरम्यान राज्याच्या सकल घरेलू उत्पन्नाच्या टक्केवारीतील कर महसूल (सहा टक्के), चौदावा वित्त आयोग (८.५ टक्के), आणि राजकोषीय सुधारणा पथ (सात टक्के) यांच्या प्रमाणशीर निर्धरणेपेक्षा कमी होता आणि मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदनाएवढा (सहा टक्के) होता.	भारतीय रिझर्व्ह बँक यांच्याकडील राज्य वित्तीय अहवाल आणि महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय सांख्यिकी मधील माहितीवरुन असे स्पष्ट होते की, परिशिष्ट १.१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन २००७-०८ ते २०१५-१६ या कलावधीत इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांच्या कर महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर १३ टक्के नसून तो ७.४ टक्के इतका आहे. तसेच सन २००७-०८ ते २०१५-१६ या कलावधीत राज्याच्या कर महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर ७.९ टक्के इतका असून तो इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांपेक्षा जास्त आहे. राज्याच्या सकल घरेलू उत्पन्नाच्या टक्केवारीतील कर महसूलाचे प्रमाण सन २०१६-१७ मध्ये जरी ६% इतके असले, तरी सन २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ७% इतके झाले आहे.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१४-१५	१.३.१.२	करेतर महसूल	सन २०१५-१६ च्या तुलनेत करेतर महसूल प्राप्तीमधील रु. ७१४ कोटीची (पाच टक्के) घट ही प्रामुख्याने शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती ५८ टक्के (रु. ३५० कोटी), मोठे पाटबंधारे ५८ टक्के (रु. २६७ कोटी) आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा ४७ टक्के (रु. २२४ कोटी) यातील घटीमुळे होती, जी घट उर्जा/वीज शीर्षाखालील २३ टक्क्यांच्या वाढीमुळे (रु. १४० कोटी) कमी झाली. चालू वर्षा दरम्यान, करेतर महसुली जमा (रु. १२,७०९ कोटी) ही राजकोषीय सुधारणा पथामधील रु. २१,६९८ कोटी (४१ टक्के), मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन/अर्थसंकल्प रु. १९,९९७ कोटी (३६ टक्के) यातील प्रक्षेपणापेक्षा तसेच चौदाव्या वित्त आयोगाच्या रु. २१,७५२ कोटी (४२ टक्के) इतक्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा कमी होती. वर्ष २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान करेतर महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (-२.९टक्के) इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांमधील वाढीच्या दरापेक्षा (९.५ टक्के) कमी होता. वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ दरम्यान करेतर महसुलातील वाढ (-५.३टक्के) ही सर्वसाधारण प्रवर्ग	पाटबंधारे महामंडळांतर्गत सिंचन प्रकल्पातून मिळणा-या पाणीपट्टीची रक्कम सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास पाटबंधारे विकास महामंडळांना मान्यता देण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने दि.१७/११/२०१६ रोजी घेतला असल्याने मोठे, मध्यम व लहान पाटबंधारे प्रकल्पांतून मिळणा-या पाणीपट्टीच्या रकमा शासकीय लेख्यांत जमा न झाल्याने करेतर महसूल कमी झाला आहे. विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे, व्यावसायिक सेवा पुरवठ्याबाबत कमी मागणी, अतिप्रदानाचे प्रमाण कमी होणे तसेच ग्रंथालय सभासदत्वाची वर्गणी द्वीवार्षिक असल्याने शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती या शीर्षाखालील महसुली जमेत सन २०१६-१७ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत घट झाली आहे. महसुलवाढ व अतिरिक्त साधनसंपत्ती निर्माण करण्यासंदर्भात शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे सन २०१६-१७ च्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये राज्याच्या करेतर महसुलात ३१% वाढ झाली आहे. परिणामी सन २०१६-१७ मध्ये चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा ४२ टक्क्यांनी कमी असलेल्या करेतर महसुलात सन २०१७-१८ मध्ये झालेल्या वाढीमुळे ही टक्केवारी २९% इतकी कमी झाली आहे. भारतीय रिझर्व्ह बँक यांच्याकडील राज्य वित्तीय अहवाल आणि महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय सांख्यिकी मधील माहितीवरुन असे स्पष्ट होते की, सन २००७-०८ ते २०१५-१६ या कलावधीत राज्याच्या करेतर महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (-

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
			राज्यांमधील वाढीच्या दरापेक्षा (१२.१ टक्के) कमी होती . (परिशिष्ट १.१)	२.९टक्के) नसून तो २.७ टक्के इतका आहे. करेतर उत्पन्न वाढविण्यासाठी राज्य शासनाकडून सातत्याने प्रयत्न चालू असून याबाबत सचिव तसेच मा. मंत्री स्तरावर सातत्याने बैठका घेण्यात येतात.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१५-१६	१.३.१.२	व्याज प्राप्ती, लाभांश आणि नफा	राज्याच्या अतिरिक्त रोख शिलकीच्या गुंतवणुकीवरील व्याज हा व्याज प्राप्तीचा एक मोठा स्त्रोत आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या विनियमानुसार, राज्याकडून राखली जाणारी रोख शिल्लक ही केंद्र शासनाच्या १४ दिवसांच्या कोषागार देयकांत गुंतवली जाते. या कोषागार देयकांवरील सरासरी व्याजाच दर पाच ते सहा टक्के असतो. त्वरीत आवश्यक असलेल्या रकमेपेक्षा अधिक प्रमाणातील रोख शिल्लक ही केंद्र शासनाच्या ९१ दिवसांच्या कोषागार देयकांमध्ये गुंतविली जाते. २०१६-१७ दरम्यान रु. ३३१ कोटी व्याज प्राप्तीच्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत रोख शिल्लकींच्या गुंतवणूकीवर प्रत्यक्षात रु. २,२१४.१९ कोटीची व्याज प्राप्ती झाली होती, ज्यापैकी १४ दिवसांच्या कोषागार देयकांवर रु. ६५१.४९ कोटी आणि ९१ दिवसांच्या कोषागार देयकांवर रु. १,५६२.७० कोटीची प्राप्ती झाली होती. राज्य शासनाने त्याच्या कंपनी/महामंडळे इत्यादींना दिलेल्या कर्जे आणि अग्रिमांवर २०१६-१७ दरम्यान रु. ४०७ कोटी व्याज प्राप्त झाले. जे वर्ष अखेरीस प्रलंबित असलेल्या कर्जे आणि अग्रिमांच्या (रु. २६,६०३.४० कोटी) १.५ टक्के होते. २०१६-१७ दरम्यान कंपनी/महामंडळ यांच्याकडून रु.६६.८१ कोटी रक्कम लाभांशाच्या रुपात गुंतवणुकीवरील परतावे म्हणून घोषित केली गेली आणि शासकीय लेख्यात जमा कली गेली. शासकीय गुंतवणुकीचे प्रमाण (रु. १,२९,९८३.७९ कोटी) विचारात घेता गुंतवणुकीवर ०.०५ टक्के दराने प्राप्त झालेले परतावे हे अत्यल्प होते.	राज्य शासन, बिम्स (Budget Estimation and Allocation Monitoring System) या संगणक आज्ञावलीद्वारे प्रशासकीय विभागांना मा. विधानमंडळाकडून मंजूर केलेल्या अनुदानापैकी ७०% अनुदान आर्थिक वर्षाच्या सुरुवातीलाच वितरीत करते. सदर संगणक प्रणालीद्वारे राज्य शासनाच्या खर्चाचा कॅश-फ्लो नियंत्रित केला जातो. तथापि, राज्य शासनाकडून लोक कल्याणाच्या योजना राबविल्या जात असल्यामुळे अनुदान केव्हा खर्ची पडेल याचे अनुमान करता येत नाही. जमा व खर्चाचा मासिक अंदाज घेऊन कर्जाची उभारणी राज्य शासन करत असते. संभाव्य खर्च व उपलब्ध असणारी रोख तरलता विचारात घेऊन १४/९१ दिवशीय कोषागार देयकामध्ये गुंतवणूक केली जाते. सन २०१६-१७ मध्ये याखाली रु. ३३१ कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली होती. तथापि, शिल्लक असणा-या निधीचे योग्य प्रकारे व्यवस्थापन केल्यामुळे प्रत्यक्षात रु. २,२१४ कोटी व्याज प्राप्त झाले.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
५६-५७	१.३.१.२	सार्वजनिक सुविधांची दर निश्चिती-पाणी शुल्क	महाराष्ट्रात, पाणी शुल्काची आकारणी आणि दर निश्चिती महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या तरतुदींनुसार केली जाते. जलसंपदा प्रकल्पांचे पाटबंधारे व्यवस्थापन, प्रशासन, कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्चाची पूर्ण वसुली पाणी शुल्काच्या रक्कमेतून होईल अशा पध्दतीने प्राधिकरणाने पटबंधारे आणि मोठ्या प्रमाणावर लागणा-या पाण्यासाठी पाणी शुल्काचे निकष निश्चित करणे आवश्यक असते. अधिनियमानुसार, पाटबंधारे प्रकल्पांवरील कार्यचालन आणि देखभाल खर्च राज्याने पाणी शुल्काच्या रक्कमेतून भागवावयास हवा. पेय जल प्रकरणांत पाणी प्रशुल्कातून प्राप्त होणारा महसूल हा पाण्याच्या उत्पादनाच्या खर्चाएवढा म्हणजे पाणी पुरवठा व्यवस्थेच्या कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्चाएवढा असावा. ऑक्टोबर २०१० पासून, महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरणाकडून पाणी शुल्क ठरविले जाऊ लागले. २०१२-१७ मध्ये कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्चाच्या तुलनेत २०१०-१३ या नियंत्रण कालावधीतील पाणी दरावर आधारित पाणी शुल्काचे निर्धारण आणि	तक्ता क्र. १.९ जलसंपदा प्रकल्पांच्या कार्यचालन व देखभाल खर्चाचा आणि पाणी शुल्काचे निर्धारण आणि वसुलीचा तपशील मधील स्तंभ क्र.५ मधील निर्धारण या मथळ्याखाली नमूद आकडेवारी ही जलसंपदा विभागाकडून सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीची केलेली वर्षनिहाय आकारणी आहे. कार्यचालन व परिरक्षण खर्चानुसार (आस्थापना + परिरक्षण आणि दुरुस्ती) दरवर्षी पाणीपट्टीची आकारणी होत नाही. दरवर्षी दि. १५ ऑक्टोबर रोजी जलाशयातील उपलब्ध पाणीसाठ्यावर आधारित सिंचन व बिगर सिंचन पाणीवापराचे परिमाण निश्चित होत असल्यामुळे त्यावर आधारित सिंचन क्षेत्रानुसार व बिगर सिंचनासाठी उपलब्ध पाणी परिमाणानुसार पणीपट्टीची आकरणी होते. दुष्काळी परिस्थितीमध्ये पाणीपट्टीची आकारणी कमी होते. तथापि, सिंचन व्यवस्थापनांतर्गत कार्यचलन व परिरक्षण खर्चामध्ये दुष्काळी परिस्थितीमध्ये कोणतीही कपात करणे शक्य नसते. त्यामुळे दरवर्षीची पाणीपट्टी आकारणी आणि कार्यचालन परिरक्षण खर्च यांची तुलना करणे संयुक्तिक नाही. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचेकडून पाणीपट्टीचे दर हे सिंचन व्यवस्थापनाकरिताच्या कार्यचालन व परिरक्षण खर्चाची पूर्णपणे वसुली होण्याच्या दृष्टीने निश्चित करणे आवश्यक आहे. सदर बाब महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे अखत्यारितील आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी निश्चित केलेल्या पाणीपट्टीच्या दरांनुसार आकारणी व वसुली करणे हे जलसंपदा विभागाचे काम आहे. पणीपट्टीची आकारणी व वसुली यातील तफावत खालील प्रमुख कारणांमुळे आहे. १) दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीमुळे पीक हानी होऊन

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१६-१७	१.३.१.२	सार्वजनिक सुविधांची दर निश्चिती-पाणी शुल्क	वसुलीवरुन असे दिसून येते की, २०१२-१७ दरम्यान वसूल केलेले पाणी शुल्क हे कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्चापेक्षा रु. १,१७९.०८ कोटीने कमी होते. वर्ष २०१२-१७ दरम्यान वसुलीतील थकबाकी रु. १,७०४.६६ कोटी होती. याशिवाय, वर्ष २०१२-१७ दरम्यान कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्च भागविण्यासाठी योग्य निर्धारण करणे आणि निर्धारणेप्रमाणे वसुली करणे यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे.	शेतकरी सिंचनाची पाणीपट्टी भरण्यास असमर्थता दर्शवितात. २) शेतीचे उत्पन्न व खर्च यामध्ये तफावत असल्याने व शेतीमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी सिंचनाची पाणीपट्टी भरत नाहीत. ३) अल्पभूधारक शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने सिंचनाची पाणीपट्टी भरत नाहीत. ४) महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, ग्राम पंचायती ह्या नियमित पाणीपट्टीचा भरणा करीत नसल्याने पाणीपट्टीच्या थकबाकीमध्ये वाढ होते. तदनंतर सदर स्थानिक स्वराज्य संस्था थकबाकी न भरता थकबाकी माफीची मागणी करतात. ५) खाजगी संस्था व कंपन्या यांच्यासोबत पाणीपट्टीच्या अनुषंगाने उद्भवलेल्या न्यायालयीन प्रकरणांत मा. न्यायालयाच्या आदेशांविना पाणीपट्टीची वसुली करता येत नाही. या व्यतिरिक्त नगर विकास विभाग, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, ग्राम विकास विभाग यांच्याकडे पाणीपट्टी वसुलीबाबत वरंवार पाठपुरावा करुनही त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही. जलसंपदा विभागाने दिनांक १७.११.२०१६ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाचे काम पाटबंधारे महामंडळांकडे वर्ग करुन पाणीपट्टीच्या रकमेतून प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास पाटबंधारे विभागांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक १७.११.२०१६ पासून शासनाकडे जमा होणारी पाणीपट्टीची रक्कम आता पाटबंधारे महामंडळांकडे जमा होत आहे. तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने राज्यातील घरगुती, औद्योगिक व कृषि-सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणा-या पाण्याचे दर दिनांक ११ जानेवारी, २०१८ च्या आदेशान्वये सुधारीत केले आहेत.

<table>
<tr><th>पृ.क्र.</th><th>परिच्छेद</th><th>विषय</th><th>अहवालातील परिच्छेद</th><th>अभिप्राय</th></tr>
<tr>
<td>१७-१८</td>
<td>१.३.२.१</td>
<td>केंद्र शासनाकडून प्राप्त सहायक अनुदाने

राज्य योजनांतर्गत झालेली घट</td>
<td>केंद्र शासनाकडून प्राप्त होणारी सहाय अनुदाने २०१५-१६ मध्ये रु. १६,८९९ कोटी होती, त्यामध्ये २८ टक्के वाढ होऊन २०१६-१७ मध्ये रु. २१,६५३ कोटी झाली. वर्ष २०१६-१७ मधील ही वाढ प्रामुख्याने केंद्र योजनांतर्गत योजना (१४१ टक्के), योजनेतर अनुदाने (४९ टक्के) आणि केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत योजना (१२ टक्के) याअंतर्गत झाली होती. महसुली जमांच्या टक्केवारीतील केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या एकूण अनुदानांचा कल २०१२-१७ दरम्यान अस्थिर होता.

केंद्र योजनांतर्गत योजनांच्या अनुदानातील वाढ (रु. ९६९ कोटी) ही मुख्यत्वे ग्रामीण विकास (रु. ४३० कोटी) आणि राज्यघटनेच्या कलम २७५ (१) च्या परंतुका अंतर्गत अनुदानांमधील वाढीमुळे (रु. ६७७ कोटी) झाली होती. केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत योजनेतील अनुदानातील वाढ (रु.१,१२६ कोटी) ही प्रामुख्याने (अ) नगर विकास (रु. १,८६९ कोटी) यामधील वाढ (ब) ग्रामीण रोजगार रु. ४२१ कोटी) आणि (क) पीक संवर्धन (रु. ४७१ कोटी) यातील घट यांच्या निव्वळ परिणामी झाली होती. योजनेतर अनुदानातील वाढ (रु. २,९९३ कोटी) ही मुख्यत्वे इतर अनुदानांतर्गत (रु. २,६१० कोटी) झाली होती.

राज्य योजनांतर्गत योजनांमधील अनुदानांमध्ये प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २७५(१) खालील अनुदाने (ही अनुदाने मुलत: आदिवासी उपयोजनांसाठी असतात) आणि गट अनुदाने यांचा समावेश असतो.

२०१६-१७ मध्ये गट अनुदाने रु. ७४ कोटींनी (२६ टक्के) घटली आणि वर्धित वेग पाटबंधारे लाभ कार्यक्रम आणि इतर जल संबंधित योजनांसाठीची अनुदाने रु. ७८ कोटींनी घटली.</td>
<td>सन २०१५ मध्ये केंद्र पुरस्कृत योजनांच्या केंद्र : राज्य हिश्श्यांच्या प्रमाणात बदल झाला व ब-याच १००% केंद्र पुरस्कृत योजनांच्या केंद्र : राज्य हिश्श्यांचे प्रमाण ६०:४० व ५०:५० असे झाल्याने राज्याच्या दायित्वात वाढ झाली आहे व केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी तुलनेत कमी झाला आहे.

राज्य योजनांतर्गत झालेली घट (रु. कोटीत)
<table>
<tr><th colspan="5">भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २७५(१) खालील अनुदाने</th></tr>
<tr><td>२०१३-१४</td><td>२०१४-१५</td><td>२०१५-१६</td><td>२०१६-१७</td><td>२०१७-१८</td></tr>
<tr><td>१२४.८९</td><td>११७.०१</td><td>१३३.४७</td><td>११५.३७</td><td>१३८.९५</td></tr>
</table>
(i) आदिवासी विकास विभागास भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २७५(१)अंतर्गत विशेष केंद्रीय सहाय योजना, आदिम जमाती विकास योजना या अंतर्गत १००% केंद्र सहाय उपलब्ध केले जाते.या योजनांकरीता मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या कार्यकारी समितीमार्फत प्रस्ताव मंजूर करुन केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्यात येतात. जनजाती कार्य मंत्रालय, नवी दिल्ली येथील प्रोजेक्ट ॲप्रेझल समितीच्या बैठकीत मान्य झालेल्या प्रस्तावांना केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
वरील तक्ता पहाता,सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेला निधी सन २०१६-१७ च्या तुलनेत कमी असला तरी सन २०१७-१८ मध्ये जास्त निधी मिळाला आहे.सदर अनुच्छेदाअंतर्गत प्राप्त झालेला निधी हा गॅप फंडींग स्वरुपाचा असून निश्चित प्रमाणात वार्षिक निधी असे बंधन नाही. सदर निधी राज्याच्या मागणीप्रमाणे व उपलब्ध निधीप्रमाणे वितरीत होतो.
(ii) कें द्र शासनाकडून वर्धित वेग पाटबंधारे लाभ कार्यक्रम आणि इतर जल संबंधित योजनांसाठी सन २०१५-१६ मध्ये ३०८ कोटी व सन २०१६-१७ मध्ये रु. ३८० कोटी अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. यावरुन दिसून येते की, सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मध्ये रु. ७२ कोटींची वाढ झाली आहे.</td>
</tr>
</table>

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१९	१.३.२.२	केंद्रीय कर हस्तांतरण	चौदाव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत केंद्रीय करातील अधिक प्रक्रांतीमुळे केंद्रीय कर हस्तांतरणात २०१५-१६ मधील रु. २८,१०६ कोटीत २० टक्के वाढ होऊन २०१६-१७ मध्ये ती रु. ३३,७१५ कोटी झाली.	१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांना मिळणा-या केंद्रीय करांच्या हिश्श्याची टक्केवारी ३२ वरुन ४२ टक्के वाढ झाली. तसेच प्रामुख्याने निगम कर, आय कर, केंद्रिय उत्पादन शुल्क यामध्ये २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ मध्ये मोठी वाढ झाल्याने केंद्रीय कर हस्तांतरणात २०१५-१६ मधील रु. २८,१०६ कोटी वरुन सन २०१६-१७ मध्ये रु. ३३,७१५ कोटी पर्यंत वाढ झाली आहे.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
१९	१.३.२.३	कर तसेच सहाय्यक अनुदानांतील प्रक्रांतीची तुलना	केंद्र शासनाकडून चौदाव्या वित्त आयोगाच्या (अधिकृत कालावधी २०१५-१६ ते २०१९-२०) शिफारशींच्या स्वीकृतीनंतर, २०१५-१६ पासून केंद्रीय कराच्या निव्वळ प्राप्तीची राज्यांना प्रक्रांती ३२ टक्क्यांवरुन वाढवून ४२ टक्के करण्यात आली. चौदाव्या वित्त आयोगाच्या पहिल्या वर्षीच्या तुलनेत, चौदाव्या वित्त आयोगाच्या अधिकृत कालावधीच्या दुस-या वर्षादरम्यान, राज्याला दिलेल्या केंद्रीय करातील राज्यांच्या हिश्श्याच्या प्रक्रांतीमध्ये २० टक्के इतकी वाढ झाली. केंद्रीय करांतील राज्यांच्या हिश्श्याच्या वस्तु व सेवा यावरील इतर कर आणि शुल्क आणि उत्पन्न व खर्च यावरील इतर कर या व्यतिरिक्त सर्व घटकांमध्ये चढता कल दिसून आला होता. मुख्य वाढ केंद्रीय उत्पादन शुल्कामध्ये (४२ टक्के) झाली होती. त्या खालोखाल, निगम कर (२ टक्के) आणि आयकर (२२ टक्के) यामध्ये वाढ झाली होती.	१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांना मिळणा-या केंद्रीय करांच्या हिश्श्याची टक्केवारी ३२ वरुन ४२ टक्के वाढ झाली. तसेच प्रामुख्याने निगम कर, आय कर, केंद्रिय उत्पादन शुल्क यामध्ये २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ मध्ये मोठी वाढ झाल्याने केंद्रीय कर हस्तांतरणात २०१५-१६ मधील रु. २८,१०६ कोटी वरुन सन २०१६-१७ मध्ये रु. ३३,७१५ कोटी पर्यंत वाढ झाली आहे.

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
२०	१.३.२.४	केंद्र पुरस्कृत योजना	केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाने बाराव्या पंचवार्षिक योजनेतील विद्यमान केंद्र पुरस्कृत योजना, ६६ योजनांमध्ये पुनर्रचित केल्या होत्या (जुलै २०१३), ज्यामध्ये १७ महत्त्वपूर्ण कार्यक्रम (फ्लॅगशीप प्रोग्राम) होते. ७३ केंद्र पुरस्कृत योजना आणि अतिरिक्त केंद्र सहाय्यांतर्गत बाह्य स्रोतांकडून अर्थसहाय्य मिळालेल्या एका प्रकल्पापैकी राज्य शासन केंद्र पुरस्कृत योजना आखू शकते. आखल्या न गेलेल्या तीन केंद्र पुरस्कृत योजनांचा तपशील खाली दर्शविला आहे. • गृह विभागांतर्गत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि मानवी तस्करी विरोधी पथकांसाठी योजना (योजना सांकेतांक १३१९) ; • सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत अधिसूचित न केलेल्या (डी नोटीफाईड) इतर मागसवर्गीय आणि विमुक्त जमातीच्या शैक्षणिक विकासासाठीच्या योजना (योजना सांकेतांक ९१८८) ; आणि • सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत इतर मागास वर्ग सीएएसपी साठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (योजना सांकेतांक ९४९३)	गृह विभागांतर्गत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि मानवी तस्करी विरोधी पथकांसाठी योजनेखाली राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये Investigating Women for Crime Against Women यासाठी कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचेमधून युनिटची स्थापना करण्यात आली आहे. त्यांच्या वेतनावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी केंद्र शासनाने निधी मंजूर केला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत प्राप्त झाला असून त्यामधून अधिकारी कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च होत आहे. सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत **डी.एन.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. आंबेडकर मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती केंद्र पुरस्कृत योजना (योजना सांकेतांक ९१८८), इतर मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती केंद्र पुरस्कृत योजना (योजना सांकेतांक ९४९३)** या दोन्ही योजना नव्याने सुरु झालेल्या विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाच्या अंतर्गत राबविण्यास मान्यता मिळाली आहे.

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
२०-२१	१.४	भांडवली जमा	राज्य शासनाच्या भांडवली जमांमाध्ये ऋणेतर आणि ऋण जमा सम्मिलीत असतात, ज्यांचे घटक परिच्छेद 1.2.1 मध्ये चर्चिले आहेत. या वर्षातील लोक ऋण (केंद्र शासनाकडून खुल्या बाजारपेठेतून घेतलेली उधारी व कर्जे) जमेमध्ये (रु.48,337 कोटी) रु.47,710 कोटी अंतर्गत ऋण (98.7 टक्के) आणि केंद्र शासनाकडून कर्जे व अग्रीमे रु.627 कोटी (1.3) टक्के अंतर्भूत होती. अंतर्गत ऋणात खुल्या बाजारातील कर्जाचा 94 टक्के इतका लक्षणीय हिस्सा होता, त्याखालोखाल परक्राम्य (निगोशिएटेड) कर्जे (सहा टक्के) अंतर्भूत होती. भांडवली जमांच्या घटकांतील कल आणि लोक ऋण जमेचा काल-निहाय तपशील तक्ता 1.14 आणि तक्ता 1.15 मध्ये दर्शविला आहे. तक्ता 1.14 असे दर्शवितो की, 2015-16 मध्ये 28 टक्के असलेला भांडवली जमेच्या वाढीचा दर 2016-17 मध्ये 29 टक्क्यांपर्यंत वाढला. 2015-16 मधील ऋणेतर भांडवली जमेतील 9.5 टक्के ऋण (निगेटिव्ह) वाढीच्या तुलनेत 2016-17 मध्ये 97.8 टक्के धन (पॉझीटीव्ह) वाढीची नोंद झाली. 2012-13 मधील रु.22,588 कोटी भांडवली जमा वाढून 2016-17 मध्ये रु 50,082 कोटी झाली. भांडवली जमांमध्ये ऋण जमेचा लक्षणीय हिस्सा होता जो 2012-17 दरम्यान 96 टक्के ते 98 टक्के इतका होता. चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार एप्रिल 2015 पासून राज्यांचा राष्ट्रीय अल्पबचत निधी योजनेमधील सहभाग हा त्यांनी त्या तारखेपर्यंत (एप्रिल 2015) घेतलेल्या ऋणांचे दायित्व पूर्ण करण्याएवढाच मर्यादित आहे. चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार 2016-17 मध्ये राष्ट्रीय अल्पबचत निधी कर्जातील वाढ निरंक होती. 2016-17 मध्ये लोक ऋण जमेत 27 टक्के (रु.10,361 कोटी) इतकी वाढ झाली आणि लोक ऋण परतफेड 18 टक्क्यांनी (रु. 1,844 कोटी) वाढली, परिणामी, लोक ऋण जमेत रु. 8,516 कोटींची निव्वळ वाढ झाली.	राज्य शासनाने उभारलेल्या कर्जापैकी खुल्या बाजारातील कर्जाचा एकुण वार्षिक सरासरी व्याजदर (weighted average interest rate) ८.०७% आहे. सदर कर्ज इतर सर्व कर्जापेक्षा स्वस्त असल्याने, राज्य शासनाच्या अंतर्गत ऋणात खुल्या बाजारातील कर्जाचा हिस्सा लक्षणीय आहे. राष्ट्रीय अल्पबचत निधी वरील कर्जाचा भारीत सरासरी व्याजदर (weighted average interest rate)९ .६५% असल्याने चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार १ एप्रिल २०१५ पासुन सदर योजनेतंर्गत कर्ज घेणे बंद करण्यात आले आहे. सबब सदर कर्जातील वाढ निरंक आहे.

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
२२	१.४.१	कर्जे व अग्रिमांची वसुली	2012-17 दरम्यान राज्य शासनाने दिलेल्या कर्जे व अग्रिमांचा तपशील तक्ता 1.16 मध्ये दर्शविला आहे. कर्जे आणि अग्रिमांच्या वसुलीतील रु. 880 कोटी (102 टक्के) वाढ ही मुख्यत: 'वीज प्रकल्पांसाठी कर्जे' (रु. 779 कोटी), 'वनीकरण आणि वन्य जीवांसाठी कर्जे' (रु. 54 कोटी) आणि 'शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे' (रु. 32 कोटी) यातील अधिक वसुलीमुळे झाली होती. मागील पाच वर्षात वसुलीची टक्केवारी 3.5 टक्के ते 7.9 टक्के इतकी नगण्य होती. परतफेडातील थकबाकी आणि कायम स्वरुपी कर्जे याविषयीची संपूर्ण माहिती शासनाने सादर केली नव्हती.	शासनाने दिलेल्या विविध महामंडळे/सार्वजनिक उपक्रम/ सहकारी संस्था इत्यादींना दिलेली कर्जे/अग्रिमाची वसुली करण्याची जबाबदारी संबधित प्रशासनिक विभागाची आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षापासून बिम्स (BEAMS) या संगणक आज्ञावलीत कर्जाच्या संकलनाबाबत स्वतंत्र आज्ञावली विकसीत करण्यात आली असून सदर वित्तीय वर्षापासुन कर्जाची माहिती संकलीत करण्यात येत आहे. प्रशासकिय विभागांकडे कर्जाचे लेखे अद्यावत नसल्यामुळे व महालेखापाल कार्यालयाशी कर्जा लेख्यांचा ताळमेळ न घेतल्यामुळे कर्ज परतफेडीची व थकबाकी आणि कायम स्वरुपी कर्ज याविषयी संपुर्ण माहिती प्राप्त करण्याचे काम चालु आहे. या संदर्भातील विविध संगणकीकृत नमुने तयार करण्याचे काम राष्ट्रीय सुचना केंद्राकडून सुरु असून सदर काम पुर्ण झाल्यानतंर आवश्यक ती माहिती महालेखापाल यांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
२२	१.५	लोक लेखा जमा	अल्बचती, भविष्य निर्वाह निधी, राखीव निधी, ठेवी, निलंबने, वित्तप्रेषणे इत्यादी विशिष्ट व्यवहार जे राज्याच्या एकत्रीकृत निधीचा भाग नसताना, त्यांच्यामधील जमा आणि संवितरणे भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २६६ (२) अंतर्गत उभारण्यात आलेल्या लोक लेख्यांमध्ये ठेवली जातात आणि त्यासाठी राज्य विधानमंडळाची मंजूरी आवश्यक नसते. शासन या ठिकाणी सार्वजनिक पैशाची बँक/विश्वस्त म्हणून कार्य करते, कारण हे व्यवहार केवळ व्यवहार केवळ व्यवहार पूर्ण करण्यासाठी केलेले असतात. २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील लोक लेख्यांच्या अंतर्गत निव्वळ जमांचा कल **तक्ता १.१७** मध्ये दर्शविला आहे. **तक्ता १.१७** असे दर्शवितो की, २०१२-१७ या कालावधीत लोकलेखा जमा ५४.६ टक्क्यांनी वाढल्या. मागील वर्षाच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये झालेली रु.९,७१९ कोटी (१३.४ टक्के) वाढ ही ठेवी आणि अग्रीमे (रु.४,५०० कोटी), निलंबन आणि संकीर्ण (रु.३,६०३ कोटी) आणि राखीव निधी (रु.१,३४१ कोटी) यामध्ये झालेल्या वाढीमुळे होती.	या लेख्यामधील बाबींची नोंद महालेखापाल कार्यालयामार्फत होत असल्याने अहवालात महालेखापालांनी नमूद कलेले अभिप्राय वस्तुस्थितीदर्शक आहेत.
२३	१.६	साधनसंपत्तीचा वापर	राज्य शासनाच्या खर्चाच्या मुख्य जबाबदाऱ्या वेगवेगळया स्तरावर सोपविलेल्या असल्याने खर्चाच्या वाटपाच्या विश्लेषणास विशेष महत्व आहे. राजकोषीय जबाबदा-यांच्या नियमांच्या चौकटीत, तूट किंवा कर्जाऊ निधीचा वापर करुन सार्वजनिक खर्च अधिक करण्यावर अर्थसंकल्पीय नियंत्रणे येतात. त्यामुळे चालु असलेल्या राजकोषीय सुधारणा व राज्य स्तरावरील एकत्रीकरण प्रक्रिया या विशेषत: विकास व सामाजिक कल्याणप्रित्यर्थ करावयाच्या खर्चात बचत करुन केल्या जात नसल्याचे सुनिश्चित करणे महत्वाचे आहे.	महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीदर्शक आहेत.
२३	१.६.१	खर्चातील वाढ व त्याचे घटक	**आलेख १.१२** मध्ये मागील पाच वर्षातील (२०१२-१७) एकूण खर्चातील कल तसेच त्यांचे महसुली, भांडवली आणि कर्जे व अग्रिमे या अंतर्गत घटक दर्शविले आहेत. **एकूण खर्च** २०१२-१७ या वर्षातील एकूण खर्च व त्याचे घटक **तक्ता १.१८** आणि आलेख १.१३ मध्ये सादर केले आहेत. राज्याचा एकूण खर्च वर्ष २०१२-१३ मधील रु.१,५७,५५० कोटीवरुन २०१६-१७ मध्ये रु.२,४५,०५५ कोटीपर्यंत सरासरी ११.५ टक्क्यांनी वाढला, परंतु, २०१२-१३ मधील एकूण खर्चाशी भांडवली खर्चाची असलेली टक्केवारी ११ टक्क्यांवरुन कमी होऊन २०१६-१७ मध्ये १० टक्के झाली होती. एकूण खर्च, त्याचा वार्षिक वाढीव दर, एकूण खर्चाचे राज्याच्या सकल घरेलू उत्पादन आणि महसुली जमेशी असलेले गुणोत्तर आणि राज्याचे सकल घरेलू उत्पादन व महसुली जमेच्या संदर्भात	महालेखापाल कार्यालयाने प्रत्यक्ष खर्चाबाबत दिलेली आकडेवारी प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			त्याची प्लावकता **तक्ता १.१९** मध्ये दर्शविली आहे. २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान एकूण खर्चाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (१३.६ टक्के) सर्वसाधारण प्रवर्ग राज्यातील वाढीच्या दरापेक्षा (१५.८ टक्के) कमी होता. वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत वर्ष २०१६-१७ मधील एकूण खर्चाच्या वाढीचा दर (१४.४ टक्के) इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांच्या वाढीच्या दरापेक्षा देखील (१५.३ टक्के) कमी होता जे परिशिष्ट १.१ मध्ये दर्शविले आहे. **तक्ता १.१८** आणि **तक्ता १.१९** पुढे असे दर्शवितो की, मागील वर्षीच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये एकूण खर्चात झालेली रु.३०,७७३ कोटी (१४.४ टक्के) वाढ ही महसुली खर्चातील रु.२२,८५५ कोटी आणि भांडवली खर्चातील रु.२,७५६ कोटी वाढीमुळे होती. २०१२-१७ दरम्यान एकूण खर्च राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या जवळजवळ ११ टक्के होता एकूण खर्चाच्या ८३.५ टक्के (२०१६-१७८ ते ९०.७ टक्के (२०१२-१३) अशी महसुली जमेची टक्केवारी होती. **तक्ता १.१९** वरुन असे दिसून येते की, २०१२-१७ दरम्यान एकूण खर्चाच्या सरासरी ८६ टक्के खर्च महसुली जमांमधून करण्यात आला होता. २०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान राज्याच्या सकल घरेलू उत्पादन व महसुली जमेशी एकूण खर्चाच्या प्लावकतेचे गुणोत्तर मिश्र कल दर्शविते. राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या संदर्भात एकूण खर्चाच्या प्लावकतेचे गुणोत्तर जे २०१५-१६ मध्ये ०.६९२ होते ते २०१६-१७ मध्ये १.०७८ इतके वाढले. यावरुन असे दिसून येते की २०१६-१७ दरम्यान राज्याच्या सकल घरेलू उत्पादनातील प्रत्येक एक टक्का वाढीमागे एकूण खर्चात १.०७८ टक्क्यांची वाढ झाली महसूली जमेच्या तुलनेत एकूण खर्चाच्या प्लावकतेचे गुणोत्तर २०१५-१६ मधील ०.६८१ पासून २०१६-१७ मध्ये १.४०० असे वाढले होते. वर्ष २०१६-१७ मधील एकूण खर्चापैकी योजनेतर खर्च ७४ टक्के तर योजनांतर्गत खर्च २६ टक्के होता. एकूण खर्चामधील रु.३०,७७३ कोटीच्या वाढीपैंकी योजनेतर खर्चाचा हिस्सा ७९ टक्क्यांनी वाढला तर योजनांतर्गत खर्च २१ टक्क्यांनी वाढला. **कार्यानुरुप एकूण खर्चातील कल** कार्यानुरुप एकूण खर्चाचे विभाजन हे व्याज प्रदानसहीत सर्वसाधारण सेवा, सामाजिक व आर्थिक सेवा यावरील खर्च सहाय्यक अनुदाने व कर्जे व अग्रिमे असे करता येईल. एकूण खर्चातील या घटकांचा सापेक्ष हिस्सा **तक्ता १.२०** व **आलेख १.१४** मध्ये दर्शविला आहे. **तक्ता १.२०** मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण खर्चाच्या घटकांच्या हिश्यातील सापेक्ष बदल असे दर्शवितात की मागील वर्षाच्या तुलनेत एकूण खर्चातील सर्वसाधारण सेवा, सामाजिक सेवा, आर्थिक सेवा आणि कर्जे व अग्रिमे यांचा हिस्सा २०१६-१७ मध्ये घटला होता. सहाय्यक अनुदानाच्या व कर्जे व	

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			अग्रिमाच्या वाढीमुळे या घटीची भरपाई झाली. सामाजिक सेवांखालील घट ही मुख्यत्वे समाज कल्याण आणि पोषण (रु.१,७५२ कोटी) याखाली झाली होती. एकूण खर्चातील सहाय्यक अनुदानाचा हिस्सा रु.१,८६० कोटीने वाढला होता. सहाय्यक अनुदानातील वाढ ही मुख्यत्वे इतर अनुदाने (रु.२,६१० कोटी) या शीर्षाखाली झाली होती, जी राष्ट्रीय आपत्ती निवारण प्रतिसाद निधीतून सहाय्यक (रु.६३७ कोटी) आणि सामाजिक सुरक्षा आणि कल्याण (रु.१४३ कोटी) यामधील घटीमुळे कमी झाली. एकूण खर्चातील सर्वसाधारण, सामाजिक आणि आर्थिक सेवा यांचा हिस्सा २०१६-१७ मध्ये जरी कमी झाला होता तरी या सेवांवरील प्रत्यक्ष खर्च अनुक्रमे रु ७,५२९ कोटी, रु.८७२५ कोटी आणि रु.१२,५४६ कोटींनी वाढला होता. सर्वसाधारण सेवांतर्गत वाढ प्रामुख्याने व्याज प्रदाने आणि ऋण विमोचन (रु.३,१४१ कोटी) निवृत्ती वेतन व इतर सेवांनिर्वत्ती लाभ (रु.१,५३१ कोटी) व पोलीस (रु.१,८२२ कोटी) यामध्ये झाली. सामाजिक सेवांच्या हिश्श्यातील वाढ प्रामुख्याने सामान्य शिक्षण (रु.२,४२९ कोटी) आणि पाणी पुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण आणि नगर विकास (रु.५,०६१ कोटी) याखाली झाली होती. आर्थिक सेवांखालील वाढ प्रामुख्याने उर्जा (रु.४,४१५ कोटी), कृषी व संलग्न कार्ये (रु.३,९२२ कोटी), ग्रामिण विकास (रु.१,६३२ कोटी) आणि परिवहन (रु.१,३०१ कोटी) यामध्ये झाली. **महसुली खर्च** महसुली खर्चात २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ मध्ये रु.२२,८५५ कोटी (१२ टक्के) इतकी वाढ झाली. ही वाढ मुख्यत्वे सर्वसाधारण सेवा (रु.७,२४० कोटी), सामाजिक सेवा (रु.७,९६५ कोटी), आर्थिक सेवा (रु.५,७९१ कोटी) व सहाय्यक अनुदाने व अंशदाने (रु.१,८६० कोटी) यांच्या खर्चात झालेली वाढीमुळे झाली होती. २६ टक्के वाढ ही योजनांतर्गत शीर्षात झाली तर उरलेली ७४ टक्के वाढ ही योजनेतर शीर्षात झाली. २०१६-१७ चा महसुली खर्च (रु.२,१३,२२९कोटी) हा राज्य शासनाने राजकीय सुधारणा पथ/मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन/अर्थसंकल्प यामध्ये केलेल्या निर्धारणेपेक्षा पाच टक्के कमी होता. योजनेतर महसुली खर्च (रु.१,७१,१४० कोटी) राज्या शासनाने राजकोषीय सुधारण पथ (रु.१,७५,१९३ कोटी) यामध्ये केलेल्या प्रक्षेपणांपेक्षा देखील कमी होता (तक्ता १.२२). एकूण खर्चात महसुली खर्चाचा हिस्सा ८७ टक्के होता (आलेख १.१३) महसुली खर्चातील वाढ प्रामुख्याने पाणी पुरवठा व स्वच्छता, गृहनिर्माण आणि नगर विकास (रु.५,२९५ कोटी), शिक्षण क्रीडा, कला आणि संस्कृती (रु.२,४९१ कोटी), कृषी आणि संलग्न कार्य (रु.३,५८५ कोटी), ग्रामीण विकास (रु.१,४०९ कोटी), व्याज प्रदाने (रु.३,१४१ कोटी), निवृत्तीवेतन आणि इतर सेवानिवृत्ती लाभ (रु.१,५२१	

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			कोटी), पोलीस (रु.१,३८३ कोटी) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण (रु.९४९ कोटी) या शीर्षांतर्गत नोंदली गेली. **महसुली खर्चाच्या घटना** सेवांचा विद्यमान स्तर कायम राखण्यासाठी व मागील दायित्वाच्या प्रदानकरीता महसुली खर्च करण्यात येतो आणि म्हणून त्यामधून राज्याच्या पायाभूत सुविधा व सेवांच्या जाळयात कोणतीही भर पडत नाही. मागील पाच वर्षातील एकंदर महसुली खर्च, त्याच्या वाढीचा दर, राज्याचे सकल घरेलू उत्पादन आणि महसुली जमेशी योजनेतर महसुली खर्चाचे गुणोत्तर आणि राज्याचे सकल घरेलू उत्पादन व महसुली जमेशी महसुली खर्चाची प्लावकता **तक्ता १.२१** मध्ये दर्शविली आहे. राज्याचे सकल घरेलू उत्पादन व महसुली जमा या दोघांच्या संदर्भात महसुली खर्चाच्या प्लावकतेचे गुणोत्तर चढ-उतार दर्शवित होते. **योजनांतर्गत महसुली खर्च** प्रामुख्याने पाणी पुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण आणि नगर विकास (रु.४,१९० कोटी), ग्रामिण विकास (रु.४९० कोटी), परिवहन (रु.४९० कोटी), सर्वसाधारण सेवा (रु.४८१ कोटी) आणि सर्वसाधारण आर्थिक सेवा (रु.२६८ कोटी) यावरील खर्चात वाढ झाल्यामुळे मागील वर्षापेक्षा २०१६-१७ मध्ये योजनांतर्गत महसुली खर्च रु.६,०३३ कोटीनी (१७ टक्के) वाढला. **योजनेतर महसुली खर्च** २०१६-१७ मध्ये योजनेतर महसुली खर्चाचे महसुली खर्चातील प्रमाण ८० टक्के होते आणि मुख्यत्वे सर्वसाधारण सेवा (रु.६,७५८ कोटी), शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती (रु.२,२०३ कोटी), कृषी आणि संलग्न कार्ये (रु.३,५८२ कोटी), ग्रामीण विकास (रु.९१९ कोटी) आणि उर्जा (रु.८६१ कोटी) यामध्ये झालेल्या वाढीमुळे मागील वर्षाच्या तुलनेत हा खर्च रु.१६,८२२ कोटीने (११ टक्के) वाढला होता. महसुली जमेच्या टक्केवारीतील योजनेतर महसुली खर्च (**तक्ता १.२१**) असे दर्शवितो की सरासरी ८४ टक्के महसुली जमा योजनेतर महसुली खर्चासाठी वापरली गेली होती. चौदाव्या वित्त आयोगाने केलेली निर्धारणे आणि राज्य शासनाने राजकोषीय सुधारणा पथ आणि मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन/अर्थसकल्प यामधील प्रक्षेपण यांच्या संदर्भात योजनेतर महसुली खर्चाची तुलनात्मक स्थिती **तक्ता १.२२** मध्ये दिली आहे. असे दिसून येते की, मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनातील प्रमाणशीर निर्धारणे / अर्थसंकल्प / राजकोषीय सुधारणा पथ यातील प्रक्षेपणे यापेक्षा २०१५-१६ व २०१६-१७ दरम्यान योजनेतर महसुली खर्च कमी होता.	

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			वसुलीवरील खर्च महसुली जमांच्या चार मुख्य शीर्षाची एकूण जमा, त्याच्या वसुलीवरील खर्च आणि २०१५-१६ वर्षासाठीच्या एकूण वसुलीवरील खर्चाच्या संबंधित अखिल भारतीय सरासरी खर्चाच्या टक्केवरीसह एकूण वसुलीवर झालेल्या अशा खर्चाची तूलनात्मक टक्केवारी **तक्ता १.२३** मध्ये दिली आहे. असू दिसून येते की राज्यातील महसूल वसुलीवरील खर्च हा विक्री, व्यापार इत्यादीवरील कराच्या अखिल भारतीय सरासरी एवढा आहे आणि तो वाहनांवरील कराव्यतिरिक्त, राज्य उत्पादन शुल्क आणि मुद्रांक व नोंदणी शुल्क यांच्या अखिल भारतीय सरासरीपेक्षा कमी आहे. वाहनांवरील कराच्या वसुलीवरील खर्चात २०१४-१५ मध्ये रु.१,५०८ कोटी (एकूण वसुलीच्या २८ टक्के), २०१५-१६ मध्ये रु.१,११३ कोटी (एकूण वसुलीच्या १८.५ टक्के) आणि २०१६-१७ मध्ये रु.१,६२३ कोटी (एकूण वसुलीच्या २४.१ टक्के) इतक्या सबसिडीचा समावेश आहे. **सबसिडी** वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत राज्य शासनाने दिलेली सबसिडी **तक्ता १.२४** मध्ये दर्शविली आहे. **तक्ता १.२४** दशवितो की २०१५-१६ मधील सबसिडीवरील रु.१७,७६६ कोटी खर्चात १८ टक्क्यांनी वाढ होऊन वर्ष २०१६-१७ मध्ये तो रु.२०,९८४ कोटी इतका झाला होता. चालू वर्षात, एकूण महसुली खर्चातील सबसिडीचे प्रमाण जवळपास १० टक्के होते. ज्या प्रमुख योजनांसाठी सबसिडी देण्यात आली होती, त्यामध्ये कृषी आणि यंत्रमागावरील प्रशुल्कात कपात झाल्यामुळे वितरण/पारेषण अनुज्ञप्तीधारकांना दिलेली सबसिडी (३६ टक्के), श्रेणीबद्द सामुहीक प्रोत्साहन योजनांतर्गत मध्यम व मोठया उद्योगांना दिलेली सबसिडी (१३ टक्के), परिवहन आयुक्त (आठ टक्के), अन्नधान्य विषयक व्यवहार (सहा टक्के) आणि महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळाला वरिष्ठ नागरिकांच्या भाडयातील सवलतीसाठी पुनर्प्रदान (२.६ टक्के) यांचा समावेश होता. २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये शासनाने राजकोषीय सुधारणा पथामध्ये प्रक्षेपित केलेली सबसिडी आणि प्रत्यक्ष केलेला खर्च **तक्ता १.२५** मध्ये दर्शविला आहे. २०१६-१७ मधील विजेवरील सबसिडीसाठी अर्थसंकल्पात राखून ठेवलेल्या रु.५,२११ कोटीच्या तुलनेत त्यारील प्रत्यक्ष खर्च रु.७,६४१ कोटी झाला होता. मागील वर्षाच्या तुलनेत २०१६-१७ दरम्यान विजेवरील सबसिडी रु. ७६ कोटींनी (एक टक्का) कमी झाली होती. **तक्ता १.२५** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण /इतर या अंतर्गत २०१६-१७ दरम्यान झालेल्या प्रत्यक्ष खर्चात, (अ) २०१६-१७ मध्ये श्रेणीबध्द सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत मध्यम व मोठया	

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			उद्योगांना दिलेली रु.२,६३३ कोटींची सबसिडी (ब) परिवहन आयुक्तांना तोटयाच्या भरपाईसाठी दिलेली रु.१,६२३ कोटींची सबसिडी आणि (क) रु.१,२३८ कोटी अन्न सबसिडी, हे मुख्य घटक होते. **भांडवली खर्च** वर्ष २०१६-१७ मध्ये भांडवली खर्च (रु.२५,५४९ कोटी) हा एकूण खर्चाच्या १० टक्के होता (आलेख १.१३) आणि २०१५-१६ पेक्षा हा खर्च १२ टक्क्यांनी वाढला होता. ही वाढ मुख्यत्वे इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च (रु.१,४४३ कोटी), पाटबंधारे व पूर नियंत्रण यावरील भांडवली खर्च (रु.७०२ कोटी) आणि परिवहनावरील भांडवली खर्च (रु.७३६ कोटी) यातील वाढीमुळे झाली होती. २०१६-१७ मधील भांडवली खर्च (रु.२५,५४९ कोटी) हा राज्य शासनाने त्याच्या राजकोषीय सुधारणा पथामध्ये केलेल्या निर्धारणापेक्षा (रु.३३,३८६ कोटी) २३ टक्क्यांनी आणि मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन/अर्थसंकल्पीय अंदाज यामध्ये केलेल्या प्रक्षेपणापेक्षा (रु.३१,००६ कोटी) १८ टक्क्यांनी कमी होता. ज्या क्षेत्रात मोठया प्रमाणात वाढ झाली त्यावर परिच्छेद १.१.३ मध्ये भाष्य केले आहे. वर्ष २००७-०८ ते २०१५-१६ दरम्याने भांडवली खर्चाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (८.९ टक्के) हा सर्वसाधारण प्रवर्ग राज्यामधील वाढीच्या दरापेक्षा (१४.५ टक्के) कमी होता. परिशिष्ट १.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ दरम्यान भांडवली खर्चाच्या वाढीचा दर (१२.१ टक्के) सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांमधील वाढीच्या दराशी (१७.९ टक्के) तुलना करता कमी होता. **कर्जे व अग्रिमे** वर्ष २०१२-१६ दरम्यान कर्जे आणि अग्रिमे एकूण खर्चाच्या एक टक्का एवढया प्रमाणात होती आणि २०१६-१७ दरम्यान ती तीन टक्के होता (आलेख १.१३) २०१५-१६ पेक्षा २०१६-१७ मध्ये कर्जे व अग्रिमांचे संवितरण रु. ५,१६३ कोटींने वाढले.	

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
३३-३५	१.६.२	व्याज प्रदाने	प्रामुख्याने ऋण दायित्वातील वाढीमुळे राज्य शासनाच्या व्याज प्रदानात 2012-13 मधील रु. 19,076 कोटीवरुन 2016-17 मध्ये 50 टक्क्यांनी रु. 28,532 कोटींपर्यंत वाढ झाली, जे तक्ता 1.29 मध्ये दर्शविले आहे. 2012-17 दरम्यान महसुली जमेशी व्याज प्रदानाचे गुणोत्तर जवळजवळ स्थिर राहीले जे तक्ता 1.43 मध्ये दर्शविले आहे. तक्ता 1.28 मध्ये राज्य शासनाच्या चौदावा वित्त आयोग, राजकोषीय सुधारणा पथ आणि मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन यामध्ये केलेल्या निर्धारणांच्या संदर्भात प्रत्यक्ष व्याज प्रदान दर्शविली आहेत. राजकोषीय सुधारणा पथामधील प्रक्षेपणांच्या संदर्भात 2015-16 व 2016-17 मध्ये व्याज प्रदाने कमी होती. मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात केलेल्या प्रक्षेपणांच्या संदर्भात व्याज प्रदाने 2015-16 दरम्यान कमी होती परंतु 2016-17 दरम्यान अंशत: जास्त होती. 2012-17	राज्य शासनाने उभारलेल्या कर्जावरील व्याजप्रदानाचे मागील १२ वर्षातील महसूली जमेशी टक्केवारीचे प्रमाण खालील प्रमाणे असून ते केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मापदंडाच्या म्हणजे २०% च्या मर्यादेत आहे. (रू.कोटीत)

अ क्र	वर्ष	महसुली जमा	व्याज प्रदाने	महसुली जमेशी %
१	२००७-०८	७९,५८३	१२,९३२	१६.२५
२	२००८-०९	८१,२७१	१३,०२७	१६.०३
३	२००९-१०	८६,९१०	१४,८३८	१७.०७
४	२०१०-११	१,०५,८६८	१५,६४८	१४.७८
५	२०११-१२	१,२१,२८६	१७,५०५	१४.४३
६	२०१२-१३	१,४२,९४७	१९,०७६	१३.३४
७	२०१३-१४	१,४९,८२२	२१,२०७	१४.१५
८	२०१४-१५	१,६५,४१५	२३,९६५	१४.४९
९	२०१५-१६	१,८५,०३६	२५,७७१	१३.९३
१०	२०१६-१७	२०,४,६९३	२८,५३२	१३.९४
११	२०१७-१८	२,४३,६७२	३३,१०१	१३.५८

			दरम्यान राज्य शासनाने केलेल्या व्याज प्रदानांचा घटक निहाय तपशील तक्ता 1.29 मध्ये दिला आहे. 2016-17 च्या रु. 28,532 कोटी व्याज प्रदानात अंतर्गत ऋणावरील व्याज (रु. 23,553 कोटी), केंद्र शासनाकडून घेतलेल्या कर्जे व अग्रिमांवरील व्याज (रु. 469 कोटी) आणि अल्पबचती, भविष्य निर्वाह निधी इत्यादीवरील व्याज (रु. 4,509 कोटी) यांचा समावेश होता. बाजारातील कर्जांवरील व्याज प्रदानातील रु. 2,804 कोटी (21.6 टक्के) आणि ठेवीवरील व्याज प्रदानात रु. 955 कोटी (56 टक्के) वाढीमुळे 2015-16 मधील रु.20,816 कोटीच्या तुलनेत अंतर्गत ऋणावरील व्याजात 13.1 टक्के वाढ होऊन 2016-17 मध्ये ते रु.23,553 कोटी झाले, जी वाढ कृषी व ग्रामीण विकासासाठीच्या राष्ट्रीयकृत बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याजातील रु.12 कोटी (चार टक्के), राष्ट्रीय अल्पबचत निधी वरील व्याजातील रु.38 कोटी (0.5 टक्के) आणि इतर वित्तीय संस्थाकडून	१२ | २०१८-१९(BE) | २,८५,९६८ | ३४,३८५ | १२.०२ व्याज प्रदान कमी करण्यासाठी शासनाने खालील प्रमाणे उपाय योजना केली आहे. १.Buyback- सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात राज्य शासनाने पुर्वी उभारलेले जादा व्याज दराने (९.५०% व त्यापेक्षा) उभारलेल्या रु.११,२९० कोटी बाजार कर्जरोखे परत घेण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मदतीने अधिसुचना काढण्यात आली होती सदर अधिसुचनेनुसार मिळालेल्या प्रतिसादानुसार रु.१,०८२.६४६ कोटीचे कर्जरोखे परत घेण्यात आले आहेत त्यामुळे राज्य शासनाच्या व्याज प्रदानात बचत झाली आहे. २.Re-issue – सन २०१७-१८ पासुन खुल्या बाजारातुन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने Re-issue करुन कर्ज उभारणी करण्यात येत आहे. संबधित वित्तीय वर्षात उभारण्यात आलेल्या कमी व्याजदराचे कर्जरोखे पुन्हा Re-issue केल्याने व्याजदर कमी येऊन शासनाच्या महसूली खर्चात बचत होत आहे. ३.लघु मुदतीचे कर्ज रोखे- पुर्वी राज्य शासनाकडून केवळ १० वर्ष मुदतीचे कर्जरोखे उभारण्यात येत असत. सन २०१७-१८ पासुन ३ ते १५ वर्ष मुदतीचे कर्जरोखे उभारण्यात येत आहेत. त्यामुळे कमी मुदतीच्या व कमी रक्कमेच्या लिलावात कमी व्याज दराने शासनाला कर्ज उभारणी करता येत आहे. कर्जरोख उभारणीच्या वेळी लिलावात जादा व्याज दराचे कर्जरोख नाकारण्याचे धोरण

			घेतलेल्या कर्जावरील व्याजातील रु.27 कोटी (16 टक्के) घटीमुळे अंशत: कमी झाली. 2016-17 दरम्यान भारतीय रिझर्व बँकेकडून कोणतीही अर्थोपाय अग्रिमे घेण्यात आली नव्हती.	शासनाने अवलंबिले आहे. ४.राज्य शासनाकडे NSSF, LIC,PFC, NCDC, HUDCO या वित्तीय संस्थाकडून पूर्वी घेतलेले जास्त व्याज दराचे कर्ज प्रलंबित आहे. सदर कर्ज One time settlement व्दारे परतफेड करण्याबाबत राज्य शासनाचे प्रयत्न सुरु आहे. या संदर्भात Pre-payment Charges माफ करण्याबाबत वरिष्ठ स्तरावरुन केंद्र शासनाला विनंती करण्यात आली आहे.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
३६	१.६.४.१	सार्वजनिक खर्चाची पर्याप्तता	सामाजिक क्षेत्र व आर्थिक पायाभूत सुविधा यांच्याशी संबंधित राज्य शासनावर सोपवलेली खर्चाची दायित्वे हे मुख्यत: राज्याचे विषय आहेत. मानव विकासाची पातळी उंचावण्यासाठी शिक्षण, आरोग्य इ. सारख्या मुख्य सामाजिक सेवांवरील खर्च राज्याने वाढवणे गरजेचे असते. एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील गुणोत्तर जर संबंधित राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असेल, तर ते कमी राजकोषीय प्राधान्य (एकूण खर्चाशी एखाद्या प्रवर्गाखाली खर्चाचे गुणोत्तर) दर्शविते. २०१३-१४ व २०१६-१७ दरम्यान विकास खर्च, सामाजिक खर्च व भांडवली खर्च यासाठी राज्य शासनाने दिलेल्या राजकोषीय प्राधान्याचे विश्लेषण खालील **तक्ता १.३१** मध्ये दर्शविले आहे. **तक्ता १.३१** मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्य शासनाच्या रोजकोषीय प्राधान्याचे विश्लेषण खालील प्रमाणे : • २०१३-१४ मधील राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाशी एकूण खर्चाचे गुणोत्तर (१०.७ टक्के) सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांशी तुलना करता (१४.८ टक्के) २०१३-१४ मध्ये कमी होते आणि २०१६-१७ मधील सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांच्या गुणोत्तराशी (१६.७ टक्के) तुलना करता ते १०.८ टक्के इतके बरेच कमी होते. • राज्याचे २०१३-१४ व २०१६-१७ मधील विकास खर्च/एकूण खर्च गुणोत्तर (६७.५ टक्के व ६७ टक्के) सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांशी तुलना करता (७० टक्के व ७०.९ टक्के) कमी होते. • राज्याचे २०१३-१४ व २०१६-१७ मधील सामाजिक क्षेत्र खर्च/एकूण खर्च यांचे गुणोत्तर (४१.५ टक्के ३८.४ टक्के) सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांशी तुलना करता (३८.२ टक्के व ३२.२ टक्के) जास्त होते. याचा अर्थ सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राने सामाजिक क्षेत्रावरील खर्चासाठी अधिक प्राधान्य दिले होते. • राज्याचे २०१३-१४ व २०१६-१७ मधील आर्थिक क्षेत्र / एकूण खर्चाचे गुणोत्तर (२६ टक्के व २८.६ टक्के) सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांशी (२९.८ टक्के व ३५.१ टक्के) तुलना करता कमी होते. • सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांशी (१३.७ टक्के व १९.७ टक्के) तुलना करता २०१३-१४ व २०१६-१७ मधील राज्याचे भांडवली खर्च / एकूण खर्चाचे गुणोत्तर (११.३ टक्के व १०.५ टक्के) कमी होते. • २०१३-१४ मधील ४.२ टक्क्यांशी तुलना करता आरोग्य व कुटुंब कल्याणावरील खर्चाच्या एकूण खर्चाशी	महालेखापाल कार्यालयाने नमूद केल्याप्रमाणे राज्याने इतर राज्यांच्या तुलनेत सामाजिक क्षेत्रावरील खर्चासाठी अधिक प्राधान्य दिलेले आहे. याचे प्रमुख कारण राज्यामध्ये निर्माण करण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा राज्य शासनाच्या अखत्यारीतील महामंडळे इ. मार्फत राबविण्यात येतात. तसेच इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये आरोग्य सुविधा खाजगी संस्थांमार्फत मोठया प्रमाणात देण्यात येत असल्याने राज्याला आरोग्य सुविधांसाठी जास्त तरतूद करण्याची आवश्यकता भासली नाही. त्यामुळे सामाजिक सेवेमध्ये राज्य शासन शिक्षण, वैयिक्तिक लाभाच्या योजना इ. साठी निधी उपलब्ध करु शकले.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			गुणोत्तरात फेरबदल होऊन २०१६-१७ मध्ये तो ४.४ टक्के झाला. २०१३-१४ व २०१६-१७ मध्ये सर्वसाधारण प्रवर्ग राज्याच्या प्राधान्याच्या तुलनेत महाराष्ट्रात या क्षेत्राला कमी प्राधान्य दिले होते.	
३८	१.६.४.२	खर्चाच्या वापराची कार्यक्षमता आणि परिणामकारकता	सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून विकास शिर्षाखाली केलेल्या सार्वजनिक खर्चाचे महत्व विचारात घेता, राज्य शासनाने चांगल्या दर्जाची महत्वाची सार्वजनिक साधने१६ पुरविण्यावर भर देऊन खर्चाची कार्यक्षमता वाढविणारे सुयोग्य उपचार करावेत. विकास खर्चासाठी१७ अतिरिक्त वाटप करण्याबरोबरच, एकूण खर्चाशी भांडवली खर्चाची टक्केवारी आणि सामाजिक व आर्थिक सेवांवरील कार्यचालन व देखभाल यावरील महसूली खर्चाचे प्रमाण यावरुन खर्चाची कार्यक्षमता दर्शविली जाते. एकूण खर्चातील या घटकांची टक्केवारी जेवढी जास्त तेवढी खर्चाची गुणवत्ता अधिक असल्याचे समजले जाते. चालु वर्षाची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके व मागील वर्षातील प्रत्यक्ष खर्च यांच्या सापेक्ष चालू वर्षातील राज्याच्या एकूण खर्चाच्या संबंधात विकास खर्चातील कल **तक्ता १.३२** आणि **आलेख १.१६** मध्ये सादर केला आहे. **विकासावरील महसुली खर्च** वर्ष २०१५-१६ मधील रु.१,२०,३६९ कोटीवरुन विकासावरील महसुली खर्च रु.१३,७५६ कोटीने वाढून २०१६-१७ मध्ये रु.१,३४,१२४ कोटी इतका झाला. ही वाढ सामाजिक सेवा (रु.७,९६५ कोटी) आणि आर्थिक सेवा (रु.५,७९१) यामध्ये झाली. राज्याच्या अर्थसंकल्पीय प्रक्षेपणापेक्षा विकासावरील प्रत्यक्ष महसुली खर्च रु.५,०८९ कोटीनी कमी होता. **विकासावरील भांडवली खर्च** वर्ष २०१५-१६ मधील रु.२१,५३४ कोटीवरुन विकासावरील भांडवली खर्च रु.२,४६७ कोटीने वाढून २०१६-१७ मध्ये रु.२४,००१ कोटी इतका झाला. आर्थिक सेवा (रु.१,७८५ कोटी) व सामाजिक सेवा (रु.६८२ कोटी) या अंतर्गत वाढ झाली. परिवहन वरील भांडवली खर्च (रु.७३५ कोटी), पाटबंधारे आणि पुर नियंत्रणावरील भांडवली खर्च (रु.७०२ कोटी) व सर्वसाधारण आर्थिक सेवावरील भांडवली खर्चातर्गत महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी (रु.४७७ कोटी) यातील वाढ हे वाढीचे मुख्य घटक होते. राज्याच्या	महालेखापाल कार्यालयाने नमूद केलेली आकडेवारी प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे. अर्थसंकल्पीत केलेला निधी हा आगामी वर्षामध्ये हाती घ्यावयाच्या योजनांसाठी उपलब्ध करुन देण्यात येतो. तसेच वर्षभरामध्ये ज्या खर्चाला प्राधान्यक्रम दिलेला नसतो अथवा नव्याने खर्च उद्भवू शकतो, त्यामुळे खर्च करताना प्राप्त होणारा महसूल व कर्ज यांची सांगड घालून खर्च नियंत्रणात ठेवावा लागतो. त्यामुळे काही क्षेत्रांमध्ये अधिक खर्च व काही क्षेत्रांमध्ये कमी खर्च होणे अपेक्षित आहे.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			अर्थसंकल्पातील प्रक्षेपणापेक्षा विकासावरील प्रत्यक्ष भांडवली खर्च रु.५,११६ कोटीने कमी होता. **विकास कामांसाठी घेतलेली कर्जे आणि अग्रिमे** विकास कामांसाठी कर्जे व अग्रिमे वर्ष २०१५-१६ मधील रु.५१२ कोटीवरी २०१६-१७ मध्ये रु.५,५६० कोटीपर्यंत म्हणजे रु.५,०४८ कोटीनी वाढली. प्रत्यक्ष विकासासाठीची कर्जे व अग्रिमे राज्याच्या अर्थसंकल्पीय प्रक्षेपणापेक्षा रु.४,७८६ कोटीनी जास्त होती. **निवडक सामाजिक आणि आर्थिक सेवांवर कार्यक्षमतेने केलेला खर्च** निवडक सामाजिक आणि आर्थिक सेवांमधील महसुली खर्चातील वेतन व मजुरी आणि कार्यचालन आणि देखभाल यांच्या हिश्श्याच्या टक्केवारीचा तपशील **तक्ता १.३३** मध्ये देण्यात आला आहे. या निवडक सेवांमधील एकूण खर्चातील भांडवली खर्चाचे गुणोत्तरदेखिल यावरुन दर्शविले जाते. **तक्ता १.३३** मध्ये सादर केलेल्या कलावरुन असे दिसून येते की एकूण खर्चाशी विकासावरील भांडवली खर्चाची टक्केवारी २०१५-१६ मधील १५.१ टक्क्यांवरुन २०१६-१७ मध्ये १४.७ इतकी कमी झाली. सामाजिक सेवावरील भांडवली खर्चाची एकूण खर्चाशी २०१५-१६ मधील तीन ही टक्केवारी २०१६-१७ मध्ये ३.५ एवढी वाढली. ही वाढ मुख्यत्वे इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च (नैसर्गिक आपत्ती) हयामध्ये झाली होती. आर्थिक सेवावरील भांडवली खर्चाची एकूण खर्चाशी २०१५-१६ मधील ३३ ही टक्केवारी २०१६-१७ मध्ये २९.६ इतकी कमी झाली. ही घट प्रामुख्याने ऊर्जा, कृषी व संलग्न कार्ये या शिर्षाखाली झाली होती जी परिवहन, पाटबंधारे आणि पुरनियंत्रण कार्यातील वाढीमुळे कमी झाली. वेतन आणि मजुरीचा महसुली खर्चातील २०१५-१६ मधील ४० टक्के हिस्सा २०१६-१७ मध्ये ४१.२ टक्क्यांपर्यंत वाढला. सामाजिक सेवांवरील महसुली खर्चातील वेतन आणि मजुरीचा २०१५-१६ मधील ५०.८ टक्के असलेला हिस्सा २०१६-१७ मध्ये ५३.५ टक्क्यांपर्यंत वाढला. ही वाढ मुख्यत्वे शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती, आरोग्य आणि कुटुंब कल्याण व पाणी पुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण, नगर विकास या शीर्षाखाली झाली. आर्थिक सेवांवरील महसुली खर्चातील वेतन आणि मजुरीचा २०१५-१६ मधील १६.७ टक्के हिस्सा २०१६-१७ मध्ये १६ टक्क्यांपर्यंत कमी झाला. ही घट प्रामुख्याने कृषी व संलग्न कार्ये, पाटबंधारे व पूर नियंत्रण, ऊर्जा व परिवहन ह्या शीर्षाखाली झाली.	

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			महसुली खर्चातील कार्यचालन आणि देखभालीचा हिस्सा जो २०१५-१६ मध्ये ३.१ टक्के होता, तो २०१६-१७ मध्ये १.७ टक्क्यांपर्यंत कमी झाला. सामाजिक सेवांवरील महसुली खर्चातील कार्यचालन आणि देखभालीचा हिस्सा जो २०१५-१६ मध्ये १.५ टक्के होता, तो २०१६-१७ मध्ये ०.६ टक्क्यांपर्यंत कमी झाला. ही घट प्रामुख्याने आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पाणी पुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण व नगर विकास व शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती या शीर्षांखाली झाली होती. आर्थिक सेवांवरील महसुली खर्चातील कार्यचालन आणि देखभालीच्या हिश्श्यामध्ये देखिल घट होऊन २०१५-१६ मध्ये असलेल्या ६.७ टक्क्यांवरुन तो २०१६-१७ मध्ये ४.१ टक्क्यांपर्यंत कमी झाला. ही घट प्रामुख्याने परिवहन या शीर्षाखाली दिसून आली.	

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालातील परिच्छेद क्र. १.७.१.१ वरील शासनाचे अभिप्राय.

परिच्छेद क्र.	परिच्छेद	शासनाचे अभिप्राय
१.७.१.१	**प्रकल्पांवरील खर्च व त्यांच्या कार्यान्वयनातील विलंब** जलसंपदा विभागांतर्गत पाच पाटबंधारे विकास महामंडळात ४२८ पाटबंधारे प्रकल्प प्रगतीपथावर होते. ह्या प्रकल्पाचे काम किती वर्षापासून कार्यान्वयित होणाच्या टप्यावर होते याचे निर्धारण करण्यासाठी प्रगतीपथावर असलेल्या सर्व प्रकल्पांच्या महामंडळाने सादर केलेल्या माहितीचे लेखापरीक्षेत विश्लेषण केले गेले. **तक्ता १.३४** मध्ये त्याची संक्षिप्त स्थिती दिली आहे.	**प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी होणा-या विलंबाची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.** १.प्रकल्पाला मूळ प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर वन, पर्यावरण इ. वैधानिक मान्यता घेण्यासाठी मोठा कालावधी लागतो. २.भूसंपादन व पुनर्वसन या कामास प्रकल्पबाधितांच्या विरोधामुळे, न्यायालयीन प्रकरणामुळे व प्रशासकीय बाबींमुळे विलंब होतो. ३.पुरेशा निधी उपलब्धतेअभावी विलंब होतो. ४.कालवा व वितरण व्यवस्थेचे सविस्तर सर्वेक्षण तसेच प्रकल्प घटकांचे सविस्तर संकल्पचित्र तयार करण्यास अधिक कालावधी लागतो. ५.स्थानिक जनता, प्रकल्पबाधित व्यक्ती तसेच लोकप्रतिनिधी यांच्या आग्रही मागणीमुळे व्याप्तीत बदल करावी लागल्याने प्रकल्पांच्या कामास विलंब होतो.

तक्ता १.३४ : जलसंपदा विभागामध्ये प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांची काल-निहाय रुपरेखा

काल निहाय रुपरेखा	एकूण योजना			
मुळ प्रशासकीय मंजूरीच्या तारखेपासून	**मोठे**	**मध्यम**	**लघु**	**एकूण**
३० वर्षापेक्षा जास्त	२८	१८	३१	७७
२० वर्षापेक्षा जास्त पण ३० वर्षापर्यंत	१८	२१	३१	७०
१५ वर्षापेक्षा जास्त पण २० वर्षापर्यंत	९	१५	२४	४८
१० वर्षापेक्षा जास्त पण १५ वर्षापर्यंत	२	५	४४	५१
५ वर्षापेक्षा जास्त पण १० वर्षापर्यंत	३	२४	१२७	१५४
५ वर्षापर्यंत	०	४	१	५
कामे सुरु झालेली नाहीत	६	०	१७	२३
एकूण	**६६**	**८७**	**२७५**	**४२८**

स्त्रोत : पाटबंधारे विकास महामंडळांनी सादर केलेली आकडेवारी; मार्च २०१७ ची स्थिती

तक्ता १.३४ वरुन असे दिसुन येते की, १९५ प्रकल्प (४५.६ टक्के) १५ वर्षापेक्षा अधिक काळ प्रगतीपथावर होते त्यापैकी ७७ प्रकल्प (१८ टक्के) ३० वर्षापेक्षा अधिक काळ प्रगतीपथावर होते.

कृ.मा.प.

प्रकल्पांच्या किंमत वाढीची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

१.दरसूचीतील वाढ
२.प्रकल्पाच्या आवश्यक जमिनीच्या किंमतीतील वाढ
३.गौण खनिजांच्या स्वामित्व शुल्कातील वाढ
४.अनुज्ञेय पुनर्वसन अनुदानातील वाढ
५.तपशिलवार संकल्पनातील बदलांमुळे काही बाबींच्या परिमाणातील वाढ

तक्ता १.३५ : सर्व प्रगतीपथावरील प्रकल्पांवर झालेला प्रत्यक्ष खर्च व अंदाजित किंमत

(रु. कोटीत)

पाटबंधारे विकास महमंडळ	प्रकल्पांची संख्या	मूळ प्रशासकीय मंजुरी	खर्च	अंदाजित किंमत
गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ	६३	४६६५.२४	१६११७.५०	३४५२२.२७
तापी पाटबंधारे विकास महामंडळ	३५	३११६.६९	४८७४.०९	१३९३१.६६
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ	२२०	११३४३.६५	२९३५८.४९	६६९०९.५४
महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ	५४	९२८०.८२	१८५७६.४०	४३६८६.८५
कोकण पाटबंधारे विकास महामंडळ	५६	१४८३.३५	७८५८.३०	१८७५२.४२
एकूण	**४२८**	**२९८८९.७५**	**७६७८४.७८**	**१७७८०२.७२**

स्त्रोत : संबंधित पाटबंधारे विकास महामंडळांनी सादर केलेली माहिती

तक्ता १.३५ वरुन असे निदर्शनास येते की, ४२८ प्रगतीपथावरील प्रकल्पांची अंदाजीत किंमत रु.१,७७,८०२.७७ कोटी होती. याप्रमाणे प्रत्यक्ष खर्च रु.७६,७८४.७८ कोटी होता. बराच कालावधी उलटून गेल्या नंतरही या प्रगतीपथावरील प्रकल्पांवर झालेल्या खर्चातून अपेक्षित लाभ प्राप्त झालेला नाही.

६.प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदल

७.प्रकल्प पूर्ण करण्याच्या नियोजित कालावधीमध्ये निरनिराळया मंजुऱ्या मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे झालेली दरसूचीतील वाढ

८.प्रकल्पासाठी प्राप्त होणाऱ्या अपुऱ्या आर्थिक तरतूदीमुळे प्रकल्पाच्या कामाची गती कमी होणे

९.प्रकल्पग्रतांच्या विरोधामुळे प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यास होणारा विलंब

१०.प्रकल्पग्रस्तांना नवीन गावठाणात द्यावयाच्या वाढीव नागरी सुविधा

११.प्रकल्पासाठी लागणाऱ्या वन जमिनीसाठी पर्यायी वनिकरणाचे वाढलेले दर.

१२.नक्तवर्तमान मूल्य (NPV) व त्याचे वाढलेले दर

१३.आस्थापना, हत्यारे व संयंत्रे वगैरेच्या खर्चातील वाढ

१४.बांधकामासाठी आवश्यक साहित्य निर्धारित खाणीमध्ये आवश्यक त्या परिमाणात उपलब्ध न झाल्याने खाण बदलामुळे होणारी वहन अंतरातील वाढ.

उपरोक्त कारणांमुळे प्रकल्प पूर्ण होण्यास प्रदीर्घ कालावधी लागतो. दरम्यानच्या काळात प्रकल्पासाठी लागणा-या साहित्याच्या, मशिनरीचे व मजुरीचे दरात तसेच जमिनीच्या किंमतीत वाढ होत असते. त्यामुळे प्रकल्पांची किंमत वाढत जाते. तरी उपरोक्त खुलासा मान्य करण्यात यावा, ही विनंती.

महालेखापालांचे आक्षेप

The action taken by Water Resources Department to reduce the delay in completion of projects may be explained to PAC.

प्रकल्पांच्या कार्यान्वयनातील विलंब टाळण्यासाठी जलसंपदा विभागाने खालील उपाययोजना केल्या आहेत.

१. निधीचे वाटप करतांना खालीलप्रमाणे प्राधान्यक्रम ठरविण्यात आला आहे.

प्राधान्य-१ :- चालू वर्षात पुर्ण होणारे प्रकल्प.

		प्राधान्य-२ :- पुढील वर्षात पुर्ण होणारे प्रकल्प. प्राधान्य-३ :- पाणीसाठा निर्माण झाला आहे अशा प्रकल्पांची वितरण व्यवस्था पुर्ण करुन सिंचन क्षमता निर्मिती प्रस्तावित असलेले प्रकल्प. प्राधान्य-४ :- घळभरणी प्रस्तावित असलेले प्रकल्प. प्राधान्य-५ :- अन्य प्रकल्प. २. संकल्पचित्रांच्या मान्यतेसाठी व सुप्रमा प्रस्तावांच्या मान्यतेसाठी दुस-या राज्य तांत्रिक सल्लागार समितीची नेमणूक करण्यात आली आहे. ३. दर्जेदार पुनर्वसन सुविधांना मान्यता देण्यात आल्या आहेत. ४. नविन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादनाचा वाढीव मोबदला देण्यात येत आहे.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालातील परिच्छेद क्र. १.७.२ वरील शासनाचे अभिप्राय.

परिच्छेद क्र.	परिच्छेद	शासनाचे अभिप्राय
१.७.२	(खाली पहा)	(खाली पहा)

परिच्छेद क्र. १.७.२ — परिच्छेद

गुंतवणूक आणि परतावा

शासनाने ३१ मार्च २०१७ पर्यंत, शासनाने वैधनिक महामंडळे, ग्रामीण बँका, संयुक्त स्कंध कंपन्या व सहकारी संस्थांमध्ये रु.१,२९,९८३ कोटी गुंतविले होते (तक्ता १.३६). या गुंतवणूकीवर २०१२-१७ दरम्यान सरासरी परतावा ०.०४ टक्के होता, तर शासनाने त्याच्या कर्जावर या काळात सरासरी ७.६ टक्के दराने व्याज दिले होते.

तक्ता १.३६ : गुंतवणुकीवरील परतावा

गुंतवणुक/परतावा/कर्जाची किंमत	२०१२-१३	२०१३-१४	२०१४-१५	२०१५-१६	२०१६-१७
वर्षअखेर असलेली गुंतवणुक (रु. कोटीत)	९०६७७.८४	१०१८६७.२	११०६७१.६९	१२०३१०.९७	१२९९८३.७९
परतावा (रु. कोटीत)	४७	१९.६८	२८.१४	५७.२७	६६.८१
परतावा (टक्केवारी)	०.०५	०.०२	०.०३	०.०५	०.०५
शासनाच्या कर्जावरील सरासरी व्याज दर (टक्केवारी)	७.४	७.५	७.८	७.७	७.६
व्याजदर आणि परताव्यामधील तफावत (टक्केवारी)	७.४	७.५	७.८	७.७	७.६
स्त्रोत : संबंधीत वर्षाचे वित्तीय लेखे					

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (रु.३,७८५ कोटी), गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (रु.१,६२९ कोटी), महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (रु.१,२८५ कोटी), तापी पाटबंधारे विकास महामंडळ (रु.८१३ कोटी), कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (रु.५४१ कोटी), महाराष्ट्र पाटबंधारे वित्त कंपनी मर्यादीत (रु.५४१ कोटी), महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळ (रु.४८७ कोटी), महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती महामंडळ (रु.३९३ कोटी) आणि महाराष्ट्र जलसंधारण विकास महामंडळ (रु.१२० कोटी) यांना दिलेल्या भांडवली अंशदानामुळे २०१६-१७ दरम्यान गुंतवणुकीत रु.९,६७३ कोटी वाढ झाली.

३१ मार्च २०१७ रोजी, शासनाने रु.४,७८५.२७ कोटी (भाग भांडवल : रु.४,६१३.५४ कोटी आणि कर्जे : रु.१७१.७३ कोटी) गुंतविलेल्या २६ कंपन्या (परिशिष्ट १.८) तोट्यात होत्या व त्यांचा ऑगस्ट २०१७ पर्यंत निव्वळ संचयी तोटा हा रु.४६,६१५.९१ कोटी होता.

शासनाचे अभिप्राय

जलसंपदा विभागांतर्गत येणा-या ५ सिंचन विकास महामंडळात राज्य शासनाच्या वाढीव भांडवली अंशदानातून सन २०१२-१३ मध्ये रु.६७३५ कोटी इतकी वाढ झाली आहे. दि.३१/०३/२०१८ रोजी प्रगतीपथावरील पाटबंधारे प्रकल्पांच्या कामांची उर्वरित किंमत रु.८३६६४ कोटी एवढी आहे.

महाराष्ट्र राज्यात पावसाचे प्रमाण व्यस्त आहे. काही भागात ४००० मी.मी. पेक्षा जास्त पाऊस पडतो तर त्याच वर्षी काही भागात ४०० मी.मी. पेक्षा कमी पाऊस पडतो. राज्यातील ग्रामीण भागातील जनता शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे जास्तीत जास्त क्षेत्रास सिंचनाची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंपदा विभागांतर्गत ५ पाटबंधारे विकास महामंडळांची स्थापना करणेत आली. या महामंडळांनी सुरवातीच्या काळात कर्जरोख्याच्या माध्यमातून निधी उभारला होता. नंतर मात्र शासनातर्फे भांडवली अंशदान उपलब्ध करुन देणेत येत आहे.

जलसंपदा प्रकल्पाचे काम पूर्ण करुन त्याद्वारे अडविलेल्या पाण्यातून शेतक-यांना व शासनाला लाभ मिळणे यास काही कालावधी लागतो. सन २०१२-१३ या वर्षात जलसंपदा खात्याकडील एकूण ६७० प्रकल्पांची कामे चालू होती. सन २०१८-१९ चे अंदाजपत्रक तयार करतांना ३३४ प्रकल्पांची कामे चालू आहेत. त्यामुळे शासन

	सात कंपन्या/ महामंडळे ज्यांचे पेडअप भांडवल रु.१,१८७.९३ कोटी होते, त्यांच्या संचयी तोट्यामुळे निव्वळ मुल्यात रु.१,८५४.१६ कोटीची हानी झाली होती. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी सादर केलेल्या माहितीनुसार एकुण रु.३९०.८८ कोटीची शासकीय गुंतवणूक (समभाग : रु.१५३.०३ कोटी व कर्जे : रु.२३७.८५ कोटी) असलेल्या ७,४६५ संस्थांपैकी ३,४९८ संस्थांमधील संचयी तोटा रु.२२४.२६ कोटी होता (३१ मार्च २०१७) जो संस्थांमध्ये केलेल्या प्राथमिक गुंतवणूकीच्या (रु.१८३.४६ कोटी) १२२ टक्के होता. तसेच १,२११ संस्था, ज्यामध्ये शासनाने मार्च २०१७ पर्यंत रु.८७.३३ कोटी इतकी गुंतवणूक केली होती, त्या दिवाळखोरीत निघाल्या.	बांधकामाधीन प्रकल्प पुर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे. शेतक-याच्या जमिनीला सिंचनाची सोय उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.
	महालेखापालांचे आक्षेप The action taken on loss making companies having Government investment may be explained to PAC.	परिशिष्ट १.८ मध्ये दर्शविलेल्या ज्या कंपन्या तोट्यात होत्या व त्यांचा ऑगस्ट २०१७ पर्यंत निव्वळ संचयी तोटा रु.४६,६१५.९१ कोटी होता. त्यात जलसंपदा विभागाशी संबंधीत महामंडळ अथवा कंपन्यांचा समावेश नाही.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा राज्य वित्त व्यवस्थेवरील दि.31 मार्च, 2017 रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
42	1.7.2	गुंतवणूक व परतावा	31 मार्च, 2017 पर्यंत, शासनाने वैधानिक महामंडळे, ग्रामीण बँका, संयुक्त स्कंध कंपन्या व सहकारी संस्थांमध्ये रु.1,29,983 कोटी गुंतविले होते. या गुंतवणूकीवर 2012-17 दरम्यान सरासरी परतावा 0.04 टक्के होता, तर शासनाने त्याच्या कर्जावर या काळात सरासरी 7.6 टक्के दराने व्याज दिले होते. 31 मार्च, 2017 रोजी शासनाने रु.4,785.27 कोटी (भागभांडवल रु.4,613.54 कोटी आणि कर्जे रु.171.73 कोटी) गुंतविलेल्या 26 कंपन्या (परिशिष्ट 1.8) तोटयात होत्या व त्याचा ऑगस्ट, 2017 पर्यंतचा निव्वळ संचयी तोटा हा रु.46,615.91 कोटी होता. सात कंपन्या/महामंडळे ज्यांचे पेडअप भांडवल रु.1,187.93 कोटी होते, त्यांच्या संचयी तोटयामुळे निव्वळ मुल्ल्यात रु.1,854.16 कोटीची हानी झाली	महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. - वस्त्रोद्योग विभागाच्या अखत्यारितील महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्या. या महामंडळास शासनाने सन 2015-16 पर्यंत रु.12.77 कोटी इतके भागभांडवल वितरीत केलेले असून शासन कर्ज रु.0.20 कोटी इतके वितरीत केलेले आहे. सदर महामंडळाचा निव्वळ तोटा रु.0.72 कोटी असून संचयी तोटा रु.11.93 कोटी इतका आहे. महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळाचा सन 2016-17 चा लेखे अहवाल विधानमंडळात सादर केलेला आहे. सदर अहवालावरील महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत- "I, on behalf of the Comptroller and Auditor General of India, have decided not to conduct the supplementary audit of the Financial Statements of Maharashtra State Powerlooms Corporation Limited, Mumbai for the year ended 31 March 2017 under section 143(6)(a) of the Act". सबब आता भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील दि.31 मार्च, 2017 रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालातील परिच्छेद क्र.1.7.2 च्या अनुषंगाने पुनःश्च महालेखापाल कार्यालयाकडून Vetting करुन घेण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्या. - वस्त्रोद्योग विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्या. या महामंडळास शासनाने सन 2015-16 पर्यंत रु.236.16 कोटी इतके भागभांडवल वितरीत

				केलेले असून शासन कर्ज रु.173.91 कोटी इतके वितरीत केलेले आहे. सदर महामंडळाचा निव्वळ तोटा रु.41.14 कोटी असून संचित तोटा रु.1045.17 कोटी इतका आहे. महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्या.यांचा सन २०१६-१७ चा लेखे अहवाल विधानमंडळात सादर केलेला आहे .सदर अहवालावरील महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत- “On the basis of my audit, nothing significant has come to my knowledge, which would give rise to any comment upon or supplement to Statutory Auditors Report.” सबब, आता भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील दि. 31 मार्च, 2017 रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालातील परिच्छेद क्र.1.7.2 च्या अनुषंगाने पुन:श्च महालेखापाल कार्यालयाकडून Vetting करुन घेण्याची आवश्यकता नाही. <u>दि प्रताप स्पिनींग, विव्हींग अँड मॅन्युफॅक्चरींग कंपनी</u> लि - दि प्रताप स्पिनींग, विव्हींग अँड मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि.(महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाची दुय्यम कंपनी)मध्ये शासनाची थेट गुंतवणूक नसून महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाने सदरहू कंपनीमध्ये भागभांडवलामध्ये गुंतवणूक केलेली आहे. सदर कंपनीचा संचित तोटा रू.63.89 कोटी इतका आहे. दि प्रताप स्पिनींग, विव्हींग अँड मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि.(महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाची दुय्यम कंपनी मर्या.)यांचा सन २०१६-१७ चा लेखे अहवाल विधानमंडळात सादर केलेला आहे .सदर अहवालावरील महालेखापाल कार्यालयाचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत-“On the basis of my audit, nothing significant has come to my knowledge, which would give rise to any comment upon or supplement to Statutory Auditors Report.” सबब, आता भारताचे

				नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील दि. 31 मार्च, 2017 रोजी संपलेल्या वर्षाच्या अहवालातील परिच्छेद क्र.1.7.2 च्या अनुषंगाने पुनःश्च महालेखापाल कार्यालयाकडून Vetting करुन घेण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर - वस्त्रोद्योग विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्या., नागपूर या महामंडळास शासनाने सन २०१५-१६ पर्यंत रु. ८८.७१ कोटी इतके भागभांडवल वितरीत केलेले असून शासन कर्ज रु. २२.६३ कोटी इतके वितरीत केलेले आहे. सदर महामंडळाचा निव्वळ तोटा रु. ४.०७ कोटी इतका असून संचयी तोटा रु. १२८.७१ कोटी इतका आहे. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाचा सन २०१६-१७ चा वार्षिक अहवाल विधानमंडळात सादर केलेला आहे. सदर अहवालावरील महालेखापालांचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहेत. - "I on behalf of the Comptroller and Auditor General of India, have decided not to conduct the supplementary audit of the Financial Statements of Maharashtra State Handlooms Corporation Limited, Nagpur for the year ended 31 March 2017 under section 143(6)(a) of the Act." सबब आता भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्थापनेवरील अहवालातील परिच्छेद क्र. १.७.२ च्या अनुषंगाने पुनश्चः महालेखापाल कार्यालयाकडून Vetting करुन घेण्याची आवश्यकता नाही.

			सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी सादर केलेल्या माहिती नुसार, एकूण रु.390.88 कोटीची शासकीय गुंतवणूक (समभाग :रु.153.03 कोटी व कर्जे:रु.237.85 कोटी) असलेल्या 7,465 संस्थांपैकी 3,498 संस्थांमधील संचयी तोटा रु.224.26 कोटी होता (31 मार्च, 2017) जो संस्थांमध्ये केलेल्या प्राथमिक गुंतवणुकींच्या (रु.183.46 कोटी) 122 टक्के होता. तसेच 1,211 संस्था, ज्यांमध्ये शासनाने मार्च, 2017 पर्यंत रु.87.33 कोटी इतकी गुंतवणूक केली होती, त्या दिवाळखोरीत निघाल्या.	⟹ सदर कार्यालयाचे पत्र दि.30.8.2017, दि.05.09.2018 व दि.16.08.2019 अन्वये सहकारी संस्थामध्ये शासनाने केलेली गुंतवणूक विहित प्रपत्र 1 ते 11 मधील माहिती मा.प्रधान महालेखाकार कार्यालय (लेखापरिक्षा) यांना सादर केली आहे. ती खालील परिच्छेदामध्ये नमुद आहे. सहकारी संस्थमध्ये शासनाने केलेली गुंतवणूक विहित प्रपत्र 1 ते 11 मध्ये दि.31.3.2018 अखेर माहिती दि.5 सप्टेंबर 2018 अन्वये सादर केली असून ती खालीलप्रमाणे आहे. एकूण रु.683.15 कोटीची शासकीय गुंतवणूक (समभाग :रु.296.12 कोटी व कर्जे:रु.387.03 कोटी) असलेल्या 5006 संस्थांपैकी 2710 संस्थांमधील संचयी तोटा रु.220.11 कोटी होता (31 मार्च, 2018) जो संस्थांमध्ये केलेल्या प्राथमिक गुंतवणुकींच्या (रु.181.46 कोटी) 121 टक्के आहे. तसेच 1021 संस्था, ज्यांमध्ये शासनाने मार्च, 2018 पर्यंत रु.43.63 कोटी इतकी गुंतवणूक केली आहे, त्या संस्था अवसायनात आहेत. क्षेत्रिय पातळीवर संस्थानिहाय शासकीय गुंतवणूकीचा आढावा घेऊन वसुली बाबत कार्यवाही करणेत येत आहे. दि.31.1.2019 अखेर शासकीय भाग भांडवल रु. 137.39 लाख व शासकीय कर्ज रु.211.76 लाख असे एकूण रु.349.15 लाख वसुली करण्यात आलेली आहे.

पृ.क्र.	परीच्छेद क्रमांक	विषय	दि.३१/०३/२०१८ रोजी संपलेल्या राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवाल परीच्छेद अनुपालन	दुग्ध्व्यवसाय विकास विभागाचे अभिप्राय
१०१	१.७.२.१	शासकिय कंपन्यांन मधील शासकिय गुंतवणूका आणि संचयी तोटे यांचा सप्टेंबर २०१७ चा तपशिल / विभागिय वाणिज्यिक उपक्रम.	काही विशिष्ट शासकिय विभागांचे विभागिय उपक्रम हे वाणिज्यिकवत स्वरुपाचे कार्ये देखिल पार पाडतात. राज्य शासनसाचे ४९ विभागिय वाणिज्यिक उपक्रम आहेत. प्रपत्र लेखे पुर्ण झालेल्या वर्षापर्यंत शासनाने केलेली गुंतवणूक, निव्वळ नफा / तोटा तसेच या उपक्रमात गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा यांची विभाग-निहाय स्थिती परीशिष्ट १.९ मध्ये दिलेली आहे. हे आढळून आले कि • लेखे पुर्ण झालेल्या आर्थिक वर्षाच्या दरम्यान तीन उपक्रमात राज्य शासनाने रू.२,५१३.२६ कोटीची रक्कम गुंतविली होती (परीशिष्ट ३.४) • ४९ घटक असलेल्या ३ विभागापैकी ज्या तीन घटकांनी त्यांचे लेखे पुर्ण केले होते.(दोन घटकांचे २०१४-१५ पर्यंत आणि एका घटकाचे २०१५-१६) फक्त ते र. १,१२८.७७ कोटी भांडवल गुंतवणूकिवर रू.२५३.२६ कोटी निव्वळ नफा मिळवू शकले. • तोट्यातील एकूण विभागिय वाणिज्यिक उपक्रमापैकी ३२ विभागिय वाणिज्यिक उपक्रम गेल्या ५ वर्षापासून सातत्याने तोट्यात आहेत. "शासकिय दुध योजना ,मुंबई व ठाणे शिधावाटप क्षेत्र आणि मुफसल क्षेत्रातील प्रपाण, वितरण आणि मुल्य वियंत्रण योजना ." हे विभागिय वाणिज्यिक उपक्रम अनुसरत असलेल्या लेखांकन प्रणालीनुसार निव्वळ तोटा / नफा हा ताळेबंधातील भांडवली खात्यातून / खात्यात थेट § अधिक करण्यात येतो.त्यामुळे विभागिय वाणिज्यिक उपक्रमाच्या प्रपत्र लेख्यांतून संचयी तोट्याची आकडेवारी काढणे शक्य नसते. बहुतांश उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या तोटयाचा विचार करता, शासनाने त्यांच्या कामकाजाच्या पुनर्विलोकन करावे, जेणे करून त्यांना स्वयंपूर्ण करता येईल.	महालेखापालांनी उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थिती दर्शक आहेत. केंद्र शासनाच्या दूध व दुग्धजन्य पदार्थ आदेश १९९२ नुसार सन २००२ मध्ये खुल्या आर्थिक व बाजार धोरणामुळे केंद्र शासनाने सर्व पंजिकृत शासकीय / खाजगी / सहकारी / संघ व व्यापारी दूध प्रकल्प धारकांना देशात कोठेही जाऊन दूध संकलन व वितरण करण्याची मूभा दिलेली आहे. राज्य शासनाच्या बहुतांशी दुग्धशाळा या तोट्यात आहेत. त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत. १.गेल्या काही वर्षापासून राज्यात सहकारी तत्त्वावरील दुग्धशाळा, खाजगी दुग्धशाळा यांचा उगम झाल्याने या क्षेत्रात पर्याय व स्पर्धा निर्माण झालेली आहे, त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या योजनांकडे येणारा दुधाचा ओघ दिवसेंदिवस कमी होत चालला आहे, तथापि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता येणारे दुध अल्प प्रमाणत असले तरी स्वीकारावे लागते. २. सदर स्वीकारलेल्या दुधावर वाहतुक खर्च, शितकरण खर्च, वितरण खर्च व प्रक्रिया खर्च हा तुलनेने जास्त असतो कारण यंत्रणा कार्यरत करताना शितयंत्र, बाष्पक व इतर यंत्रे ही त्यांच्या क्षमतेनुसार कार्यरत होतात.व त्यासाठी विज, इंधन हे त्यांच्या क्षमतेनुसार वापरतात. ३. पुर्वी पेक्षा दुधाची आवक कमी झाली असली तरीसुध्दा असलेल्या यंत्रणेची देखभाल यावरील खर्च कमी झालेला नाही. ४.बहुतांशी दुग्धशाळांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त कर्मचारी आहेत. त्यापैकी बरेचशे कर्मचारी अतिरिक्त ठरलेले आहेत. सदर कर्मचाऱ्यांचे इतरत्र समायोजन होईपर्यंत त्यांचे वेतन व भत्ते यांचा भार संबधित दुग्धशाळांना सोसावा लागतो, सबब खर्चात वाढ होउन तोटा होतो. तसेच बंद पडलेल्या दुग्धशाळांमधील कर्मचारी इतरत्र समायोजित होईपर्यंत त्यांचे वेतन व भत्ते यांचा भार संबधित दुग्धशाळांना सोसावा लागतो. दुग्धशाळांचा तोटा कमी करण्याबाबत पुनर्विलोकन करून त्यांना स्वयंपूर्ण करण्याबाबत उपाययोजना चालू आहेत.

राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाल मार्च २०१७ रोजी संपलेले वर्ष मधील परिच्छेद १.७.२.१ चे अनुपालन.

विभागीय वाणिज्यिक उपक्रम

काही विशिष्ट शासकीय विभागांचे विभागीय उपक्रम हे वाणिज्यिकवत स्वरुपाची कार्ये देखील पार पाडतात. राज्य शासनाचे ४९ विभागीय वाणिज्यिक उपक्रम आहेत. प्रपत्र लेखे पूर्ण झालेल्या वर्षापर्यंत शासनाने केलेली गुंतवणूक, निव्वळ नफा/तोटा तसेच या उपक्रमांत गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा यांची विभाग-निहाय स्थिती परिशिष्ट १.९ मध्ये दिलेली आहे. हे आढळून आले की -

- लेखे पूर्ण झालेल्या आर्थिक वर्षाच्या दरम्यान तीन उपक्रमांत राज्य शासनाने रु.२,५१३.२६ कोटीची रक्कम गुंतविली होती (परिशिष्ट ३.४)
- ४९ घटक असलेल्या तीन विभागांपैकी, ज्या तीन घटकांनी त्यांचे लेखे पूर्ण केले होते (दोन घटकांचे २०१४-१५ पर्यंत आणि एका घटकांचे २०१५-१६ पर्यंत) फक्त ते रुपये १,१२८.७७ कोटी भांडवल गुंतवणूकीवर रु. २५३.२६ कोटी निव्वळ नफा मिळवू शकले.

भारताचे नियंत्रक व महालेखा परिक्षक यांचे सन २०१६-१७ च्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालातील समाविष्ठ बाब क्र.१.७.२.१ – विभागीय वाणिज्यीक उपक्रम- **बुलडोझर यंत्राव्दारे जमिन विकास योजना या अंतर्गत तक्त्यात नमूद तपशिल खालील प्रमाणे आहे.**

(रू. लाखात)

अ. क्र.	उपक्रमांचे नाव	काम सुरु केल्याचे वर्ष	लेख्याचा कालावधी	सरासरी शासकिय भांडवल	घसारा मुल्या-नुसार घट मत्ता	वर्षामध्ये तरतुद केलेला घसारा	उलाढाल	निव्वळ नफा + तोटा -	भांडवला वरील व्याज	एकुण परतावा 9+10	भांडवलावरील परताव्या वरील टक्केवारी
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२
४३	बुलडोझर यंत्राव्दारे जमीन विकास योजना, पुणे	१९४४	१९९४-९५	१४४.२६	७७.४७	४.५२	४६.७५	-७२.८३	१८.७५	-५४.०८	-३७.४९
४४	-//- औरंगाबाद	१९६०	९८-९९	३२.९९	१.०५	०.००	२.०२	-२३.४२	४.७८	-१८.६१	-५६.५०
४५	-//- अमरावती	१९६५	९५-९६	२.८२	०.४१	०.००	१.८०	-४.४६	०.४०	-४.०६	-१४३.९७
४६	-//- नागपूर	१९९६	९६-९७	२.१७	०.२३	०.००	१.८१	०.२१	०.३२	०.५३	२४.४२
	एकुण		-	१८२.२४	७९.१६	४.५२	५२.३८	-१००.०५	२४.२५	-७६.२२	-२१३.५४

या तक्त्यावरुन उपस्थित मुद्दा- क्र.१.७.२.१ ''वरील प्रमाणे बंद पडलेली आजारी युनिट आहेत, म्हणून त्यांनी लेखे तयार करणे बंद केलेली आहेत''.

राज्यामध्ये सन १९६३-६४ पासून ना नफा ना तोटा या तत्त्वावर कृषि विभागामार्फत बलीवर्द (बुलडोझर) यंत्राच्या सहाय्याने जमीन

■ तोटयातील एकूण विभागीय वाणिज्यिक उपक्रमांपैकी, ३२ विभागीय वाणिज्यिक उपक्रम गेल्या पाच वर्षापासून सातत्याने तोटयात आहेत. 'शासकीय दुध योजना', 'मुंबई व ठाणे शिधावाटप क्षेत्र आणि मुफसल क्षेत्रातील प्रापण, वितरण आणि मुल्य नियंत्रण योजना' हे विभागीय वाणिज्यिक उपक्रम अनुसरत असलेल्या लेखांकन प्रणालीनूसार निव्वळ तोटा/नफा हा ताळेबंदातील भांडवली खात्यातून / खात्यात थेट वजा/अधिक करण्यात येतो. त्यामुळे विभागीय उपक्रमांच्या प्रपत्र लेख्यातून संचयी तोटयाची आकडेवारी काढणे शक्य नसते. बहुतांश उपक्रमांमध्ये मोठया प्रमाणात झालेल्या तोटयाचा विचार करता, शासनाने त्यांच्या कामकाजाचे पुर्नविलोकन करावे, जेणेकरुन त्यांना स्वयंपूर्ण करता येईल.	विकास योजना राबविण्यात येत होती. सदर योजने मार्फत शेतक-यांचे जमीन सुधारणा करणे, पडीक जमीन लागवडीखाली आणणे , चढ उताराच्या जमिनी सिंचन योग्य समपातळीत आणणे, मृद संधारण कामासाठी बांध बंदिस्ती इत्यांदी कामासाठी राबविण्यात येत होती. या योजने अंतर्गत ६० ते ९० अश्वशक्तीच्या बीएनटी-६०, रशियन सी-१०० बीईएमएल,कॅट-डी- फोर डी या परदेशी बनावटीच्या चैन टाईप ट्रॅक्टरला डोझींग ब्लेड बसवून बलिवर्द (बुलडोझर्स) कामासाठी वापरण्यात येत होती. राज्यामध्ये सदरचे यंत्रे कामाच्या उपलब्धतेनुसार निरनिराळया ठिकाणी ठेवण्यात आलेली होती. इच्छुक शेतक-यांनी प्रस्तावित कामाची अंदाजित रक्कम चलनाने कोषागारात भरुन चलन तत्कालीन विभागीय मृद संधारण अधिकारी / उप विभागीय मृद संधारण अधिकारी यांचेकडे जमा करण्यात आल्या नंतर काम सुरु करण्याचे आदेश देण्यात येत असत, सदर परदेशी बनावटीचे उपलब्ध यंत्राचे उपयुक्त आयुष्यमान संपल्याने तसेच सुट्टे भाग वेळेवर उपलब्ध होत नसल्याने यंत्र दुरुस्ती करणे कठीण झाले होते, त्यामुळे यंत्र बंद राहत होती. तसेच परिरक्षण, इंधन या बाबीखाली सदर योजनेंतर्गत पुरेसे अनुदान उपलब्ध होत नव्हते तथापी आस्थापना बाबी वरील खर्च चालुच होता. या व्यतिरिक्त स्थानिक बाजारात नवीन अद्यावत बलिवर्द यंत्रे परवडणा-या दरात उपलब्ध होत असल्याने विभागाच्या जुन्या बलिवर्द यंत्राची मागणी कमी होत गेली या अशा कारणास्तव सदरची योजना सातत्याने तोटयात चालत होती. त्यामुळे ही योजना टप्प्याटप्याने बंद करण्यात आलेली आहे. मे, १९९८ च्या एक खिडकी योजनेंतर्गत या योजनेचा आढावा घेवून एकुण २५६ मंजूर पदांपैकी ९१ पदे समर्पित करण्यात आली. उर्वरित पदे नियत वयोमानुसार, सेवानिवृत्तीने रिक्त झाली आहेत, शासन धोरणानुसार सदर योजनेतील सेवानिवृत्तने रिक्त झालेली पदे पुढे भरण्यात आलेली नाहीत सद्यस्थितीत ही पदे उपलब्ध नाहीत. वरील कारणामुळे सदरची योजना सातत्याने तोट्यात चालत असल्याने पुनर्जिवित न करता बंद करण्यात आली आहे व त्यामुळे सदर योजनेचे लेखे तयार होत नाहीत. कृपया स्पष्टीकरण मान्य व्हावे, ही विनंती.

परि.क्र.	विषय	अभिप्राय
१.७.२.१	विभागीय वाणिज्यिक उपक्रम काही विशिष्ट शासकीय विभागांचे विभागीय उपक्रम हे वाणिज्यिकवत स्वरुपाची कार्ये देखील पार पाडतात. राज्य शासनाचे ४९ विभागीय वाणिज्यिक उपक्रम आहेत. प्रपत्र लेखे पूर्ण झालेल्या वर्षापर्यंत शासनाने केलेली गुंतवणूक, निव्वळ नफा/तोटा तसेच या उपक्रमांत गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा यांची विभाग-निहाय स्थिती परिशिष्ट१.९ मध्ये दिलेली आहे. हे आढळुन आले की : लेखे पूर्ण झालेल्या आर्थिक वर्षाच्या दरम्यान तीन उपक्रमांत राज्य शासनाने रु.२५१३.२६ कोटींची रक्कम गुंतविली होती (परिशिष्ट ३.४) ४९ घटक असलेल्या तीन विभागांपैकी, ज्या तीन घटकांनी त्यांचे लेखे पूर्ण केले होते (दोन घटकांचे २०१४-१५ पर्यंत, आणि एका घटकांचे २०१५-१६ पर्यंत) फक्त ते रु.१,१२८.७७ कोटी भांडवल गुंतवणूकीवर रु.२५३.२६ कोटी निव्वळ नफा मिळवू शकले. तोट्यातील एकूण विभागीय वाणिज्यिक उपक्रमांपैकी, ३२ विभागीय वाणिज्यिक उपक्रम गेल्या पाच वर्षापासून सातत्याने तोट्यात आहेत. "शासकीय दुध योजना", 'मुंबई व ठाणे शिधावाटप क्षेत्र आणि मुफसल क्षेत्रातील प्रापण, वितरण आणि मुल्य नियंत्रण योजना' हे विभागीय वाणिज्यिक उपक्रम अनुसरत असलेल्या लेखांकन प्रणाली नुसार निव्वळ तोटा/ नफा हा ताळेबंदातील भांडवली खात्यातून/खात्यात थेट वजा/अधिक करण्यात येतो. त्यामुळे विभागीय उपक्रमांच्या प्रपत्रलेख्यातून संचयी तोटयाची आकडेवारी काढणे शक्य नसते. बहूतांश उपक्रमांमध्ये मोठया प्रमाणात झालेल्या तोटयाचा विचार करता, शासनाने त्यांच्या कामकाजाचे पुनर्विलोकन करावे, जेणेकरून त्यांना स्वयंपूर्ण करता येईल.	सदर परिच्छेदातील अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील उपक्रमांबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत. या विभागाच्या अधिनस्त विभागीय उपक्रम हे वाणिज्यिकवत स्वरुपाची कार्ये करत नाहीत. सदर उपक्रम हे निव्वळ नफा/तोटा अथवा शासनाने केलेली गुंतवणुक मिळविण्यासाठी नसुन लाभार्थ्यांना या योजनेतुन लाभ मिळावा या उद्देशासाठी कार्यरत आहेत. या विभागाच्या बहुतांश योजना या समाजातील तळागाळातील लाभार्थ्यांना अल्प दराने अन्नधान्य पुरविण्याच्या आहेत. त्यामुळे या योजनेवर होणारा खर्च केंद्र व राज्य शासन यांचेमार्फत केला जातो. त्यामुळे नफा किंवा तोटा असा विचार न करता योजना राबविताना किती तुट येते ती तुट भरुन काढण्याचे धोरण ठरलेले असते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेअंतर्गत खरेदी व विक्रीची किंमत सारखीच आहे. परंतु वाहतुक, साठवण व हमाली, तसेच दुकानदारांची मार्जिन इ. बाबींमुळे सदरहु योजनांमध्ये तुट येते. ही तुट केंद्र व राज्य शासनामार्फत भरुन काढली जाते. राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना ही सन २०१४ मध्ये सुरु झाली. परंतु त्याच्या खर्चाची प्रतिपुर्ती केंद्रशासनाकडुन सन २०१६-१७ पासुन प्राप्त होऊ लागली. ती रक्कम रु. ५९३.००/- कोटी एवढी होती. विभागामधील किमान आधारभूत किंमत , साखर, यांसारख्या योजनेवर सुरुवातीस शासनामार्फत खर्च केला जातो. त्याचे तिमाही दावे केंद्रशासनास सादर करुन दावे प्राप्त होण्यास आठ-नऊ महिन्यांचा कालावधी जातो. त्यामुळेही योजनेमध्ये तुट दिसुन येते. आज घडीलाही केंद्रशासनाकडील / भा.खा.निगमकडे रु. ७००/- कोटींपेक्षा अधिक रक्कम प्रलंबित आहे. त्यामुळे ही रक्कम वसुल होईपर्यंत विभागाच्या लेख्यांमध्ये तुट दिसुन येते. सर्व योजनांचे स्वरुप कल्याणकारी स्वरुपाचे असल्यामुळे लाभार्थ्यांना अधिक किमतीने धान्य विकता येत नाही. त्यामुळे त्याप्रकारे नफा मिळविण्यासाठी योजना राबविता येत नाही. तूट/नफा यांचे समायोजन केले जाते. त्यामुळे स्वयंपूर्ण उपक्रम राबविणे अभिप्रेत नाही. तरी सदर खुलासा मान्य करुन या विभागाबाबत उपरोक्त अनुपालन मान्य करण्यात यावे.

(श्रीम.सं.ग.जोशी)
सहाय्यक संचालक

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा राज्य वित्त व्यवस्थेवरील दि. 31 मार्च, 2017 रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल.

अ.क्र.	परिच्छेद क्र.	विषय	स्पष्टीकरण
	1.7.2.1	31 मार्च, 2017 रोजी शासनाने रु.4785.27 कोटी (भाग भांडवल : रु.4613.54 कोटी आणि कर्ज रु.171.73 कोटी) गुंतविलेल्या 26 कंपन्या (परिशिष्ट 1.8) तोट्यात होत्या व त्यांचा ऑगस्ट 2017 पर्यतचा निव्वळ संचयी तोटा हा रु.46615.91 कोटी होता.	अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली दि. 2.2.2019 रोजी झालेल्या बैठकीत, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या दि. 31.3.2017 अखेरच्या सार्वजनिक उपक्रम संदर्भातील अहवालामध्ये नमूद केलेल्या तोट्यात चालत असणा-या उपक्रमांचा आढावा विभागांनी घेऊन योग्य कार्यवाही करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत. (इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.)
		सात कंपन्या/ महामंडळे ज्यांचे पेडअप भांडवल रू. 1187.93 कोटी होते, त्यांच्या संचयी तोट्यामुळे निव्वळ मुल्यात रू. 1854.16 कोटीची हानी झाली होती.	या परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या 7 कंपन्यांपैकी, 1)कोकण विकास महामंडळ मर्यादित, 2)विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, 3)महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स कॉर्पोरेशन मर्यादित (मेल्ट्रॉन) व महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित या 4 कंपन्या परिसमापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुषंगाने या कंपन्यांचा आढावा उच्चाधिकार समितीने घेतला असून त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभागांना कार्यवाही करण्याबाबत कळविण्यात आले आहे. (पत्राची/ इतिवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.) उर्वरित 1) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, 2) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित आणि 3) महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ या तोट्यात असलेल्या महामंडळाबाबत अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली दि. 2.2.2019 रोजी आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित सार्वजनिक उपयुक्तता क्षेत्रात कार्यरत असून त्या महामंडळाने तोटा कमी करण्याचा प्रयत्न करावा आणि उर्वरीत 2 महामंडळांच्या बाबतीत विभागाने तोट्याची कारणे तपासून योग्य तो निर्णय घ्यावा अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
४४	१.७.३	राज्य शासनाने दिलेली कर्जे व अग्रिमे	सहकारी संस्था, महामंडळे आणि कंपन्यातील गुंतवणुकी बरोबरच, शासन अनेक संस्था/संघटनांना कर्जे व अग्रिमे देखिल देते. मागील तीन वर्षातील व्याज प्रदानांच्या तुलनेत 31 मार्च 2017 अखेरीस प्रलंबित कर्जे व अग्रिमे, व्याज जमांची स्थिती तक्ता 1.37 मध्ये सादर केली आहे. तक्ता 1.37 वरुन असे दिसून येते की, 31 मार्च 2017 रोजी एकुण प्रलंबित कर्जे व अग्रिमे रु.26,603 कोटी होती. यावर्षी संवितरित केलेली कर्जे 2015-16 मधील रु. 1,115 कोटीवरुन 2016-17 मध्ये रु.6,277 कोटीपर्यंत वाढली. यावर्षात दिलेल्या कर्ज व अग्रिमांच्या एकूण रक्कमेपैकी रु.5,370 कोटी आर्थिक सेवांसाठी व रु. 190 कोटी सामाजिक सेवांसाठी देण्यात आले. आर्थिक सेवांतर्गत दिलेल्या कर्जाचा मोठा हिस्सा वीज (82 टक्के) या शीर्षाखाली गेला. तथापि, या कर्जावरील प्राप्त झालेले व्याज 2015-16 मधील 3.5 टक्क्यांवरुन 2016-17 मध्ये 1.5 इतके कमी झाले. ही घट मुख्यत्वे लघु पाटबंधाऱ्यांसाठी कर्जे यावर 2016-17 मध्ये व्याजाच्या कमी प्राप्ती मुळे (रु.569 कोटी) झाली होती जी वनीकरण आणि वन्यजीवन यासाठी दिलेल्या कर्जावरील व्याजात झालेल्या वाढीमुळे (रु. 240 कोटी) कमी झाली होती.	शासनाने दिलेल्या विविध महामंडळे/सार्वजनिक उपक्रम/ सहकारी संस्था इत्यादींना दिलेली कर्जे/अग्रिमाची वसुली करण्याची जबाबदारी संबधित प्रशासनिक विभागाची आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षापासून बिम्स (BEAMS) या संगणक आज्ञावलीत कर्जाच्या संकलनाबाबत स्वतंत्र आज्ञावली विकसीत करण्यात आली असून सदर वित्तीय वर्षापासुन कर्जाची माहिती संकलीत करण्यात येत आहे. प्रशासकिय विभागांकडे कर्जाचे लेखे अद्यावत नसल्यामुळे व महालेखापाल कार्यालयाशी कर्जा लेख्यांचा ताळमेळ न घेतल्यामुळे कर्ज परतफेडीची व थकबाकी आणि कायम स्वरुपी कर्ज याविषयी संपुर्ण माहिती प्राप्त करण्याचे काम चालु आहे. या संदर्भातील विविध संगणकीकृत नमुने तयार करण्याचे काम राष्ट्रीय सुचना केंद्राकडून सुरु असून सदर काम पुर्ण झाल्यानतंर आवश्यक ती माहिती महालेखापाल यांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

			कर्जाचे तपशिलावर लेखे राज्य शासनाच्या विभागांकडून ठेवले जातात. ज्यांनी, प्रलंबित कर्जाच्या आकडेवारीची प्रधान महालेखाकार (लेखे व अनुज्ञेयता)-I, महाराष्ट्र, मुंबई यांच्याकडून खात्री करुन घेणे गरजेचे असते आणि थकीत वसुलीबाबतची पूर्ण माहिती सादर करायची असते. ते केले नव्हते. परिणामत: भारतीय शासकीय लेखांकन मानके (आयजीएएस)-3 नुसार 2016-17 च्या वित्तीय लेख्यांत दिलेली माहिती त्या प्रमाणात अपूर्ण होती.	

पृ.क्र.	परिच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
४४-४६	१.७.४	रोख शिल्लक आणि रोख शिलकीची गुंतवणूक	राज्य शासनाची या वर्षाच्या अखेरीस असलेली रोख शिल्लक रु.६८,७५० कोटी ही मागील वर्षापेक्षा २४ टक्क्याने (रु.१३,१९७ कोटी) जास्त होती. वरील रोख शिलकीतून रु. ४४,११० कोटी भारत सरकारच्या कोषागार देयकांत गुंतविले होते, त्यावर रु.२,२१४ कोटी इतके व्याज प्राप्त झाले. तसेच, राखून ठेवलेल्या निधीत रु.२७,८७८ कोटी गुंतविले होते. ज्यावर रु.१,७४० कोटी व्याज प्राप्त झाले. चालू वर्षात अर्थोपाय अग्रिमे घेतली नव्हती. राज्य शासनाची, मार्च २०१७ अखेरची रोख शिल्लक (रु.६८,७५० कोटी) त्यांच्या या वर्षातल्या एकूण खर्चाच्या (रु.२,४५,०५५ कोटी) जवळजवळ २८ टक्के होती.	राज्य शासनाच्या मार्च २०१७ वर्षाच्या अखेरीस असलेल्या रोख शिल्लक रु.६८,७५० कोटी पैकी भारत सरकारची कोषागार देयकातील शिल्लक रु.४४,१०९.३८कोटी दर्शविली आहे. मात्र राज्य शासनाच्या अभिलेख्यांवरुन भारत सरकारची कोषागार देयकातील मार्च, २०१७ अखेरची शिल्लक रु.४४,१६०.०७ कोटी इतकी आहे व त्यावर रु.२,२१४ कोटी इतके व्याज प्राप्त झाले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त जानेवारी ते मार्च,२०१७ च्या त्रैमासिक अहवालानुसार राज्याच्या एकत्रित ऋण निवारण निधीमध्ये मार्च, २०१७ अखेर एकूण रु.२२,५३१,८५ कोटी इतका निधी जमा आहे. सदर निधीमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश आहे याबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेकडे विचारणा केली असता याबाबत भारतीय रिझर्व्ह बँकेने दि.२६.१०.२०१८रोजीच्या ई-मेल द्वारे कळविले आहे की, "the State Government's total investments include fresh investments (Principal Contribution) as well as reinvestments (interest accrued and reinvested) in terms of Face Value of Securities held under CSF Scheme." तसेच या मुद्दयाबाबत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील विनियोजन लेख्यातील परिच्छेदाबाबतचे अभिप्राय प्रधान महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता) मुंबई यांच्या निदर्शनास आणण्यात आले आहेत.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या राज्य वित्तव्यवस्थेवरील अहवालातील परिच्छेदासंदर्भातील स्पष्टीकरण

परि.क्र.	परिच्छेदाचा विषय	स्पष्टीकरण
१.७.४.१	धनादेश आणि देयके या शीर्षाखालील प्रलंबित शिल्लका	हे शीर्ष व्यवहारांची प्रारंभिक नोंद घेण्याचे मध्यस्त लेखाशीर्ष आहे, ज्यांचा यथावकाश निपटारा करावा लागतो जेव्हा धनादेश जारी केला जातो, त्यावेळी कार्यात्मक शीर्षाखाली खर्च दाखवून मुख्यशीर्ष ८६७० धनादेश आणि देयके याखाली जमा दाखवितात. बॅकेकडून धनादेश वटविल्यानंतर मुख्य शीर्ष ८६७० धनादेश आणि देयके या शीर्षाला त्र ण जमा दाखवून मुख्यशीर्ष ८६७५ - भारतीय रिझर्व्ह बॅंकेत असलेल्या ठेवी या शीर्षाखाली जमा दाखवून शासनाची तेवढीच रोख शिल्लक कमी केली जाते. अशा तऱ्हेने मुख्य शीर्ष ८६७० -धनादेश आणि देयके याखालील प्रलंबित रक्कमा न वटविलेल्या धनादेशांच्या रकमा दर्शविते. ३१ मार्च, २०१७ रोजी रु.१५,४५६.८७ कोटी इतकी प्रलंबित शिल्लक (संचयी) होती. २०१६-१७ मध्ये व्यपगत धनादेशांची रक्कम रु.२५.३९ कोटी इतकी होती.
	३१ मार्च २०१७ रोजी रु. १५,४५६.८७ कोटी इतकी प्रलंबित शिल्ल्क संचयी होती.	माहे मार्च मध्ये पुरवणी मागण्या व आठमाही अंदाजपत्रकानुसार पुर्नविनियोजन करण्यात आलेले अनुदान आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे प्राप्त होत असतात. आहरण व संवितरण अधिकारी प्राप्त झालेल्या अनुदानाच्या अनुषंगाने अनुदान खर्ची घालण्यासाठी कोषागार / उपकोषागार व अधिदान व लेखा कार्यालयाकडे देयके सादर करतात. तथापि दिनांक ३१ मार्च हा वित्तीय वर्षाचा शेवटा दिवस असल्याने त्या दिवशी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून मोठया संख्येने देयके सादर केल्यामुळे कोषागारांकडून मोठया प्रमाणावर प्रदाने होत असतात. कोषागार कार्यालये यांचेकडून प्रदान झालेल्या रकमांचे लेखांकन मुख्य लेखाशीर्ष ८६७० खाली जमा (credit) म्हणून दर्शविण्यात येतात. दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी कोषागार/उपकोषागार व अधिदान व लेखा कार्यालयाकडून मुख्य लेखाशीर्ष ८६७० खाली एकूण प्रमाणकांची संख्या ७३०८६ व त्यांची रक्कम रु.१७३०७.६० कोटी असे लेखांकन करण्यात आलेले आहे. (सोबत दि.३१ मार्च २०१७ रोजीची कोषागार निहाय यादी)
	सन २०१६-१७ मध्ये व्यपगत धनादेशांची रक्कम रु.२५.३९ कोटी इतकी होती.	कोषागार व अधिदान व लेखा कार्यालय यांचेकडून आहरण व संवितरण अधिकारी व त्रयस्थ अदाता यांना प्रदानाच्या अनुषंगाने धनादेश / सीएमपी/ ईएफटी/ एनईएफटी या प्रदानाच्या माध्यमाद्वारे वितरण करीत असतात. या सर्व प्रकारच्या प्रदानांचे जमा लेखांकन हे मुख्य लेखाशीर्ष ८६७० खाली होत असते. बऱ्याच वेळा अदात्यामार्फत त्यांना दिलेले धनादेश ते विहित मुदतीत बॅकेमार्फत वटविले न गेल्याने अशा व्यपगत झालेल्या धनादेशांची रक्कम ही मुख्य लेखाशीर्ष ८६७० मध्येच असल्याने मासिक लेख्यांसोबत त्याचा अहवाल महालेखापालांना कळविण्यात येत असतो, त्यामुळे सन २०१६-१७ मध्ये व्यपगत धनादेशांची रक्कम रु. २५.३९ कोटी इतकी होती.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
४६	१.८	मत्ता व दायित्वे		
४६	१.८.१	मत्ता व दायित्वांची वाढ व रचना	विद्यमान रोकड आधारित शासकीय लेखे प्रणालीमध्ये शासनाच्या मालकीच्या जमिनी व इमारती यासारख्या स्थावर मत्तांचे सर्वसमावेशक लेखांकन केले जात नाही. तथापि शासनाची वित्तीय दायित्वे व केलेल्या खर्चातून निर्माण झालेल्या मत्ता शासकीय लेख्यांत धरल्या जातात. अशा दायित्वे व मत्तांच्या ३१ मार्च २०१६ रोजीच्या तत्सम स्थितीशी तुलनात्मक ३१ मार्च २०१७ च्या स्थितीचा गोषवारा परिशिष्ट १.१० मध्ये दिला आहे. दायित्वामध्ये अंतर्गत कर्जे, केंद्र शासनाकडून प्राप्त कर्जे व अग्रिमे, लोक लेखे व राखीव निधीतील जमा यांचा समावेश होतो, तसा मत्तांमध्ये प्रामुख्याने भांडवली खर्च, राज्य शासनाने दिलेली कर्जे व अग्रिमे आणि रोख शिल्लकींचा समावेश होतो. महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये राज्याची एकूण दायित्वे म्हणजे राज्याच्या एकत्रिकृत निधी व लोक लेख्यांतर्गत असणारी दायित्वे होत.	महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीदर्शक आहेत.

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
४६ ते ४८	१.८.२.	राजकोषीय दायित्वे	मागिल वर्षाच्या तुलनेत चालू वर्षातील राजकोषीय दायित्वाची रचना आलेख १.१८ मध्ये सादर करण्यात आली आहे. तक्ता १.३९ मध्ये राज्यांची राजकोषीय दायित्वे, त्यांच्या वाढीचा दर , या दायित्वांचे राज्याचे सकल घरेलू उत्पादन, महसुली जमा आणि राज्याचा कर महसुल व करेत्तर महसुलाचा समावेश असलेले राज्याचे स्वत:चे स्त्रोत यांच्याशी असलेले गुणेत्तर, तसेच या मापदंडांच्या संदर्भात राजकोषीय दायित्वांची प्लावकता दर्शविली आहे. राज्याची एकुण राजकोषीय दायित्वे २०१२-१७ ज्या कालावधीत १० टक्के या सरासरी वार्षिक दराने वाढली. वर्ष २०१२-१३ मधील ९.७ टक्के वाढीचा दर सातत्याने कमी होऊन २०१४-१५ मध्ये ८.८ टक्क्यांवर आला आणि २०१५-१६ मध्ये ९.९ टक्क्यांपर्यंत वाढला आणि २०१६-१७ मध्ये तो वाढून १२.७ टक्के झाला आहे. २०१६-१७ मध्ये ऋणाचे राज्यातील सकल घरेलु उत्पादनाशी गुणोत्तर १७.५ टक्के होते, जे मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणाच्या निवेदना(१६.२ टक्के) मध्ये केलेल्या प्रक्षेपणापेक्षा जास्त होते, पण चौदाव्या वित्त आयोगापेक्षा (२२.६ टक्के) कमी होते. २०१६.१७ दरम्याने सकल घरेलु उत्पादनाच्या बाबतीत दायित्वांची प्लावकता ०.९५० होती.जे सकल घरेलु उत्पादन व	राज्य शासनानचे १४व्या वित्त अयोगाच्या शिफारशी मधील परिच्छेद १४.६४ प्रमाणे राजकोषीय धोरण आहे. १४ व्या वित्त आयोगाच्या राजकोषीय मापदंडानुसार धोरण अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. राज्याच्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणाच्या निवेदनात व्याज प्रदाने/महसुली जमा गुणोत्तर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंक्रल्पीय अंदाजानुसार १२.७८% अपेक्षित होते व सन २०१६-१७ च्या सुधारीत अंदाजानुसार १३.१०% होते सन २०१६-१७ करीता प्रत्यक्ष व्याज प्रदाने/महसुली जमा गुणोत्तर १३.९४% झाले आहे. व्यय विभाग, वित्त मंत्रालय भारत सरकार यांचे पत्र दिनांक ३० एप्रिल २०१० मध्ये स्पष्ट केल्यानुसार ज्या राज्याची व्याजाच्या प्रदानाची महसुली जमेशी टक्केवारी २०% पेक्षा जास्त आहे ते राज्य कर्जबाधित राज्य होय हा मापदंड निश्चित करण्यात आला आहे. सन २०१६-१७ मध्ये राज्याचे व्याज प्रदाने/महसुली जमा गुणोत्तर १३.९४% असुन तो विहित मापदंड च्या मर्यादेत

			राजकोषिय दायित्वांची वाढ समान दराने झाल्याचे दर्शविते. २०१२-१३ अखेरीस राजकोषिय दायित्व २०१२-१३ वर्षाच्या महसूली जमेच्या १८८.२ टक्के होते जे २०१६-१७ मध्ये १९३.४ टक्केपर्यंत वाढले. हि दायित्वे २०१६-१७च्या अखेरीस महसुली जमेच्या जवळपास दुप्पट होती व राज्याच्या स्वत्त:च्या स्त्रोतांच्या दुप्पटीपेक्षा जास्त होती. एकूण राजकोषीय दायित्वात अंतर्गत ऋणांचा हिस्सा सर्वात जास्त (७४ टक्के) होता. त्या पाठोपाठ लोक लेखा दायित्व (२४ टक्के) आणि केंद्र शासनाकडून कर्ज (दोन टक्के) होता. वर्ष २०१५-१६ मध्ये राजकोषीय दायित्वे रु.३,५१,८५८ कोटी होती ज्यामध्ये रु.४४,५१७ कोटीची वाढ होऊन ती २०१६-१७ मध्ये रु.३,९५,८५८ कोटी झाली. ही वाढ मुख्यत्वे लोकऋण (रु. ३६,४५० कोटी), ठेवी (रु.६,८४० कोटी) आणि अल्पबचत व भविष्य निर्वाह निधी (रु.१,१२३ कोटी) यातील वाढीमुळे झाली होती. खुल्या बाजारातील कर्जाच्या परतफेडीच्या तरतुदीसाठी राज्य शासनाने वित्तीय वर्ष १९९९-२००० ला एक एकत्रिकृत कर्ज निवारण निधी प्रस्थापित केला. ३१ मार्च २०१७ च्या अखेरीस कर्ज निवारण निधीतील अंतिम शिल्ल्क २०१६-१७ करीता असलेल्या रु.५,१८२ कोटीसहीत रु.२७,८५३.४१ कोटी होती व या संपूर्ण रक्कमेची गुंतवणूक करण्यात आली होती.	आहे. राजकोषीय दायित्व हे उपरोक्त विहित मापदंडाच्या मर्यादेत आहेत. प्रस्तुत अहवालात दि. ३१ मार्च, २०१७ रोजीची एकत्रित कर्जनिवारण निधीतील शिल्लक रु.२७,८५३.४१ कोटी नमूद केली आहे. मात्र भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त जानेवारी ते मार्च, २०१७ च्या त्रैमासिक अहवालानुसार राज्याच्या एकत्रित ऋण निवारण निधीमध्ये मार्च, २०१७ अखेर एकूण रु.२२,५३१,८५ कोटी इतका निधी जमा आहे. या मुद्दयाबाबत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षातील विनियोजन लेख्यातील परिच्छेदाबाबतचे अभिप्राय प्रधान महालेखापाल१ (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई यांच्या निदर्शनास आपण्यात आले आहेत.

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
४८	१.८.२.१	महाराष्ट्रात उदय योजनेची अंमलबजावणी	केंद्र शासनाने राज्याच्या मालकीच्या वीज वितरण कंपन्यांच्या कार्यचालन व आर्थिक बदलवासामध्ये उज्जवल डिसकॉम हमी योजना (उदय) मंजूर केली (नोव्हेंबर 2015) या योजनेनुसार राज्य शासन डिसकॉमचे 30 सप्टेंबर 2015 रोजीचे 75 टक्के कर्ज दोन वर्षात घेणार होते म्हणजेच 2015-16 मध्ये 50 टक्के व 2016-17 मध्ये उर्वरित 25 टक्के कर्ज घेणार होते. 30 सप्टेंबर 2015 ला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितचे एकूण रु. 22,097 कोटी कर्ज प्रलंबित होते ज्यापैकी मध्यम आणि लघु मुदतीचे कर्ज (अधिकर्ष कर्जाव्यतिरिक्त) रु. 6,613 कोटी होते. 2015-16 दरम्यान राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादितचे कोणतेही कर्ज ताब्यात घेतले नव्हते. वर्ष 2016-17 दरम्यान राज्य शासनाने रु. 4,959.75 कोटीचे (मध्यम व लघु मुदतीच्या कर्जाच्या 75 टक्के) विशेष रोखे उभारले आणि हि रक्कम महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादितला कर्जे म्हणून दिली. उर्वरित रु. 1,653.25 कोटी रक्कमेसाठी (मध्यम व लघु मुदतीच्या कर्जाच्या 25 टक्के) महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी मर्यादीतला राज्य शासनाच्या हमीने कर्ज उभारण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे.	महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित यांना मध्यम व लघु मुदतीच्या कर्जाच्या ७५% रक्कम म्हणुन सन २०१६-१७ मध्ये राज्य शासनाने रु.४९५९.७५ कोटीचे कर्जरोखे उभारले असुन महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित यांना कर्ज (त्यावेळचे प्रलंबित कर्ज)म्हणुन दिले आहे. उर्वरीत २५% रक्कम रुपये १६५३.२५ कोटी बाबत नमुद करण्यात येते की महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित यांच्या मध्यम व लघु मुदतीच्या कर्जाची परतफेड झाली असल्याने शासनाने हमी देण्याचा प्रयत्न उद्भवत नाही.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
४८	१.८.२.२	८४३३ - नागरी ठेवी अंतर्गत शिल्लकींचा वाढता कल	२०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान वित्तीय वर्षाच्या अखेरीस मुख्य शीर्ष ८४४३- नागरी ठेवी अंतर्गत असलेली अंतिम शिल्लक तक्ता क्र. १.४० मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाढता कल दर्शवित होती. यावरुन असे दिसून येते की, २०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान मुख्यशीर्ष ८४४३- नागरी ठेवी अंतर्गत असलेल्या शिल्लकीपैकी जवळजवळ ६० टक्के भाग १०६ स्वीय ठेवीमधील शिल्लकींचा होता. तसेच जेथे राज्याच्या एकत्रिकृत निधीतून स्वीय ठेवी लेख्यांमध्ये निधी हस्तांतरीत करण्यात येतो, तेथे वित्तीय वर्षाच्या अखेरीस असलेल्या शिल्लक रक्कमा एकत्रिकृत निधीमध्ये परत हस्तांतरीत करणे आवश्यक असते. परंतु २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांवरुन असे दिसून येते की, वित्तीय वर्षाच्या शेवटी जी रक्कम एकत्रिकृत निधीमध्ये हस्तांतरीत करणे आवश्यक होती अशी रक्कम प्रत्यक्षात परिगणित करणे शक्य नव्हते. परिणामी ८४४३-नागरी ठेवी अंतर्गत असलेली प्रत्यक्ष दायित्वे देखिल परिगणित करणे शक्य नव्हते.	स्वीय प्रपंजी लेख्याबाबत महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीदर्शक आहेत. मात्र या लेख्यांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग यांच्याकडील निधी अधिक प्रमाणात आहे. या दोन्ही विभागांमार्फत पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत असतात व त्यांना त्या त्या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये खर्चाचे नियोजन करणे शक्य नसल्याने स्वीय प्रपंजी लेख्यामधील रक्कम वाढत जाणे स्वाभाविक आहे.
४९	१.८.२.३	लेख्यामधील अखेरची शिल्लक व दुय्यम नोंदी मधील ताळमेळ न घेतलेल्या तफावती	२०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांनुसार नागरी ठेवी व इतर नागरी ठेवी अंतर्गत ताळमेळ न घेतलेली शिल्लक रु. ५,९८६.०४ कोटी होती जी २००८-०९ ते २०१६-१७ या कालावधीशी संबंधित होती. यापैकी अनुदानित माध्यमिक आणि विशेष शाळांचा भविष्य निर्वाह निधी लेख्यांमधील २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीशी संबंधित रक्कम (रु.३,२८६.६९ कोटी) हा प्रमुख भाग होता ज्याचा मार्च २०१७ पर्यंत ताळमेळ घेतला गेला नव्हता.	संबंधित विभागांना योग्य त्या सूचना वेळोवेळी देण्यात आलेल्या असून यापुढेही याबाबतच्या सूचना देण्यात येतील.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
१९	१.८.३	राखीव निधीतील व्यवहार	महाराष्ट्रात विशिष्ठ प्रयोजनांकरीता १८ राखीव निधी ठेवण्यात आले होते. ज्यापैकी परिशिष्ट १.११ मध्ये दर्शविल्याप्रमाणे नऊ निधीत व्यवहार केले जात होते आणि नऊ निधी अकार्यरत होते. या निधीतील ३१ मार्च २०१७ रोजीची एकूण संचयीत शिल्लक रु.३७,५१५.५६ कोटी (रु.३७,४८६.५५ कोटी कार्यरत निधी व रु.२९.०१ कोटी अकार्यरत निधी) होती. परंतु या शिल्लकीतून फक्त रु.२७,८७७.४२ कोटींची (७४ टक्के) गुंतवणूक करण्यात आली होती. २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांच्या विवरण क्रमांक २२ मध्ये या निधीचे लेखे समाविष्ट आहेत. अकार्यरत राखीव निधींचा आढाव घेण्यासाठी राज्य शासनाने प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे आणि सदर अकार्यरत राखीव निधी बंद करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरु करण्याची गरज आहे.	शासन याबाबत योग्य ती कार्यवाही करेल.

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
४९-५०	१.८.४ १.८.४.१	आकस्मिक दायित्वे हमीची स्थिती	हमी दिलेल्या कर्जदारांकडून कसूर झाल्यास राज्याच्या एकत्रिकृत निधीवर ही हमी संभाव्य दायित्वे ठरतात. 2016-17 च्या वित्तीय लेख्यांच्या विवरणपत्र 9 मधील माहितीनुसार मागील तीन वर्षात राज्य शासनाने ज्या कमाल रक्कमेसाठी हमी दिली होती ती रक्कम व त्यातील प्रलंबित हमी यांचा सारांश तक्ता 1.41 मध्ये देण्यात आला आहे. राज्य विधानमंडळाने राज्य शासनाने दयावयाच्या हमीची मर्यादा निश्चित केलेली नाही. महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005 मध्ये देखिल अशी कोणतीही मर्यादा विहीत केलेली नाही. वर्ष 2016-17 दरम्यान राज्य शासनाने (अ) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (रु. 495 कोटी); (ब) महाराष्ट्र राज्य सहकारी कापुस उत्पादक पणन महासंघ मर्यादीत, मुंबई (रु. 400 कोटी); आणि (क) माहाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत, मुंबई (रु. 110 कोटी) अशा एकूण रु. 1005 कोटी रक्कमेच्या हमी दिल्या होत्या. 2016-17 च्या प्रलंबित हमी (रु. 7,306 कोटी) या महसुली जमेच्या (रु. 2,04,693 कोटी) 3.6 टक्के आणि राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या (रु. 22,67,789 कोटी) 0.3 टक्के होत्या. बाराव्या वित्त आयोगाने, राज्य शासनाने दिलेल्या हमी मधून निर्माण होणारी आकस्मिक दायित्वे पुर्ण करण्यासाठी निर्धारित हमी शुल्काद्वारे हमी शुल्क विमोचन निधी उभारण्याची शिफारस केली होती. राज्यात हमी विमोचन निधी उभारण्याची	बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार राज्यात हमी विमोचन निधी उभारण्याचा प्रस्ताव दिनांक १८.११.२०१८ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत सादर केला असता महाराष्ट्र शासनाच्या हमी विमोचन निधी घटीत करणे व त्याची व्यवस्था करणे यासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्याबाबतची अधिसुचना निर्गमित करण्यात येत आहे. वित्त विभाग शासन दिनांक ५ नोंव्हेबर १९९९ व शासन परिपत्रक दिनांक २८ जानेवारी २०१० नुसार शासन हमीवर घेतलेल्या कर्जाची परतफेड व हमी शुल्क वसुली याची जबाबदारी संबधित प्रशासकीय विभागांच्या नियंत्रण अधिका-यावर राहील असे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार शासनाने कर्ज घेण्याकरीता दिलेल्या हमीवरील हमी शुल्क

			प्रक्रिया सुरु असल्याचे वर्षे 2008-09 च्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात सांगितले. परंतु 2016-17 च्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात असे नमूद करण्यात आले होते की (अ) कर्जदार आणि कर्जदाता या दोघांना अदेय लाभ होईल; आणि (ब) ज्या प्रकरणांमध्ये कर्जाच्या हमी अवाहनीत करण्यात आल्या आहेत अशा प्रकरणांवर वैधानिक नियंत्रण कमी होईल या कारणासाठी राज्य शासनाने हमी विमोचन निधी निर्माण न करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने संस्थांना दिलेल्या हमीसाठी हमी शुल्क आकारण्यात येत होते व ते "संकीर्ण सर्वसाधारण सेवा" मध्ये लेखांकित केले जात होते. हमीशुल्काखालील जमा 2015-16 मध्ये प्राप्त झालेल्या रु. 29.09 कोटीवरुन 2016-17 मध्ये रु. 9.87 कोटीपर्यंत कमी झाल्या. राज्य शासनाने, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त महामंडळ मर्यादीतच्या रु. 20.26 कोटी अवाहनीत हमींची पुर्तता करणे अद्यापही बाकी आहे. एकूण अंदाजित प्राप्त हमी शुल्कांपैकी (रु. 1,464.58 कोटी) वर्षभरात फक्त रु. 9.87 कोटी प्राप्त झाले. महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादीतने राज्य शासनाला प्रदान करावयाच्या हमी शुल्काच्या ज्या रकमेचे (रु. 1.31 कोटी) समभागातील गुंतवणुकीच्या रुपात पुस्तकी समायोजन करण्यात आले होते त्याचा समावेश प्राप्त हमी शुल्कात केला होता. परिणामी प्राप्त हमी शुल्कातील निव्वळ तुट रु. 1,454.71 कोटी होती.	सबंधित महामंडळे/सार्वजनिक उपक्रम/सहकारी संस्था यांनी शासनाकडे भरणे आवश्यक आहे. वित्त विभागाकडून प्रतिवर्षी सबंधित प्रशासनिक विभागांना हमीशुल्क वसुली करीता मागणीपत्र (Demand Notice) पाठविण्यात येते व पाठपुरावा चालु असतो.

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
५०	१.८.४.२	अर्थाकल्पा बाहेरील कर्जे	भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 293 (3) अन्वये अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे अनुज्ञेय नाहीत. 2008-09 च्या मध्यम मुदतीचा राजकोषीय धोरण निवेदनानुसार राज्य शासनाने 2005-06 या वर्षापासून अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे पुर्णपणे थांबविली होती. 2006-07 ते 2016-17 दरम्यान कोणतीही अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे घेण्यात आली नव्हती. तथापि, 2015-16 च्या शेवटी 2005-06 च्या पूर्वीच्या अर्थसंकल्पाबाहेरील कर्जापोटी रु. 550 कोटी प्रलंबित होते.	नियोजन विभागांतर्गत महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित या उपक्रमाकरीता उभारण्यात आलेल्या अर्थसंकल्प बाह्य कर्जापैकी सन २०१६-१७ अखेर रु. ५०.५० कोटीचे दायित्व शिल्लक असून सदर दायित्वाची परतफेडीचा विवरणपत्रानुसार संपुर्ण परतफेड सन २०२२-२३ होणार आहे.

पृष्ठ क्र.	परीच्छेद	विषय	अहवालातील परिच्छेद	अभिप्राय
४४-४६	१.९	ऋण व्यवस्थापन ऋणांची व्यवहार्यता	कर्जाची परतफेड करण्याची राज्याची क्षमता ही ऋण व्यवहार्यतेवरुन दर्शविली जाते. राज्य शासनाच्या ऋणाच्या प्रमाणाबरोबरच राज्याच्या ऋणाची व्यवहार्यता ठरविणाऱ्या विविध दर्शकाचे विश्लेषण करणेही महत्त्वाचे असते. 2012-13 ते 2016-17 या कालावधीतील वेगवेगळया ऋण व्यव्हार्यतेच्या निदर्शकांचे विश्लेषण तक्ता 1.42 मध्ये दिले आहे. व्याज प्रदाने आणि परतफेडीसाठी तरतूद केल्यानंतर कर्जाऊ निधीपैकी उपलब्ध निव्वळ निधीत 2012-13 मधील रु. 4,633 कोटीवरुन 2014-15 मध्ये रु. १,९७६ कोटी अशी तीव्र घट झाली व 2015-16 मध्ये वाढ होऊन ती रु. 5,824 कोटी झाली आणि 2016-17 मध्ये अधिक वाढ होऊन ती रु. 15,984 कोटी झाली. 2012-13 ते 2016-17 दरम्यान व्याज प्रदानांचे महसुली जमेशी गुणोत्तर 14.5 टक्के ते 13.3 टक्के होते. राज्याच्या कर्जाच्या परिपक्वतेची रुपरेखा तक्ता 1.43 व आलेख 1.19 मध्ये दर्शविली आहे. राज्याच्या कर्जाची परिपक्वता असे दर्शविते की राज्याच्या एकूण कर्जाच्या जवळजवळ 54 टक्के रक्कमेची पुढील सात वर्षात परतफेड करायची आहे. तक्ता 1.43 पुढे असे दर्शवितो की राज्याने 2018-20 कालावधी	महालेखापाल यांच्या लेख्यानुसार दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी राज्यावरील एकुण दायित्व रु. ३९५८५८ कोटी दर्शविले आहे. राज्य शासनाच्या लेख्यानुसार सदर दायित्व रु. ३६४८१९ कोटी आहे. महालेखापाल यांनी दर्शविलेल्या दायित्वामध्ये बिनव्याजी ठेवींचा समावेश आहे. राज्य शासनाने घेतलेल्या कर्जापैकी कोणतीही थकबाकी राज्य शासनावर नाही. महालेखापाल यांच्या निष्कर्षा बाबत खालील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत. १. शासनाने उभारलेल्या कर्जावरील कर्जसेवा खर्चामध्ये (debt servicing) मुद्दल व व्याजाचा समावेश होतो. व्याजावरील खर्च हा राज्याच्या स्वत:च्या महसुली उत्पन्नातून प्रदान करण्यात येतो, सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील राज्यावरील एकुण व्याज प्रदानाची महसूली जमेशी टक्केवारी केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मापदंडाच्या आत आहेत. २. सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील राज्यावरील एकूण दायित्वाचे स्थुल राज्य उत्पादनाशी प्रमाण

			दरम्यान रु. 43,952.10 कोटींच्या (2016-18 च्या तुलनेत रु. 30,235.04 कोटीची वाढ) परतफेडीसाठी स्त्रोतांना चालना दयावी. हे दायित्व पुर्ण करण्यासाठी जर निश्चित योजना नसेल तर विकासासाठी उपलब्ध असलेले साधनस्त्रोत घटतील. तक्ता 1.44 व आलेख 1.20 मध्ये 2012-13 ते 2016-17 या कालावधीतील लोक ऋणावरील तक्ता 1.44 आणीआलेख 1.20 वरुन असे दिसून येते की 2012-13 आणि 2013-14 दरम्यान संपूर्ण लोक ऋण जमा ऋण परतफेडीसाठी वापरण्यात आली होती. 2015-16 मध्ये 82 टक्क्यांच्या तुलनेत 2016-17 च्या लोक ऋणांच्या जमेतून लोक ऋणांची परतफेड 74 टक्के होती. अशाप्रकारे 2012-17 दरम्यान ऋण परतफेडीवरील सरासरी खर्च रु. 30,652 कोटी होता जो या कालावधीतील सरासरी लोक ऋण जमाच्या 89.1 टक्के होता ज्यावरुन ऋणांचा मोठया टक्केवारीतील हिस्सा ऋण परतफेडीसाठी वापरला जात होता हे स्पष्ट होते. यावरुन असेही स्पष्ट झाले की प्रगतीला चालना देण्यासाठी विकासावरील खर्च भागवण्यासाठी ऋणांचा अतिशय अल्पसा हिस्सा उपलब्ध होता. 2012-13 मधील रु. 17,835.14 हे दरडोई कर्ज वाढून 2016-17 मध्ये रु. 26,853.91 झाले.	केंद्र शासनाच्या निर्देशानुसार २५% आत आहेत ३. वित्त आयोगाने राजकोषिय तुटीची निश्चित केलेली मर्यादा स्थुल राज्य उत्पादनाच्या ३ टक्के असुन, सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील सदरचे प्रमाणही ३% च्या आत आहे. ४. तसेच केंद्र शासनाकडून वार्षिक कर्ज उभारण्याची मर्यादा निश्चित करताना, निव्वळ कर्ज उभारणीसाठी (Net Borrowing) परवानगी दिली जाते. (वित्तीय वर्षातील एकूण कर्ज उभारणी वजा त्या वर्षातील कर्ज परतफेडीची रक्कम) केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेतच कर्जाची उभारणी करण्यात येते. राज्य शासनाकडून कर्जे मुख्यत्वे करुन विकास कामासाठी उभारण्यात येतात. तथापि लोकहितासाठी उदभवणा-या आकस्मिक दायित्वामुळे उदा. (शेतकरी कर्ज माफी, नैसर्गिक आपत्ती, सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा इ.मुळे) विकास कामावरील खर्च कमी होण्याची शक्यता असते.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
५३	१.१०	राजकोषीय असमतोल	तीन मुख्य राजकोषीय मापदंड जसे की महसूल,राजकोषीय व प्राथमिक तूट हे विनिर्दिष्ट कालावधीत राज्य शासनाच्या वित्तीय स्थितीतील एकंदर राजकोषीय असमतोलांचे प्रमाण दर्शवितात. शासकीय लेख्यांतील तूट, जमा व खर्चातील तफावत दर्शविते.तुटीचे स्वरुप हे शासनाच्या राजकोषीय व्यवस्थापनाच्या दूरदर्शीपणाचे द्योतक आहे. तसेच, ज्या मार्गाने तूट भरून काढली जाते व उभारलेले स्त्रोत वापरले जातात. ते शासनाच्या राजकोषीय स्वास्थ्याचे महत्वाचे निदर्शक आहेत. तुटीचा कल, स्वरूप, प्रमाण व तूट भरून काढण्यासाठी केलेली वित्तव्यवस्था व तसेच महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम / नियमांतर्गत २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी तयार केलेल्या लक्ष्यांच्या तुलनेत महसूली व राजकोषीय तुटीच्या प्रत्यक्ष पातळीचे निर्धारण या भागात सादर केले आहे.	महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीदर्शक आहेत.
५३	१.१०.१	तुटीतील कल	१७-२०१२ या कालावधीतील तुटीच्या निदर्शकांचा कल आलेख १.२१ मध्ये सादर केला आहे. महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम (दूसरी सुधारणा), २०११ नुसार २०११-१२ पर्यंत महसूली तूट शुन्यापर्यंत खाली आणून त्यानंतर महसूली आधिक्य निर्माण करायचे होते. परंतू, महसूली खर्चाच्या १२ टक्के वाढीच्या तुलनेत महसूली जमेतील १८ टक्के वाढीमूळे प्रामुख्याने २०१२-१३ मध्ये रू.४,२११ कोटी महसूली आधिक्य प्राप्त करणे शक्य झाले.महसुली खर्चातील तीव्र वाढीमुळे २०१३-१४ दरम्यान महसुली आधिक्य महसुली तूटीत रुपांतरीत झाले (रु.५,०८१ कोटी) २०१४-१५ दरम्यान मागील वर्षाच्या तूलनेत महसुली तूट २.४ पट वाढून रु.१२,१३८ कोटी झाली आणि २०१५-१६ मध्ये ती कमी होऊन रू.५,३३८ कोटी झाली व पुढे २०१६-१७ मध्ये ती रु.८,५३६ कोटी पर्यंत वाढली. वर्ष २०१५-१६ मधील रु.२८,३६४ कोटी राजकोषीय तूट २०१६-१७ मध्ये वाढून उदय व्यतिरिक्त ती रु.३३,६५७ कोटी झाली (उदय सम्मिलीत करून रु.३८,६१६ कोटी). २०१२.१३ दरम्यानचे प्राथमिक आधिक्य (रु.५,३३६ कोटी), २०१३-१४ मध्ये (रू.४,८११ कोटी) २०१४-१५ मध्ये (रू.७,८६२ कोटी) २०१५-१६ मध्ये (रू.२,५९३ कोटी) आणि २०१६-१७ मध्ये (रु.५,१२५ कोटी) प्राथमिक तुटीत परावर्तीत झाले. मागील वर्षाच्या तुलनेत राजकोषीय तुटीमधील वाढ (रु.५,२९३ कोटी) व व्याज प्रदानातील वाढ (रु.२,७६१ कोटी) यामुळे २०१६-१७ दरम्यान प्राथमिक तूट वाढली. वर्ष २०१६-१७ मध्ये एकत्रिकृत निधीच्या बाहेर व्यवहार घडणे, चुकीच्या शीर्षाखाली रक्कम	महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीदर्शक आहेत.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			अर्थसंकल्पीत व लेखांकीत होणे, राखीव निधी व ठेवी इत्यादीवरील व्याजासाठी तरतूद न करणे इत्यादी घडामोडी घडल्या होत्या. परिणामी, महसुली तूट रु.९२६.२८ कोटीने आधिक प्रमाणात आणि रू.२,०३३.७१ कोटीने कमी प्रमाणात दर्शविली गेली होती, याच्या निव्वळ प्रभावामुळे महसुली तूट रु.१,१०७.४३ कोटींनी कमी दर्शविली गेली.	
५४	१.१०.२	राजकोषीय तूटीचे घटक व तिची भरपाई करण्याची पद्धत	तक्ता **१.४५** मध्ये प्रतिबिंबित झाल्याप्रमाणे राजकोषीय तुटीची भरपाई करण्याच्या पद्धतीत घटकात्मक स्थित्यंतर घडून आले. महसूली तूटीमधील वाढीमुळे मागील वर्षाच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये राजकोषीय तूटीमध्ये रु.५,२९२ कोटीची वाढ झाली. राजकोषीय तूटीच्या टक्केवारीच्या तुलनेत निव्वळ भांडवली खर्च २०१५-१६ मध्ये ८० टक्क्यावरून कमी होऊन २०१६-१७ मध्ये ७६ टक्के झाला.	सन २०१६-१७ मध्ये वाढलेली महसूली तूट व उदय योजनेसाठी करावयाची तरतूद यामुळे भांडवली खर्च कमी झालेला आहे.
५५	१.१०.३	तूट / आधिक्याचा दर्जा	राजकोषीय तूटीशी महसूली तूटीचे गुणोत्तर व प्राथमिक महसुली तूट व भांडवली खर्चात (कर्जे व अग्रिमांसह) प्राथमिक तुटीचे अपघटन राज्यांच्या वित्तव्यवस्थेतील तुटीचा दर्जा निर्देशित करतात. राजकोषीय तुटीशी महसूली तुटीचे गुणोत्तर चालू खर्चासाठी कर्जाऊ निधीचा किती प्रमाणात वापर झाला हे दर्शविते. चालू वर्षात हे गुणोत्तर ०.२२ होते म्हणजेच २२ टक्के कर्जाऊ निधी चालू खर्चासाठी वापरण्यात आला होता. राज्याची ऋणेतर जमा महसुली वर्गातील प्राथमिक खर्चाच्या गरजा भागविण्यासाठी पूरेशी होती.परंतु, भांडवील वर्गांतर्गतचे खर्च भागविण्यासाठी ती पूरेशी नसल्यामुळे २०१३-१७ दरम्यान प्राथमिक तूट निर्माण झाली. तथापि, २०१२-१३ दरम्यान महसुली आणि भांडवली अशा दोन्ही वर्गातर्गतचे खर्च भागविण्यास ऋणेतर जमा पुरेशी असल्यामुळे प्राथमिक आधिक्य निर्माण झाले. तक्ता **१.४६** मध्ये तपशील दर्शविला आहे. प्राथमिक खर्चाशी भांडवली खर्चाची टक्केवारी २०१२-१३ मधील १२.६ टक्क्यावरुन कमी होऊन २०१६-१७ मध्ये ११.८ टक्के झाली.	महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीदर्शक आहेत.

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
५६	१.१२	निष्कर्ष	कर महसूल (आठ टक्के), केंद्र शासनाकडुन प्राप्त सहाय्यक अनुदाने (२८ टक्के), केंद्रीय करांचे हस्तांतरण (२० टक्के) यांतील वाढ आणि करतेर महसुलामध्ये (पाच टक्के), झालेली घट यांच्या निव्वळ परिणामामुळे मागील वर्षापेक्षा यावर्षी राज्यात महसुली जमेत (रु.२,०४,६९३ कोटी) ११ टक्क्यांनी वाढ झाली. महसुली जमा २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ९३ टक्के होती. राज्य शासनाच्या करेतर महसुली जमा राजकोषीय सुधारणा पथामध्ये केलेल्या प्रक्षेपणापेक्षा ४१ टक्क्यांनी आणि अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा ३६ टक्क्यांनी कमी होत्या. राज्याचा महसुली खर्च मागील वर्षापेक्षा १२ टक्क्यांनी वाढला आणि २०१६-१७ च्या एकूण खर्चाच्या ८७ टक्के होता. योजनेतर महसुली खर्च महसुली खर्चाच्या ८० टक्के होता व महसुली जमांशी त्याची टक्केवारी २०१५-१६ मधील ८३ टक्क्यावरून वाढ होऊन २०१६-१७ मध्ये ८४ टक्के झाली. रु.१,७१,१४० कोटी हा योजनेतर महसुली खर्च अर्थसंकल्पीय अंदाज व राजकोषीय सुधारणा पथामधील प्रमाणशीर निर्धारणापेक्षा (रु.१,७५,१९३ कोटी) कमी राहिला. योजनांतर्गत महसुली खर्च व योजनेतर महसुली खर्च मागील वर्षापेक्षा अनुक्रमे १७ टक्के आणि ११ टक्क्यांनी वाढला.२०१५-१६ पेक्षा या वर्षात व्याज प्रदाने (रु.२८,५३२ कोटी) ११ टक्क्यांनी वाढली होती, ती चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रक्षेपणापेक्षा (रु.२९,६९७ कोटी) कमी होती. अशाप्रकारे, राज्य शासनाला राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमात निश्चित केलेल्या मर्यादेत राजकोषीय तूट ठेवण्यात यश आले. तथापि,२०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये प्रक्षेपित केलेल्या रु.३,६४५ कोटी महसुली तुटीच्या तुलनेत, प्रत्यक्ष तुट रु.८,५३६ कोटीची होती जी मागील वर्षीच्या तुलनेत,महसुली जमा (११ टक्के) आणि महसुली खर्च (१२ टक्के) यातील वाढीच्या दरांच्या फरकामुळे झाली होती. मागील वर्षाशी तुलना करता, राजकोषीय तुट (उदय व्यतिरिक्त रु.३३,६५७ कोटी) वाढली होती आणि ती राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या १.५ टक्के होती.२०१६-१७ दरम्यान प्राथमिक तूट रु.५,१२५ कोटी होती. मागील वर्षाच्या तुलनेत सबसिडी वरील खर्च १८ टक्क्यांनी वाढला व तो महसुली खर्चाच्या जवळजवळ १० टक्के होता. मजूरीवरील (सहाय्यक अनुदानाचा घटक समाविष्ट करून) खर्च राज्याच्या	महालेखापाल कार्यालयाने उपस्थित केलेले मुद्दे वस्तुस्थितीदर्शक आहेत.

कक्ष अधिकारी
महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
			स्वत:च्या राजकोषीय सुधारणा पथापेक्षा व अर्थसंकल्पीय अंदाजामधील प्रक्षेपणांपेक्षा कमी होता. स्थानिक संस्था आणि इतर संस्थांना दिलेले अर्थसहाय्य जे २०१६-१७ मध्ये महसूली खर्चाच्या ४७ टक्के होते.ते मागील वर्षापेक्षा १८ टक्क्यांनी वाढले होते. राज्याचा भांडवली खर्च जो एकूण खर्चाच्या १० टक्के होता तो, मागील वर्षाच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये १२ टक्क्यांनी वाढला, परंतु २०१६-१७ च्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा तो रु.५,४५७ कोटीने (१८ टक्के) कमी होता. २०१२-१७ दरम्यान शासकीय कंपन्या, संयुक्त स्कंध कंपन्या, आणि भागीदारी व वैधानिक महामंडळे इत्यादी मधील राज्य शासनाच्या गुंतवणूकीवरील सरासरी परतावा ०.०४ टक्के होता, तर याच कालावधीत शासनाने घेतलेल्या कर्जावर सरासरी ७.६ टक्के व्याज दिले होते. मार्च २०१७ ला राज्याची कर्जाची एकूण थकबाकी रु.३,९५,८५८ कोटी होती. २०१२-१७ दरम्यान कर्जाच्या परतफेडीवरील सरासरी खर्च रु.३०,६५२ कोटी होता जो त्याच कालावधीतील सरासरी लोक ऋण जमांच्या ८९.१ टक्के होता, ज्यावरून कर्ज परतफेडीसाठी कर्जाच्या मोठया टक्केवारीत रक्कम वापरली जात होती हे स्पष्ट होते. यावरून असेही दर्शविले गेले की प्रगतीला चालना देण्यासाठी विकास खर्च भागविण्यासाठी कर्जाच्या अगदी नगण्य भाग उपलब्ध होता. तसेच, २०१८-२० या कालावधीत दरम्यान रु.४३,९५२.१० कोटीच्या परतफेडीसाठी (२०१६-१८ या कालावधीच्या तुलनेत रु.३०,२३५.०४ कोटीची वाढ) राज्याने स्त्रोतांना चालना द्यायला हवी. तसेच, हे दायित्व पूर्ण करण्यासाठी जर निश्चित योजना नसेल तर, विकासासाठी उपलब्ध असलेले साधनस्त्रोत घटतील. मागील वर्षाच्या तुलनेत राज्य शासनाच्या रोख शिलकीत २४ टक्क्यांची वाढ झाली होती, ज्यातील मोठा भाग लोक लेख्यांतील शिलकींचा होता. २०१६-१७ च्या अखेरीस राज्याची रोख शिल्लक रु.६८,७५० कोटी होती, ज्यातील रु.४४,११० कोटी रोख शिल्लक गुंतवणूक लेख्यांमध्ये होती. २०१६-१७ आणि २०१५-१६ दरम्यान राज्य शासनाला भारतीय रिझर्व बँकेत किमान रोख शिल्लक राखण्यात यश आले आणि राज्याला अर्थोपाय अग्रीमे घ्यावी लागली नाहीत.	

पृष्ठ क्र.	परिच्छेद क्र.	विषय	राज्य वित्त अहवाल २०१६-१७ मधील परिच्छेद	वित्त विभागाचे अभिप्राय
५८	१.१३	शिफारशी	• मागील पाच वर्षातील एकूण खर्चापैकी भांडवली खर्चाच्या प्रमाणातील घसरता कल लक्षात घेता शासनाने भांडवली मत्ता निर्मितीवरील खर्चास जास्त प्राधान्य देण्यास वाव आहे. • शासनाने गुंतवणूकीवर यथायोग्य परतावा प्राप्त होईल याची सुनिश्चीती करण्यासाठी उपाययोजना करावी. अन्यथा, कमी वित्तीय परतावा असलेल्या प्रकल्पांमध्ये अधिक दरावर प्राप्त केलेल्या खर्चिक कर्जाऊ निधीची गुंतवणूक सातत्याने केली जाईल.	वित्त विभागाने या अगोदरच भांडवली खर्चाबाबत अभिप्राय नोंदविलेले आहेत. सदर पायाभूत सुविधा निर्माण झाल्यानंतर राज्याच्या उत्पन्नाच्या स्त्रोतामध्ये वाढ होणे अपेक्षित आहे.

साक्ष :

२.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालातील प्रकरण क्रमांक १ (परिच्छेद क्रमांक १.१ ते १.१३) यासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक २८ मे, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली.

साक्षीच्या वेळी सन २०१६-१०१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवाला संदर्भात समितीस सखोल माहिती देण्यात यावी अशी समितीने सूचना केली असता, या टिपिकल ऑडिट रिपोर्टमध्ये राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज येत असतो. राज्याच्या आर्थिक स्थितीची माहिती मिळावी, हा या अहवालाचा उद्देश असतो. या दृष्टीने यातील सर्व माहितीचे संकलन व आयोजन केलेले असते. फायनान्स कमिशन हा रिपोर्ट राज्याच्या आर्थिक परिस्थितीचा अंदाज यावा याकरिता तयार करीत असते. यातील स्टेटिस्टक्स बऱ्याच वेळा राज्याच्या निरनिराळया स्तरावरील फायनान्शियल आढाव्याकरिता वापरले जात असते. बजेटमध्ये फायनान्शियल मॅनेजमेंट अंतर्गत ॲप्रुव्हड बजेटरी ॲक्रिडियेशन्सचा सखोल विचार केलेला असतो. यासंदर्भात समितीने संबंधित विभागाच्या सचिवांची व महसूल, वित्त, व्यय सचिवांची सखोल साक्ष घेतलेली असते. त्याच्या समरीचाही येथे वापर केला जातो. या फायनान्शियल रिपोर्टची काही प्रमुख वैशिष्टये आहेत, राज्याचा फिस्कल डेफिशिट जो आहे, तो पाहिला तर तो संपूर्ण राज्याचा १५ टक्के इतका आहे. स्टेट जीडीपी जनरली तीन टक्केच्या खाली असेल तर ते चांगले समजले जाते. त्याच प्रमाणे फिस्कल डेफिशिटचा विचार केला जातो. त्या दृष्टीने यातील ती स्थिति चांगली असल्याचे निदर्शनास येत आहे. यानंतर राज्याची आर्थिक स्थिती पाहण्याचा दुसरा पॅरामीटर म्हणजे जीडीपी, टोटल लायेबिलिटीज किती आहेत, राज्याची एकंदर कर्ज, देणी किती आहेत, त्या तुलनेत जीडीपीचा विचार केला जातो. राज्याचा जीडीपी किती आहे, याचाही या तुलनेत विचार केला जातो. सन २०१६-२०१७ मध्ये राज्याचा जीडीपी २२,६८,००० इतका होता. ३,९५,८५८ इतकी देणी, लायेबिलिटीज होती. ही स्थिती फार उत्तम आहे. कारण राज्याचा जीडीपी जो त्याच्या १७.५ टक्के इतका आहे. गुजराथ, राजस्थान यांचा जीडीपी अनुक्रमे २१.१ व ३३ टक्के इतका आहे. पहिल्यापेक्षा आताची आपली स्थिती खूप चांगली आहे. पहिली गोष्ट म्हणजे राज्याचे जे उत्पन्न आहे ते टॅक्स आणि नॉन टॅक्सच्या माध्यमातून येते. केंद्र शासनाकडून राज्याचा उत्पन्न मिळाले तरी त्याचा शेअर युनियन ग्रांट म्हणून येतो. राज्याच्या सध्याच्या उत्पन्नाचा आपण विचार केला तर एकंदरीत राज्याच्या जीडीपीच्या तुलनेत किती टक्के टॅक्स आणि नॉन टॅक्समधून उत्पन्न येते, ते महत्त्वाचे आहे. पाच वर्षापूर्वी ७.१ टक्के हे टॅक्स आणि नॉन टॅक्सचे उत्पन्न होते. जीडीपी जर शंभर असेल तर ८० टक्क्यांव्यतिरिक्त १२ ते १३ लाख रुपये राज्याच्या तिजोरीत गेलेले आहेत. सन २०१६-२०१७ मध्ये पाहिले तर ६६ टक्क्यांपैकी राज्याचा ६० टक्के उत्पन्न राज्याच्या तिजोरीत नॉन टॅक्सद्वारे येते. राज्याचे उत्पन्न जीडीपीच्या तुलनेत कमी होत आहे, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले.

नॉन टॅक्सअंतर्गत काय काय गृहित धरले जाते ? अशी विचारणा समितीने केली असता, नॉन टॅक्समध्ये इंटरेस्ट, मायनिंग व तत्सम बाबी गृहित धरल्या जातात. सन २०१६-२०१७ मध्ये टॅक्समधून १,४९,००० कोटी रुपये इतके उत्पन्न आले होते. १,२७,००० कोटी रुपये उत्पन्न नॉन टॅक्समधून तिजोरीत आले होते. टॅक्सपेक्षा नॉनटॅक्सचे उत्पन्न कमी येते. आता आपण जर पाच वर्षांचा आलेख पाहिला तर सन २०१२-२०१३ मध्ये ७.८ टक्के टॅक्स-नॉन टॅक्स राज्याचे उत्पन्न होते. राज्याचे जीडीपी १०० रुपये असेल तर ७० किंवा ८० पैसे उत्पन्न राज्याच्या तिजोरीमध्ये टॅक्स आणि नॉन टॅक्सच्या माध्यमातून मिळत होते. ७.८ टक्का हा कमी होत चाललेला आहे. राज्याचे उत्पन्न जीडीपीच्या तुलनेत कमी होत आहे. हा कन्सर्नचा मुद्दा आहे. नॉन टॅक्समध्ये इंटरेस्ट वगैरे हे उत्पन्न येते. आता सन २०१६-२०१७ मध्ये ज्यावेळी १,४९,००० एवढे उत्पन्न होते. १२,७०० कोटी रुपयांमध्ये त्याचे रुपांतर झालेले आहे. १,३६,००० कोटी रुपये टॅक्समधून उत्पन्न येते. बेसिकली सब्स्टिन्शियली टॅक्समधून हे उत्पन्न येते. नॉन टॅक्सचे टेन पर्सेंट इतके कमी आहे. हा एक पहिला मुद्दा आहे की, राज्याच्या स्वतःच्या रिव्हेन्यूचे जीडीपीच्या तुलनेत पर्सेंटेज कमी होत चालली आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, स्टेट फायनान्सचा रिपोर्ट पाहिला की, कॅपिटल एक्स्पेंडिचर किंवा कॅपिटल आऊट ले म्हणजे ज्यातून हे ॲसेट निर्माण केले जातात. ती टक्केवारी ११ ते १२ इतकी आहे. राज्याचा जेवढा खर्च होतो, त्याच्या साधारणतः दहा ते अकरा पर्सेंट कॅपिटल एक्स्पेंडिचर आहे, उर्वरित सर्व खर्च हा रिव्हेन्यूचा आहे. तेच जर आपण जनरल कॅटेगरी स्टेट्सचे पाहिले तर तेच पर्सेंटेज आहे. १४.५ इतकी ही टक्केवारी आहे. शंभरातील १४.५ रुपये कॅपिटल एक्स्पेंडिचरवर खर्च करीत आहेत, त्यापेक्षाही आपला कॅपिटल खर्च कमी होत आहे. कॅश बॅलन्स वाढत आहे. ४०,००० कोटींच्या वर कॅश बॅलन्स आहे. कॅश बॅलन्स मॅनेजमेंटकडेही लक्ष देण्याची गरज आहे. दुसरे दोन पॉईंट असे आहेत की, जे शासनाकडून लोन दिले जातात, प्रत्येक सरकारचे रिझर्व्ह बँकेकडे खाते असते. ट्रेझरीमधून जे ट्रान्झॅक्शन्स होतात, ते सर्व शेवटी रिझर्व्ह बँकेच्या त्याच अकाऊंटमध्येच जातात. आता असे पण होऊ शकते की, जर तेथे जास्त कॅश असेल तर रिझर्व्ह बँक चौदा दिवसांच्या किंवा ९१ दिवसांच्या गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या ट्रेझरीजमध्ये इन्व्हेस्ट करते, म्हणजे ती कॅश निव्वळ पडून न राहता त्याच्यावर व्याज देखील मिळते. त्याशिवाय एक सिंकिंग फंड तयार केला जातो, राज्याचे एवढे कर्ज घेतलेले आहे, आता आपण बघितले की, या टोटल लायेबिलिटीज ३,९५,००० कोटी इतक्या आहेत. त्यात मार्केट लोन्स वगैरे या सगळयाचा भाग येतो. हे एक सिंकिंग फंड तयार केला जातो. अर्धा टक्के वगैरे या लायेबिलिटीच्या अर्धा टक्के इतका फंड वेगळा करून रिझर्व्ह बँकेचा प्रश्न येत नाही. कर्ज परत करण्याची वेळ आली आणि तिजोरीत पैसे नाहीत, त्यावेळी सिंकिंग फंडाचा वापर होतो. दुसरे दोन छोटे मुद्दे असे आहेत की, जे विभाग लोन देतात, त्यांच्या लोन अकाऊंट्सचे कोणाला लोन दिले, केव्हा डयू आहेत वगैरे हे रेकॉर्ड किपींगचा इश्यू आहे. रिकन्सिलिएशनचाही इश्यू आहे. युटिलायजेशन सर्टिफिकेटचाही इश्यू आहेत, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीस विदित केले.

शासन व महामंडळांचे लोन आहेत, ज्यांना शासनाने स्वायत्त महामंडळे केलेले आहेत, त्यासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, इंडिपेंडंट लिगल एन्टिटीज आहेत. गॅरंटीजवाल्या संस्थाही यामध्ये आहेत. शासन त्यांना लोन्समध्ये ॲड करीत नाही. शासन गॅरंटी म्हणून

सांगतो की, स्टेट गव्हर्नमेंटने एवढ्या गॅरंटीज दिलेल्या आहेत. समजा जर उद्या वेळ आली की, ती जी कोणती एन्टिटी असेल तिने डिफॉल्ट केले तर राज्य शासनाला त्याचे पेमेंट करावे लागेल. गॅरंटीज अकाऊंट केली जात नाही. ती कॅश बेसिसमध्येही गॅरंटीज दाखविली जात नाही, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले.

बजेटमध्ये गॅरंटीज दाखविली जातात काय ? असा प्रश्न समितीने केला असता, अकाऊंट्समध्ये गॅरंटीज नोट दाखविली जाते. ती लायेबिलिटी दाखविली जात नाही असे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले.

जेवढा नियत व्यय आपण प्रत्येक विभागाला देतो, ते काही पूर्ण खर्च होत नाही, त्याचा उल्लेख यामध्ये दिसला नाही. अखर्चित रकमेचा उल्लेख दिसला नाही. याची आकडेवारी दिसणे आवश्यक आहे. ३१ मार्चपर्यंत खर्च न झालेले दिसून येतात. या मुद्दयात तो विषय नाही. आपण ट्रेझरीमध्ये किंवा बजेटला तरतूद करतो, खर्च केली नाही तरी जमा कॅश सरप्लस कॅश म्हणून युटिलाईज होत नाही तोपर्यंत कॅश म्हणून कन्सिडर करण्यात येते काय, याबाबत माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, शासनाचे बजेट दरवर्षी होते, बजेट केलेले आहे, म्हणजे कॅश वेगळी काढून ठेवलेली आहे. आरबीआयचे करंट अकाऊंट चालू आहे. टॅक्सेस, सेंट्रल गव्हर्नमेंटकडून ट्रान्सफर झालेले पैसे जमा होत राहतात. एकीकडे खर्च होत राहतो. समजा एखाद्या विभागाचे पाच हजार कोटींचे बजेट आहे. त्यांनी ४८०० कोटीच खर्च झालेले आहेत. यामध्ये आपण त्या विभागाच्या नावाने ५००० कोटी रुपयांचा कॅश बॅलन्स बाजूला काढलेला नसतो, त्यामुळे ४८०० कोटी रुपयांच्या खर्चाव्यतिरिक्त जो २०० कोटी रुपये अखर्चित राहिले ते काही कॅश स्वरुपात शिल्लक राहत नाहीत, ते शिल्लक राहिले, अखर्चित राहिले, असा प्रश्नच निर्माण होत नाही, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीस अवगत केले.

याचे मूळ कारण असेच आहे की, ज्या ज्या विभागाकरिता तरतूद केली जाते, तो विभाग वेळेवर पूर्ण पैसे खर्च करीत नाही म्हणून कॅश वाढत जाते असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २०१६-२०१७ मध्ये ४०,००० कोटी रुपयांची कॅश बॅलन्स ३१ मार्च २०१७ ला होती. त्याच पार्श्वभूमीवर मागील वर्षी ३१ मार्च, २०१९ ला काय कॅश बॅलन्स स्थिती होती या बाबत सचिवांनी ४७ हजार कोटी रुपये कॅश बॅलन्स आहे असे समितीस अवगत केले. प्रत्यक्षात विभागाकडे प्रत्येक वर्षीची किती कॅश बॅलन्स आहे, प्रत्येक महिन्याला २०-२१ हजार कोटी रुपये कमिटेड खर्च असतो. मिनी एक्स्पेंडिचरमध्ये खर्च करीत असतो. हे सर्व मिळून ही रक्कम झालेली आहे. मागील वर्षी पे-कमिशन विषयी राज्य शासनाला घ्यायचे होते. याकरिता बजेटमध्ये तरतूद करून ठेवलेली आहे. मागील वर्षी निर्णय झाले तरीही खर्च मात्र पुढील वर्षी करण्यात येतो. १ जानेवारी,२०१६ पासून द्यावयाचा निर्णय झाला तरी पगारामध्ये हा निधी रिफ्लेक्ट करताना त्याकरिता तरतूद या वर्षी केलेली आहे. एरियर्सकरिता तरतूद करताना त्याप्रमाणे तरतूद केलेली आहे. उर्वरित जमा पाच टप्प्यांमध्ये जमा करण्यात येणार आहे. एका टप्प्याकरिता तरतूद ५००० कोटी रुपये इतकी केलेली आहे. याकरिता आपल्याला कॅश पैसे ठेवावे लागतात. आपली कॅश आपण बँकेत ठेवतो असे नाही विभाग साधारणतः हे कॅश रिझर्व्ह बँकेत ठेवतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

ही जी कॅश अमाऊंट दरवर्षी वाढत चालली आहे. याची कारणे काय आहेत ? विभागाने मागील वर्षीचे सातव्या पे कमिशनकरिता ठेवली आहे, असे सांगितले होते, असे समितीने निदर्शनास आणले असता, आधीचे निर्णय व ज्यावेळी द्यावयाचे एग्झिक्यूट करण्याकरिता वेगवेगळया प्रकारची तरतूद वेळेप्रमाणे करावी लागते. एखाद्या वर्षी नेमका किती खर्च होणार आहे, याचाही विचार करावा लागतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कन्टिन्जन्सी चार्जेसकरिता रिझर्व्ह ठेवली तरी तेही कंडिशन्सप्रमाणे राखीव ठेवावे लागतात. मागील दोन वर्षांमध्ये कंटिन्जन्सी चार्जेसमध्ये अगोदर खर्च व्हायचे ते प्रमाण आता कमी झालेले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, केंद्र शासनाच्या योजनांमध्ये केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा असतो. आता ६० व ४० टक्के असा हिस्सा आहे, यापूर्वी ७५ व २५ टक्के असा हिस्सा होता. आता बऱ्याच योजनांसाठी राज्य शासनाला प्रोव्हीजन करून ठेवावी लागते. त्यामुळे पीएलए अकाऊंटध्ये निधी ठेवण्यात येतो. आता बऱ्याच विभागांमध्ये पीएलए अकाऊंट आहेत. त्या अकाऊंटमध्ये असलेला निधी कॅश बॅलन्समध्ये धरण्यात येतो. याबाबत केंद्र शासनासोबत कमिटमेंट असते. केंद्र शासनाने १०० कोटी दिले तर राज्य शासनाचे ४० कोटी रुपये असतात अशा प्रकारे १४० कोटी रुपये पीएलए अकाऊंटमध्ये ठेवावे लागतात. या दोन तीन कारणांमुळे कॅश बॅलन्स ठेवावा लागतो. मागच्या वर्षी खूप प्रयत्न करून कॅश बॅलन्स कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या अगोदरपासून कर्जाचा हिस्सा कमी केलेला आहे. मागच्या वर्षी फक्त १२ हजार कोटी रुपये कर्ज घेतले असून त्या अगोदर २५ ते २६ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात येत होते. मागच्या वर्षी कॅश बॅलन्स मॅनेजमेंट इफिशिएन्टली केले आहे. त्यामुळे कर्जाचे प्रमाण ५० ते ६० टक्के कमी झाले आहे. मागच्या वर्षी फक्त १२ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्यात आले असून त्याप्रमाणे यावर्षी नियोजन करण्यात आले आहे. मंत्री महोदयांनी बजेट सादर केले तेव्हा असे विचारण्यात आले की, कर्ज घेण्याची मर्यादा जास्त असून प्रत्यक्षात कर्ज का कमी घेण्यात आले त्याचे कारण कॅश मॅनेजमेंटमध्ये दिसून येते, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

प्रधान महालेखाकार यांनी सन २०१७ चे आकडे दिले आहेत. सन २०१९ मध्ये काय सुधारणा केल्या ते विभागाने सांगितले आहे. महालेखापाल यांचे असे म्हणणे आहे की, कॅश बॅलन्सची रक्कम मिस मॅनेजमेंटमुळे वाढत आहे. विभागाने आता सांगितले की, आम्ही मॅनेजमेंट करून कर्ज कमी घेतले. कॅश बॅलन्स वाढत चालला असा महालेखापाल यांचा आक्षेप आहे. त्यासंदर्भातील कारणे काय आहेत ते सांगावे, असे समितीने निदेश दिले असता, महालेखापाल यांचा आक्षेप असा आहे की, शासनाकडे कॅश बॅलन्स असताना आम्ही कर्ज का घेतो. दर वर्षी नवीन योजना व नवीन घोषणांसाठी निधी लागणार असतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, शासनाचे ४० हजार कोटी रुपये आरबीआयमध्ये आहेत. हा पैसा १४ किंवा ९१ दिवसांसाठी भारत सरकारच्या ट्रेझरीमध्ये गुंतविला जातो. त्यावर ५ ते ५.३० टक्के व्याज मिळते. सरकार कर्ज घेते त्यावर ७.३० ते ८ टक्के व्याज देते. यामध्ये कमीत कमी दोन टक्क्यांचा फरक येतो. त्यामुळे शासनाची दोन टक्के रक्कम जास्त जाते. कॅश मॅनेजमेंट व्यवस्थित केले व आवश्यक तेवढीच कॅश ठेवली तर साडेसात ते आठ टक्क्याने जास्त निधी घ्यावा लागणार नाही. एकीकडे साडेपाच टक्के मिळतात व साडेसात टक्के व्याज सरकार देते.

त्यासाठी कोठे तरी बेंचमार्क करणे आवश्यक आहे. बेंचमार्क म्हणजे राज्याला वर्षासाठी नेमका किती कॅश बॅलन्स हवा आहे. उदा. आपण असे ठरवू शकता की, एक महिन्यासाठी जेवढा निधी खर्चासाठी लागतो तो निधी व काही निधी पीएलए अकाऊंटमध्ये बॅलन्स असतो. इतकी रकम शासनाकडे कॅश बॅलन्स असेल तर ती पुरेशी होईल. त्यापेक्षा जास्त कॅश बॅलन्स असू नये. त्यापेक्षा जास्त कॅश बॅलन्स असेल तर नवीन कर्ज कमी प्रमाणात घेतले पाहिजे. त्यासाठी बेंचमार्क करण्याची आवश्यकता आहे. आता सचिवांनी सांगितले की, काही उपाययोजना केल्यामुळे त्यावर नियंत्रण येत आहे. तरी देखील आता जो बॅलन्स आहे तो जास्त आहे. उदाहरण द्यावयाचे झाले तर सन २०१७-१८ चा एकूण खर्च २ लाख ६९ हजार कोटी रुपये आहे. सन २०१६-१७ मध्ये एकूण खर्च २ लाख ४५ हजार कोटी रुपये आहे. या खर्चाचे विभाजन केले तर दरमहा २० ते २२ हजार कोटी रुपये होतात. त्यामध्ये ८ ते १० हजार कोटी रुपये पीएलए बॅलन्स ॲड करा. त्यामुळे ३० हजार कोटी एका महिन्याला पुरेसे होऊ शकतील. याच्या विरोधात ४० हजार कोटी रुपये कॅश बॅलन्स आहे. १० हजार कोटी रुपयांचा कॅश बॅलन्स कमी केला व त्यावर २ टक्के व्याज गृहित धरले तरी २०० कोटी रुपये व्याजाची बचत एका वर्षात होऊ शकते. ३० हजार कोटी रुपयेच योग्य बॅलन्स आहे असे सुमिती म्हणू शकत नाही. यासंदर्भात सांख्यिकी अभ्यास केला पाहिजे, बेंचमार्क केले पाहिजे. प्रत्यक्षात आरबीआयकडे किती कॅश बॅलन्स ठेवावा याचे नियोजन करून ते नियंत्रणात ठेवले पाहिजे, असे प्रधान महालेखाकारांनी समितीच्या माध्यमातून निदर्शनास आणले असता, महालेखापाल यांनी सांगितले ते बरोबर आहे, १० हजार कोटी रुपये जास्तीचा कॅश बॅलन्स आहे. त्यावर जवळपास ८.१३ टक्के व्याज द्यावे लागते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखापाल यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यानुसार शासनाकडील कॅश विथ्ड्रावल व शासनाला आवश्यक असलेले कर्ज यासाठी काही बेंचमार्क आहे काय, आपणाकडे किती कॅश आहे व आपण किती कर्ज काढतो. याबाबत कोठे तरी विचार होत असेलच, असे मत समितीने व्यक्त केले असता, ग्रामविकास विभागाने याबाबत सॉफ्टवेअर विकसित केले आहे. त्यानंतर मागच्या तीन वर्षांत प्रत्येक महिन्याला व प्रत्येक आठवड्यामध्ये किती खर्च करतो त्याची सरासरी काढलेली आहे. पहिल्या व दुसऱ्या आठवड्यात राज्य शासनाकडून किती खर्च करण्यात येतो याबाबत अंदाज काढण्यात आले आहेत. या अंदाजाप्रमाणे आता सांगितल्यानुसार जवळपास ३० हजार कोटी रुपये खर्च होत असतो. धोरणात्मक निर्णय घेताना अनेक प्रकारचे निर्णय राज्य शासनाकडून घेण्यात येतात. त्यासाठी फायनन्सिअल सपोर्ट द्यावा लागतो. त्यासाठी राज्य शासन नेहमी तयार असायला पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकार यांचा असा मुद्दा आहे की, कर्ज काढताना शासनाकडे किती कॅश रक्कम आहे त्यानुसार टप्प्या टप्प्याने कर्ज काढण्यात येते की, एकदम कर्ज काढण्यात येते याबाबत काही नियोजन नसते काय ? त्यांना तसा विचार आपण देतो काय ? त्यासंदर्भात शासनाकडे मॉडेल आहे काय ? इतकाच हा मुद्दा आहे, असा प्रश्न समितीने केला असता, प्रत्येक आठवड्यात व प्रत्येक महिन्याला किती कर्ज घ्यावयाचे त्याचे कॅलेंडर ठरलेले असते. या वर्षातील १२ महिन्यांसाठी आपणाकडे किती कॅश रक्कम आहे व किती कर्ज घ्यावयाचे याचे कॅलेंडर असते. त्या कॅलेंडर नुसार केंद्र शासन व आरबीआयकडून ॲप्रुव्हल घेऊन कार्यवाही करण्यात येते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा सविस्तर अहवाल पहिल्यांदाच या समितीसमोर आला आहे. फायनन्शिअल मॅटर हाताळणाऱ्या मंडळीवर शासनाचा पूर्ण विश्वास आहे, ती एक ट्रस्ट आहे. त्यांच्या कॅपेसिटीमध्ये त्यांना ते काम देण्यात येते. परंतु प्रत्येक तीन वर्षानंतर तो अधिकारी बदलतो. अधिकारी बदलतो म्हणून थॉट बदलतात. प्रत्येक व्यक्तीला वाटते की, माझ्या पद्धतीने मी काही बदल करून त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे. समितीकडून शासनाकडे याबाबत काही सूचना केल्या पाहिजेत. करोडो रुपयांचे ट्रान्झेक्शन सरकार करते. त्याचा ॲझम्पशन चा एक्सपेन्स म्हणजे काय गृहीत धरून आपण खर्च करणार आहोत. शासनाच्या लायबिलिटीज, शासनाकडून घेण्यात येणारे कर्ज, या सर्व मॅनेजमेंटसाठी जगातील सर्व मोठ्या कंपन्या म्हणजे ज्या कंपनीची टर्न ओव्हर २००-३०० कोटी रुपयांच्या वर आहे, Such Companies have Financial Consultant or Financial Advisor for the Financial Managment of the year. विभागाकडे तशी व्यवस्था आहे किंवा नाही याची समितीला माहिती नाही. परंतु तशी व्यवस्था नाही असे समितीला वाटते. विभागाकडे जे कर्मचारी आहेत ते एक्सपर्ट आहेत त्यांनी वर्षानुवर्षे कामे केली आहेत. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे व सीएजीच्या रिमार्कप्रमाणे आपण काम करतो. हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. ऑडीटरांनी तो लक्षात आणून दिला व सन्माननीय सदस्यांनी त्यावर भाष्य केले. एका बाजूला ४० हजार कोटी रुपयांची आवश्यकता नाही. भविष्यात केंद्र सरकारने निधी दिला तर त्यानुसार आपणाला बदल करता येणार नाही. एखाद्या विभागाकडे जास्तीचा निधी असेल तर तो शासनाकडे पाठवून द्यावा असे करता येणार नाही. त्यासाठी अगोदर प्रोव्हीजन करावी लागते. १० हजार कोटी रुपयांची प्रोव्हीजन आपण नंतर वापरू शकलो नाही व पेईंग इंटरेस्ट व डिफरंट इंटरेस्ट वापरू शकलो तर त्यातून महाराष्ट्रातील एखादा प्रोजेक्ट होऊ शकतो. त्यामुळे हा विषय आज फायनल केला पाहिजे. यासंदर्भात त्यांनी स्वतंत्र निर्णय करण्याची आवश्यकता आहे. याबाबत कन्सलटंट आहे काय कोणाशी सल्लामसलत केली जाते. प्रत्येक अधिकारी बदलला की, सिस्टीम बदलते, याबाबत विभागाने खुलासा करावा, असे समितीने निदेश दिले असता, संपूर्ण देशात व १२ राज्यांमध्ये डेप्थ मॅनेजमेंट युनिट तयार केले आहे. त्या डेप्थ मॅनेटमेंट युनिटमध्ये आरबीआयचे सेवा निवृत्त वरिष्ठ अधिकारी आहेत. डेप्थ मॅनेजमेंट म्हणजे कर्जाबाबत सल्ला घेतला जातो. राज्य शासनाचे फायनन्सिअल पॅरामिटर्स आहेत, त्याबाबत एजी यांनी सांगितले आहे. याबाबत तीन चार प्रकारचे पॅरामिटर्स आपण पाहतो. रेव्हेन्यू डेफिसिट किती आहे. रेव्हेन्यू सरप्लस आहे काय ? इतर राज्याच्या तुलनेमध्ये आपण कसे आहोत. त्यानंतर फिस्कल डेफिसिट किती आहे. केंद्र शासनाने आखून दिलेले पॅरामिटर्स काय आहेत व त्याबाबत राज्य शासन कोठे आहे ही बाब तपासण्यात येते. तिसरी व महत्त्वाची बाब म्हणजे कर्जावर इंटरेस्टचे पेमेंट करीत असतो तेव्हा त्याचे परसेंटेज रेव्हेन्यूवर किती आहे याबाबत तपासणी केली जाते, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभाग जे सांगत आहे ती बाब वेगळी आहे मूळ मुद्दा तसा नाही. महालेखापाल यांचे म्हणणे असे आहे की, जसे इंटर बँकिंग फायनन्स असते. सकाळी प्रत्येक बॅक आपणाकडे दोन, तीन किंवा आठ दिवसांसाठी जास्तीचा निधी किती आहे त्याची माहिती आरबीआयला देते. कारण त्यांना तीन ते चार दिवसांसाठी त्या निधीवर व्याज मिळते. इंटर बँकिंग व्यवहार १ दिवस ते ३० दिवसांचे मॅनेजटमेंट केले जाते. समितीचे असे म्हणणे आहे की, अशा प्रकारे सल्लागार नेमून उर्वरित निधीचे नियोजन करून राज्याचे २०० ते ३०० कोटी रुपये वाचवू शकतो काय ? याबाबत स्पेसिफिक सांगावे की, विभागाने तसे काही नियोजन केले आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, मागील एक वर्षापासून राज्य शासनाने याबाबत नियोजन केल्यामुळे मागील वर्षात कर्ज घेण्याचे प्रमाण कमी झाले आहे. मागच्या वर्षी १३० कोटी रुपयांचा भार कमी केला. चालू वर्षाची अंतिम आकडेवारी झाल्यावर सांगता येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचे असे मत आहे की, विभागाने बेंचमार्क करून नियोजन केले पाहिजे. अमुक निधी शासनाला लागणार आहे त्या निधीचे नियोजन विभागाने केले आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, मागच्या वर्षी व त्या अगोदर कर्ज घेत असताना प्रत्येक आठवड्याला व प्रत्येक महिन्याला किती कर्ज घ्यावयाचे त्याचे कॅलेंडर तयार करण्यात आले आहे. या कॅलेंडर नुसार १ किंवा २ टक्क्यांपेक्षा जास्त फरक येत नाही. जवळपास ९० टक्के कार्यवाही केली जाते. मागील वर्षात एक्सपर्ट लोकांची टीम नियुक्त केली होती, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने डेथ्थसाठी हे केले आहे. समिती डेथ्थबाबत बोलत नाही. त्या विषयाची चर्चा नंतर करता येईल. आता असा विषय आहे की, शासनाने कॅश रक्कम बँकेत ठेवली आहे. ती कॅश डेली रुटीनसाठी एक-दीड महिन्यासाठी शासनाला पाहिजे. शॉर्टमध्ये पाकिटमनी. ही रक्कम कमी करता येते काय जेणे करून शासनाला लागणारे व्याज वाचवू शकू असा हा विषय आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, महालेखापाल यांनी मुद्दा मांडला होता की, कॅश शासनाकडे आहे व विभागाने माहिती दिली की, विशिष्ट खर्चापेक्षा काही वेळा अतिरिक्त खर्च होऊ शकेल त्याचा विचार करून कॅश ठेवण्यात आली होती. मागच्या वर्षापासून आता मॅनेजमेंट युनिट तयार करण्यात आले, त्याचा परिणाम असा झाला की, दरवर्षी २५ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेत होतो ते आता ११ हजार कोटी रुपयांपर्यंत खाली आले आहे. वार्षिक कॅलेंडरचा आढावा शासन नेहमीच घेत असतो. यावर्षी जे कर्ज घ्यावे लागते त्यामध्ये मोठ्या प्रमाणात कपात होऊ शकेल, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

समितीची अशी सूचना आहे की, एखादा फायनन्शिअल कन्सलटंट ठेऊन त्याची फी देऊन शासनाचे पैसे तो वाचू शकत असेल तर अशा प्रकारचा प्रयोग करावा. सकाळ ते सायंकाळपर्यंत कॉल मनी असतात. सकाळी पैसे दिले तर सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत ०.०१ किंवा ०.०२ टक्के जे व्याज असेल त्या व्याजासह विभागाच्या खात्यात पैसे जमा होतात. त्यातून दिवसाला १० ते २० कोटी रुपये मिळू शकतील असे समितीने मत व्यक्त केले असता, समितीने जी भावना व्यक्त केली त्यानुसार मागच्या वर्षी विभागाने डेथ्थ मॅनेजमेंट युनिट तयार केले. ओव्हर ऑल मॅनेजमेंट करीता एक्सपर्ट लोकांचे युनिट तयार करण्याचा नक्की विचार करू व ते सुरू करण्याचा प्रयत्न करू, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीकडून शिफारस करण्यात येईल परंतु एका महिन्यात यासंदर्भातील निर्णय घेतला पाहिजे, असे मत समितीने मांडले असता, समितीने जी सूचना केली त्याबाबत नक्की विचार करण्यात येईल. लवकर हे युनिट कार्यान्वित करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्र. १.२.३ विधानमंडळाच्या नियंत्रणाबाहेर निधीचा वापर करणे

या परिच्छेदाअंतर्गत महाराष्ट्र निवारा निधीच्या संदर्भात अधिनियम तयार करण्यात येणार आहे, असे सांगितले होते, त्यासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, महाराष्ट्र निवारा निधी प्रकरणी म्हाडा ॲक्टमध्ये सुधारणा करावी लागणार आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी समितीच्या निदर्शनास आणले.

महाराष्ट्र निवारा निधीतून ३,९३८ कोटी रुपये खर्च करण्यात येऊनही महाराष्ट्र निवारा निधीतील जमा आणि खर्चाचे वार्षिक लेखे व लेखापरिक्षा अहवाल राज्य विधानमंडळाला सादर करण्यात आले नव्हते. लेखापरीक्षा करून घेण्यासाठी म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वित्त विभागाने गृहनिर्माण विभागाला निर्देश दिले आहेत, याबाबत माहिती देण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता, सदरहू प्रकरणी कार्यवाही सुरू आहेत. याप्रकरणी कायद्यामध्ये सुधारणा करावी लागणार आहे. महालेखाकार यांचेशी समन्वय सुरू आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या कार्यवाहीसाठी अनेक वर्षांचा कालावधी लागत आहे, खूप विलंब होत आहे, उक्त प्रकरणी किती दिवसांमध्ये कार्यवाही पूर्ण करण्यात येणार आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, आता लवकरच कार्यवाही पूर्ण होईल. सदरहू प्रकरणी गृहनिर्माण विभागाने कार्यवाही करावयाची आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने शासन या नात्याने सांगावे की, सदरहू विषय गृहनिर्माण विभागाशी समन्वय ठेवून आवश्यक ती सर्व कार्यवाही करून २ ते ३ महिन्यात निकाली काढण्यात येईल, अशी सूचना केली असता, समितीने परवानगी दिली तर गृहनिर्माण विभागास विचारणा करून उद्या समितीला लेखीस्वरुपामध्ये कळविण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले. सदरहू विभागाशी एक बैठक घेऊन समन्वय साधावा व हा विषय निकाली काढावा, असे समितीने निदेश दिले.

परिच्छेद क्रमांक १.३ - महसुली जमा

राज्याच्या स्वतःच्या कराचा हिस्सा सन २०१२ ते २०१४ या कालावधीमध्ये ७२ टक्के होता व तो नंतर ६९ टक्क्यांपर्यंत घटला त्यानंतर तो ६७ टक्क्यांपर्यंत घटला आहे. राज्याच्या कराची टक्केवारी घटण्याची कारणे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१६-१७ मध्ये महसुली जमा २ लाख ४ हजार कोटी रुपये, त्यापूर्वी सन २०१५-१६ मध्ये १ लाख ३ हजार कोटी रुपये होता. दरवर्षी महसुली करामध्ये नैसर्गिक वाढ १० टक्के अपेक्षित असते त्यानुसार ती झालेली आहे. मागील २ वर्षात जीएसटी लागू झाल्यापासून महसुली जमा रकमेमध्ये चांगली वाढ झालेली आहे. मी उदाहरणासाठी सांगतो की, सन २०१६-१७ मध्ये २ लाख ४ हजार कोटी रुपये व सन २०१७-१८ मध्ये २ लाख ४३ हजार कोटी रुपये, सन २०१८-१९ मध्ये २ लाख ८६ कोटी रुपये महसुल जमा झाली आहे. केंद्र शासनाने आश्वासन दिले आहे की, जीएसटीमध्ये १४ टक्क्यांप्रमाणे वाढ होईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्य शासनाने महसुली जमेमध्ये १० टक्के वाढ गृहीत धरली व केंद्र शासनाने १४ टक्के गृहीत धरली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, सन २०२२ पर्यंत मर्यादित कालावधीसाठी गृहीत धरली आहे. त्यानंतर विभाग मार्केटवर अवलंबून असणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

केंद्र शासनाने ५ वर्षांसाठी आश्वासित केले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, राज्यामध्ये जीडीपी ग्रोथ झालेली आहे. कारण सर्व्हीस सेक्टर हा मुख्य कंम्पोनंट आहे. राज्य शासन मॅन्युफॅक्चरींगवर टॅक्स वसूल करते. आता जीएसटी लागू झाले आहे, पूर्वी सर्व्हीस सेक्टरमधील टॅक्स केंद्र शासनास मिळत होता, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सर्व्हीस टॅक्स हा नंतर आला आहे. राज्य मॅन्युफॅक्चरींगमध्ये मागे पडत आहे. टॅक्स रेषो कमी होतो त्यावेळी राज्य कोणत्या तरी क्षेत्रात मागे पडत आहे, असा याचा अर्थ होतो, असे मत समितीने व्यक्त केले असता, अशी बाब नाही. जीडीपीची ग्रोथ दिसून येत आहे. रेव्हेन्यू टॅक्स v/s जीडीपी हा रेषो आहे. सर्व्हीस सेक्टरमुळे बेसमध्ये जीडीपी वाढत आहे. सर्व्हीस सेक्टरमधील टॅक्स केंद्र शासनास मिळतो. त्यानंतर तो केंद्र शासनाकडून राज्य शासनास मिळतो त्यामुळे वाढ दिसून येत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नवीन महसुली उत्पन्नाचे मार्ग निर्माण करण्यात आले नाहीत. राज्याला निधीची कमतरता भासते त्यावेळी पेट्रोल किंवा इतर बाबींवरील करामध्ये वाढ करण्यात येते असे समितीने निदर्शनास आणले असता, राज्यामध्ये इतर राज्यांच्या तुलनेमध्ये थोडा अधिक कर वसूल करण्यात येत आहे. ऊर्जा किंवा पेट्रोल वर मुंबईमध्ये आकारण्यात येणारा कर इतर महानगरांच्या तुलनेत अधिक आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशा पद्धतीने कर वाढविल्याने लोकांच्या रोषाला लोकप्रतिनिधी यांना सामोरे जावे लागते. त्याकरिता नवीन महसुली उत्पन्नाचे मार्ग निर्माण करणे गरजेचे आहे, ते करण्यात आले नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता, जीएसटी, स्टॅम्प ड्युटी, विक्री कर व वाहतूक कर हे ४ राज्याचे महत्त्वाचे महसुली उत्पन्नाचे मार्ग आहेत. मागील ४-५ वर्षामध्ये स्टॅम्प ड्युटीमध्ये चांगल्या प्रकारे वाढ होऊन ती २५ ते २६ हजार कोटी रुपयांपर्यंत पोहचली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

इतर उत्पन्नाचे मार्ग शोधणे गरजेचे आहे. जीडीपीच्या तुलनेमध्ये टॅक्स रेषो कमी होत आहे. तो अशाच पद्धतीने कमी होत राहिला तर ही बाब भविष्याच्या दृष्टीकोनातून चांगली नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, जीडीपीमध्ये इंडस्ट्रीच्या माध्यमातून होणारे मॅन्युफॅक्चरींग, सर्व्हीस सेक्टर व ॲग्रीकल्चर या ३ महत्त्वाच्या बाबी आहेत. ॲग्रीकल्चरमधून मिळणारे उत्पन्न १२ ते १४ टक्के आहे. सर्व्हीस सेक्टरमधून सद्यःस्थितीत ५७ टक्के मिळतो. याचा अर्थ सुमारे ५० ते ६० टक्के टॅक्स सर्व्हीस सेक्टर मधून मिळतो. राज्य शासनाचा सन २०१७ पर्यंत सर्व्हिस सेक्टरवरील टॅक्स शून्य आहे. जीएसटी पैकी ६० टक्के टॅक्स राज्य शासनाला मिळत नाही, केवळ मॅन्युफॅक्चरींगचा टॅक्स मिळतो. ॲग्रीकल्चरचा टॅक्स कमी आहे. सर्व टॅक्स मॅन्युफॅक्चरींगमधूनच राज्य शासनाला मिळत आहे. पण आता सुदैवाने जीएसटीमध्ये राज्य शासनाचा हिस्सा म्हणून सेवा कर सुद्धा येत असतो. त्यामध्ये थोडीफार सुधारणा होण्याची शक्यता आहे. एक ते दोन वर्ष जीएसटी झालेली आहे. अजून दोन ते तीन वर्षानंतर सुधारणा होण्याची शक्यता आहे. आता समितीने सांगितल्याप्रमाणे विभागास इतर कर प्रक्रिया वाढविण्याच्या दृष्टीकोनातून बघावे लागणार आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जीएसटी आल्यानंतर विभागाला इतर करामध्ये कोणत्या ठिकाणी वाव आहे, असा प्रश्न समितीने केले असता, सर्व करांचा मिळून जीएसटी हा एकच कर झाला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. मागच्या बैठकीमध्ये एकदा ऑनलाईन खरेदीचा विषय आला होता. तर या ऑनलाईन खरेदी विक्रीवर कर लावलेला आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, प्रत्यक्षात ई-रिटेल आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. आज यामध्ये व्हॅटचे किती पैसे देणे बाकी आहेत ? असा प्रश्न समितीने केला असता, १ लाख १० हजार कोटी रुपयांपर्यंत व्हॅटची वसुली बाकी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

व्यापाऱ्यांच्या व्हॅटचे केसेस प्रलंबित आहेत तरी विभागाकडून त्या केस सुटत नाहीत. १०० रुपये भरायचे आणि विभागाने ३०० रुपये काढून ठेवलेले आहेत. जर त्याला युद्ध पातळीवर केले तर हा विषय सूटू शकतो. यासाठी एक टार्गेट केले पाहिजे की, कोणत्याही परिस्थितीत ट्रीब्युनल, अपिलेट असतील ते संपवायचे आहेत. विभागाने जर अशी भूमिका घेतली तर यातील ७५ टक्के पैसे सेटल होतील. हे सर्व विभागाने केले पाहिजे कारण आता तो विभाग बंद झाला आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, समितीचा मुद्दा योग्य आहे. १ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त पैसे त्यामध्ये

गुंतवलेले आहेत. जीएसटी आल्यानंतर तो व्हॅट फक्त अपिल आहे. राज्य शासनाने या गोष्टी खूप गांभिर्याने घेतलेल्या आहेत. मागच्या दोन ते तीन वेळेला ॲम्नस्टी मागितली होती पण अपेक्षित त्या पद्धतीने त्याचा रिस्पॉन्स आलेला नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अकोल्याच्या ऑईलमिल आणि दाळमिल ची एक अडचण आहे. ती अडचण काही सुटत नाही त्यामध्ये शेकडो लोक अडकलेले आहेत. विभागाने जर एखादा धोरणात्मक निर्णय केला तर राज्यातील ५ हजार तरी केसेस संपतील. कोणकोणत्या प्रकरणामध्ये आणि कोणत्या मुद्यावर विभागाच्या केसेस प्रलंबित आहेत हे विभागाने बघावे विभागाने जर १० मुद्यांवर निर्णय घेतला तर यातील ७५ टक्के प्रश्न संपतील. पण शासनाला बसून धोरणात्मक निर्णय करावे लागतील ते काही ट्रीब्युनल मधून करता येणार नाहीत. यामुळे शासनाकडे रिव्हेन्यु जनरेट होईल आणि तो माणूस पण फ्री होईल, अशी सूचना समितीने केली असता, आता अधिवेशनामध्ये जी नवीन योजना येणार आहे. सेक्टरनुसार याची माहिति घेतलेली आहे तसेच डिस्प्युटेड अमाऊँटपैकी १ लाख रुपयांपर्यंतच्या किती केसेस आहेत, २ लाख रुपयांपर्यंतच्या किती केसेस आहेत किंवा १ कोटी रुपयांपर्यंतच्या किती केसेस आहेत अशा प्रकारची आकडेवारी तयार करून आपण अभ्यास पण केलेला आहे. त्यासाठी राज्य शासनाने केलेले नवीन धोरण अत्यंत महत्त्वाचे आहे. पूर्वीच्या वन टाईम सेटलमेंटमध्ये कोणत्याही प्रकारच्या सवलती दिलेल्या नाहीत. आता ५० टक्केपेक्षा जास्त सवलती देण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय झालेला आहे. इंटरेस्ट व पेनल्टीवर मोठया प्रमाणावर सवलती दिलेल्या आहेत. शासनाची आणि विभागाची अशा प्रकारची अपेक्षा आहे की, मागच्या वेळेला झालेल्या वन टाईम सेटलमेंटमध्ये ५ कोटी रुपयांचा रिस्पॉन्स आला होता. यावेळेला ती सेटलमेंट ६० ते ७० हजार कोटी रुपयांची होणार आहे. यामध्ये जास्तीत जास्त ९० टक्के केसेस येणार आहेत. आतापर्यंत मागच्या २ महिन्यातील रिस्पॉन्स खूप प्रोत्साहित करणारा आहे. कारण खूप मोठया प्रमाणावर लोकांना याचा फायदा दिलेला आहे. येणाऱ्या अधिवेशनामध्ये यासाठीचे बिल पण येणार आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परिच्छेद क्रमांक १.३.१.२ करेतर महसूल

इतर राज्यामध्ये महाराष्ट्रापेक्षा जास्त महसुली जमा आहे. याचा अर्थ त्यांचा ग्रोथरेट जास्त आहे, असे मत समितीने मांडले.

परिच्छेद क्रमांक १.७.१.१ जलसंपदा विभाग - प्रकल्पांवरील खर्च व त्यांच्या कार्यान्वयनातील विलंब

पाटबंधारे विकास महामंडळाकडून ४२८ प्रकल्प कधीपर्यंत पूर्ण करणार, कशा पद्धतीने पूर्ण करणार, याकरिता नियोजन केले आहे काय ? अशी विचारणा केली असता, सद्यःस्थितीमध्ये ३१३ प्रकल्प बांधकामाधिन आहेत त्याची किंमत सुमारे ९२ हजार कोटी रुपये आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

उक्त प्रकल्प पूर्ण करण्यासाठी करण्यात आलेल्या नियोजनाची माहिती समितीला सादर करावी, अशी सूचना समितीने केली असता, केंद्र शासनाच्या पीएमजेएसवाय व बळीराजा, जलसंजीवनी योजनेच्या माध्यमातून विशेष पॅकेजमधील प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले आहे. ज्या प्रकल्पांवर ७५ टक्क्यांपेक्षा अधिक खर्च झाला आहे त्याचे नियोजन केले आहे. बळीराजा योजनेंतर्गत ९१ प्रकल्प आहेत व पीएमजेएसवाय अंतर्गत २४ प्रकल्प आहेत. वर्षनिहाय दरवर्षी माहे जूनपर्यंत किती प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहेत, याचे नियोजन करण्यात आले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू नियोजनाची प्रत समितीला सादर करावी. काही प्रकल्पांच्या संदर्भात जागा मिळाली नाही, निधी मिळाला नाही, न्यायालयामध्ये प्रकरणे आहेत, वन विभागाची मान्यता मिळाली नाही, अशी नेहमीप्रमाणे कारणे शासनाने अभिप्रायामध्ये नमूद केली आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता, आता बरेच विषय निकाली काढण्यात आले आहेत. सुप्रमा मिळालेली आहे, भूसंपादनाचे काही विषय मार्गी लावले आहेत, तरी देखील मंडळावरील जबाबदारी मोठी आहे. विभागाकडून पुढील कालावधीमध्ये पूर्ण करण्यात येणाऱ्या प्रकल्पांची माहिती समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

परिच्छेद क्रमांक १.७.२–गुंतवणूक व परतावा

या परिच्छेदामध्ये पाणीपट्टी वसूली पेक्षा देखभालवरील खर्च अधिक आहे. पाणीपट्टी वसूल करू शकत नाही किंवा केली नाही, असे कारण देण्यात आले आहे, याबाबत माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, यावर्षी १०३४ कोटी रुपये वसूली केली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंदर्भात विभागनिहाय वसुलीची माहिती समितीला द्यावी, अशी सूचना समितीने केली असता, पश्चिम महाराष्ट्र व कोकणामध्ये नॉनएरिगेशनची वसुली मोठ्या प्रमाणात आहे. पश्चिम महाराष्ट्रामध्ये एरिगेशनची वसुली चांगली आहे. विदर्भ व मराठवाड्यात वसूली होत नाही. एरिगेशनमधून साधारणतः १० टक्के महसूल प्राप्त होतो व तो जास्तीत जास्त १०० कोटी रुपये मिळतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

काही ठिकाणी विभागास पाणीपट्टी वसुली करता येऊ शकली असती परंतु ती वसूल करण्यात आली नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, मागील २ वर्षापूर्वी पाणीपट्टी वसूली ६०० कोटी रुपये होती त्यामध्ये वाढ झाली असून यावर्षी १०३४ कोटी रुपये इतकी वसूली करण्यात आली आहे. आता सन २०१९ मध्ये एमडब्ल्यूआरआय माध्यमातून पुन्हा दर निश्चित करण्यात येतील, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू दर निश्चित करताना सरसकट सारखा दर निश्चित न करता दुष्काळी भागांचा सहानुभूतीने विचार करावा. ऊसाचे पीक व सोयाबीनचे पीकांसाठी करण्यात येणारा पाणी वापर या बाबीं विचारात घेण्यात याव्यात, अशी सूचना समितीने केली असता, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

रुपये १,२९,९८३ कोटी एवढी शासकीय गुंतवणूक सदर परिच्छेदामध्ये दाखवलेली आहे, ती गुंतवणूक कशामध्ये आहे ? विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे महामंडळ यामध्ये विभागाने जे पैसे गुंतविलेले आहेत ते परत येणार आहेत काय ? जे पैसे परत येतात त्याला गुंतवणूक म्हणतात. विभाग जर अशी गुंतवणूक दाखवत असेल तर एक दिवस ५ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक दिसेल आणि याची काहीच परत येणार नाही. कारण एरिगेशन डिपार्टमेंटला पाण्याचे जे पैसे येतात ते देखभाल दुरुस्तीवर लागतात आणि त्यापेक्षा जास्त इनकम त्यांना होत नाही. याचे हेड वेगळे करता येते काय याचा विचार केला पाहिजे. नाहीतर विभाग सरकारकडे जी गुंतवणूक दाखवत आहेत ती गुंतवणूक होऊ शकत नाही, असे समितीने मत व्यक्त केले असता, हे एस-८ च्या क्रियेशनमध्ये असल्यामुळे प्रत्यक्षात महामंडळाला देत असताना आपण शेअर कॅपिटल किंवा लोन म्हणून देत असतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समजा एखादा महामार्ग बांधला आणि त्याला टोल घेतला तर ते रिटर्न येईल. पण यामध्ये काय रिटर्न येणार आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, यामध्ये उत्पन्न खूप कमी आहे. कारण आपण पाणी कर भरला तरी तो मॅन्युअलसाठी पुरत नाही. पूर्वी हा एक विभाग होता पण आता त्याचेच महामंडळ झाले आहे. त्यामुळे विभाग गुंतवणूक म्हणतो. ॲक्चुअली महामंडळाच्या स्वरुपात हे सरकारी विभाग आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पण रेकॉर्डला सरकारची जी बॅलेन्स शीट आहे त्यामध्ये आपण ही गुंतवणूक दाखवत आहात. यामुळे आपण रिटर्नचे कॅलक्युलेशन करतो. सरकार या नात्याने आपण विचार केला पाहिजे आणि वित्त विभागाकडे गेले पाहिजे की, आपण याला गुंतवणूक दाखवतो पण त्याऐवजी पैसे येणार नाहीत असे समितीने निदर्शनास आणले असता, महामंडळ असल्यामुळे गुंतवणूक दाखवावी लागेल असे विभागाला वाटते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महामंडळाला अनुदान देता येईल काय ? असा प्रश्न समितीने केला असता, रिटर्न अमाउन्ट ०.५ टक्के एवढी म्हणजे खूप कमी आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले. मग ही अमाउन्ट परत येणारच नाही काय ? असा प्रश्न समितीने केला असता, एस-८ ची क्लास ऑफ ॲक्सेप्ट अशाप्रकारचे आहे की, त्या ठिकाणी आपण उत्पन्न ठेवून अपेक्षा करता येत नाही. ती एक ग्रॅन्ट दाखवली तर ती इथे येणार नाही पण कॅपिटल कॉन्ट्रीब्युशन दाखवले आहे. ग्रॅन्ट म्हणून दाखवले असते तर कॅपिटल एक्सपिंडीचर कमी होईल. आता आधीच आपले कॅपिटल एक्सपिंडीचर हे ११ ते १२ टक्के आहे. त्यामुळे राज्य शासनाचे नुकसान होईल. तरी यामध्ये व्हाया मिडीया किंवा इतर काही करता येईल काय हे बघावे लागेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याचा अर्थ गुंतवणुकीवर आम्हाला रिटर्न येत नाही किंवा आम्ही डेड गुंतवणूक केली आहे, असे येणाऱ्या भविष्यात आपल्याला वाटू नये म्हणून याचा शब्द बदलून सरकारला काही करता येईल काय ? असा प्रश्न समितीने केला असता, याचा विचार करता येईल. पण याचे काय परिणाम होतील हे पण बघावे लागणार आहे. आता याचे क्लासिफिकेशन आपण कॅपिटल एक्सपिंडीचर म्हणून दाखवतो आणि नंतर असे दाखवले, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ग्रामीण रस्ते करताना त्याचे कॅपिटल एक्सपिंडीचर होऊ शकते काय ? ग्रामीण रस्ते महामंडळ नावाचे एक महामंडळ उभे करून रस्ते बांधण्यासाठी १ लाख कोटी रुपये लावले तर यातून विभागाला काय रिटर्न येणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, जलसंपदा विभागाने सांगितल्याप्रमाणे आपण जर त्याला ग्रॅन्ट म्हटले तर कॅपिटल एक्सपिंडीचर आणखी कमी दिसेल आणि आधीच कमी दिसते असा त्यांचा आक्षेप आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत समिती काही म्हणणार नाही पण विभागाने याचा विचार करावा. वस्त्रोद्योग महामंडळामध्ये प्रताप स्पिनिंग ॲन्ड लिव्हिंग मॅन्युफॅक्चरिंग कंपनीचे उदाहरण आलेले आहे. ही कंपनी महामंडळाची आहे. बुल्डोजर यंत्राद्वारे जमीन विकास योजनेंतर्गत एक महामंडळ होते, असे समितीने निदर्शनास आणले तसेच उद्योगामध्ये बँकिंग किंवा इतर कोणतेही क्षेत्र असो एनपीए दाखवते आणि कुठेतरी हा विषय संपत असतो. हे सर्व बंद झालेले दुकान आहे. त्या प्रॉपर्टीमध्ये महामंडळ बंद झाले आहे त्यामध्ये काही शिल्लक नाही. ते पूर्ण महामंडळ शासनाच्या नावाने करून तो विषय संपविता येईल काय याचा विचार करण्याची गरज आहे. आपल्या राज्यातील सरकारची महामंडळे व प्रकल्प बंद पडलेली विभागाने दाखवली आहेत. हे सर्व नुकसानीमध्ये आहे त्यामुळे राज्याची प्रतिमा काही चांगली नाही, असे समितीचे मत असल्याचे समितीने सांगितले.

परिच्छेद क्रमांक १.७.२.१ - विभागीय वाणिज्यिक उपक्रम

या परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे तोट्यातील एकूण विभागीय वाणिज्यिक उपक्रमांपैकी ३२ विभागीय वाणिज्यिक उपक्रम मागील पाच वर्षापासून सातत्याने तोट्यामध्ये आहेत. या विषयासंदर्भात माहिती देण्यात यावी तसेच सदरहू उपक्रम हे मागील पाच वर्षापासून तोट्यात चालली आहेत. यावर वित्त विभागाची भुमिका काय आहे ? यामध्ये एकूण ३२ विभागीय वाणिज्यिक उप्रकम आहेत. त्यामुळे तोट्यामध्ये जाणाऱ्या महामंडळांसाठी शासनाकडून धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे काय ? सदरहू महामंडळ शासनाकडून चालविण्यात येणार आहेत किंवा कसे ? सदरहू परिच्छेदामध्ये प्रधान महालेखाकारांनी कोणते आक्षेप घेतलेले आहेत ? सदरहू महामंडळे सुरू ठेवावयाची आहेत किंवा बंद करावयाची आहेत, याचा निर्णय शासनाने घ्यावयास पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, हा एक स्टॅटिस्टिक रिपोर्ट आहे. नेहमीच्या ऑडीट रिपोर्टपेक्षा हा रिपोर्ट वेगळा आहे. यामध्ये महालेखापाल कार्यालयाने असे म्हटलेले आहे की, "The Government should review their working to make them self-sustained." ही बाब सूचविलेली आहे. याबाबतची सविस्तर माहिती महालेखापाल कार्यालयाने शासनाला उपलब्ध करून दिलेली आहे, असे प्रधान महालेखापाल यांनी समितीस अवगत केले.

सार्वजनिक उपक्रमाचा आढावा घेण्यासाठी अपर मुख्य सचिव, वित्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. या समितीची वर्षातून दोन वेळा बैठक आयोजित करण्यात येते. त्यामध्ये प्रत्येक महामंडळाचा आढावा घेऊन त्याबाबतच्या सूचना केल्या जातात. त्या सुचनेप्रमाणे कार्यवाही केली किंवा नाही, याचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेतला जातो. अशा प्रकारच्या सूचना अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत. मागील बैठक ही फेब्रुवारी, २०१९ मध्ये झालेली आहे. त्यामध्ये चार ते पाच संस्थांबाबत विशेष सूचना देण्यात आलेली असून त्याप्रमाणे कार्यवाही सुरू आहे. तरी देखील सर्व संस्था ह्या सार्वजनिक संस्था असून राज्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्या संस्था कार्य करीत असतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या सार्वजनिक उपक्रमांमधील नोकर भरती बंद आहे काय ? त्याचप्रमाणे एखादा व्यक्ती सेवानिवृत्त झाल्यानंतर त्या व्यक्तीचे पद व्यपगत होते काय ? असा प्रश्न समितीने केला असता, सार्वजनिक उपक्रमांमधील नोकर भरती बंद आहे. तसेच सेवानिवृत्त झाल्यानंतर ती पदे व्यपगत होत असतात, असे विभागीय सचिवांनी सांगितले. पदे रिक्त राहतात का पुन्हा निर्माण होतात ? असा प्रश्न समितीने केला असता, पदे व्यपगत होत असतात. पदे भरण्यात येत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले. पदे व्यपगत होणे आणि रिक्त होणे या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. एखादा अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर ते पद व्यपगत झाले पाहिजे, अशा प्रकारचा शासन निर्णय आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जी महामंडळे स्वायत्त आणि आर्थिकदृष्ट्या चांगली आहेत त्या महामंडळाचे संचालक मंडळ पदभरती किंवा पद निर्माण करू शकतात. परंतु ज्या महामंडळांच्या कर्मचाऱ्यांना शासनाकडून दिले जातात किंवा शासनाकडून त्यांना निधी दिला जातो अशा महामंडळांसाठी एक सर्वसामान्य आदेश काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, विभागाचा आढावा झाल्याशिवाय पदभरती करू नये. कारण त्या विभागामध्येच महामंडळाचा समावेश होतो. त्यामुळे त्या कर्मचाऱ्यांचे पगार हे शासनच देत असते. यासाठी दोन टप्प्यावर समित्या नियुक्त केलेल्या आहेत. पहिली समिती ही अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली आहे आणि दुसरी समिती ही मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली आहे. पदे ज्याप्रमाणात रिक्त होतात त्याप्रमाणे आर्थिक आढावा घेऊन आणि आवश्यकता लक्षात घेऊनच भरतीसाठी मंजुरी दिली जात असते. मोठया प्रमाणात पदभरतीसाठी मंजुरी दिली जात नाहीत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनाच्या मिल्क स्कीम जिल्हा आणि तालुक्याच्या ठिकाणी बांधलेल्या आहेत. परंतु त्या कोणत्याही वापराविना तशाच पडून राहिलेल्या आहेत. कारंजा मतदारसंघातील एक विषय होता. त्या मिल्क स्कीम घेण्यासाठी अमूल कंपनीचे अधिकारी आलेले होते. परंतु त्यावर शासनाने निर्णय घेतलेला नाही. पुसद येथील मिल्सडेअरी अमूल कंपनीने घेतलेली आहे. परंतु कारंजा मिल्क डेअरी स्कीम आहे. ती बंद पडलेली आहे. त्यामुळे शासनाने ह्या पी.पी.पी मॉडेलवर द्याव्यात किंवा लिजवर दिल्या पाहिजेत. यासाठी शासनाकडून १० ते २० कोटी रुपयांचा खर्च करण्यात आलेला आहे. त्यासंदर्भात योग्य तो निर्णय करण्यात यावा, अशी सूचना समितीने केली असता, पीपीपीच्या माध्यमातून शासकीय दूध डेअरी चालविता येईल काय यासाठी एक सल्लागाराची नियुक्ती करावी, असा निर्णय मंत्री मंडळाने घेतला होता, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदरहू निर्णयाला बरीच वर्षे झालेली आहेत. अमूल कंपनीने सदरहू जागा लिजवर देण्यासाठी मागितलेली होती. त्यांनी असे सांगितले होते की, ते यासाठी गाई, म्हशी उपलब्ध करून देणार होते. परंतु शासनाने त्यांना जागा लिजवर दिलेली नाही आणि शासन स्वतःदेखील ती जागा वापरत नाही. त्यामुळे याबाबत शासनाने योग्य तो निर्णय केला पाहिजे, असे समितीने मत व्यक्त केले असता, मुख्यमंत्री महोदयांनी वॉर रुमच्या बैठकीमध्ये असे सांगितलेले होते की, शासकीय दूध योजना पूर्णपणे बंद करावयाची नाही. सध्या खाजगी आणि सहकारी दूध संघाचा वाटा ९९ टक्केपर्यंत गेलेला आहे. शासकीय दूध योजनेचे कॉन्ट्र्युब्युशन, मार्केट शेअर कमी झालेले आहे. परंतु जो लोड आहे तो कमी झालेला नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विदर्भामधील शेतकऱ्यांकडे पशूधन नाही. त्याठिकाणी तीव्र उन्हाळा असतो. अशा परिस्थितीमध्ये अमूल कंपनी तेथील शेतकऱ्यांना गाई फायनान्स करीत असते. त्या ठिकाणी पाच हजार गाई दिलेल्या आहेत. अमूल कंपनी दूध संकलित करीत असते. परंतु शासन ही बाब करू शकत नाही. म्हणून जर हे काम करावयाचे असेल तर शासनाने किमान ती जागा लिजवर दिली पाहिजे. जेणेकरून तेथील लोकांना रोजगार मिळू शकेल, अशी सूचना समितीने केली असता, नागपूरचा डेअर इन्फ्रास्ट्रक्चर मदर डेअरीला देण्यात आलेला आहे. त्या मध्यमातून राज्यातील अकोला, वाशिम यासह १४ जिल्ह्यामध्ये विदर्भ आणि मराठवाडा एकात्मिक दुग्ध प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू आहे. एक वर्षाच्या आत या जिल्ह्याचे दूध संकलन सव्वा दोन लाख लिटरपर्यंत गेलेले आहे. या भागामध्ये मागणी ग्रीड झालेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग जे सांगत आहे तशी वस्तुस्थिती नाही. अमूल कंपनीने पुसद येथे अशा प्रकारची डेअरी सुरू केलेली आहे. त्याठिकाणचे इन्फ्रास्ट्रक्चर वीस-वीस वर्षापासून डेड झालेले आहे. त्यामुळे त्याचा काहीतरी उपयोग केला पाहिजे. ते इन्फ्रास्ट्रक्चर शासनाने किमान लिजवर दिले पाहिजे. त्याबाबत योग्य तो निर्णय झाला पाहिजे. असे मत समितीने व्यक्त केले असता, पूर्वीच्या मंत्रिमंडळामध्ये अशी भूमिका मांडण्यात आली होती की, जेवढ्या डेअरी आहेत त्यावर एकत्रित निर्णय घ्यावयाचा आहे. त्यानंतर त्यासाठी पीपीपीचा निर्णय घेण्यात आला. वास्तविक तो निर्णय पुनर्विलोकनाचा घ्यावयास हवा होता. पीपीपीचा प्रतिसाद यासाठी मिळत नाही. कारण या डेअरीमध्ये ज्या मशिनरीज आहेत त्या खूप जुन्या झालेल्या आहेत. पीपीपी करण्यासाठी ॲसेट व्हॅल्युएशन कमी असल्यामुळे ते प्रकल्प सुरू करण्यासाठी कोणी पुढे येत नाहीत. त्यामुळे पुनर्विलोकनात ॲसेट मॉनिटायझेशनचा मुद्दा आहे. त्यासाठी टेंडरला प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे आय.टी. विभागाकडून एजन्सी निवडण्याची प्रक्रिया विभागाने सुरू केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सांगली सातारा, कोल्हापूर येथील काही डेअरी बंद झाल्या होत्या. एक रुपया वार्षिक भाडे दराने त्या डेअरी चालू होत्या. परंतु या ठिकाणीचे लोकं अधिक पैसे द्यावयास तयार आहेत. त्यामुळे याबाबतचा योग्य तो निर्णय घेतला पाहिजे. त्याठिकाणचे इन्फ्रास्ट्रक्चर तसेच पडून आहे. त्यामुळे शासनाने याबाबत योग्य तो निर्णय घेतला पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, याबाबत विभागाकडून लवकरात लवकर निर्णय घेतला जाईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

वाशिम जिल्ह्यामध्ये चार ते पाच ठिकाणच्या डेअरी अशाच प्रकारे विनावापर पडून आहेत आणि त्याची किंमत जवळपास ५ ते १० कोटी रुपये आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, अनेक राज्यांनी दूध व्यवसायातून माघार घेतलेली आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणात शासकीय दूध योजना सुरू आहेत. परंतु ह्या योजनेसाठी शासन अनुदान देत आहे. त्यामुळे प्रति लिटर दुधाची किंमत २५ रुपये देण्यात आलेली आहे. जर शासनाने यामध्ये इंटरव्हेन्शन कमी केले तर दुग्धोत्पादनांची किंमत कमी होण्याची शक्यता आहे. तसेच मार्केटमध्ये प्रेझेंस असावयास पाहिजे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत समितीचे कोणतेही दूमत नाही. त्याठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर उभे झाले पाहिजे. वाशिम जिल्ह्यामध्ये अहमदनगर, सांगली, कोल्हापूर येथून दूध येत आहे. त्यामुळे विदर्भामध्ये जर अशा प्रकारे एखादी दूध उत्पादक कंपनी उद्योग करण्यास पुढाकार घेत असेल तर त्यावर विभागाकडून योग्य तो निर्णय केला पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, अमूल कंपनीबाबत एक धोरणात्मक निर्णय केलेला आहे. केंद्र शासनाने राज्य शासनाच्या वाट्याचे RKVY चे फंडींग राज्य शासनाने करू नये. केंद्र शासनाच्या अनेक प्रकल्पामधून अमूल कंपनीला मोठ्याप्रमाणात मदत होत आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अमूल कंपनीला मदत करावी, असे समिती म्हणत नाही. वाशिम जिल्ह्यामध्ये डेअरी सुरू करावी, तेथील लोकांना रोजगार द्यावा, असे समितीचे म्हणणे आहे. त्याठिकाणी उभे असलेले इन्फ्रास्ट्रकचर उपयोगात आले पाहिजे, अशी समितीची भुमिका आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, आता ही बाब एनडीडीबीच्या कक्षेमध्ये आहे. त्यांनी नागपूर जिल्ह्यामध्ये शासकीय दूध योजनेचे नवीनीकरण केलेले आहे. काही जिल्ह्यामध्ये यासाठी चांगला प्रतिसाद मिळालेला आहे. परंतु वाशिम आणि भंडारा जिल्ह्यामध्ये हवा तसा प्रतिसाद मिळालेला नाही. वर्धा जिल्ह्यातील तीन तालुक्यामधून जवळपास ४५ हजार लिटरचे दूध संकलन केले जात आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पुसद येथे अमूल कंपनीने डेअरी निर्माण केली आहे. गुजरात राज्यातील व्यक्ती येथे येऊन कशा प्रकारे उद्योग चालवितो, हे पाहण्यासाठी आपल्या विभागाच्या अधिकाऱ्यांना पाठवावे. अमूल कंपनीने शेतकऱ्यांना गाई दिलेल्या आहेत. त्यामधून ते दूध संकलित करीत आहेत, शेतकऱ्यांचे त्यामधून पैसे कपात करीत आहेत, असे समितीने निदर्शनास आणले असता, गुजरात राज्यातील विविध जिल्ह्यातील सहकार विभागाने महाराष्ट्रामध्ये खूप मोठया प्रमाणात उद्योग उभे केले आहेत. त्यामधून जवळपास १० ते १२ लाख लिटर दुधाचे संकलन होत आहे. नवी मुंबई या भागामध्ये त्यांचे मोठे प्लँट निर्माण झालेले आहेत. परंतु त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचे संनियत्रण नसल्यामुळे ते दूध उत्पादक शेतकऱ्यांना काय किंमत देत आहेत, यावर या राज्य सरकारला काहीही करता येत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले

पुसद तालुक्यामध्ये जर अमूल कंपनीने शेतकऱ्यांना गाई, म्हशी दिल्या असतील तर आणि त्यामुळे जर त्या शेतकऱ्याला उत्पन्न मिळत असेल तर शासनाची यासाठी काय हरकत राहणार आहे ? त्यामुळे अशा प्रकारचे तेथे उद्योग सुरू होतील काय हे पहावे. ही संस्था एनडीडीबी कडे जाते. एनडीडीबी तोट्यात असलेली संस्था नफ्यामध्ये आणते. त्यानंतर पुन्हा ही संस्था मूळ संस्थेकडे गेल्यानंतर ती संस्था पुन्हा तोट्यामध्ये जाते, असे समितीने मत व्यक्त केले असता, एनडीडीबीकडून गुंतवणूक करण्यात येते, असे विभागीय सचिवांनी सांगितले. सर्व प्रयत्न करून एनडीडीबी फायदा करून देत आहे, असे समितीने मत व्यक्त केले असता, राज्यातील कोणत्याही ठिकाणची शासनाची दूध डेअरी फायद्यात नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले. सदरहू प्रकरणी सकारात्मक दृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात यावेत, असे समितीने निदेश दिले.

या परिच्छेदातील बुलडोझर यंत्राद्वारे जमीन विकास या संदर्भात माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता, हा मुद्दा कृषि विभागाशी संबंधित आहे. त्यावेळी जमीन सपाटीकरणासाठी बुलडोझर यंत्र उपलब्ध नव्हते. जमीन सपाटीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर त्याकरिता ५१ मशीन ठेवण्यात आल्या होत्या. सदरहू काम सन १९९७-९८ पर्यंत काम सुरू राहिल्यानंतर तोटा होत असल्याचे लक्षात आले. मध्यंतरीच्या काळात नवीन मशीन बाजारामध्ये आल्यानंतर व एक खिडकी योजना सुरू करण्यात आल्यानंतर सन १९९७-९८ मध्ये सदरहू युनिट बंद करण्यात आले. त्यावेळी पदे समर्पित करण्यात आली होती. उक्त योजना सन १९९७-९८ मध्ये बंद करण्यात आली. आता लेखापरिक्षणामध्ये सदरहू प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली, असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. आता सदर विभाग बंद करण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक १.८.२.३ लेख्यामधील अखेरची शिल्लक व दुय्यम नोंदीमधील ताळमेळ न घेतलेल्या तफावतीः

सदर परिच्छेदाबाबत विभागाने समितीला थोडक्यात माहिती द्यावी, अशी सूचना समितीने केली असता, शालेय शिक्षण विभागातील काही शिक्षक आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागातील काही शिक्षकांच्या भविष्यनिर्वाह निधीच्या रकमेबाबत थोडा ओव्हर लॅप्स झालेला आहे. शालेय शिक्षण विभाग आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शिक्षकांच्या पगारातून भविष्यनिर्वाह निधीची रक्कम कपात करून ती शासकीय तिजोरीत डिपॉझिट केली जाते. त्याचे बजेट हेड सारखे आहे, परंतु सब हेड वेगळे आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी शालेय शिक्षण विभागाच्या सब हेडमध्ये जमा झाल्याबाबतचा हा मुद्दा आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परिच्छेदामध्ये नमूद केले आहे की, सन २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीशी संबंधित रक्कम (रु.३,२८६.६९) हा प्रमुख भाग होता ज्याचा मार्च, २०१७ पर्यंत ताळमेळ घेतला गेला नव्हता. या रकमेचे रिकन्सिलिएशन झालेले नाही, ऑडिट झालेले नाही असा महालेखाकारांचा आक्षेप आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, यामध्ये शालेय शिक्षण आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा समावेश आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील शिक्षकांच्या भविष्यनिर्वाह निधीची रक्कम कपात करण्यात आलेली आहे. संबंधित विभाग एकत्रित बसून हा विषय क्लिअर करून घेऊ, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकत्रित बसावे किंवा कसे याबाबत महालेखाकार सूचना देणार नाहीत. यामध्ये जी रक्कम आहे ती ३,२८६ कोटी रुपये इतकी आहे. सदर रक्कम एका महिन्यात जमा झालेली नसून सन २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीत टप्प्याटप्प्याने जमा झालेली आहे. उच्च व तंत्र शिक्षण विभागातील शिक्षकांच्या भविष्यनिर्वाह निधीची रक्कम शालेय शिक्षण विभागाच्या सब हेडमध्ये जमा झालेली आहे. मागील ५ वर्षात इंटरनल ऑडिट सुद्धा झालेले नाही. विभागाने ४० हजार कोटी रुपये रिझर्व्ह फंडाचा मुद्दा उपस्थित केला होता. भविष्यनिर्वाह निधीची रक्कम ३,२८६ कोटी रुपये इतकी आहे. मागील ५ वर्षांत ही रक्कम टप्प्याटप्प्याने जमा झालेली आहे. मागील ५ वर्षात ऑडिट झालेले नाही, कोणावर जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही, असे कसे चालेल ? आता दोन्ही विभाग एकत्र बसून ॲडजेस्टमेंट करणार, जी रक्कम जमा करावयाची आहे त्या रकमेचे व्याज शालेय शिक्षण विभागाच्या खात्यात जमा झाले असेल, मग त्याची नुकसान भरपाई कशा प्रकारे करण्यात येणार आहे ? विभाग ५-५ वर्षे रिकन्सिलिएशन करणार नसेल तर ज्या काही गोष्टी झालेल्या आहेत त्या निदर्शनास कशा काय येतील ? अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित विभाग एकत्रित बसून हे क्लिअर करून घेऊ. कारण, शासनाच्या तिजोरीमध्ये पैसे जमा झालेले आहेत यामध्ये कोणताही वाद नाही. यामध्ये शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे असाही प्रकार नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकारांनी सन २०१७ मध्ये या संदर्भात रिपोर्ट दिलेला आहे. आता २०१९ वर्ष सुरू आहे. मग महालेखाकारांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर आता पर्यंत विभागाने काय केले ? असा प्रश्न समितीने केला असता, संबंधित अधिकाऱ्यांनी हा विषय आता निदर्शनास आणून दिलेला आहे. शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत एकत्रित बसून हे क्लिअर करून घेऊ, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शालेय शिक्षण विभागामध्ये एखादा अधिकारी हे काम बघत असेल. महालेखाकारांनी विषय निदर्शनास आणून दिल्यानंतरसुद्धा रिकन्सिलिएशन करून घेतले नाही हे आणखी गंभीर आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये मिसक्लासिफिकेशन झाले आहे. बांद्रा येथील अकाऊंट ऑफिसकडे दोन्ही अकाऊंट्सची माहिती असते. त्यामध्ये तो मिसक्लासिफाय होऊन तिकडे जमा झालेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे सर्व बघण्याची जबाबदारी कोणत्या तरी अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली असेल ? शिक्षण विभागाच्या अपर मुख्य सचिव समिती समोर उपस्थित आहेत. आता त्या त्यांची भूमिका पार पाडत आहेत. परंतु, जर त्या वित्त विभागाच्या अधिकारी म्हणून समिती समोर उपस्थित राहिल्या असत्या तर त्यांनी कोणती भूमिका घेतली असती ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये मिसक्लासिफिकेशन झाले आहे. ते दुरुस्त करून घेऊ. ती रक्कम शासनाकडे जमा झालेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा केवळ मिसक्लासिफिकेशनचा प्रश्न नाही. This is the case of negligence. The amount involved is Rs. 3486 Cr. for 5 years. महालेखाकारांनी हा विषय निदर्शनास आणून दिल्यानंतर सुद्धा कोणतीही कारवाई करण्यात येत नाही ? असे समितीने निदर्शनास आणले असता, ती रक्कम शालेय शिक्षण विभागाच्या सब हेडमधून काढून घ्यावी असे करू शकतो. परंतु, ती रक्कम कोणत्या हेडमध्ये टाकावी हे उच्च व तंत्र शिक्षण विभागाच सांगू शकेल. म्हणून शालेय शिक्षण विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग एकत्रित बसून हे दुरुस्त करून घेऊ, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखाकारांनी दिनांक २० जून, २०१८ रोजी विभागाकडे अहवाल सादर केलेला आहे. आता अहवाल सादर करून ११ महिने १० दिवस झालेले आहेत. प्रत्येक वर्षी ऑडिट झाले पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, एकदा सिस्टीम सेट झाल्यानंतर पुन्हा असे होणार नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे क्लिअर करून घेण्याचे काम विभागातील अधिकाऱ्यांचे आहे. त्यामुळे आपण विभागातील संबंधित अधिकाऱ्याला जबाबदार धरले पाहिजे. कारण, एखादा फ्रॉड झाला आणि ५-५ वर्षे अकाऊंट सेटल केले नाही तर ते निदर्शनास कसे काय येईल ? प्रत्येक वर्षी अकाऊंट सेटल झालेच पाहिजे, अशी सूचना समितीने केली असता, विभागाकडून ताळमेळ करून घेण्यात येईल तसेच यापुढे अशी चूक होणार नाही, असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वस्त केले.

परिच्छेद क्रमांक १.८.४ - आकस्मिक दायित्वे

परिच्छेद क्रमांक १.८.४.१ हमीची स्थिती

या परिच्छेदासंदर्भात माहिती देण्यात यावी अशी सूचना समितीन केली असता, सदर मुद्दा ३ विभागांशी संबंधित आहे. यामध्ये कापूस उत्पादक संघ आणि सहकारी पणन महासंघ यांना देण्यात आलेली थकहमी सुद्धा समाविष्ट आहे. यामध्ये सहकारासाठी जी थकहमी दाखविण्यात आलेली आहे ती ४९५ कोटी रुपये इतकी आहे. या संदर्भातील सद्यःस्थिती अशी आहे की, आता रिकन्सिलिएशनचा पार्ट पूर्ण केलेला आहे. त्यांनी थकहमीची रक्कम ४९५ कोटी रुपये दाखविली असली तरी सुद्धा यामध्ये नाबार्डचा ६० टक्के हिस्सा आहे. त्यासाठी जी थकहमी दिलेली आहे ती ११६.५९ कोटी रुपये

आहे. त्याची सद्य:स्थिती अशी आहे की, यापूर्वी एका वर्षासाठी जी परतफेड करावयाची होती ती नाबार्डकडे झालेली आहे आणि आता आऊटस्टॅंडिंग रक्कम फक्त ९३.२७ कोटी रुपये आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ विविध पिकांची प्रोक्युअरमेंट करणारे नोडल महासंघ आहे. पणन महासंघाची दिनांक ३.६.२०१६ रोजीची १० कोटी रुपये शासन हमी आणि दिनांक ३०.१.२०१७ रोजीची १०० कोटी रुपयांची शासन हमी दाखविली आहे. ज्यावेळी नाफेडकडून निधी प्राप्त झाला त्यावेळी ११० कोटी रुपये बँकेला अदा करण्यात आले आहेत. त्यामुळे आता ११० कोटी रुपयांचे कर्ज खाते निरंक झाले आहे. तसेच, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक सहकारी पणन महासंघाची २०० कोटी रुपये विजया बँकेची आणि २०० कोटी रुपये अलाहाबाद बँकेची अशी एकूण ४०० कोटी रुपयांची थकहमी आहे. सन २०१७ मध्ये कापूस खरेदी खूपच कमी झाल्यामुळे सदर हमी शासन निर्णय दिनांक १८.७.२०१७ प्रमाणे रद्द करण्यात आली आहे, असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

जी बँक गॅरंटी देण्यात आली होती ती कोणत्या स्वरुपात देण्यात आली होती ? म्हणजे विभागाने त्यांना काही तारण दिले होते काय ? असा प्रश्न समितीने केला असता, शासन हमीमध्ये तारण देण्यात येत नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने सांगितल्याप्रमाणे सन २०१७ मध्ये जेवढी हमी दिली होती तेवढ्या कापसाची खरेदी झालेली नाही, असे समितीने निदर्शनास आणले असता, विभाग हमीच्या आधारावर बँकेकडून कर्ज घेत असतो आणि खरेदीची मागणी कमी राहिली तर रक्कम उचलली जात नाही, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने सांगितले की, हमीच्या आधारावर कर्ज घेतो हे समितीला स्पष्ट करावे अशी सूचना समितीने केली असता, आपल्याला बँक शासन हमीच्या आधारावर पैसे देते, असे विभागीय सचिवांनी सांगितले. म्हणजे राज्य शासनाने दिलेली हमी बँकेच्या दृष्टीने तारण आहे, काय असा प्रश्न समितीने केला असता, कापूस खरेदी केल्यानंतर पेमेंट करण्यासाठी बँकेकडून पैसे घेतले जातात. त्यासाठी राज्य शासन हमी देते. समजा रिपेमेंट करण्यामध्ये काही अडचण आली तर राज्य शासन पैसे देईल, असा याचा अर्थ आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासनाने कर्जाची वसुली करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागांच्या नियंत्रण अधिकाऱ्यांवर सोपविली आहे. प्रशासकीय अधिकारी म्हणजे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक काय ? असा प्रश्न समितीने केला असता, राज्याची स्टेट नोडल एजन्सी नाफेडच्या वतीने तूर, चना, उडीद, मूग इत्यादींची खरेदी करीत असते. वसुलीची जबाबदारी नोडल एजन्सीच्या व्यवस्थापकीय संचालकांवर असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यावेळी शासन हमी देते त्यावेळी संबंधित महामंडळाकडून काही टक्के शुल्क आकारले जाते. समजा ती हमी पूर्णपणे लोन स्वरुपात वापरली गेली नाही तर हमी शुल्काचे ॲडजेस्टमेंट कसे केले जाते ? असा प्रश्न समितीने केला असता, सामान्यतः हमी वापरली गेली नाही तर विभाग हमी शुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करतो, म्हणजे ती इंटरनल बुक ॲडजेस्टमेंट असते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकूण अंदाजित प्राप्त हमी शुल्कांपैकी (रु.१,४६४.५८ कोटी) वर्षभरात फक्त रु.९.८७ कोटी प्राप्त झाल्याचे लेखी माहितीमध्ये नमूद केले आहे. हमी शुल्काचे १४६४.५८ कोटी रुपये बाकी होते. त्यापैकी ९.८७ कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. मग उर्वरित थकीत रकमेची स्थिती काय आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, पणन विभागाचा ४१० कोटी रुपयांचा मुद्दा होता, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१२ व्या वित्त आयोगाने राज्य शासनाने दिलेल्या हमीमधून निर्माण होणारी आकस्मिक दायित्वे पूर्ण करण्यासाठी निर्धारित हमी शुल्काद्वारे हमी शुल्क विमोचन निधी उभारण्याची शिफारस केली होती. राज्यात हमी विमोचन निधी उभारण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे वर्ष २००८-०९ च्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात सांगितले, असे परिच्छेदामध्ये नमूद केले आहे. परंतु, सन २०१६-१७ मध्ये मात्र असा निधी उभारणार नाही अशी उलट भूमिका घेण्यात आली आहे, अशी विचारणा समितीने केली असता, ती भूमिका विभागाने घेतली आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले.

ती भूमिका या सरकारच्या काळात घेण्यात आली आहे. १२ व्या वित्त आयोगाने पूर्वीच्या सरकारला अशा प्रकारे निधी डेव्हलप करावा असे सांगितले आणि त्यांनी आम्ही तसे करू असे सांगितले होते. त्यांनी २००८-०९ च्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात तसे सांगितले आहे. परंतु, तो निधी डेव्हलप करण्यात आला नव्हता हे बरोबर आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, प्रधान महालेखाकार यांनी होकारार्थी उत्तर दिले.

आता या शासनाने अशी भूमिका घेतली की, असा निधी डेव्हलप करणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, शासनाने गॅरंटी रिडम्पशन फंड निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने आता पर्यंत २७ हजार कोटी रुपयांची गॅरंटी दिलेली आहे. त्यामध्ये पणन संस्था, मार्केटींग संस्था अशा विविध संस्थांचा समावेश आहे गॅरंटी देताना २ टक्के गॅरंटी फी घेत असतो, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गॅरंटी फी कोणाकडून घेतली जाते ? असा प्रश्न समितीने केला असता, ज्यांना गॅरंटी दिलेली आहे त्यांच्याकडून गॅरंटी फी घेतली जाते. उदाहरणार्थ पणन महामंडळाला ४०० कोटी रुपयांची गॅरंटी दिलेली असल्यामुळे आपण पणन महांडळाकडून २ टक्के गॅरंटी फी वसूल करतो. परंतु, गॅरंटी रिडम्पशन फंड म्हटल्या नंतर समजा उद्या पणन महामंडळाला दिलेल्या ४०० कोटी रुपयांपैकी त्यांनी फक्त २०० कोटी रुपयांची परतफेड केली, उर्वरित २०० कोटी रुपयांची परतफेड केली नाही तर त्यासाठी राज्य शासनाने फंड तयार केलेला आहे. आपण त्या फंडामध्ये जवळपास १५०० कोटी रुपये डिपॉझीट करणार आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्य शासनाने गॅरंटी रिडम्पशन फंड निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु, परिच्छेदामध्ये असा निर्णय घेतला नसल्याचे नमूद केले आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, ही पोजिशन सन २०१६ मधील आहे, असे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले.

म्हणजे हा निर्णय नंतर घेण्यात आला आहे, काय असा प्रश्न समितीने केला असता, राज्य शासनाने सन २०१८ मध्ये तसा निर्णय घेतलेला आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग गॅरंटी रिडम्पशन फंडामध्ये १५०० कोटी रुपये टाकणार आहे. तो निधी कोठून उपलब्ध होणार आहे ? असा प्रश्न समितीने केला असता, राज्य शासन ती रक्कम बजेटमधून देणार आहे. विभाग पुढील ८ वर्षात त्यामध्ये १५०० कोटी रुपये जमा करणार आहे. मागील आर्थिक वर्षात १५०० कोटी रुपयांपैकी १ टक्का रक्कम जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. विभागाने मागील आर्थिक वर्षात २३६ कोटी रुपये जमा केलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने ती रक्कम कोणाकोणाला देण्यात आली, ती कोणती कॉर्पोरेशन होती ? असा प्रश्न समितीने केला असता, विभागाने ती रक्कम फंडामध्ये जमा केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हमी दिल्यानंतर २ टक्के प्रमाणे १४०० कोटी रुपये वसूल केलेले नाहीत. हमी दिल्यानंतर २ टक्के फी वसूल करावयास पाहिजे. ती रक्कम १४६४ कोटी रुपये इतकी आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, शासनाने गॅरंटी देण्यासाठी सन २००२ व २००३ ला शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्या शासन निर्णयाप्रमाणे २ टक्के हमी घेण्यात यावी, असे नमूद केले आहे. परंतु, राज्य सरकार अनेक वेळा हमीची माफी करीत असते. सध्या १९ हजार कोटी रुपयांची गॅरंटी देण्यात आलेली आहे. त्या गॅरंटीची पूर्णपणे माफी करण्यात आलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पूर्ण माफी दिली म्हणजे काय ? याबाबत विभागाने सविस्तर माहिती द्यावी, अशी सूचना समितीने केली असता, गॅरंटीच्या २ टक्के वसुली करावयाची असते. राज्य शासन याबाबतचे निर्णय घेत असते. काही वेळेला हा शासन निर्णय एखाद्या कर्जासाठी लागू करावयाचा किंवा नाही, याचा निर्णय राज्य शासन घेत असते. या संदर्भात एक उदाहरण देता येईल. मेट्रो प्रकल्पाच्या कर्जावर शासनाने दोन टक्के गॅरंटी घेतलेली आहे. म्हणून राज्य शासनाने माफी केलेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मेट्रो प्रकल्पासाठी जे कर्ज घेण्यात आलेले आहे त्याची हमी राज्य शासनाने घेतलेली आहे. मेट्रो प्रकल्पासाठी घेण्यात आलेले कर्ज हे एमएमआरडीए च्या नावे दर्शविण्यात आलेले आहे. परंतु, त्या कर्जाची हमी शासनाने घेतलेली आहे काय ? असा प्रश्न समितीने केला असता, एका प्रकल्पाच्या कर्जासाठी हमी घेण्यात आलेली आहे. पूर्ण मुंबई शहरामध्ये सात ते आठ प्रकल्प सुरू आहेत. त्यापैकी एका प्रकल्पासाठी जे कर्ज घेण्यात आलेले आहे, त्या कर्जाची गॅरंटी घेण्यात आलेली आहे. इतर ठिकाणी अशा प्रकारची गॅरंटी देण्यात आलेली नाही, असे विभागीय सचविांनी सांगितले.

विभागाला जर १४०० कोटी रुपये माफ करावयाचे असतील तर, विभागाने ती रक्कम माफ करावी. परंतु, सदरहू प्रकरणाबाबत विभागाने कोणताही निर्णय अद्यापपर्यंत घेतलेला नाही आणि सदरहू रक्कमदेखील येणे बाकी आहे. रक्कम माफ करण्याचा अधिकार विभागाचा आहे. परंतु, ती रक्कम विभागाने अद्यापपर्यंत माफ केलेली नाही आणि वसुलही केलेले नाही. त्यामुळे विभागाची यासंदर्भात भुमिका स्पष्ट असली पाहिजे, असे मत समितीने व्यक्त केले असता, १४०० कोटी रुपयांचा हा हिशेब आहे. कोणकोणत्या संस्थांकडून रक्कम घ्यावयाची, याचा हिशेब काढण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा सर्व हिशोब करण्यात यावा. त्याचप्रमाणे विभागाची स्पष्ट भूमिका समितीला समजली पाहिजे. जेणेकरून समितीच्या अहवालामध्ये शिफारस करीत असताना अभिप्राय काय द्यावयाचे, हे समितीला समजेल. त्याचप्रमाणे कोणाकडे किती रक्कम शिल्लक आहे, किती दिवसापासून वसुली शिल्लक आहे, त्यामुळे याबाबतची सर्व माहिती समितीला देण्यात यावी, असे समितीने निदेश दिले तसेच नाबार्ड आणि नाफेडच्या माध्यमातून ज्या शेतमालाची खरेदी होणार आहे किंवा ज्या महामंडळामधून इन्फ्रास्ट्रक्चरचा प्रोजेक्ट उभा राहणार आहे अशा सर्व महामंडळांना राज्य शासन कर्जाच्यासंदर्भात हमी देत असते. यासाठी दोन टक्के हमी शुल्क असतो. जायका कंपनीकडून जे कर्ज घेतलेले आहे ते ०.५ टक्के आहे आणि राज्य शासनाचे हमी शुल्क दोन टक्के आहे. दुसरे असे की, १,४६४.५८ कोटी रुपयांपैकी ९.८७ कोटी रुपये प्राप्त झालेले आहेत. उर्वरित रक्कम घ्यावयाची किंवा नाही, हा वेगळा विषय आहे. परंतु यासाठी एक धोरण तयार करण्यात यावे. ज्यांनी वेळेत पैसे भरले, ज्यांचे एन.पी.ए. झाले नाही, त्यांची हमी १०० टक्के देण्यात यावी. महामंडळांची स्वायत्तता शासनाने ठरविलेली आहे. लहान माणसांना वर आणण्यासाठी हे काम सरकारने करावयाचे नाही, असे ठरले. महामंडळाचे परफॉर्म्सन्सवाईस ऑडीट केल्यानंतर कर्जाचे पैसे योग्य प्रकारे भरले असतील तर सरळ शुल्क अतिशय कमी प्रमाणात असले पाहिजे. कारण महामंडळे ही राज्य शासनाला संलग्न असलेली बॉडी आहे. त्यामुळे यासंदर्भात विभागाचे काय मत आहे हे समितीला सांगावे, असेही समितीने निदेश दिले. १४०० कोटी रुपयांचा आढावा घेण्यात येईल. त्यामध्ये कोणत्या महामंडळाकडून वसुली करणे शक्य आहे, याची माहिती घेतली जाईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा. आवश्यकता वाटल्यास यासाठी एखादा सल्लागार नियुक्त करावा. आवश्यकता वाटल्यास यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये आढावा घ्यावा, अशी सूचना समितीने केली. प्रत्येक आयटमचा आढावा घेऊन त्यावर धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. तशा प्रकारचा अहवाल तयार करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अभिप्राय व शिफारशी

परिच्छेद क्रमांक १.१.१ " सन २०१६-१७ मधील राजकोषीय व्यवहारांचा गोषवारा "

परिच्छेद क्रमांक १.१.२ " राजकोषीय स्थितीचे पुनर्विलोकन "

अभिप्राय

३.१ मागील वर्षाच्या तुलनेत सन २०१६-१७ मधील राजकोषीय व्यवहारांमध्ये मोठे बदल झाले असून महसुली जमा - ११ टक्क्यांनी वाढ झाली. स्वतःचा कर महसूल ११ टक्क्यांनी वाढला. महसुली खर्च - १२ टक्क्यांनी वाढला. योजनांतर्गत खर्च १७ टक्क्यांनी वाढला. भांडवली खर्च - १२ टक्क्यांनी वाढला. कर्जे व अग्रीमे - वसुली १०२ टक्क्यांनी वाढली. संवितरणे ४६३ टक्क्यांनी वाढली. लोक ऋण जमा २७ टक्क्यांनी वाढली. परतफेड १८ टक्क्यांनी वाढली. रोख शिल्लक - २४ टक्क्यांनी वाढली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

त्याचप्रमाणे सन २०१६-१७ दरम्यान राज्यांनी, चौदाव्या वित्त आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या तीन प्रमुख परिमाणांपैकी दोन साध्य केली होती, जसे की, (i) राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या १.५ टक्के असलेली राजकोषीय तूट आणि (ii) ऋणांचे राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाशी असलेले १७.५ टक्के गुणोत्तर हे प्रमाणकापेक्षा कमी होते. तथापि, तिसरे परिमाण व्याज प्रदाने/ महसुली जमा गुणोत्तर जे १४ टक्के होते ते चौदाव्या वित्त आयोगाकडे विहित केलेल्या प्रमाणकापेक्षा (१२ टक्के) आणि राज्याच्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणाच्या निवेदनात विहित केलेल्या प्रमाणकापेक्षा (१३ टक्के) जास्त होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.२ महालेखाकारांनी राज्य वित्त व्यवस्थेवरील हा अहवाल सभागृहाला सादर केलेला असून यात एकूण तीन प्रकरणांमध्ये त्याची विभागणी करण्यात आलेली आहे. प्रकरण-एक मध्ये राज्य शासनाची वित्त व्यवस्था, प्रकरण-दोन मध्ये वित्तीय व्यवस्थापन आणि अर्थसंकल्पीय नियंत्रण आणि प्रकरण-तीन मध्ये वित्तीय अहवाल यांचा समावेश करण्यात आला आहे. सदरहू प्रकरण-एक हे राज्याच्या वित्तीय लेख्यांच्या लेखापरीक्षेवर आधारीत असून यात राज्याच्या दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीच्या राजकोषीय स्थितीची निर्धारणा करण्यात आली आहे. यात राज्याच्या सन २०१६-१७ मधील वित्तव्यवस्थेचे विस्तृत यथार्थदर्शन आणि मागील पाच वर्षाच्या तुलनेत मोठ्या राजकोषीय घटकांमध्ये झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांचे विश्लेषण, मागील पाच वर्षांच्या एकंदर कल लक्षात घेऊन दाखविण्यात आले आहे. राजकोषीय स्थितीची निर्धारणा करण्यासाठी अवलंबिण्यात येणारी कार्यपद्धती आणि मानके/मर्यादा ज्या राज्याच्या महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या यासंदर्भातील कायद्यातील तरतूदींअन्वये घालून दिलेल्या आहेत. अधिनियमानुसार शासनाने आपला स्वतःचा राजकोषीय सुधारणा पथ विकसित केला. अधिनियमात विहित केल्याप्रमाणे शासनाने मार्च,२०१६ मध्ये आपले सन २०१६-१७ साठीचे मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणाचे निवेदन राज्य विधानमंडळाला सादर केले. राज्याचे उत्पन्न जीडीपीच्या तुलनेत कमी होत असल्याचे आक्षेप महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आहेत. महालेखाकारांनी सदरहू अहवालात नमूद केलेली आकडेवारी ही अभ्यासपूर्ण वस्तुस्थितीदर्शक असून राज्यात धोरणात्मक वित्तीय सुधारणा करण्यासंदर्भात निश्चितच पथदर्शी आहेत. या आकडेवारीचा सखोल अभ्यास करून मागील पाच वर्षातील एकूण खर्चापैकी भांडवली खर्चाच्या प्रमाणातील घसरता कल लक्षात घेता शासनाने भांडवली मत्ता निर्मितीवरील खर्चास जास्त प्राधान्य द्यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.१.३ " अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष "

अभिप्राय व शिफारस

३.३ सन २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा महसुली खर्च पाच टक्क्यांनी कमी होता, तरी अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा प्रत्यक्ष महसुली जमा ७.३ टक्क्यांनी कमी असल्यामुळे रु.८५३६ कोटीची महसुली तूट होती. अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा भांडवली खर्च १७.६ टक्क्यांनी कमी झाला होता तर व्याज प्रदानात मात्र १.१ टक्के किरकोळ प्रमाणात वाढ झाली होती.

बऱ्याच महत्त्वपूर्ण परिमाणांच्या बाबतीत अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष आकडेवारीत मोठी तफावत होती. राज्य उत्पादन शुल्क, मुद्रांक आणि नोंदणी शुल्क आणि जमीन महसूल यावरील प्राप्ती अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कमी झाल्याने अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत महसुली जमांमध्ये तूट (रु.१६,११७ कोटी : ७.३ टक्के) होती.

कर महसुलातील ५ टक्के, करेतर महसुलातील ३६ टक्के घटीच्या निव्वळ परिणामी महसुली जमांमध्ये घट झाली होती. केंद्रीय कर व शुल्कांच्या हिश्श्यामध्ये सात टक्के आणि केंद्र शासनाच्या सहायक अनुदानामध्ये १३ टक्क्यांनी वाढ झाली.

महसुली जमांमध्ये झालेल्या रु.१६,११७ कोटींच्या घटीमुळे, अर्थसंकल्पात अंदाजित केलेल्या रु.३६४५ कोटीपेक्षा प्रत्यक्षातील रु.८५३६ कोटी महसुली तूट जास्त होती.

अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत महसुली खर्चात ५ टक्के झालेली घट ही मुख्यतः सर्वसाधारण/सामान्य सेवा (७ टक्के) आणि सामाजिक सेवा (८ टक्के) याखाली झालेल्या कमी खर्चामुळे होती. ही घट मुख्यत्वे शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती (७ टक्के) समाज

कल्याण आणि पोषण (१५ टक्के) आणि अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण (१५ टक्के) याखाली झाली होती.

सन २०१६-१७ च्या मूळ अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत प्रत्यक्ष भांडवली खर्च रु.५४५७ कोटी (१८ टक्के) एवढा कमी झाला होता. ही घट मुख्यत्वे ग्रामीण विकास (६२ टक्के), अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांचे कल्याण (७३ टक्के) आणि शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती (६४ टक्के) यामध्ये झाली होती.

अर्थसंकल्पीय अंदाजात केलेल्या निर्धारणेपेक्षा (रु.३५,०३१ कोटी) राजकोषीय तूट (उदय व्यतिरीक्त रु.३३,६५७ कोटी) प्रामुख्याने महसुली आणि भांडवली खर्चाच्या कमी वाढीमुळे चार टक्क्यांनी कमी होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सन २०१६-१७ मध्ये राज्याचे एकूण महसुली उत्पन्न मागील वर्षाच्या उत्पन्नापेक्षा साधारणतः ११ टक्क्यांनी वाढले आहे. तथापि, करेतर उत्पन्नामध्ये घट झाल्याने महसुली तूट रु.८५३६ कोटी इतकी झाली आहे. सन २०१७-१८ मध्ये महसुली तूट नियंत्रणात ठेवण्यात यश आले असून महसुली अधिक्य रु.२०८३ कोटींचे राहीले आहे. राज्याच्या स्वतःच्या कर उत्पन्नापैकी राज्य उत्पादन शुल्क, मुद्रांक आणि नोंदणी शुल्क व जमीन महसूल यावरील प्राप्ती अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कमी होण्याची विविध कारणे आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाने महामार्गालगतच्या ५०० मीटरच्या आतील मद्य विक्री अनुज्ञप्त्या दिनांक ०१.०४.२०१७ पासून बंद करण्याचे आदेश देणे, सर्वसाधारण रिअल इस्टेट बाजारात मंदीचे वातावरण असल्याने, स्थावर मालमत्ताच्या खरेदी-विक्री व्यवहारांच्या दस्तांची संख्या व महसूल कमी असणे, कमी पर्जन्यमान, दुष्काळ, टंचाई परिस्थिती इ. कारणांमुळे ५० पैशांपेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांना जमीन महसुलात सूट दिल्यामुळे जमीन महसुलात घट झालेली आहे, तसेच राज्य शासनाने रीतसर मान्यता प्रदान केलेल्या शासकीय प्रकल्पांकरिता शासन जमीनसंबंधित विभागास महसूलमुक्त व सारामाफीने प्रदान करण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर माध्यमातून शासनास मिळणाऱ्या महसुलात घट झाली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीस केला. महालेखाकारांनी नमूद केलेले आक्षेप पाहता विभागाने महसुली उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टीने व महसुली तूट नियंत्रणात आणण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहावे. तसेच यातील तफावतीसंदर्भात सखोल फेरआढावा घेऊन ही तफावत कमी करण्यासंदर्भात योग्य ती पाऊले उचलावित व त्याअनुषंगाने वित्तीय धोरण निश्चिती करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.२ " राज्याची साधनसंपत्ती "

परिच्छेद क्रमांक १.२.१ " वार्षिक वित्तीय लेख्यानुसार राज्याची साधनसंपत्ती "

अभिप्राय

३.४ राज्याची सन २०१२-१३ मधील एकूण जमा रु.२,१३,४७० कोटी होती, जी सन २०१६-१७ मध्ये रु.३,३७,२४२ कोटी इतकी झाली म्हणजेच रु.१,२३,७७२ कोटीने (५८ टक्के) वाढली. राज्याच्या एकूण जमेतील महसुली जमेचा हिस्सा सन २०१२-१३ मधील ६७ टक्क्यांवरुन कमी होऊन सन २०१६-१७ मध्ये ६१ टक्के इतका झाला. तर सन २०१२-१३ मधील राज्याच्या एकूण जमेतील लोकलेखा जमांचा हिस्सा २२ टक्क्यांवरुन वाढून सन २०१६-१७ मध्ये २४ टक्के झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, मागील १० वर्षाच्या कालावधीचा विचार केल्यास राज्याच्या महसुली उत्पन्नातील वाढीचा नैसर्गिक दर साधारणपणे सरासरी ११ ते १२ टक्के इतका राहीला आहे. राज्याची एकूण महसुली जमा सन २०१२-१३ मध्ये रु.१,४२,९४७ कोटी इतकी होती, जी सन २०१६-१७ मध्ये रु.२,०४,६९३ कोटी झाली. ही वाढ ४३ टक्के इतकी असून वार्षिक सरासरी वाढ ११ टक्के ही नैसर्गिक वाढीच्या सरासरी इतकी आहे.

शिफारस

३.५ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी वार्षिक वित्तीय लेख्यानुसार राज्याच्या साधनसंपत्ती अंतर्गत सदरहू आक्षेप नोंदविलेले असून ही आकडेवारी अत्यंत मार्गदर्शक आहे. राज्य शासनाच्या जमांचे महसुली आणि भांडवली असे दोन स्त्रोत आहेत. महसुली जमांमध्ये कर महसूल, करेतर महसूल, केंद्रीय कर आणि शुल्कांचा राज्याचा हिस्सा आणि केंद्र शासनाकडून मिळालेली सहाय्यक अनुदाने अंतर्भूत असतात. भांडवली जमांमध्ये संकीर्ण भांडवली जमा, जसे की, निर्गुंतवणुकीवरील उत्पन्न, कर्जे आणि अग्रिमे यांची वसुली, अंतर्गत स्त्रोतांकडून ऋण प्राप्ती (खुल्या बाजारातील कर्जे, वित्तीय संस्था/वाणिज्यिक बँकांकडून उधारी) आणि केंद्र शासनाकडून मिळालेली कर्जे आणि अग्रिमे अंतर्भूत असतात. शिवाय संवितरणानंतर लोक लेख्यांत उपलब्ध असलेला निधी सुद्धा शासनाकडून तूट भरुन काढण्यास वापरला जातो, असे असताना आक्षेपात नमूद आकडेवारी ही निश्चितच गांभीर्याने घेणे आवश्यक असून या तफावतीचा योग्य तो ताळमेळ घालून ही तफावत दूर करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.२.२ " राज्य अर्थसंकल्पाबाहेरील राज्य कार्यान्वयन अभिकरणांना हस्तांतरित केलेला निधी "

अभिप्राय

३.६ केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०१४ पासून केंद्र पुरस्कृत योजना/अतिरिक्त केंद्रिय अर्थसहाय्य यांच्याशी संबंधित सर्व अर्थसहाय्य कार्यान्वयन अभिकरणांना मुक्त न करता राज्य शासनाला थेट मुक्त करण्याचे ठरविले. तथापि, सन २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांमध्ये दाखविल्यानुसार सन २०१६-१७ दरम्यान केंद्र शासनाने रु.१५९२.११ कोटी रक्कम राज्य कार्यान्वयन अभिकरणांना मुक्त केली होती. अशाप्रकारे सन २०१६-१७ मध्ये मुक्त केलेला निधी हा सन २०१५-१६ च्या तुलनेत (रु.४५१ कोटी) ३.५ पट होता. केंद्र शासनाकडून हा निधी राज्य कार्यान्वयन अभिकरणांना थेट हस्तांतरीत होत असल्यामुळे विविध योजनांवर अभिकरणांकडून झालेल्या खर्चावर संनियंत्रण ठेवण्यात अपयश येते कारण हा निधी राज्याच्या अर्थसंकल्पात परिवर्तीत होत नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी समितीस स्पष्ट केले की, केंद्र शासनाने दिनांक १ एप्रिल २०१४ पासून केंद्र पुरस्कृत योजना/अतिरिक्त केंद्रिय अर्थसहाय्य यांच्याशी संबंधित सर्व अर्थसहाय्य कार्यान्वयन अभिकरणांना मुक्त न करता राज्य शासनाला थेट मुक्त करण्याचे ठरविले. तथापि, केंद्र शासनाच्या दिनांक ०३ फेब्रुवारी २०१६ च्या पत्रावरुन असे दिसते की, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या सहमतीनेच केंद्र पुरस्कृत योजना/अतिरिक्त केंद्रिय अर्थसहाय्य यांच्याशी संबंधित अर्थसहाय्य कार्यान्वयन अभिकरणांना थेट मुक्त करण्यात येते.

शिफारस

३.७ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी राज्य अर्थसंकल्पाबाहेरील राज्य कार्यान्वयन अभिकरणांना हस्तांतरीत केलेला निधी यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. सन २०१४ मध्ये केंद्र शासनाने केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी कार्यान्वयन अभिकरणांना थेट मुक्त न करता तो राज्य शासनाला मुक्त करण्याचे ठरविले. मात्र असे असतानाही सन २०१६-१७ मध्ये केंद्र शासनाने निधी राज्य कार्यान्वयन अभिकरणांना मुक्त केला. केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केंद्र शासनाने करणे अभिप्रेत आहे. यात जर तफावत वा विसंगती असेल तर यासंदर्भात निर्णय घेण्याचा अधिकार देखील केंद्र शासनाला आहे. यासंदर्भात राज्य शासन वा लोकलेखा समिती कोणतेही निदेश केंद्र शासनाला देऊ शकत नाही. मात्र राज्य शासनाने यासंदर्भात केंद्र शासनाकडे लेखी स्वरुपात पाठपुरावा करून या अंमलबजावणीतील विसंगतीबाबतची बाब केंद्र शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी व आवश्यक ती स्पष्टता केंद्र शासनाकडून करून घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.२.३ " विधानमंडळाच्या नियंत्रणाबाहेर निधीचा वापर करणे "

अभिप्राय

३.८ तेराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार, राज्याच्या एकत्रिकृत निधीच्या बाहेर निधी निर्माण करून त्यामधून सार्वजनिक खर्च करण्यास परावृत्त करावे. राज्याच्या एकत्रिकृत निधीच्या बाहेर निधी निर्माण करून त्यामधून सार्वजनिक खर्च केल्याची घटना भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या आधीच्या राज्य वित्त व्यवस्थेवरील अहवालात नमूद केली होती. चालू वर्षातही हीच पद्धत सुरू होती. केंद्रीय सहाय्याद्वारे वेगवेगळ्या गृहनिर्माण योजना हाती घेण्यासाठी शासनाच्या स्त्रोतांना पुरक ठरेल अशा उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाने महाराष्ट्र निवारा निधी निर्माण केला (मे, २०१०). महाराष्ट्र शासनाच्या एकत्रिकृत निधीच्या तसेच लोक लेख्यांच्या बाहेर महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) कार्यकक्षेमध्ये (म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये दुरुस्ती न करता) हा निधी निर्माण करण्यात आला होता. निधीची स्थापना झाल्यापासून मार्च, २०१७ पर्यंत महाराष्ट्र निवारा निधीला महाराष्ट्र शासन, म्हाडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांकडून, प्राधिकरणाने संकलित केलेल्या ९० टक्के जमीन अधिमुल्याच्या आवर्ती अंशदानाचे रुपये. १७,२३७.९९ कोटी प्राप्त झाले होते. पुढे मार्च,२०१७ पर्यंत महाराष्ट्र निवारा निधीतून रुपये ३,९६८ कोटी खर्च करण्यात येऊनही महाराष्ट्र निवारा निधीतील जमा आणि खर्चाचे वार्षिक लेखे व लेखापरिक्षा अहवाल राज्य विधानमंडळाला सादर करण्यात आले नव्हते (डिसेंबर,२०१७) . अशाप्रकरे शासकीय लेख्यांबाहेर महाराष्ट्र निवारा निधीची निर्मिती करून त्यामध्ये व्यवहार करूनही प्राधिकृत करण्याच्या नियमित प्रक्रियेद्वारे विधानमंडळाकडून त्याची तपासणी होऊ शकली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र निवारा निधीमधील नियोजित व्यवहार सर्वसाधारण अर्थसंकल्पीय प्रक्रियेद्वारे केल्यास ते अधिक योग्य ठरेल. महाराष्ट्र निवारा निधीच्या प्रशासकीय आणि आर्थिक स्वातंत्र्याशी तसेच निधीची भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेकडून लेखापरीक्षा करून घेण्याची सुनिश्चित करण्यासाठी, म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्याचे निर्देश (ऑगस्ट,२०१७) वित्त विभागाने गृहनिर्माण विभागाला दिले असल्याचेही समितीस सादर करण्यात आले. म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये दुरुस्ती न करता महाराष्ट्र निवारा निधीची निर्मिती केल्यामुळे म्हाडाबरोबरच महाराष्ट्र निवारा निधीचे लेखापरिक्षण करता येत नाही. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर अधिनियमात सुधारणा झाल्यानंतर, सदर निधीचे लेखापरीक्षण महालेखापाल कार्यालयाकडून करून घेण्यात येईल व लेखापरिक्षणाचा अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्यात येईल असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सादर केले.

शिफारस

३.९ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी विधानमंडळाच्या नियंत्रणाबाहेर निधीचा वापर करणे यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. समितीने यासंदर्भात विस्तृत छाननी केली असता महाराष्ट्र निवारा निधीमधून रुपये ३,९३८ कोटी खर्च करण्यात येवूनही महाराष्ट्र

निवारा निधीतील जमा आणि खर्चाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षा अहवाल विधीमंडळाला सादर करण्यात आला नाही. या प्रकरणी लेखापरिक्षण करून घेण्यासाठी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यासंदर्भात ऑगस्ट, २०१७ मध्ये वित्त विभागाने गृहनिर्माण विभागाला निर्देश दिलेले असून या प्रकरणी कार्यवाही सुरू असून गृहनिर्माण विभागाशी समन्वय ठेवून आवश्यक ती पुढील कार्यवाही दोन ते तीन महिन्यांत निकाली काढण्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. अतः वित्त विभागाने गृहनिर्माण विभागाशी समन्वय साधून व आवश्यक ती सुधारणा अधिनियमात करून सदर निधीचे लेखापरीक्षण महालेखापाल कार्यालयाकडून करणे व लेखापरिक्षणाचा अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करणेबाबतची कार्यवाही विभागाने कालबद्ध पद्धतीने करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.३ " महसुली जमा "

परिच्छेद क्रमांक १.३.१ 'राज्याची स्वतःची साधनसंपत्ती'

अभिप्राय

३.१० महसुली जमेत शासनाचे स्वतःचे कर व करेतर महसूल, केंद्रीय कर हस्तांतरणे व केंद्र शासनाकडून प्राप्त सहाय्यक अनुदाने यांचा समावेश होतो. सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ दरम्यान महसुली जमा रुपये १९,६५७ कोटीने (११ टक्के) वाढली. ही वाढ म्हणजे कर महसूल रुपये १०,००८ कोटी (८ टक्के) , केंद्रीय कर व शुल्क यांतील राज्याचा हिस्सा रु.५६०९ कोटी (२० टक्के) आणि केंद्र शासनाचे सहाय्यक अनुदान रुपये ४७५४ कोटी (२८ टक्के) यांतील वाढ आणि करेतर महसुलातील रुपये ७१४ कोटी (५ टक्के) घट यांचा निव्वळ परिणाम होय. सन २०१६-१७ मधील रुपये २,०४,६९३ कोटी महसुली जमा ही राज्य शासनाने त्यांच्या राजकोषीय सुधारणा पथामध्ये केलेल्या निर्धारणेच्या (रुपये २,२५,३८८ कोटी) जवळजवळ ९१ टक्के आणि मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनातील निर्धारणेच्या (रुपये २,२०,८११ कोटी) ९३ टक्के इतकी होती. सन २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत कर महसुलात पाच टक्क्यांची घट झाली.

सन २०१२-१४ या कालावधीत महसुली जमेतील राज्याच्या स्वतःच्या कराचा हिस्सा ७२ टक्के होता. जो सन २०१४-१५ दरम्यान ६९ टक्क्यांपर्यंत घटला आणि २०१५-१६ मध्ये तो स्थिर राहिला. सन २०१६-१७ दरम्यान तो पुढे ६७ टक्क्यांपर्यंत कमी झाला. सन २०१३-१४ मध्ये करेतर महसुलाच्या हिश्श्यात अल्पशी वाढ झाली आणि सन २०१४-१५ मध्ये तो स्थिर राहीला. सन २०१५-१६ आणि २०१६-१७ मध्ये त्यात अल्पशी घट झाली. सन २०१२-१५ दरम्यान केंद्रीय हस्तांतरणाचा हिस्सा स्थिर होता ज्यामध्ये सन २०१५-१६ व २०१६-१७ दरम्यान अल्पशी वाढ झाली. सहाय्यक अनुदानाचा हिस्सा सन २०१२-१७ दरम्यान चढ-उताराचा कल दर्शवितो.

सन २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान महसुली जमेचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (११.१ टक्के) इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यातील वाढीच्या दरांपेक्षा (१४.६ टक्के) कमी होता. सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मधील महसुली जमेतील वाढ (१०.६ टक्के) ही सर्वसाधारण प्रवर्ग राज्यातील वाढीच्या दरांपेक्षाही (११.५ टक्के) कमी होती. महसुली जमेतील वाढीच्या दरात सन २०१५-१६ मधील ११.९ टक्केवरून घट होऊन ती सन २०१६-१७ मध्ये १०.६ टक्के झाली होती. राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या संदर्भात राज्याच्या स्वतःच्या कर प्लावकतेचे गुणोत्तर सन २०१२-१३ मध्ये १. ३१२ होते. त्यामध्ये घट होऊन सन २०१३-१४ मध्ये ते ०. ३६५ झाले आणि सन २०१४-१५ मध्ये त्यामध्ये वाढ होऊन ते ०.६८२ झाले. सन २०१५-१६ मध्ये गुणोत्तरात वाढ होऊन ते ०. ८५७ झाले आणि सन २०१६-१७ मध्ये घट होऊन ते ०. ५९० झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

याचप्रमाणे केंद्रीय करातील राज्याचा हिस्सा हा वित्त आयोगाच्या शिफारशीच्या आधारे ठरविला जात असल्याने अतिरिक्त साधनसंपत्तीला चालना देण्याची राज्याची कार्यक्षमता ही कर आणि करेतर जमांचा समावेश असलेल्या स्वतःच्या साधनसंपत्तीच्या अनुषंगाने निर्धारित केली जाते. चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा, अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनामध्ये केलेल्या प्रक्षेपणांपेक्षा वर्षभरात प्रत्यक्ष प्राप्त झालेला कर महसूल कमी होता. शासनाचा करेतर महसूल सुद्धा चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा ४२ टक्क्यांनी कमी होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राज्याचा स्वतःचा कर महसूल सन २०१२-१३ मध्ये रुपये. १,०३,४४८ कोटी होता, जो सन २०१६-१७ मध्ये रु. १,३६,६१६ कोटी पर्यंत वाढला. ही वाढ ३२ टक्के असून वार्षिक सरासरी वाढ ८ टक्के इतकी आहे. सन २०१६-१७ मध्ये अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा कर महसुलामध्ये प्रामुख्याने मुद्रांक व नोंदणी शुल्क, राज्य उत्पादन शुल्क व जमीन महसूल यांमध्ये घट झाली असून करेतर बाबींमध्ये प्रामुख्याने शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती, मोठे पाटबंधारे आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा यामध्ये घट झाल्यामुळे एकूण महसुलामधील कर व करेतर महसुलाच्या हिश्श्यामध्ये घट झाली आहे. महालेखाकारांनी आक्षेपित केलेल्या आकडेवारीबाबतचा खुलासा विभागाने त्यांचे ज्ञापनात केला आहे. शासनाने अतिरिक्त साधन संपत्ती निर्माण करण्यासंदर्भात दिनांक १५ एप्रिल २०१७ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. महसूल वाढ व अतिरिक्त साधनसंपत्ती निर्माण करण्यासंदर्भात शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे सन २०१६-१७ च्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये राज्याच्या स्वतःच्या कर महसूलात व करेतर महसुलात वाढ झाली आहे. परिणामी सन २०१६-१७ मध्ये चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा ४२ टक्क्यांनी कमी असलेल्या करेतर महसुलात सन २०१७-१८ मध्ये झालेल्या वाढीमुळे ही टक्केवारी २९ टक्के इतकी कमी झाली आहे.

तसेच सन २०१६-१७ मध्ये चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा २३ टक्क्यांनी कमी असलेल्या कर महसुलात सन २०१७-१८ मध्ये झालेल्या वाढीमुळे ही टक्केवारी १७ टक्के इतकी कमी झाली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारशी

३.११ (१) सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी महसुली जमा अंतर्गत राज्याची स्वतःची साधनसंपत्ती यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून यात राज्याचा स्वतःचा कराचा हिस्सा सन २०१२-१४ च्या तुलनेत कमी झाल्याचे दिसून येते. वास्तविकतः दरवर्षी महसुली करामध्ये १० टक्के वाढ अपेक्षित आहे. जीएसटीमुळे आता महसुली जमा रकमेमध्ये मोठी वाढ झाल्याचे दिसून येते. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता सर्व्हीस सेक्टरमुळे जीडीपीमध्ये वाढ होते. सर्व्हीस सेक्टर मधील कर हा केंद्र शासनाकडे जमा होतो व त्यानंतर तो राज्य शासनास प्राप्त होत असल्यामुळे ही वाढ दिसून येत नाही. त्यातच नवीन महसुली उत्पन्नाचे मार्ग निर्माण करण्यात आले नाही त्यामुळे राज्याला निधीची कमतरता भासते. अशा परिस्थितीत कर वाढविल्यास नागरिकांच्या रोषाला शासनाला सामोरे जावे लागते. त्यामुळे नवीन महसुली उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे गरजेचे आहे. सद्यःस्थितीत जीएसटी, स्टॅम्प ड्युटी, विक्री कर व वाहतूक कर हे राज्याचे महत्वाचे महसुली उत्पन्नाचे मार्ग आहेत. यात पुढील दोन ते तीन वर्षांत निश्चितच सुधारणा होण्याची शक्यता आहे परंतु वित्तीय धोरण ठरविताना विभागाने कर प्रक्रियेचे पुनर्गठन करून एका वेगळ्या दृष्टीकोनातून याकडे बघण्याची आवश्यकता आहे. याअनुषंगाने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) जीएसटीमुळे सर्व करांचा मिळून एकच कर घेण्यात येतो. मात्र मागील कालावधीतील व्हॅटची जवळजवळ रुपये १,१०,००० कोटींची वसुली अद्यापही बाकी आहे. व्हॅटच्या केसेस अद्यापही मोठ्या प्रमाणात प्रलंबित आहेत. ज्यामुळे मोठी रक्कम अडकून पडलेली आहे. एकदाच हा विषय अंतिमतः कालबद्ध पद्धतीने निकाली काढणे अत्यंत आवश्यक आहे. कोट्यावधी रुपयांची रक्कम यामध्ये गुंतलेली आहे. या प्रलंबित प्रकरणांसंदर्भात विभागाने धोरणात्मक निर्णय घेऊन ही प्रकरणे निकाली काढावी व त्याअनुषंगाने अडकून पडलेल्या निधीचे योग्य नियोजन करण्यात यावे जेणेकरून शासनाकडे देखील हा निधी फार काळ जमा राहणार नाही व करदातादेखील या प्रकरणातून लवकर मुक्त होईल. ही प्रकरणे निकाली काढताना वादातीत रकमेच्याआधारे प्रकरणांची विभागणी करण्यात यावी व अधिक रकमेचा समावेश असलेली प्रकरणे प्रथम प्राधान्याने निकाली काढण्यात यावीत. त्यातही काही विशिष्ट सवलती देवून एकाच वेळी निकाली (One Time Settlement) काढता येत असतील तर त्यासाठी विभागाने प्रयत्न करावेत व ही प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.३.१.१ " कर महसूल "

अभिप्राय

३.१२ मागील सन २०१५-१६ च्या तुलनेत कर महसुलात झालेली रु. १०,००८ (८ टक्के) वाढ ही प्रामुख्याने (अ) मुल्यवर्धीत करांतर्गत संकलनात झालेल्या वाढीमुळे, विक्री, व्यापार इत्यादीवरील करात रु. ११,५१३ कोटी (१७ टक्के) ; (ब) राज्य मोटार वाहन कराधान अधिनियम आणि पर्यावरण कर यातील अधिक प्राप्तीमुळे मोटार वाहन करात रु. ७२४ कोटी (१२ टक्के) याखाली झाली होती जी विजेचा वापर आणि विक्री यावरील कर आणि शुल्क यांच्या कमी संकलनामुळे कर व शुल्कात झालेल्या रु. १८७३ कोटी (२२ टक्के) घटीमुळे कमी झाली.

सन २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान, कर महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (१३ टक्के) इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांमधील वाढीच्या दरापेक्षा (१४.८ टक्के) कमी होता. सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मधील स्वतःच्या कर महसुलातील वाढ (७.९ टक्के) देखील सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांतील वाढीच्या दरापेक्षा (१३.५ टक्के) कमी होती. सन २०१६-१७ दरम्यान राज्याच्या सकल घरेलू उत्पन्नाच्या टक्केवारीतील कर महसूल (६ टक्के) , चौदावा वित्त आयोग (८.५ टक्के) , आणि राजकोषीय सुधारणा पथ (७ टक्के) यांच्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा कमी होता आणि मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदनाएवढा (६ टक्के) होता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.१३ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी कर महसूलात झालेल्या वाढ/घट संदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. यासंदर्भात समितीने विस्तृत छाननी केली असता सन २०१६-१७ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत राज्याच्या कर महसुलामध्ये प्रामुख्याने विक्रीकर, मोटार वाहन कर या मुख्य करांमध्ये वाढ झाली असून विजेचा वापर आणि विक्री यावरील कर आणि शुल्क यामध्ये घट झाली आहे.

मोटार वाहन करासंदर्भात सन २०१६-१७ या वर्षात इंजिन क्षमतेनुसार दुचाकी-तिचाकी वाहनांवरील कराचे सुधारित दर राज्यात लागू करण्यात आल्याने, रस्ते सुरक्षा निधी स्थापन करण्यात आल्याने व वस्तू व सेवा कर लागू झाल्यानंतर दुचाकी व चारचाकी वाहनांवर २ टक्के करवाढ लागू करण्यात आल्यामुळे ही वाढ/घट झाली आहे.

विक्री करासंदर्भात सन २०१६-१७ मध्ये वाढ ही प्रामुख्याने कराच्या दरातील वाढ परिशिष्ट " सी " अंतर्गत वस्तूंवर ५ टक्के ऐवजी ५.५ टक्के दर आकारण्यात आला तर परिशिष्ट " ई " अंतर्गत वस्तूंवर १२.५ टक्के ऐवजी १३.५ टक्के दर आकारण्यात आला, तसेच पेट्रोलच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे ही वाढ झाल्याचे दिसून येते.

विजेचा वापर आणि विक्री यावरील कर आणि शुल्कासंदर्भात सन २०१६-१७ मध्ये या कराचे संकलन कमी झाले कारण मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लि. मुंबई यांनी माहे ऑक्टोबर,२०१६ पासून शासनास देय असलेल्या विद्युत शुल्क व विजेच्या विक्रीवरील कराचा भरणा शासन कोषगारात केला नाही. सदर रकमेचा व्याजासहित भरणा नंतर माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये केला असल्याचे समितीस दिसून आले.

भारतीय रिझर्व्ह बँक यांच्याकडील राज्य वित्तीय अहवाल आणि महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पीय सांख्यिकीमधील माहितीवरुन सन २००७-०८ ते २०१५-१६ या कालावधीत इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांच्या कर महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर १३ टक्के नसून तो ७.४ टक्के इतका आहे. तसेच सन २००७-०८ ते २०१५-१६ या कलावधीत राज्याच्या कर महसूलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर ७.९ टक्के इतका असून तो इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांपेक्षा जास्त आहे. राज्याच्या सकल घरेलू उत्पन्नाच्या टक्केवारीतील कर महसूलाचे प्रमाण सन २०१६-१७ मध्ये जरी ६ टक्के इतके असले, तरी सन २०१७-१८ मध्ये हे प्रमाण ७ टक्के इतके झाले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप हे अभ्यासपूर्ण आकडेवारीवर आधारीत असून हे आकडे वस्तुस्थितीवर आधारीत आहेत. तसेच ते वित्त विभागासाठी निश्चितच मार्गदर्शक आहेत. त्याआधारे कर महसूलांचे प्रमाण वाढते ठेवण्यासाठी योग्य व आवश्यक ती उपाययोजना वित्त विभागाने अवलंबावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.३.१.२ " करेतर महसूल "

अभिप्राय

३.१४ सन २०१५-१६ च्या तुलनेत करेतर महसूल प्राप्तीमधील रु. ७१४ कोटीची (पाच टक्के) घट ही प्रामुख्याने शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती ५८ टक्के (रु. ३५० कोटी) , मोठे पाटबंधारे ५८ टक्के (रु. २६७ कोटी) आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा ४७ टक्के (रु. २२४ कोटी) यातील घटीमुळे होती, जी घट उर्जा/वीज शीर्षाखालील २३ टक्क्यांच्या वाढीमुळे (रु.१४० कोटी) कमी झाली. चालू वर्षा दरम्यान, करेतर महसुली जमा (रु. १२,७०९ कोटी) ही राजकोषीय सुधारणा पथामधील रु. २१,६९८ कोटी (४१ टक्के) , मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन/अर्थसंकल्प रु. १९,९९७ कोटी (३६ टक्के) यातील प्रक्षेपणापेक्षा तसेच चौदाव्या वित्त आयोगाच्या रु. २१.७५२ कोटी (४२ टक्के) इतक्या प्रमाणशीर निर्धारणेपेक्षा कमी होती.

सन २००७-०८ ते २०१५-१६ दरम्यान करेतर महसुलाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (-२.९ टक्के) इतर सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांमधील वाढीच्या दरापेक्षा (९.५ टक्के) कमी होता. सन २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ दरम्यान करेतर महसुलातील वाढ (-५.३ टक्के) ही सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांमधील वाढीच्या दरापेक्षा (१२.१ टक्के) कमी होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

शिफारशी

३.१५ (१) सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी करेतर महसूलात वेळोवेळी होणारी घट यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. पाटबंधारे महामंडळांतर्गत सिंचन प्रकल्पातून मिळणाऱ्या पाणीपट्टीची रक्कम सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास पाटबंधारे विकास महामंडळांना मान्यता देण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतल्याने मोठे, मध्यम व लहान पाटबंधारे प्रकल्पांतून मिळणाऱ्या पाणीपट्टीच्या रकमा शासकीय लेख्यांत जमा न झाल्याने करेतर महसूल कमी झाला. विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे, व्यावसायिक सेवा पुरवठ्याबाबत कमी मागणी, अतिप्रदानाचे प्रमाण कमी होणे तसेच ग्रंथालय सभासदत्वाची वर्गणी द्विवार्षिक असल्याने शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती या शीर्षाखालील महसुली जमेत घट झाली. करेतर उत्पन्न वाढविण्यासाठी राज्य शासनाकडून सातत्याने प्रयत्न चालू असून याबाबत सचिव तसेच मा. मंत्री स्तरावर सातत्याने बैठका घेण्यात येतात असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. वित्त विभागाने करेतर उत्पन्न वाढविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावे व राज्याच्या महसूलात वाढ करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीस शिफारस आहे.

(२) व्याज प्राप्ती, लाभांश आणि नफा

अभिप्राय

३.१६ राज्याच्या अतिरिक्त रोख शिल्लकीच्या गुंतवणुकीवरील व्याज हा व्याज प्राप्तीचा एक मोठा स्त्रोत आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या विनियमानुसार, राज्याकडून राखली जाणारी रोख शिल्लक ही केंद्र शासनाच्या १४ दिवसांच्या कोषागार देयकांत गुंतवली जाते. या कोषागार देयकांवरील सरासरी व्याजाचा दर पाच ते सहा टक्के असतो. त्वरित आवश्यक असलेल्या रकमेपेक्षा अधिक प्रमाणातील रोख शिल्लक ही केंद्र शासनाच्या ९१ दिवसांच्या कोषागार देयकांमध्ये गुंतविली जाते. सन २०१६-१७ दरम्यान रु. ३३१ कोटी व्याज प्राप्तीच्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत रोख शिल्लकींच्या गुंतवणूकीवर प्रत्यक्षात रु. २,२१४.१९ कोटीची व्याज प्राप्ती झाली होती, ज्यापैकी १४ दिवसांच्या कोषागार देयकांवर रु. ६५१.४९ कोटी आणि ९१ दिवसांच्या कोषागार देयकांवर रु. १५६२.७० कोटीची प्राप्ती झाली होती.

राज्य शासनाने त्याच्या कंपनी/महामंडळे इत्यादींना दिलेल्या कर्जे आणि अग्रिमांवर सन २०१६-१७ दरम्यान रु. ४०७ कोटी व्याज प्राप्त झाले. जे वर्ष अखेरीस प्रलंबित असलेल्या कर्जे आणि अग्रिमांच्या (रु. २६,६०३.४० कोटी) १.५ टक्के होते. सन २०१६-१७ दरम्यान कंपनी/महामंडळ

यांच्याकडून रु. ६६.८१ कोटी रक्कम लाभांशाच्या रुपात गुंतवणुकीवरील परतावे म्हणून घोषित केली गेली आणि शासकीय लेख्यात जमा केली गेली. शासकीय गुंतवणुकीचे प्रमाण (रु. १,२९,९८३.७९ कोटी) विचारात घेता गुंतवणुकीवर ०.०५ टक्के दराने प्राप्त झालेले परतावे हे अत्यल्प होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.१७ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी व्याज प्राप्ती, लाभांश व नफा यासंदर्भात आढळलेल्या तफावतीबाबत आक्षेप नोंदविलेले आहेत. राज्य शासन, बिम्स (Budget Estimation and Allocation Monitoring System) या संगणक आज्ञावलीद्वारे प्रशासकीय विभागांना मा. विधानमंडळाकडून मंजूर केलेल्या अनुदानापैकी ७० टक्के अनुदान आर्थिक वर्षाच्या सुरूवातीलाच वितरीत करते. सदर संगणक प्रणालीद्वारे राज्य शासनाच्या खर्चाचा कॅश-फ्लो नियंत्रित केला जातो. तथापि, राज्य शासनाकडून लोक कल्याणाच्या योजना राबविल्या जात असल्यामुळे अनुदान केव्हा खर्ची पडेल याचे अनुमान करता येत नाही. जमा व खर्चाचा मासिक अंदाज घेऊन कर्जाची उभारणी राज्य शासन करत असते. संभाव्य खर्च व उपलब्ध असणारी रोख तरलता विचारात घेऊन १४/९१ दिवशीय कोषागार देयकामध्ये गुंतवणूक केली जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. हे जरी खरे असले तरीही हा निधी अधिक कालावधीसाठी विनावापर ठेवण्यात येत असेल तर विभागाने व्याजाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा निश्चितच लाभ घेऊन शासनाचे आर्थिक हित जपावे व कर महसूलात वाढ करावी अशी समितीची शिफारस आहे.

(३) सार्वजनिक सुविधांची दर निश्चिती-पाणी शुल्क

अभिप्राय व शिफारस

३.१८ महाराष्ट्रात, पाणी शुल्काची आकारणी आणि दर निश्चिती महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ च्या तरतूदींनुसार केली जाते. जलसंपदा प्रकल्पांचे पाटबंधारे व्यवस्थापन, प्रशासन, कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्चाची पूर्ण वसुली पाणी शुल्काच्या रक्कमेतून होईल अशा पद्धतीने प्राधिकरणाने पाटबंधारे आणि मोठ्या प्रमाणावर लागणाऱ्या पाण्यासाठी पाणी शुल्काचे निकष निश्चित करणे आवश्यक असते. अधिनियमानुसार, पाटबंधारे प्रकल्पांवरील कार्यचालन आणि देखभाल खर्च राज्याने पाणी शुल्काच्या रक्कमेतून भागवावयास हवा. पेयजल प्रकरणांत पाणी प्रशुल्कातून प्राप्त होणारा महसूल हा पाण्याच्या उत्पादनाच्या खर्चाएवढा म्हणजे पाणीपुरवठा व्यवस्थेच्या कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्चाएवढा असावा.

मात्र ऑक्टोबर,२०१० पासून महाराष्ट्र राज्यात महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरणाकडून पाणी शुल्क ठरविले जाऊ लागले. सन २०१२-१७ दरम्यान वसूल केलेले पाणी शुल्क हे कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्चापेक्षा रु.१,१७९.०८ कोटीने कमी होते. सन २०१२-१७ दरम्यान वसुलीतील थकबाकी रु.१,७०४.६६ कोटी होती. याशिवाय, सन २०१२-१७ दरम्यान कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्च भागविण्यासाठी योग्य निर्धारण करणे आणि निर्धारणेप्रमाणे वसुली करणे यासाठी प्रयत्नांची आवश्यकता आहे असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

कार्यचालन व परिरक्षण खर्चानुसार (आस्थापना + परिरक्षण आणि दुरुस्ती) दरवर्षी पाणीपट्टीची आकारणी होत नाही. दरवर्षी दिनांक १५ ऑक्टोबर रोजी जलाशयातील उपलब्ध पाणीसाठ्यावर आधारित सिंचन व बिगर सिंचन पाणीवापराचे परिमाण निश्चित होत असल्यामुळे त्यावर आधारित सिंचन क्षेत्रानुसार व बिगर सिंचनासाठी उपलब्ध पाणी परिमाणानुसार पाणीपट्टीची आकारणी होते. दुष्काळी परिस्थितीमध्ये पाणीपट्टीची आकारणी कमी होते. तथापि, सिंचन व्यवस्थापनांतर्गत कार्यचलन व परिरक्षण खर्चामध्ये दुष्काळी परिस्थितीमध्ये कोणतीही कपात करणे शक्य नसते. त्यामुळे दरवर्षीची पाणीपट्टी आकारणी आणि कार्यचालन परिरक्षण खर्च यांची तुलना करणे संयुक्तिक नाही.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचेकडून पाणीपट्टीचे दर हे सिंचन व्यवस्थापनाकरिताच्या कार्यचालन व परिरक्षण खर्चाची पूर्णपणे वसुली होण्याच्यादृष्टीने निश्चित करणे आवश्यक आहे. सदर बाब महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे अखत्यारितील आहे. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांनी निश्चित केलेल्या पाणीपट्टीच्या दरांनुसार आकारणी व वसुली करणे हे जलसंपदा विभागाचे काम आहे. त्यातच पाणीपट्टीची आकारणी व वसुली यातील तफावत ही प्रामुख्याने दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट अशा नैसर्गिक आपत्तीमुळे पीक हानी होऊन शेतकऱ्यांची सिंचनाची पाणीपट्टी भरण्यास असमर्थता, शेतीचे उत्पन्न व खर्च यामध्ये तफावत असल्याने व शेतीमालाला हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी सिंचनाची पाणीपट्टी न भरणे, अल्पभूधारक शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने सिंचनाची पाणीपट्टी न भरणे, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा, ग्राम पंचायती ह्या नियमित पाणीपट्टीचा भरणा करीत नसल्याने पाणीपट्टीच्या थकबाकीमध्ये वाढ होते. तदनंतर सदर स्थानिक स्वराज्य संस्था थकबाकी न भरता थकबाकी माफीची मागणी करणे, खाजगी संस्था व कंपन्या यांच्यासोबत पाणीपट्टीच्या अनुषंगाने उद्‌भवलेल्या न्यायालयीन प्रकरणांत मा. न्यायालयाच्या आदेशांविना पाणीपट्टीची वसुली करता येत नाही. या व्यतिरिक्त नगर विकास विभाग, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, ग्रामविकास विभाग यांच्याकडे पाणीपट्टी वसुलीबाबत वारंवार पाठपुरावा करूनही त्यांच्याकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

तसेच जलसंपदा विभागाने दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ च्या शासन निर्णयान्वये पाटबंधारे प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाचे काम पाटबंधारे महामंडळांकडे वर्ग करून पाणीपट्टीच्या रकमेतून प्रकल्पांच्या सिंचन व्यवस्थापनाच्या कामासाठी खर्च करण्यास पाटबंधारे विभागांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक १७ नोव्हेंबर २०१६ पासून शासनाकडे जमा होणारी पाणीपट्टीची रक्कम आता पाटबंधारे महामंडळांकडे जमा होत आहे. तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने राज्यातील घरगुती, औद्योगिक व कृषि-सिंचन प्रयोजनार्थ वापरल्या जाणाऱ्या पाण्याचे दर दिनांक ११ जानेवारी, २०१८ च्या आदेशान्वये सुधारित केले असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

ही जरी वस्तुस्थिती असली तरीही महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात नोंदविलेले आक्षेप गांभीर्याने घेणे आवश्यक आहे. त्यानुसार पाटबंधारे प्रकल्पावरील कार्यचालन आणि देखभाल खर्च राज्याने पाणीशुल्काच्या रकमेतून भागविणे संदर्भात व पेयजल प्रकरणांत पाणी प्रशुल्कातून प्राप्त होणारा महसूल पाण्याच्या उत्पादनाच्या खर्चाएवढा म्हणजे पाणीपुरवठा व्यवस्थेच्या कार्यचालन आणि देखभाल यावरील खर्चाएवढा असावा यादृष्टीने विभागाने उपाययोजना करावी. तसेच शासनाने गुंतवणूकीवर यथायोग्य परतावा प्राप्त होईल याची सुनिश्चीती करण्यासाठी उपाययोजना करावी. अन्यथा, कमी वित्तीय परतावा असलेल्या प्रकल्पांमध्ये अधिक दरावर प्राप्त केलेल्या खर्चिक कर्जाऊ निधीची गुंतवणूक सातत्याने केली जाईल याअनुषंगाने आवश्यक ती दक्षता घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.३.२.१ " केंद्र शासनाकडून प्राप्त सहायक अनुदाने "

अभिप्राय व शिफारस

३.१९ केंद्र शासनाकडून प्राप्त होणारी सहायक अनुदाने सन २०१५-१६ मध्ये रु.१६,८९९ कोटी होती, त्यामध्ये २८ टक्के वाढ होऊन सन २०१६-१७ मध्ये रु.२१,६५३ कोटी झाली. सन २०१६-१७ मधील ही वाढ प्रामुख्याने केंद्र योजनांतर्गत योजना (१४१ टक्के) , योजनेतर अनुदाने (४९ टक्के) आणि केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत योजना (१२ टक्के) याअंतर्गत झाली होती. महसुली जमांच्या टक्केवारीतील केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या एकूण अनुदानांचा कल सन २०१२-१७ दरम्यान अस्थिर होता.

केंद्र योजनांतर्गत योजनांच्या अनुदानातील वाढ (रु.९६९ कोटी) ही मुख्यत्वे ग्रामीण विकास (रु.४३० कोटी) आणि राज्यघटनेच्या कलम २७५ (१) च्या परंतुका अंतर्गत अनुदानांमधील वाढीमुळे (रु.६७७ कोटी) झाली होती. केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत योजनेतील अनुदानातील वाढ (रु.११२६ कोटी) ही प्रामुख्याने (अ) नगरविकास (रु.१८६९ कोटी) यामधील वाढ (ब) ग्रामीण रोजगार (रु.४२१ कोटी) आणि (क) पीक संवर्धन (रु.४७१ कोटी) यातील घट यांच्या निव्वळ परिणामी झाली होती. योजनेतर अनुदानातील वाढ (रु.२९९३ कोटी) ही मुख्यत्वे इतर अनुदानांतर्गत (रु.२६१० कोटी) झाली होती.

तसेच राज्य योजनांतर्गत योजनांमधील अनुदानांमध्ये प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २७५ (१) खालील अनुदाने (ही अनुदाने मुलतः आदिवासी उपयोजनांसाठी असतात) आणि गट अनुदाने यांचा समावेश असतो. सन २०१६-१७ मध्ये गट अनुदाने रु.७४ कोटींनी (२६ टक्के) घटली आणि वर्धित वेग पाटबंधारे लाभ कार्यक्रम आणि इतर जल संबंधित योजनांसाठीची अनुदाने रु.७८ कोटींनी घटली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सन २०१५ मध्ये केंद्र पुरस्कृत योजनांच्या केंद्र : राज्य हिश्श्यांच्या प्रमाणात बदल झाला व बऱ्याच १०० टक्के केंद्र पुरस्कृत योजनांच्या केंद्र : राज्य हिश्श्यांचे प्रमाण ६०:४० व ५०:५० असे झाल्याने राज्याच्या दायित्वात वाढ झाली आहे व केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी तुलनेत कमी झाला आहे. तसेच आदिवासी विकास विभागास भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २७५ (१) अंतर्गत विशेष केंद्रीय सहाय योजना, आदिम जमाती विकास योजना या अंतर्गत १०० टक्के केंद्र सहाय उपलब्ध केले जाते. सदर अनुच्छेदाअंतर्गत प्राप्त निधी हा गॅप फंडींग स्वरुपाचा असून निश्चित प्रमाणात वार्षिक निधी असे बंधन नाही. सदर निधी राज्याच्या मागणीप्रमाणे व उपलब्ध निधीप्रमाणे वितरित होतो असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. असे असले तरीही महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपांची सकारात्मक दखल घेऊन विभागाने केंद्र शासनाकडून प्राप्त सहाय्यक अनुदाने व त्या तलुनेत राज्य योजनांतर्गत झालेली घट यातील तफावत कमी करण्यासंदर्भात योग्य ते नियोजन करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.३.२.२ " केंद्रीय कर हस्तांतरण "

परिच्छेद क्रमांक १.३.२.३ " कर तसेच सहाय्यक अनुदानांतील प्रक्रांतीची तुलना "

अभिप्राय व शिफारस

३.२० चौदाव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत केंद्रीय करातील अधिक प्रक्रांतीमुळे केंद्रीय कर हस्तांतरणात सन २०१५-१६ मधील रु.२८,१०६ कोटीत २० टक्के वाढ होऊन सन २०१६-१७ मध्ये ती रु.३३,७१५ कोटी झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

तसेच केंद्र शासनाकडून चौदाव्या वित्त आयोगाच्या (अधिकृत कालावधी २०१५-१६ ते २०१९-२०) शिफारशींच्या स्वीकृतीनंतर, २०१५-१६ पासून केंद्रीय कराच्या निव्वळ प्राप्तीची राज्यांना प्रक्रांती ३२ टक्क्यांवरून वाढवून ४२ टक्के करण्यात आली. चौदाव्या वित्त आयोगाच्या पहिल्या वर्षीच्या तुलनेत, चौदाव्या वित्त आयोगाच्या अधिकृत कालावधीच्या दुसऱ्या वर्षादरम्यान, राज्याला दिलेल्या केंद्रीय करातील राज्यांच्या हिश्श्याच्या प्रक्रांतीमध्ये २० टक्के इतकी वाढ झाली. केंद्रीय करांतील राज्यांच्या हिश्श्याच्या वस्तू व सेवा यावरील इतर कर आणि शुल्क आणि उत्पन्न व खर्च यावरील इतर कर या व्यतिरिक्त सर्व घटकांमध्ये चढता कल दिसून आला होता. मुख्य वाढ केंद्रीय उत्पादन शुल्कामध्ये (४२ टक्के) झाली होती. त्या खालोखाल, निगम कर (२ टक्के) आणि आयकर (२२ टक्के) यामध्ये वाढ झाली होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहे.

१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांना मिळणाऱ्या केंद्रीय करांच्या हिश्श्याच्या टक्केवारीत ३२ वरून ४२ टक्के वाढ झाली. तसेच प्रामुख्याने निगम कर, आय कर, केंद्रिय उत्पादन शुल्क यामध्ये २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ मध्ये मोठी वाढ झाल्याने केंद्रीय कर हस्तांतरणात २०१५-१६ मधील रु. २८,१०६ कोटी वरून सन २०१६-१७ मध्ये रु. ३३,७१५ कोटी पर्यंत वाढ झाली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप व आकडेवारी ही वस्तुस्थितीदर्शक आहे. मात्र केंद्रीय कर आकारणीच्या प्रमाणासंदर्भात निर्णय घेण्याचा पूर्णतः अधिकार केंद्र शासनाला आहे. मात्र त्याअनुषंगाने राज्यांना मिळणाऱ्या केंद्रीय करांच्या हिश्श्याच्या टक्केवारीत वाढ होण्याच्या अनुषंगाने विभागाने प्रयत्नशील राहावे अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.३.२.४ “ केंद्र पुरस्कृत योजना”

अभिप्राय व शिफारस

३.२१ केंद्र शासनाच्या नियोजन आयोगाने बाराव्या पंचवार्षिक योजनेतील विद्यमान केंद्र पुरस्कृत योजना, ६६ योजनांमध्ये पुनर्रचित केल्या होत्या (जुलै, २०१३), ज्यामध्ये १७ महत्त्वपूर्ण कार्यक्रम (फ्लॅगशीप प्रोग्राम) होते. ७३ केंद्र पुरस्कृत योजना आणि अतिरिक्त केंद्र सहाय्यांतर्गत बाह्य स्त्रोतांकडून अर्थसहाय्य मिळालेल्या एका प्रकल्पापैकी राज्य शासन केंद्र पुरस्कृत योजना आखू शकते. परंतु गृह विभागांतर्गत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि मानवी तस्करी विरोधी पथकांसाठी योजना (योजना सांकेतांक १३१९) , तसेच सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत अधिसूचित न केलेल्या (डी नोटीफाईड) इतर मागासवर्गीय आणि विमुक्त जमातीच्या शैक्षणिक विकासासाठीच्या योजना (योजना सांकेतांक ९१८८) ; आणि सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत इतर मागास वर्ग सीएएसपी साठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती (योजना सांकेतांक ९४९३) या ३ केंद्र पुरस्कृत योजना आखल्या गेल्या नव्हत्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

गृह विभागांतर्गत प्रशिक्षकांचे प्रशिक्षण आणि मानवी तस्करी विरोधी पथकांसाठी योजनेखाली राज्यातील सात जिल्ह्यांमध्ये **Investigating Women for Crime Against Women** यासाठी कार्यरत अधिकारी कर्मचारी यांचेमधून युनिटची स्थापना करण्यात आली आहे. त्यांच्या वेतनावरील खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी केंद्र शासनाने निधी मंजूर केला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत प्राप्त झाला असून त्यामधून अधिकारी कर्मचारी यांच्या वेतनावरील खर्च होत आहे. तसेच सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य विभागांतर्गत डी.एन.टी. प्रवर्गांतील विद्यार्थ्यांसाठी डॉ.आंबेडकर मॅट्रीकपूर्व व मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती केंद्र पुरस्कृत योजना (योजना सांकेतांक ९१८८) , इतर मागासवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती केंद्र पुरस्कृत योजना (योजना सांकेतांक ९४९३) या दोन्ही योजना नव्याने सुरू झालेल्या विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाच्या अंतर्गत राबविण्यास मान्यता मिळाली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. अतः विभागाने महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपाची योग्य ती दखल घेऊन आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.४ “ भांडवली जमा”

अभिप्राय व शिफारस

३.२२ राज्य शासनाच्या भांडवली जमांमध्ये ऋणेतर आणि ऋण जमा संम्मिलीत असतात. या वर्षातील लोक ऋण (केंद्र शासनाकडून खुल्या बाजारपेठेतून घेतलेली उधारी व कर्जे) जमेमध्ये (रु. ४८,३३७ कोटी) रु.४७,७१० कोटी अंतर्गत ऋण (९८.७ टक्के) आणि केंद्र शासनाकडून कर्जे व अग्रीमे रु. ६२७ कोटी (१.३) टक्के अंतर्भूत होती. अंतर्गत ऋणात खुल्या बाजारातील कर्जाचा ९४ टक्के इतका लक्षणीय हिस्सा होता, त्याखालोखाल परक्राम्य (निगोशिएटेड) कर्जे (सहा टक्के) अंतर्भूत होती. भांडवली जमांच्या घटकांतील कल आणि लोक ऋण जमेचा काल-निहाय तपशील पाहता २०१५-१६ मध्ये २८ टक्के असलेला भांडवली जमेच्या वाढीचा दर २०१६-१७ मध्ये २९ टक्क्यांपर्यंत वाढला. २०१५-१६ मधील ऋणेतर भांडवली जमेतील ९.५ टक्के ऋण (निगेटिव्ह) वाढीच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये ९७.८ टक्के धन (पॉझीटीव्ह) वाढीची नोंद झाली. २०१२-१३ मधील रु. २२,५८८ कोटी भांडवली जमा वाढून २०१६-१७ मध्ये रु. ५०,०८२ कोटी झाली. भांडवली जमांमध्ये ऋण जमेचा लक्षणीय हिस्सा होता जो २०१२-१७ दरम्यान ९६ टक्के ते ९८ टक्के इतका होता. चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार एप्रिल, २०१५ पासून राज्यांचा राष्ट्रीय अल्पबचत निधी योजनेमधील सहभाग हा त्यांनी त्या

तारखेपर्यंत (एप्रिल, २०१५) घेतलेल्या ऋणांचे दायित्व पूर्ण करण्याएवढाच मर्यादित आहे. चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार २०१६-१७ मध्ये राष्ट्रीय अल्पबचत निधी कर्जातील वाढ निरंक होती. २०१६-१७ मध्ये लोक ऋण जमेत २७ टक्के (रु.१०,३६० कोटी) इतकी वाढ झाली आणि लोक ऋण परतफेड १८ टक्क्यांनी (रु. १,८४४ कोटी) वाढली, परिणामी, लोक ऋण जमेत रु. ८,५१६ कोटींची निव्वळ वाढ झाली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राज्य शासनाने उभारलेल्या कर्जापैकी खुल्या बाजारातील कर्जाचा एकूण वार्षिक सरासरी व्याज दर (**weighted average interest rate**) ८.०७ टक्के आहे. सदर कर्ज इतर सर्व कर्जापेक्षा स्वस्त असल्याने, राज्य शासनाच्या अंतर्गत ऋणात खुल्या बाजारातील कर्जाचा हिस्सा लक्षणीय आहे. राष्ट्रीय अल्पबचत निधी वरील कर्जाचा भारीत सरासरी व्याज दर (**weighted average interest rate**) ९.६५ टक्के असल्याने चौदाव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार १ एप्रिल २०१५ पासून सदर योजनेंतर्गत कर्ज घेणे बंद करण्यात आले आहे. सबब सदर कर्जातील वाढ निरंक आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपात नमूद आकडेवारी पाहता विभागाने लोक ऋण जमा व लोक ऋण परतफेड याचा योग्य समन्वय व ताळमेळ राहणे संदर्भात आवश्यक ती उपाययोजना करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.४.१ “ कर्जे व अग्रिमांची वसुली ”

अभिप्राय व शिफारस

३.२३ २०१२-१७ दरम्यान राज्य शासनाने दिलेल्या कर्जे व अग्रिमांचा तपशील पाहता कर्जे आणि अग्रिमांच्या वसुलीतील रु. ८८० कोटी (१०२ टक्के) वाढ ही मुख्यतः वीज प्रकल्पांसाठी कर्जे (रु. ७७९ कोटी), “ वनीकरण आणि वन्य जीवांसाठी कर्जे ” (रु.५४ कोटी) आणि “ शासकीय कर्मचाऱ्यांना कर्जे ” (रु.३२ कोटी) यातील अधिक वसुलीमुळे झाली होती. मागील पाच वर्षात वसुलीची टक्केवारी ३.५ टक्के ते ७.९ टक्के इतकी नगण्य होती. परतफेडीतील थकबाकी आणि कायमस्वरुपी कर्जे याविषयीची संपूर्ण माहिती शासनाने सादर केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षापासून बिम्स (**BEAMS**) या संगणक आज्ञावलीत कर्जाच्या संकलनाबाबत स्वतंत्र आज्ञावली विकसित करण्यात आली असून सदर वित्तीय वर्षापासून कर्जाची माहिती संकलित करण्यात येत आहे. प्रशासकीय विभागांकडे कर्जाचे लेखे अद्ययावत नसल्यामुळे व महालेखापाल कार्यालयाशी कर्ज लेख्यांचा ताळमेळ न घेतल्यामुळे कर्ज परतफेडीची व थकबाकी आणि कायम स्वरुपी कर्ज याविषयी संपूर्ण माहिती प्राप्त करण्याचे काम चालू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. त्यादृष्टीने कालबद्ध पद्धतीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व नियमित ताळमेळ घेण्यात यावा व कर्जवसुली संदर्भात प्रयत्न अधिक वाढविण्यासंदर्भात उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.५ “ लोक लेखा जमा ”

अभिप्राय व शिफारस

३.२४ अल्पबचती, भविष्य निर्वाह निधी, राखीव निधी, ठेवी, निलंबने, वित्तप्रेषणे इत्यादी विशिष्ट व्यवहार जे राज्याच्या एकत्रीकृत निधीचा भाग नसताना, त्यांच्यामधील जमा आणि संवितरणे भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद २६६ (२) अंतर्गत उभारण्यात आलेल्या लोक लेख्यांमध्ये ठेवली जातात आणि त्यासाठी राज्य विधानमंडळाची मंजुरी आवश्यक नसते. शासन याठिकाणी सार्वजनिक पैशाची बँक/विश्वस्त म्हणून कार्य करते, कारण हे व्यवहार केवळ व्यवहार पूर्ण करण्यासाठी केलेले असतात. २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील लोक लेख्यांच्या अंतर्गत निव्वळ जमांचा कल यासंदर्भात माहितीचे अवलोकन केले असता २०१२-१७ या कालावधीत लोकलेखा जमा ५४.६ टक्क्यांनी वाढल्या. मागील वर्षाच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये झालेली रु.९,७१९ कोटी (१३.४ टक्के) वाढ ही ठेवी आणि अग्रीमे (रु. ४,५०० कोटी) , निलंबन आणि संकीर्ण (रु. ३,६०३ कोटी) आणि राखीव निधी (रु. १,३४१ कोटी) यामध्ये झालेल्या वाढीमुळे होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. वित्त विभागाने महालेखाकारांचे आक्षेप विचारात घेता या निधीचे योग्य ते नियोजन करावे अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.६ “ साधनसंपत्तीचा वापर ”

परिच्छेद क्रमांक १.६.१ “ खर्चातील वाढ व त्याचे घटक ”

अभिप्राय

३.२५ राज्य शासनाच्या खर्चाच्या मुख्य जबाबदाऱ्या वेगवेगळया स्तरावर सोपविलेल्या असल्याने खर्चाच्या वाटपाच्या विश्लेषणास विशेष महत्व आहे. राजकोषीय जबाबदाऱ्यांच्या नियमांच्या चौकटीत, तूट किंवा कर्जाऊ निधीचा वापर करून सार्वजनिक खर्च अधिक करण्यावर अर्थसंकल्पीय नियंत्रणे येतात. त्यामुळे चालू असलेल्या राजकोषीय सुधारणा व राज्य स्तरावरील एकत्रीकरण प्रक्रिया या विशेषतः विकास व सामाजिक कल्याणप्रित्यर्थ करावयाच्या खर्चात बचत करून केल्या जात नसल्याचे सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे.

तसेच मागील वर्षीच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये एकूण खर्चात झालेली रु. ३०,७७३ कोटी (१४.४ टक्के) वाढ ही महसुली खर्चातील रु.२२,८५५ कोटी आणि भांडवली खर्चातील रु. २,७५६ कोटी वाढीमुळे होती. २०१२-१७ दरम्यान एकूण खर्च राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या जवळजवळ ११ टक्के होता. एकूण खर्चाच्या ८३.५ टक्के (२०१६-१७) ते ९०.७ टक्के (२०१२-१३) अशी महसुली जमेची टक्केवारी होती. २०१२-१७ दरम्यान एकूण खर्चाच्या सरासरी ८६ टक्के खर्च महसुली जमांमधून करण्यात आला होता. २०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान राज्याच्या सकल घरेलू उत्पादन व महसुली जमेशी एकूण खर्चाच्या प्लावकतेचे गुणोत्तर मिश्र कल दर्शविते. राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या संदर्भात एकूण खर्चाच्या प्लावकतेचे गुणोत्तर जे २०१५-१६ मध्ये ०.६९२ होते ते २०१६-१७ मध्ये १.०७८ इतके वाढले. यावरून असे दिसून येते की २०१६-१७ दरम्यान राज्याच्या सकल घरेलू उत्पादनातील प्रत्येक एक टक्का वाढीमागे एकूण खर्चात १.०७८ टक्क्यांची वाढ झाली. महसुली, जमेच्या तुलनेत एकूण खर्चाच्या प्लावकतेचे गुणोत्तर २०१५-१६ मधील ०.६८१ पासून २०१६-१७ मध्ये १.४०० असे वाढले होते. वर्ष २०१६-१७ मधील एकूण खर्चापैकी योजनेतर खर्च ७४ टक्के तर योजनांतर्गत खर्च २६ टक्के होता. एकूण खर्चामधील रु.३०,७७३ कोटीच्या वाढीपैंकी योजनेतर खर्चाचा हिस्सा ७९ टक्क्यांनी वाढला तर योजनांतर्गत खर्च २१ टक्क्यांनी वाढला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

कार्यानुरुप एकूण खर्चातील कल

कार्यानुरुप एकूण खर्चाचे विभाजन हे व्याज प्रदानसहीत सर्वसाधारण सेवा, सामाजिक व आर्थिक सेवा यावरील खर्च, सहाय्यक अनुदाने व कर्जे व अग्रिमे असे करता येईल. तसेच एकूण खर्चाच्या घटकांच्या हिश्यातील सापेक्ष बदल असे दर्शवितात की, मागील वर्षाच्या तुलनेत एकूण खर्चातील सर्वसाधारण सेवा, सामाजिक सेवा, आर्थिक सेवा आणि कर्जे व अग्रिमे यांचा हिस्सा २०१६-१७ मध्ये घटला होता. सहाय्यक अनुदानाच्या व कर्जे व अग्रिमाच्या वाढीमुळे या घटीची भरपाई झाली.

महसुली खर्च

महसुली खर्चात २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ मध्ये रु. २२,८५५ कोटी (१२ टक्के) इतकी वाढ झाली. ही वाढ मुख्यत्वे सर्वसाधारण सेवा (रु. ७,२४० कोटी) , सामाजिक सेवा (रु. ७,९६५ कोटी) , आर्थिक सेवा (रु. ५,७९१ कोटी) व सहाय्यक अनुदाने व अंशदाने (रु.१,८६० कोटी) यांच्या खर्चात झालेल्या वाढीमुळे झाली होती. २६ टक्के वाढ ही योजनांतर्गत शीर्षात झाली तर उरलेली ७४ टक्के वाढ ही योजनेतर शीर्षात झाली. २०१६-१७ चा महसुली खर्च (रु.२,१३,२२९कोटी) हा राज्य शासनाने राजकीय सुधारणा पथ/मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन/अर्थसंकल्प यामध्ये केलेल्या निर्धारणेपेक्षा पाच टक्के कमी होता. योजनेतर महसुली खर्च (रु.१,७१,१४० कोटी) राज्य शासनाने राजकोषीय सुधारणा पथ (रु.१,७५,१९३ कोटी) यामध्ये केलेल्या प्रक्षेपणांपेक्षा देखील कमी होता.

महसुली खर्चाच्या घटना

सेवांचा विद्यमान स्तर कायम राखण्यासाठी व मागील दायित्वाच्या प्रदानकरिता महसुली खर्च करण्यात येतो आणि म्हणून त्यामधून राज्याच्या पायाभूत सुविधा व सेवांच्या जाळ्यात कोणतीही भर पडत नाही. मागील पाच वर्षातील एकंदर महसुली खर्च, त्याच्या वाढीचा दर, राज्याचे सकल घरेलू उत्पादन आणि महसुली जमेशी योजनेतर महसुली खर्चाचे गुणोत्तर आणि राज्याचे सकल घरेलू उत्पादन व महसुली जमेशी महसुली खर्चाची चढ-उतार दर्शवित होते.

योजनांतर्गत महसुली खर्च

प्रामुख्याने पाणी पुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण आणि नगर विकास (रु. ४,१९० कोटी) , ग्रामिण विकास (रु. ४९० कोटी) , परिवहन (रु. ४९० कोटी) , सर्वसाधारण सेवा (रु. ४८१ कोटी) आणि सर्वसाधारण आर्थिक सेवा (रु. २६८ कोटी) यावरील खर्चात वाढ झाल्यामुळे मागील वर्षापेक्षा २०१६-१७ मध्ये योजनांतर्गत महसुली खर्च रु. ६,०३३ कोटीनी (१७ टक्के) वाढला.

योजनेतर महसुली खर्च

२०१६-१७ मध्ये योजनेतर महसुली खर्चाचे महसुली खर्चातील प्रमाण ८० टक्के होते आणि मुख्यत्वे सर्वसाधारण सेवा (रु. ६,७५८ कोटी) , शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती (रु. २,२०३ कोटी) , कृषी आणि संलग्न कार्ये (रु. ३,५८२ कोटी) , ग्रामीण विकास (रु. ९१९ कोटी) आणि उर्जा (रु. ८६१ कोटी) यामध्ये झालेल्या वाढीमुळे मागील वर्षाच्या तुलनेत हा खर्च रु. १६,८२२ कोटीने (११ टक्के) वाढला होता. महसुली जमेच्या टक्केवारीतील योजनेतर महसुली खर्च दर्शवितो की सरासरी ८४ टक्के महसुली जमा योजनेतर महसुली खर्चासाठी वापरली गेली होती.

चौदाव्या वित्त आयोगाने केलेली निर्धारणे आणि राज्य शासनाने राजकोषीय सुधारणा पथ आणि मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन/ अर्थसकल्प यामधील प्रक्षेपण यांच्या संदर्भात योजनेतर महसुली खर्चाची तुलनात्मक स्थिती पाहता मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनातील प्रमाणशीर निर्धारणे / अर्थसंकल्प / राजकोषीय सुधारणा पथ यातील प्रक्षेपणे यापेक्षा २०१५-१६ व २०१६-१७ दरम्यान योजनेतर महसुली खर्च कमी होता.

वसुलीवरील खर्च

महसुली जमांच्या चार मुख्य शीर्षाची एकूण जमा, त्याच्या वसुलीवरील खर्च आणि २०१५-१६ वर्षासाठीच्या एकूण वसुलीवरील खर्चाच्या संबंधित अखिल भारतीय सरासरी खर्चाच्या टक्केवरीसह एकूण वसुलीवर झालेल्या अशा खर्चाची तुलनात्मक टक्केवारी पाहता राज्यातील महसूल वसुलीवरील खर्च हा विक्री, व्यापार इत्यादीवरील कराच्या अखिल भारतीय सरासरी एवढा आहे आणि तो वाहनांवरील कराव्यतिरिक्त, राज्य उत्पादन शुल्क आणि मुद्रांक व नोंदणी शुल्क यांच्या अखिल भारतीय सरासरीपेक्षा कमी आहे.

सबसिडी

वर्ष २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीत राज्य शासनाने दिलेली सबसिडी पाहता २०१५-१६ मधील सबसिडीवरील रु.१७,७६६ कोटी खर्चात १८ टक्क्यांनी वाढ होऊन वर्ष २०१६-१७ मध्ये तो रु.२०,९८४ कोटी इतका झाला होता. चालू वर्षात, एकूण महसुली खर्चातील सबसिडीचे प्रमाण जवळपास १० टक्के होते.

भांडवली खर्च

वर्ष २०१६-१७ मध्ये भांडवली खर्च (रु.२५,५४९ कोटी) हा एकूण खर्चाच्या १० टक्के होता (आलेख १.१३) आणि २०१५-१६ पेक्षा हा खर्च १२ टक्क्यांनी वाढला होता. वर्ष २००७-०८ ते २०१५-१६ दरम्याने भांडवली खर्चाचा वार्षिक चक्रवाढ वाढीचा दर (८.९ टक्के) हा सर्वसाधारण प्रवर्ग राज्यामधील वाढीच्या दरापेक्षा (१४.५ टक्के) कमी होता. २०१५-१६ च्या तुलनेत २०१६-१७ दरम्यान भांडवली खर्चाच्या वाढीचा दर (१२.१ टक्के) सर्वसाधारण प्रवर्ग राज्यांमधील वाढीच्या दराशी (१७.९ टक्के) तुलना करता कमी होता.

कर्जे व अग्रिमे

वर्ष २०१२-१६ दरम्यान कर्जे आणि अग्रिमे एकूण खर्चाच्या एक टक्का एवढ्या प्रमाणात होती आणि २०१६-१७ दरम्यान ती तीन टक्के होता. २०१५-१६ पेक्षा २०१६-१७ मध्ये कर्जे व अग्रिमांचे संवितरण रु. ५,१६३ कोटींने वाढले.

शिफारस

३.२६ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी साधनसंपत्तीचा वापर, अंतर्गत खर्चातील वाढ व त्याचे घटक यासंदर्भात अभ्यासपूर्ण विश्लेषण केलेले असून त्यात एकूण खर्च, कार्यानुरुप एकूण खर्चातील कल, महसुली खर्च, महसुली खर्चाच्या घटना, योजनांतर्गत महसुली खर्च, योजनेत्तर महसुली खर्च, वसुलीवरील खर्च, सबसिडी, भांडवली खर्च, कर्जे व अग्रिमे यासंदर्भात प्रत्यक्ष खर्चाबाबत दिलेली आकडेवारी ही प्रत्यक्ष खर्चावर आधारीत आहे. आक्षेपात नमूद संपूर्ण आकडेवारी ही निश्चितच अत्यंत अभ्यासपूर्ण व मार्गदर्शक असून याची दखल विभागाने घ्यावी व आवश्यक ते पुढील वित्तीय नियोजन व धोरण निश्चित करावे अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.६.२ "वचनबद्ध खर्च"

अभिप्राय

३.२७ राज्य शासनाच्या महसुलासाठीच्या वचनबद्ध खर्चात मुख्यत्वे व्याज प्रदाने, वेतन व मजुरी आणि निवृत्तीवेतने वरील खर्च यांचा समावेश असतो. ज्यात सन २०१२-१७ दरम्यान वेतन व मजुरीवरील खर्चात ९.७ टक्के सरासरी वार्षिक वाढ झाली होती. सन २०१५-१६ मध्ये वेतन व मजुरीवरील रु.६९,००७ कोटी खर्च रु.३५७६ (पाच टक्के) वाढून सन २०१६-१७ दरम्यान रु.७२,५८३ कोटी झाला. सन २०१६-१७ मधील वेतन व मजुरीवरील रु.७२,५८३ कोटी खर्च मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरण निवेदन/अर्थसंकल्प यामध्ये केलेल्या प्रक्षेपणांपेक्षा (रु.७९,९४१ कोटी) कमी होता.

निवृत्तीवेतन प्रदानावरील खर्च सन २०१२-१३ मध्ये रु.१३,४२९ कोटीवरून वार्षिक सरासरी १३.३ टक्के दाराने वाढून सन २०१६-१७ मध्ये रु.२१,७६० कोटी झाला. मागील वर्षापेक्षा सन २०१६-१७ मध्ये निवृत्तीवेतन प्रदानातील रु.३११८ कोटी वाढ (१६.७ टक्के) ही मुख्यत्वे निवृत्तीवेतन आणि इतर सेवानिवृत्ती लाभ यावरील वाढीव खर्चामुळे झाली.

व्याज प्रदानांच्याबाबतीत प्रामुख्याने ऋण दायित्वावरील वाढीमुळे राज्य शासनाच्या व्याज प्रदानात सन २०१२-१३ मधील रु. १९,०७६ कोटीवरून सन २०१६-१७ मध्ये ५० टक्क्यांनी रु.२८,५३२ कोटीपर्यंत वाढ झाली. सन २०१२-१७ दरम्यान महसुली जमेशी व्याज प्रदानाचे गुणोत्तर जवळजवळ स्थिर राहिले. राजकोषीय सुधारणा पथामधील प्रक्षेपणांच्या संदर्भात सन २०१५-१६ व सन २०१६-१७ मध्ये व्याज प्रदाने कमी होती. मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात केलेल्या प्रक्षेपणांच्या संदर्भात व्याज प्रदाने सन २०१५-१६ दरम्यान कमी होती. परंतु सन २०१६-१७ दरम्यान अंशतः जास्त होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राज्य शासनाने उभारलेल्या कर्जावरील व्याज प्रदानाचे मागील १२ वर्षातील महसुली जमेशी टक्केवारीचे प्रमाण पाहता ते केंद्र शासनाने निश्चित केलेल्या मापदंडाच्या म्हणजे २० टक्क्यांच्या मर्यादेत आहे. व्याज प्रदान कमी करण्यासाठी शासनाने कर्जरोखे परत घेणे, त्यामुळे राज्य शासनाच्या व्याज प्रदानात बचत झाली आहे. तसेच सन २०१७-१८ पासून खुल्या बाजारातून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या सल्ल्याने Re-issue करून कर्ज उभारणी करण्यात येत आहे. संबंधित वित्तीय वर्षात उभारण्यात आलेल्या कमी व्याजदाराने कर्जरोखे पुन्हा Re-issue केल्याने व्याजदर कमी येऊन शासनाच्या महसुली खर्चात बचत झाली. तसेच लघु मुदतीचे कर्ज रोखे उभारणे म्हणजेच सन २०१७-१८ पासून ३ ते १५ वर्ष मुदतीचे कर्जरोखे उभारण्यात येत आहेत. त्यामुळे कमी मुदतीच्या व कमी रक्कमेच्या लिलावात कमी व्याजदराने शासनाला कर्ज उभारणी करता येत आहे. राज्य शासनाकडे NSSF, LIC, PFC, NCDC, HUDCO या वित्तीय संस्थांकडून पूर्वी जास्त व्याज दराने घेतलेले कर्ज प्रलंबित आहे. सदर कर्ज एकाच वेळी निपटारा करून (one time settlement) परतफेड करण्याबाबत राज्य शासनाचे प्रयत्न सुरू असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस

३.२८ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी वचनबद्ध खर्चाअंतर्गत वेतन व मजुरी, योजनेत्तर शीर्ष, योजनांतर्गत शीर्ष, व्याज प्रदाने, निवृत्ती वेतन अशा घटकांबाबत अभ्यासपूर्ण व विस्तृत आकडेसह वस्तुस्थितीदर्शक तपशिल नमूद केला आहे. त्यात प्रामुख्याने

व्याज प्रदानेमध्ये काही अशी सुधारणात्मक बदल घडवून आणणे विभागाला शक्य आहे. ज्यात कर्जरोखे परत घेणे (**Buy back**) , कर्जरोखे पुन्हा जारी करणे (**Re-issue**), लघु मुदतीचे कर्जरोखे, अनेक वित्तीय संस्थांकडून घेतलेले कर्ज एकाच वेळी निपटारा (**One Time Settlement**) द्वारे परतफेड करणे अशा अनेक माध्यमांद्वारे व्याज प्रदानात निश्चितच बचत शक्य आहे. यादृष्टीने आवश्यक ती कार्यवाही विभागाने करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.६.३ "राज्य शासनाकडून स्थानिक संस्था, शैक्षणिक संस्था व इतर संस्थांना दिलेले अर्थसहाय्य"

अभिप्राय व शिफारस

३.२९ फेब्रुवारी, २०११ मध्ये २०११-१२ ते २०१५-१६ या कालावधी करीता स्थापन करण्यात आलेल्या चौथ्या राज्य वित्त आयोगाने त्याचा अहवाल राज्य शासनाला सप्टेंबर २०१२ पर्यंत सादर करावयाचा होता. अहवाल सादर करण्यास २०१४ पर्यंत मुदतवाढ दिली होती सदर अहवालाचे मुद्रण सुरू असल्याचे सांगण्यात आले.

चौथ्या राज्य वित्त आयोगाचा अहवाल व स्पष्टीकरणात्मक ज्ञापन (**Action Taken Report**) दि. २८ मार्च २०१८ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर केला. अहवालातील स्वीकृत व अंशतः स्वीकृत शिफारशी नगरविकास विभाग व ग्राम विकास विभागास पुढील कार्यवाहीसाठी पाठविल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. विभागाने सदरहू अहवाल वेळोवेळी व विनाविलंब सभागृहाच्या पटलावर ठेवून त्यांच्या शिफारशींसह कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.६.३.१ "अर्थसहाय्याचे प्रमाण" - शिफारस नाही.

परिच्छेद क्रमांक १.६.४ "खर्चाची गुणवत्ता"

परिच्छेद क्रमांक १.६.४.१ "सार्वजनिक खर्चाची पर्याप्तता"

अभिप्राय व शिफारस

३.३० राज्यातील चांगल्या सामाजिक व भौतिक पायाभूत सुविधांची उपलब्धता साधारणतः खर्चाची गुणवत्ता प्रतिबिंबीत करते. खर्चाच्या गुणवत्तेच्या सुधारणेत प्रामुख्याने खर्चाची पर्याप्तता (म्हणजे सार्वजनिक सेवा पुरविण्यासाठी पुरेशी तरतूद) , खर्चाची कार्यक्षमता व परिणामकारकता (निवडक सेवांकरिता व्यय-निष्पत्ती संबंधाचे निर्धारण) या तीन बाजू अंतर्भूत असतात.

सामाजिक क्षेत्र व आर्थिक पायाभूत सुविधा यांच्याशी संबंधित राज्य शासनावर सोपवलेली खर्चाची दायित्वे हे मुख्यतः राज्याचे विषय आहेत. मानव विकासाची पातळी उंचावण्यासाठी शिक्षण, आरोग्य इ. सारख्या मुख्य सामाजिक सेवांवरील खर्च राज्याने वाढवणे गरजेचे असते. एखाद्या विशिष्ट क्षेत्रातील गुणोत्तर जर संबंधित राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी असेल, तर ते कमी राजकोषीय प्राधान्य (एकूण खर्चाशी एखाद्या प्रवर्गाखाली खर्चाचे गुणोत्तर) दर्शविते. २०१३-१४ व २०१६-१७ दरम्यान विकास खर्च, सामाजिक खर्च व भांडवली खर्च यासाठी राज्य शासनाने दिलेल्या राजकोषीय प्राधान्याचे विश्लेषण पाहता हे गुणोत्तर तुलनात्मक कमी/जास्त होते. त्याचा संपूर्ण तपशील महालेखाकारांनी त्यांचे आक्षेपात नमूद केला आहे.

महालेखापाल कार्यालयाने नमूद केल्याप्रमाणे राज्याने इतर राज्यांच्या तुलनेत सामाजिक क्षेत्रावरील खर्चासाठी अधिक प्राधान्य दिलेले आहे. याचे प्रमुख कारण राज्यामध्ये निर्माण करण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा राज्य शासनाच्या अखत्यारीतील महामंडळे इ. मार्फत राबविण्यात येतात. तसेच इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रामध्ये आरोग्य सुविधा खाजगी संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणात देण्यात येत असल्याने राज्याला आरोग्य सुविधांसाठी जास्त तरतूद करण्याची आवश्यकता भासली नाही. त्यामुळे सामाजिक सेवेमध्ये राज्य शासन शिक्षण, वैयक्तिक लाभाच्या योजना इ. साठी निधी उपलब्ध करू शकले असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीस केला. महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप व राज्यात अस्तित्वात असलेली परिस्थिती या आक्षेपांची दखल विभागाने गांभीर्याने घ्यावी व खर्चाची गुणवत्ता व सार्वजनिक खर्चाची पर्याप्तता यांचा योग्य तो ताळमेळ व नियोजन ठेवावे अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.६.४.२ "खर्चाच्या वापराची कार्यक्षमता आणि परिणामकारकता"

अभिप्राय व शिफारस

३.३१ सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून विकास शिर्षाखाली केलेल्या सार्वजनिक खर्चाचे महत्त्व विचारात घेता, राज्य शासनाने चांगल्या दर्जाची महत्त्वाची सार्वजनिक साधने पुरविण्यावर भर देऊन खर्चाची कार्यक्षमता वाढविणारे सुयोग्य उपाय करावेत. विकास खर्चासाठी अतिरिक्त वाटप करण्याबरोबरच, एकूण खर्चाशी भांडवली खर्चाची टक्केवारी आणि सामाजिक व आर्थिक सेवांवरील कार्यचालन व देखभाल यावरील महसुली खर्चाचे प्रमाण यावरून खर्चाची कार्यक्षमता दर्शविली जाते. एकूण खर्चातील या घटकांची टक्केवारी जेवढी जास्त तेवढी खर्चाची गुणवत्ता अधिक असल्याचे समजले जाते. चालू वर्षाची अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके व मागील वर्षातील प्रत्यक्ष खर्च यांच्या सापेक्ष चालू वर्षातील राज्याच्या एकूण खर्चाच्या संबंधात विकास खर्चातील कल पाहता विकासावरील महसुली खर्च वाढला. ही वाढ सामाजिक सेवा आणि आर्थिक सेवा यामध्ये झाली. राज्याच्या अर्थसंकल्पीय प्रक्षेपणापेक्षा विकासावरील प्रत्यक्ष महसुली खर्च कमी होता.

विकासावरील भांडवली खर्च वर्ष २०१५-१६ च्या तुलनेत सन २०१६-१७ मध्ये वाढला. आर्थिक सेवा व सामाजिक सेवा या अंतर्गत वाढ झाली. परिवहनावरील भांडवली खर्च, पाटबंधारे आणि पुर नियंत्रणावरील भांडवली खर्च व सर्वसाधारण आर्थिक सेवावरील भांडवली खर्चांतर्गत महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी यातील वाढ हे वाढीचे मुख्य घटक होते. राज्याच्या अर्थसंकल्पातील प्रक्षेपणापेक्षा विकासावरील प्रत्यक्ष भांडवली खर्च कमी होता. विकास कामांसाठी घेतलेली कर्जे आणि अग्रिमे विकास कामांसाठी कर्जे व अग्रिमे वाढली. प्रत्यक्ष विकासासाठीची कर्जे व अग्रिमे राज्याच्या अर्थसंकल्पीय प्रक्षेपणापेक्षा जास्त होती.

निवडक सामाजिक आणि आर्थिक सेवांवर कार्यक्षमतेने केलेला खर्च निवडक सामाजिक आणि आर्थिक सेवांमधील महसुली खर्चातील वेतन व मजुरी आणि कार्यचालन आणि देखभाल यांच्या हिश्श्याच्या टक्केवारीचा तपशील पाहता एकूण खर्चाशी विकासावरील भांडवली खर्चाची टक्केवारी कमी झाली. सामाजिक सेवावरील भांडवली खर्चाची टक्केवारी वाढली. ही वाढ मुख्यत्वे इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च (नैसर्गिक आपत्ती) ह्यामध्ये झाली होती. आर्थिक सेवावरील भांडवली खर्चाची एकूण खर्चाशी २०१५-१६ मधील टक्केवारी कमी झाली.

वेतन आणि मजुरीचा महसुली खर्चातील ५०.८ टक्के असलेला हिस्सा २०१६-१७ मध्ये ५३.५ टक्क्यांपर्यंत वाढला. ही वाढ मुख्यत्वे शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती, आरोग्य आणि कुटुंब कल्याण व पाणीपुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण, नगर विकास या शीर्षाखाली झाली. आर्थिक सेवांवरील महसुली खर्चातील वेतन आणि मजुरीचा हिस्सा २०१६-१७ मध्ये कमी झाला. ही घट प्रामुख्याने कृषी व संलग्न कार्ये, पाटबंधारे व पूर नियंत्रण, ऊर्जा व परिवहन ह्या शीर्षाखाली झाली.

महसुली खर्चातील कार्यचालन आणि देखभालीचा हिस्सा कमी झाला. सामाजिक सेवांवरील महसुली खर्चातील कार्यचालन आणि देखभालीचा हिस्सा कमी झाला. ही घट प्रामुख्याने आरोग्य आणि कुटुंब कल्याण, पाणीपुरवठा, स्वच्छता, गृहनिर्माण व नगर विकास व शिक्षण, क्रीडा, कला आणि संस्कृती या शीर्षांखाली झाली होती. आर्थिक सेवांवरील महसुली खर्चातील कार्यचालन आणि देखभालीच्या हिश्श्यामध्ये देखील घट होऊन कमी झाली. ही घट प्रामुख्याने परिवहन या शीर्षाखाली दिसून आली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

अर्थसंकल्पीत केलेला निधी हा आगामी वर्षामध्ये हाती घ्यावयाच्या योजनांसाठी उपलब्ध करून देण्यात येतो. तसेच वर्षभरामध्ये ज्या खर्चाला प्राधान्यक्रम दिलेला नसतो अथवा नव्याने खर्च उद्‌भवू शकतो, त्यामुळे खर्च करताना प्राप्त होणारा महसूल व कर्ज यांची सांगड घालून खर्च नियंत्रणात ठेवावा लागतो. त्यामुळे काही क्षेत्रांमध्ये अधिक खर्च व काही क्षेत्रांमध्ये कमी खर्च होणे अपेक्षित आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला. महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात खर्चाच्या वापराची कार्यक्षमता व परिणामकारकता यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. यासंदर्भात आक्षेपात नमूद विस्तृत आकडेवारी ही स्वयंस्पष्ट आहे. विभागाने खर्चाच्या वापराची कार्यक्षमता व परिणाकारकता याचा योग्य ताळमेळ ठेवणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही विभागाने करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.७.१ "प्रगतीपथावरील योजना"

परिच्छेद क्रमांक १.७.१.१ "जलसंपदा विभाग"

प्रकल्पांवरील खर्च व त्यांच्या कार्यान्वयनातील विलंब

अभिप्राय

३.३२ जलसंपदा विभागांतर्गत पाच पाटबंधारे विकास महामंडळात ४२८ पाटबंधारे प्रकल्प प्रगतीपथावर होते. ह्या प्रकल्पाचे काम किती वर्षापासून कार्यान्वित होण्याच्या टप्प्यावर होते याचे निर्धारण करण्यासाठी प्रगतीपथावर असलेल्या सर्व प्रकल्पांच्या महामंडळाने सादर केलेल्या माहितीचे लेखापरीक्षेत विश्लेषण केले गेले.

ज्यात १९५ प्रकल्प (४५.६टक्के) १५ वर्षापेक्षा अधिक काळ प्रगतीपथावर होते त्यापैकी ७७ प्रकल्प (१८ टक्के) ३० वर्षापेक्षा अधिक काळ प्रगतीपथावर होते. ४२८ प्रगतीपथावरील प्रकल्पांची अंदाजित किंमत रु.१,७७,८०२.७२ कोटी होती. याप्रमाणे प्रत्यक्ष खर्च रु.७६,७८४.७८ कोटी होता. बराच कालावधी उलटून गेल्या नंतरही या प्रगतीपथावरील प्रकल्पांवर झालेल्या खर्चातून अपेक्षित लाभ प्राप्त झालेला नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

वन, पर्यावरण इ.वैधानिक मान्यता, भूसंपादन व पुनर्वसन या कामास प्रकल्पबाधितांच्या विरोधामुळे, न्यायालयीन प्रकरणामुळे व प्रशासकीय बाबी, पुरेशा निधी उपलब्धता नसणे, कालवा व वितरण व्यवस्थेचे सविस्तर सर्वेक्षण तसेच प्रकल्प घटकांचे सविस्तर संकल्पचित्र तयार करण्यास अधिक कालावधी लागणे, स्थानिक जनता, प्रकल्पबाधित व्यक्ती तसेच लोकप्रतिनिधी यांच्या आग्रही मागणीमुळे व्याप्तीत बदल करावा लागल्याने प्रकल्पांच्या कामास विलंब होतो.

त्याचप्रमाणे दरसूचीतील वाढ, प्रकल्पाच्या आवश्यक जमिनीच्या किंमतीतील वाढ, गौण खनिजांच्या स्वामित्व शुल्कातील वाढ, अनुज्ञेय पुनर्वसन अनुदानातील वाढ, तपशिलवार संकल्पनातील बदलांमुळे काही बाबींच्या परिमाणातील वाढ, प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदल, प्रकल्प पूर्ण करण्याच्या नियोजित कालावधीमध्ये निरनिराळ्या मंजुऱ्या मिळण्यास होणाऱ्या विलंबामुळे झालेली दरसूचीतील वाढ, प्रकल्पासाठी प्राप्त होणाऱ्या अपुऱ्या आर्थिक

तरतूदीमुळे प्रकल्पाच्या कामाची गती कमी होणे, प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे प्रत्यक्ष बांधकाम सुरू करण्यास होणारा विलंब, प्रकल्पग्रस्तांना नवीन गावठाणात द्यावयाच्या वाढीव नागरी सुविधा, प्रकल्पासाठी लागणाऱ्या वन जमिनीसाठी पर्यायी वनीकरणाचे वाढलेले दर, नक्तवर्तमान मूल्य (NPV) व त्याचे वाढलेले दर, आस्थापना, हत्यारे व संयंत्रे वगैरेच्या खर्चातील वाढ, बांधकामासाठी आवश्यक साहित्य निर्धारित खाणीमध्ये आवश्यक त्या परिमाणात उपलब्ध न झाल्याने खाण बदलामुळे होणारी वहन अंतरातील वाढ इत्यादी कारणांमुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ होते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीस केला.

प्रकल्पांच्या कार्यान्वयनातील विलंब टाळण्यासाठी विभागाने निधीचे वाटप करतांना प्राधान्यक्रम ठरविणे ज्यात चालू वर्षात पूर्ण होणारे प्रकल्प, पुढील वर्षात पूर्ण होणारे प्रकल्प, पाणीसाठा निर्माण झाला आहे अशा प्रकल्पांची वितरण व्यवस्था पूर्ण करून सिंचन क्षमता निर्मिती प्रस्तावित असलेले प्रकल्प, घळभरणी प्रस्तावित असलेले प्रकल्प, अन्य प्रकल्प असे प्राधान्य ठरविण्यात आले. तसेच संकल्पचित्रांच्या मान्यतेसाठी व सुप्रमा प्रस्तावांच्या मान्यतेसाठी दुसऱ्या राज्य तांत्रिक सल्लागार समितीची नेमणूक करण्यात आली आहे. दर्जेदार पुनर्वसन सुविधांना मान्यता देण्यात आल्या आहेत. नविन भूसंपादन कायद्यानुसार भूसंपादनाचा वाढीव मोबदला देण्यात येत असल्याचे समितीसमोर स्पष्ट करण्यात आले.

शिफारस

३.३३ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी प्रकल्पावरील खर्च व त्यांच्या कार्यान्वयनातील विलंब यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. पाटबंधारे विकास महामंडळाकडे सद्यःस्थितीत ४२८ प्रकल्प प्रलंबित असल्याचे आक्षेपात नमूद करण्यात आले आहे. हे प्रकल्प कधी पूर्ण होणार यासंदर्भात विभागाने काय नियोजन केले अशी विचारणा समितीने केली असता सद्यःस्थितीत यातील ३१३ प्रकल्प बांधकामाधीन असून त्याची किंमत रु.९२,००० कोटी आहे. केंद्र शासनाच्या PMJSY, बळीराजा, जलसंजीवनी या योजनांच्या माध्यमातून या प्रकल्पांचे नियोजन करण्यात आले असून ज्या प्रकल्पांवर ७५ टक्क्यांपेक्षा अधिक खर्च झाला आहे त्याचे नियोजन प्राधान्याने करण्यात आले असून बळीराजा योजनेंतर्गत ९१ व PMJSY अंतर्गत २४ प्रकल्प कार्यरत असून या प्रकल्प पूर्णत्वाच्यादृष्टीने नियोजन करण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले. तसेच काही प्रकल्पांच्या बाबतीत जागा वा निधी न मिळणे, प्रकरणे न्यायप्रविष्ठ असणे, वन विभागाची मान्यता नसणे अशा अनेक कारणास्तव प्रलंबित असलेल्या प्रकल्पासंदर्भात हे विषय मार्गी लावण्याचे काम सुरू केले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. उपरोक्तपणे प्रलंबित असलेले सर्व प्रकल्प कालबद्ध पद्धतीने पूर्ण करून त्या माध्यमातून सिंचनाचा शाश्वत लाभ जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्यात यावा, जेणेकरून प्रकल्प खर्चातदेखील होणारी वाढ टाळता येईल व प्रकल्पांचे प्राधान्यक्रम ठरवून ही कामे पूर्ण करण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.७.२ "गुंतवणूक व परतावा"

अभिप्राय

३.३४ शासनाने ३१ मार्च, २०१७ पर्यंत, शासनाने वैधानिक महामंडळे, ग्रामीण बँका, संयुक्त स्कंध कंपन्या व सहकारी संस्थांमध्ये रु. १,२९,९८३ कोटी गुंतविले होते. या गुंतवणूकीवर २०१२-१७ दरम्यान सरासरी परतावा ०.०४ टक्के होता, तर शासनाने त्याच्या कर्जावर या काळात सरासरी ७.६ टक्के दराने व्याज दिले होते.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (रु. ३.७८५ कोटी) , गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (रु. १,६२९ कोटी) , महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ (रु. १,२८५ कोटी) , तापी पाटबंधारे विकास महामंडळ (रु. ८१३ कोटी) , कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (रु. ५४१ कोटी) , महाराष्ट्र पाटबंधारे वित्त कंपनी मर्यादीत (रु. ५४१ कोटी) , महाराष्ट्र राज्य रस्ते परिवहन महामंडळ (रु. ४८७ कोटी) , महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती महामंडळ (रु. ३९३ कोटी) आणि महाराष्ट्र जलसंधारण विकास महामंडळ (रु. १२० कोटी) यांना दिलेल्या भांडवली अंशदानामुळे २०१६-१७ दरम्यान गुंतवणुकीत रु. ९,६७३ कोटी वाढ झाली.

दि. ३१ मार्च, २०१७ रोजी, शासनाने रु. ४,७८५.२७ कोटी गुंतविलेल्या २६ कंपन्या तोट्यात होत्या व त्यांचा ऑगस्ट २०१७ पर्यंत निव्वळ संचयी तोटा हा रु.४६,६१५.९१ कोटी होता.

सात/कंपन्या/महामंडळे ज्यांचे पेडअप भांडवल रु.१,१८७.९३ कोटी होते, त्यांच्या संचयी तोट्यामुळे निव्वळ मुल्यात रु.१,८५४.१६ कोटीची हानी झाली होती.

त्याचप्रमाणे एकूण रु. ३९०.८८ कोटीची शासकीय गुंतवणूक असलेल्या ७,४६५ संस्थांपैकी ३,४९८ संस्थांमधील संचयी तोटा रु. २२४.२६ कोटी होता. जो संस्थांमध्ये केलेल्या प्राथमिक गुंतवणूकीच्या १२२ टक्के होता. तसेच १,२११ संस्था, ज्यामध्ये शासनाने मार्च २०१७ पर्यंत रु. ८७.३३ कोटी इतकी गुंतवणूक केली होती, त्या दिवाळखोरीत निघाल्या असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळास शासनाने रु. १२.७७ कोटी इतके भागभांडवल वितरीत केलेले असून शासन कर्ज रु.०.२० कोटी इतके वितरीत केलेले आहे. सदर महामंडळाचा निव्वळ तोटा रु. ०.७२ कोटी असून संचयी तोटा रु. ११.९३ कोटी इतका आहे. महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळास शासनाने सन २०१५-१६ पर्यंत रु. २३६.१६ कोटी इतके भाग भांडवल वितरीत केलेले असून शासन कर्ज रु. १७३.९१ कोटी इतके वितरीत केलेले आहे. सदर महामंडळाच्या निव्वळ तोटा रु. ४१.१४ कोटी असून संचित तोटा रु. १०४५.१७ कोटी इतका आहे.

दि प्रताप स्पिनींग, विव्हींग अँड मॅन्युफॅक्चरींग कंपनी लि. मध्ये शासनाची थेट गुंतवणूक नसून महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळाने सदरहू कंपनीमध्ये भागभांडवलामध्ये गुंतवणूक केलेली आहे. सदर कंपनीचा संचित तोटा रु.६३.८९ कोटी इतका आहे.

महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर मध्ये शासनाने सन २०१५-१६ पर्यंत रु. ८८.७१ कोटी इतके भागभांडवल वितरीत केलेले असून शासन कर्ज रु.२२.६३ कोटी इतके वितरीत केलेले आहे. सदर महामंडळाचा निव्वळ तोटा रु. ४.०७ कोटी इतका असून संचयी तोटा रु.१२८.७१ कोटी इतका असल्याचे समितीसमोर स्पष्ट करण्यात आले.

शिफारशी

३.३५ (१) सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी गुंतवणूक व परतावा यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात दिलेल्या आकडेवारीनुसार विभागाने केलेल्या गुंतवणूकीच्या तुलनेत सरासरी परताव्याची टक्केवारी अत्यंत कमी असल्याचे दिसून येते. शासनाने कर्ज उभारुन अशा रकमेचे वितरण या महामंडळास करणे व दुसरीकडे मात्र ही महामंडळे तोट्यात असल्यामुळे आवश्यक तो परतावा शासनास देण्यात येत नाही. यात वसुलीचे प्रमाण अतिशय नगण्य असल्यामुळे यातील तफावत अधिकच वाढत जाते. समितीने विभागनिहाय वसुलीच्या माहितीचा आढावा घेतला असता पश्चिम महाराष्ट्र व कोकणात सिंचन नसलेल्यांची वसुली मोठ्या प्रमाणात आहे. पश्चिम महाराष्ट्रात सिंचनाची वसुली देखील चांगली आहे. मात्र विदर्भ व मराठवाड्यात ही वसुली अत्यंत कमी असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. सदरहू परिच्छेदान्वये जवळजवळ रु. १,२९,९८३ कोटी इतकी गुंतवणूक दर्शविण्यात आलेली आहे. याच्या परताव्याची परिस्थिती तुलनात्मकदृष्ट्या नगण्य आहे आणि समाधानकारक नाही. अनेक महामंडळाकडे शासनाने दिलेला निधी हा गुंतवणूक स्वरूपात दर्शविण्यात येतो. जर ही गुंतवूणक आहे तर त्याचा परतावा देखील अभिप्रेत असतो. हे अनुदान नसून भांडवली सहभाग दर्शविल्यामुळे परताव्याचा विषय निश्चितच उपस्थित होतो. विभागाला या निधीचा परतावा अभिप्रेत असेल तर तो त्यांनी वसुल केला पाहिजे. जर अनुदान म्हणून हा निधी सोडायचा असेल तर शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक ठरेल. राज्यात अनेक महामंडळे अडचणीत असून त्यातील कित्येक महामंडळे बंद देखील झालेली आहेत. अशा परिस्थितीत शासनाची ही गुंतवूणक तेथे अडकून पडते वा त्याचा निश्चित लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहचत नाही. अतः या प्रकरणी निधीबाबत विभागाने धोरणात्मक निर्णय घेऊन आवश्यक ती पुढील कार्यवाही करावी. तसेच शासनाने गुंतवणूकीवर यथायोग्य परतावा प्राप्त होईल याची सुनिश्चिती करण्यासाठी उपाययोजना करावी अन्यथा कमी वित्तीय परतावा असलेल्या प्रकल्पांमध्ये अधिक व्याज दरावर प्राप्त केलेल्या खर्चिक कर्जाऊ निधीची गुंतवणूक सातत्याने केली जाईल व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) पाणीपट्टीची वसुली देखील मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्यामुळे परताव्याचे प्रमाण कमी दिसून येते. पाणीपट्टीचा दर निश्चित करताना देखील राज्यातील सर्वच विभागातील भौगोलिक व वातावरणीय बदल विचारात घेऊन ही निश्चिती करणे आवश्यक आहे. मराठवाड्यातील भागात कायम दुष्काळी परिस्थिती असते. राज्यातील काही भागांचा निश्चितच सहानुभूतीपूर्वक विचार करणे आवश्यक ठरते. आता सन २०१९ मध्ये MWRRA च्या माध्यमातून पुन्हा दर निश्चिती करण्याबाबत विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. अशा परिस्थितीत ही दर निश्चिती करताना ती सरसकट न करता दुष्काळी भाग, हवामान, पाऊस, त्या विभागात घेण्यात येणारे पिक व त्यासाठी लागणारे पाण्याचे प्रमाण या सर्व बाबींचा विचार करूनच ही दर निश्चिती करावी व सदरहू परिच्छेदात नमूद वसुली व परतावा कालबद्ध पद्धतीने वसुल करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.७.२.१ “विभागीय वाणिज्यिक उपक्रम”

अभिप्राय

३.३६ काही विशिष्ट शासकीय विभागांचे विभागीय उपक्रम हे वाणिज्यिकवत स्वरुपाची कार्ये देखिल पार पाडतात. राज्य शासनाचे ४९ विभागीय वाणिज्यिक उपक्रम आहेत. प्रपत्र लेखे पूर्ण झालेल्या वर्षापर्यंत शासनाने केलेली गुंतवणूक, निव्वळ नफा / तोटा तसेच या उपक्रमात गुंतविलेल्या भांडवलावरील परतावा यांची विभाग-निहाय स्थिती पाहता लेखे पूर्ण झालेल्या आर्थिक वर्षाच्या दरम्यान तीन उपक्रमात राज्य शासनाने रू. २,५१३.२६ कोटीची रक्कम गुंतविली होती, ४९ घटक असलेल्या ३ विभागापैकी ज्या तीन घटकांनी त्यांचे लेखे पूर्ण केले होते. फक्त ते रु. १,१२८.७७ कोटी भांडवल गुंतवणूकीवर रू. २५३.२६ कोटी निव्वळ नफा मिळवू शकले, तोट्यातील एकूण विभागीय वाणिज्यिक उपक्रमापैकी ३२ विभागीय वाणिज्यिक उपक्रम गेल्या ५ वर्षापासून सातत्याने तोट्यात आहेत.

शासकीय दुध योजना, मुंबई व ठाणे शिधावाटप क्षेत्र आणि मुफसल क्षेत्रातील प्रापण, वितरण आणि मुल्य नियंत्रण योजना हे विभागीय वाणिज्यिक उपक्रम अनुसरत असलेल्या लेखांकन प्रणालीनुसार निव्वळ तोटा / नफा हा ताळेबंधातील भांडवली खात्यातून / खात्यात थेट वजा/अधिक करण्यात येतो.त्यामुळे विभागीय वाणिज्यिक उपक्रमाच्या प्रपत्र लेख्यांतून संचयी तोट्याची आकडेवारी काढणे शक्य नसते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राज्य शासनाच्या बहुतांशी दुग्धशाळा या तोट्यात आहेत कारण गेल्या काही वर्षापासून राज्यात सहकारी तत्त्वावरील दुग्धशाळा, खाजगी दुग्धशाळा यांचा उगम झाल्याने या क्षेत्रात पर्याय तसेच स्पर्धा निर्माण झालेली आहे, त्यामुळे महाराष्ट्र शासनाच्या योजनांकडे येणारा दुधाचा ओघ दिवसेंदिवस कमी होत चालला आहे, तथापि शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता येणारे दुध अल्प प्रमाणात असले तरी स्वीकारावे लागते, सदर स्वीकारलेल्या दुधावर वाहतुक खर्च, शितकरण खर्च, वितरण खर्च व प्रक्रिया खर्च हा तुलनेने जास्त असतो कारण यंत्रणा कार्यरत करताना शितयंत्र, बाष्पक व इतर यंत्रे ही त्यांच्या क्षमतेनुसार कार्यरत होतात.व त्यासाठी विज, इंधन हे त्यांच्या क्षमतेनुसार वापरतात, पुर्वीपेक्षा दुधाची आवक कमी झाली असली तरीसुद्धा असलेल्या यंत्रणेची देखभाल यावरील खर्च कमी झालेला नाही. बहुतांशी दुग्धशाळांमध्ये आवश्यकतेपेक्षा जास्त कर्मचारी आहेत. त्यापैकी बरेचसे कर्मचारी अतिरिक्त ठरलेले आहेत. सदर कर्मचाऱ्यांचे इतरत्र समायोजन होईपर्यंत त्यांचे वेतन व भत्ते यांचा भार संबधित दुग्धशाळांना सोसावा लागतो, सबब खर्चात वाढ होऊन तोटा होतो असे समितीसमोर स्पष्ट करण्यात आले.

शिफारस

३.३७ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी विभागीय वाणिज्यिक उपक्रमासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून एकूण विभागीय वाणिज्यिक उपक्रमांपैकी ३२ विभागीय वाणिज्यिक उपक्रम मागील ५ वर्षापासून सातत्याने तोट्यात आहेत. अशा परिस्थितीत ही महामंडळे सुरू ठेवायची की बंद करायची याचा निर्णय शासनाने घेणे गरजेचे आहे. या सर्व सार्वजनिक उपक्रमांचा आढावा घेण्यासाठी अपर मुख्य सचिव, वित्त यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. जिच्या बैठका वर्षातून २ वेळा घेऊन प्रत्येक महामंडळाचा आढावा घेऊन सूचना केल्या जातात. त्यामध्ये ४ ते ५ संस्थांबाबत विशेष सूचना देण्यात आलेल्या असून त्याबाबतची कार्यवाही सुरू असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. परंतु या महामंडळातील कर्मचाऱ्यांचे पगार मात्र शासन देतच राहते. यासंदर्भात अपर मुख्य सचिव (सेवा) यांच्या अध्यक्षतेखाली त्याचप्रमाणे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली अशा दोन समित्या कार्यरत असून पदे ज्या प्रमाणात रिक्त होतात त्याप्रमाणे त्याचा आर्थिक आढावा व आवश्यकता लक्षात घेऊन भरतीसाठी मंजूरी दिली जाते.

यातील शासकीय दुध योजनेसंदर्भात जेवढ्या डेअरी आहेत त्यावर एकत्रित निर्णय घेण्यासंदर्भात मंत्रिमंडळामध्ये भूमिका मांडण्यात आली होती व त्यानंतर पीपीपी चा निर्णय घेण्यात आला. वास्तविक हा निर्णय पुनर्विलोकनाचा घ्याववयास हवा होता. पीपीपी साठी असेट व्हॅल्युएशन कमी असल्यामुळे यासाठी कोणीही पुढे येत नाही. म्हणून आता आयटी विभागाकडून एजन्सी निवडण्याची प्रक्रिया विभागाने सुरू केली आहे. या दुध डेअरींच्याबाबत शासनाने योग्य तो निर्णय लवकरात लवकर घेतला पाहिजे असे समितीचे स्पष्ट मत आहे. अनेक राज्यांनी दुध व्यवसायातून माघार घेतलेली आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये या योजना सुरू आहेत व शासन यासाठी अनुदान देखील देते. अशा परिस्थितीत दुध व्यवसायास चालना मिळण्यासाठी विभागाने त्यासाठी आवश्यक तो निर्णय तातडीने केला पाहिजे. राज्यात दुधाचे अनेक ब्रॅण्ड सुरू झाले असून त्यावर शासनाचे कोणतेही नियंत्रण नसल्यामुळे दुध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाचे योग्य ते भाव मिळत नाहीत. अशा प्रकरणांमध्ये सकारात्मक दृष्टीकोन ठेवून निर्णय घेणे आवश्यक आहे. अतः बहुतांश उपक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या तोटयाचा विचार करता, शासनाने त्यांच्या कामकाजाचे पुनर्विलोकन करावे, जेणे करून त्यांना स्वयंपूर्ण करता येईल. तसेच दुग्धशाळांचा तोटा कमी करण्याबाबत पुनर्विलोकन करून त्यांना स्वयंपूर्ण करण्याबाबत उपाययोजना करण्यात यावी. तसेच उर्वरित महामंडळाबाबत तोट्याची कारणमिमांसा अभ्यासपूर्ण व विस्तृतरित्या तपासून योग्य तो निर्णय घ्यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.१.७.३ "राज्य शासनाने दिलेली कर्जे व अग्रिमे"

अभिप्राय

३.३८ सहकारी संस्था, महामंडळे आणि कंपन्यातील गुंतवणुकी बरोबरच, शासन अनेक संस्था/संघटनांना कर्जे व अग्रिमे देखील देते. मागील तीन वर्षातील व्याज प्रदानांच्या तुलनेत ३१ मार्च, २०१७ अखेरीस प्रलंबित कर्जे व अग्रिमे, व्याज जमांची स्थिती पाहता दि.३१ मार्च, २०१७ रोजी एकूण प्रलंबित कर्जे व अग्रिमे यांच्या तुलनेत यावर्षी संवितरित केलेली कर्जे वाढलेली दिसून येतात. यावर्षात दिलेल्या कर्ज व अग्रिमांच्या एकूण रकमेपैकी रु. ५,३७० कोटी आर्थिक सेवांसाठी व रु. १९० कोटी सामाजिक सेवांसाठी देण्यात आले. आर्थिक सेवांतर्गत दिलेल्या कर्जाचा मोठा हिस्सा वीज (८२ टक्के) या शीर्षाखाली गेला. तथापि, या कर्जावरील प्राप्त झालेले व्याज २०१५-१६ मधील ३.५ टक्क्यांवरुन २०१६-१७ मध्ये १.५ इतके कमी झाले. ही घट मुख्यत्वे लघु पाटबंधाऱ्यांसाठी कर्जे यावर २०१६-१७ मध्ये व्याजाच्या कमी प्राप्तीमुळे झाली होती जी वनीकरण आणि वन्यजीवन यासाठी दिलेल्या कर्जांवरील व्याजात झालेल्या वाढीमुळे कमी झाली होती. कर्जाचे तपशिलवार लेखे राज्य शासनाच्या विभागांकडून ठेवले जातात. ज्यांनी, प्रलंबित कर्जांच्या आकडेवारीची महालेखाकारांकडून खात्री करून घेणे गरजेचे असते आणि थकीत वसुलीबाबतची पूर्ण माहिती सादर करायची असते. ते केले नव्हते. परिणामतः भारतीय शासकीय लेखांकन मानके (आयजीएएस) -३ नुसार २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांत दिलेली माहिती त्या प्रमाणात अपूर्ण होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.३९ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी राज्य शासनाने दिलेली कर्जे व अग्रिमे यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून एकूण वितरण केलेल्या कर्जाच्या तुलनेत त्याच्या वसुलीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. शासनाने दिलेल्या विविध महामंडळे/सार्वजनिक उपक्रम/ सहकारी संस्था इत्यादींना दिलेली कर्जे/अग्रिमाची वसुली करण्याची जबाबदारी संबंधित प्रशासनिक विभागाची आहे. सन २०१५-१६ या

वित्तीय वर्षापासून बिम्स् (BEAMS) या संगणक आज्ञावलीत कर्जाच्या संकलनाबाबत स्वतंत्र आज्ञावली विकसित करण्यात आली असून सदर वित्तीय वर्षापासून कर्जाची माहिती संकलित करण्यात येत आहे. प्रशासकीय विभागांकडे कर्जाचे लेखे अद्ययावत नसल्यामुळे व महालेखापाल कार्यालयाशी कर्ज लेख्यांचा ताळमेळ न घेतल्यामुळे कर्ज परतफेडीची व थकबाकी आणि कायम स्वरुपी कर्ज याविषयी संपूर्ण माहिती प्राप्त करण्याचे काम सुरू आहे. यासंदर्भातील आवश्यक ती कार्यवाही कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात यावी व शासनाने दिलेल्या कर्जे व अग्रिमे यांच्या वसुलीसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही प्राधान्याने करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.१.७.४ "रोख शिल्लक आणि रोख शिलकीची गुंतवणूक"

परिच्छेद क्र.१.७.४.१ "धनादेश आणि देयके या शीर्षाखालील प्रलंबित शिल्लका"

अभिप्राय

३.४० राज्य शासनाची या वर्षाच्या अखेरीस असलेली रोख शिल्लक रु.६८,७५० कोटी ही मागील वर्षापेक्षा २४ टक्क्याने (रु. १३,१९७ कोटी) जास्त होती. वरील रोख शिलकीतून रु. ४४,११० कोटी भारत सरकारच्या कोषागार देयकांत गुंतविले होते, त्यावर रु. २,२१४ कोटी इतके व्याज प्राप्त झाले. तसेच, राखून ठेवलेल्या निधीत रु. २७,८७८ कोटी गुंतविले होते. ज्यावर रु.१,७४० कोटी व्याज प्राप्त झाले. चालू वर्षात अर्थोपाय अग्रिमे घेतली नव्हती. राज्य शासनाची, मार्च २०१७ अखेरची रोख शिल्लक (रु. ६८,७५० कोटी) त्यांच्या या वर्षातल्या एकूण खर्चाच्या (रु. २,४५,०५५ कोटी) जवळजवळ २८ टक्के होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

त्याचप्रमाणे "धनादेश व देयके" हे शीर्ष व्यवहारांची प्रारंभिक नोंद घेण्याचे मध्यस्त लेखाशीर्ष आहे, ज्यांचा यथावकाश निपटारा करावा लागतो जेव्हा धनादेश जारी केला जातो, त्यावेळी कार्यात्मक शीर्षाखाली खर्च दाखवून मुख्यशीर्ष ८६७० धनादेश आणि देयके याखाली जमा दाखवितात. बँकेकडून धनादेश वटविल्यानंतर मुख्य शीर्ष ८६७० धनादेश आणि देयके या शीर्षाला ऋण जमा दाखवून मुख्यशीर्ष ८६७५ - भारतीय रिझर्व्ह बँकेत असलेल्या ठेवी या शीर्षाखाली जमा दाखवून शासनाची तेवढीच रोख शिल्लक कमी केली जाते. अशा तऱ्हेने मुख्य शीर्ष ८६७० - धनादेश आणि देयके याखालील प्रलंबित रक्कमा न वटविलेल्या धनादेशांच्या रकमा दर्शविते. दि. ३१ मार्च २०१७ रोजी रु. १५,४५६.८७ कोटी इतकी प्रलंबित शिल्लक (संचयी) होती. २०१६-१७ मध्ये व्यपगत धनादेशांची रक्कम रु. २५.३९ कोटी इतकी होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.४१ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी रोख शिल्लक व रोख शिल्लकीची गुंतवणूक तसेच "धनादेश आणि देयके" या शीर्षाखालील प्रलंबित शिल्लक यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. यासंदर्भात समितीसमोर स्पष्ट करण्यात आले की, राज्य शासनाच्या मार्च २०१७ वर्षाच्या अखेरीस असलेल्या रोख शिल्लक रु. ६८,७५० कोटी पैकी भारत सरकारची कोषागार देयकातील शिल्लक रु. ४४,१०९.३८कोटी दर्शविली आहे. मात्र राज्य शासनाच्या अभिलेख्यांवरून भारत सरकारची कोषागार देयकातील मार्च, २०१७ अखेरची शिल्लक रु. ४४,१६०.०७ कोटी इतकी आहे व त्यावर रु. २,२१४ कोटी इतके व्याज प्राप्त झाले आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेकडून प्राप्त जानेवारी ते मार्च,२०१७ च्या त्रैमासिक अहवालानुसार राज्याच्या एकत्रित ऋण निवारण निधीमध्ये मार्च, २०१७ अखेर एकूण रु. २२,५३१,८५ कोटी इतका निधी जमा आहे. तसेच माहे मार्च मध्ये पुरवणी मागण्या व आठमाही अंदाजपत्रकानुसार पुनर्विनियोजन करण्यात आलेले अनुदान आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडे प्राप्त होत असतात. आहरण व संवितरण अधिकारी प्राप्त झालेल्या अनुदानाच्या अनुषंगाने अनुदान खर्ची घालण्यासाठी कोषागार/उपकोषागार व अधिदान व लेखा कार्यालयाकडे देयके सादर करतात. तथापि, दिनांक ३१ मार्च हा वित्तीय वर्षाचा शेवटचा दिवस असल्याने त्या दिवशी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून मोठयासंख्येने देयके सादर केल्यामुळे कोषागारांकडून मोठया प्रमाणावर प्रदाने होत असतात.

कोषागार व अधिदान व लेखा कार्यालय यांचेकडून आहरण व संवितरण अधिकारी व त्रयस्थ अदाता यांना प्रदानाच्या अनुषंगाने धनादेश/सीएमपी/ईएफटी/एनईएफटी या प्रदानाच्या माध्यमाद्वारे वितरण करीत असतात. या सर्व प्रकारच्या प्रदानांचे जमा लेखांकन हे मुख्य लेखाशीर्ष ८६७० खाली होत असते. बऱ्याच वेळा अदात्यामार्फत त्यांना दिलेले धनादेश ते विहित मुदतीत बँकेमार्फत वटविले न गेल्याने अशा व्यपगत झालेल्या धनादेशांची रक्कम ही मुख्य लेखाशीर्ष ८६७० मध्येच असल्याने मासिक लेख्यांसोबत त्याचा अहवाल महालेखापालांना कळविण्यात येत असतो, त्यामुळे सन २०१६-१७ मध्ये व्यपगत धनादेशांची रक्कम रु. २५.३९ कोटी इतकी होती असे समितीसमोर स्पष्ट करण्यात आले. विभागाने या सर्व आक्षेपांचा फेरआढावा घ्यावा व याची गांभीर्याने दखल घेऊन रोख शिल्लक व रोख शिलकीची गुंतवणूक व धनादेश आणि देयके या शीर्षाखालील प्रलंबित शिल्लका यांचे योग्य नियोजन करून खर्चाचा नियमित ताळमेळ करण्यात यावा व असे आक्षेप भविष्यात टाळावेत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.८ "मत्ता व दायित्वे"

परिच्छेद क्रमांक १.८.१ "मत्ता व दायित्वांची वाढ व रचना"

परिच्छेद क्रमांक १.८.२ "राजकोषीय दायित्वे"

अभिप्राय

३.४२ विद्यमान रोकड आधारित शासकीय लेखे प्रणालीमध्ये शासनाच्या मालकीच्या जमिनी व इमारती यासारख्या स्थावर मत्तांचे सर्वसमावेशक लेखांकन केले जात नाही. तथापि, शासनाची वित्तीय दायित्वे व केलेल्या खर्चातून निर्माण झालेल्या मत्ता शासकीय लेख्यांत धरल्या जातात. अशा दायित्वे व मत्तांच्या ३१ मार्च २०१६ रोजीच्या तत्सम स्थितीशी तुलनात्मक ३१ मार्च २०१७ च्या स्थितीचा गोषवारा पाहता दायित्वामध्ये अंतर्गत कर्जे, केंद्र शासनाकडून प्राप्त कर्जे व अग्रिमे, लोक लेखे व राखीव निधीतील जमा यांचा समावेश होतो, तसा मत्तांमध्ये प्रामुख्याने भांडवली खर्च, राज्य शासनाने दिलेली कर्जे व अग्रिमे आणि रोख शिल्लकींचा समावेश होतो.

राज्याची एकूण राजकोषीय दायित्वे सन २०१२-१७ ज्या कालावधीत १० टक्के या सरासरी वार्षिक दराने वाढली. वर्ष २०१२-१३ मधील ९.७ मधील टक्के वाढीचा दर सातत्याने कमी होऊन सन २०१४-१५ मध्ये ८.८ टक्क्यांवर आला आणि सन २०१५-१६ मध्ये ९.९ टक्क्यांपर्यंत वाढला आणि सन २०१६-१७ मध्ये तो वाढून १२.७ टक्के झाला. सन २०१६-१७ मध्ये ऋणांचे राज्यातील सकल घरेलू उत्पादनाशी गुणोत्तर १७.५ टक्के होते. जे मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणाच्या निवेदनामध्ये (१६.२ टक्के) केलेल्या प्रक्षेपणापेक्षा जास्त होते. पण चौदाव्या वित्त आयोगापेक्षा (२२.६ टक्के) कमी होती. सन २०१६-१७ दरम्यान सकल घरेलू उत्पादनाच्या बाबतीत दायित्वांची प्लावकता ०.९५० होती, जे सकल घरेलू उत्पादन व राजकोषीय दायित्वांची वाढ समान दराने झाल्याचे दर्शविते. सन २०१२-१३ अखेरीस राजकोषीय दायित्व सन २०१२-१३ वर्षाच्या महसुली जमेच्या १८८.२ टक्के होते. जे सन २०१६-१७ मध्ये १९३.४ टक्के पर्यंत वाढले. ही दायित्वे सन २०१६-१७ च्या अखेरीस महसुली जमेच्या जवळपास दुप्पट होती व राज्याच्या स्वतःच्या स्त्रोतांच्या दुप्पटीपेक्षी जास्त होती. एकूण राजकोषीय दायित्वात अंतर्गत ऋणांचा हिस्सा सर्वात जास्त (७४ टक्के) होता. त्या. पाठोपाठ लोक लेखा दायित्व (२४ टक्के) आणि केंद्र शासनाकडून कर्जे (२ टक्के) होता. सन २०१५-१६ मध्ये राजकोषीय दायित्वे रु. ३,५१,३४१ कोटी होती ज्यामध्ये रु. ४४,५१७ कोटींची वाढ होऊन ती २०१६-१७ मध्ये रु. ३,९५,८५८ कोटी झाली. ही वाढ मुख्यत्वे लोक ऋण (रु. ३६,४५० कोटी), ठेवी (रु. ६८४० कोटी) आणि अल्पबचत व भविष्य निर्वाह निधी (रु. ११२३ कोटी) यातील वाढीमुळे झाली होती. खुल्या बाजारातील कर्जाच्या परतफेडीच्या तरतुदीसाठी राज्य शासनाने वित्तीय वर्ष १९९९-२००० ला एक एकत्रिकृत कर्ज निवारण निधी प्रस्थापित केला. दि. ३१ मार्च २०१७ च्या अखेरीस कर्ज निवारण निधीतील अंतिम शिल्लक २०१६-१७ करीता असलेल्या रु. ५८१२ कोटीसहीत रु. २७,८५३.४१ कोटी होती व या संपूर्ण रक्कमेची गुंतवणूक करण्यात आली होती.

महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ अन्वये राज्याची एकूण दायित्वे म्हणजे राज्याच्या एकत्रिकृत निधी व लोक लेख्यांतर्गत असणारी दायित्वे होत.

शिफारस

३.४३ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी मत्ता व दायित्वांची वाढ व रचना तसेच राजकोषीय दायित्वे याबाबत आक्षेप नोंदविलेले आहेत. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता राज्य शासनाचे १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीमधील परिच्छेद १४.६४ प्रमाणे राजकोषीय धोरण आहे. १४ व्या वित्त आयोगाच्या राजकोषीय मापदंडानुसार धोरण अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. राज्याच्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणाच्या निवेदनात व्याज प्रदाने/महसुली जमा गुणोत्तर सन २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाजानुसार १२.७८ टक्के अपेक्षित होते व सन २०१६-१७ च्या सुधारित अंदाजानुसार १३.१० टक्के होते. सन २०१६-१७ करीता प्रत्यक्ष व्याज प्रदाने/महसुली जमा गुणोत्तर १३.९४ टक्के झाले आहे. वित्त मंत्रालय, भारत सरकार द्वारे ज्या राज्याची व्याजाच्या प्रदानाची महसुली जमेशी टक्केवारी २० टक्केपेक्षा जास्त आहे ते राज्य कर्जबाधित राज्य होय हा मापदंड निश्चित करण्यात आला आहे. सन २०१६-१७ मध्ये राज्याचे व्याज प्रदान/महसुली जमा गुणोत्तर १३.९४ टक्के असून तो विहित मापदंडच्या मर्यादेत आहे. राजकोषीय दायित्व हे उपरोक्त विहित मापदंडाच्या मर्यादेत आहेत असे समितीस सांगण्यात आले. महालेखाकारांनी उपस्थित केलेले मुद्दे हे वस्तुस्थितीदर्शक आहेत. विद्यमान रोकड आधारीत शासकीय लेखे प्रणालीमध्ये शासनाच्या मालकीच्या जमिनी व इमारती यासारख्या स्थावर मत्तांचे सर्वसमावेशक लेखांकन करण्यात यावे व त्यानुसार शासनाची वित्तीय दायित्वे व केलेल्या खर्चातून निर्माण झालेल्या मत्ता शासकीय लेख्यात धरण्यात याव्यात. त्याचप्रमाणे महालेखाकारांनी राजकोषीय दायित्वांमध्ये नोंदविलेली आकडेवारी अत्यंत वस्तुस्थितीदर्शक असून त्याचा गांभीर्याने विचार करून राजकोषीय दायित्वांचे नियोजन विभागाने करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.८.२.१ "महाराष्ट्रात उदय योजनेची अंमलबजावणी"

अभिप्राय व शिफारस

३.४४ केंद्र शासनाने राज्याच्या मालकीच्या वीज वितरणाच्या कंपन्यांच्या कार्यचालन व आर्थिक बदलावासाठी उज्ज्वल डिसकॉम हमी योजना (उदयत्र मंजूर केली. (नोव्हेंबर,२०१५) या योजनेनुसार राज्य शासन डिसकॉमचे ३० डिसेंबर, २०१५ रोजीचे ७५ टक्के कर्ज

दोन वर्षांत घेणार होते म्हणजेच सन २०१५-१६ मध्ये ५० टक्के व सन २०१६-१७ मध्ये उर्वरित २५ टक्के कर्ज घेणार होते. दि.३० सप्टेंबर,२०१५ ला महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादितचे एकूण रु.२२,०९७ कोटी कर्ज प्रलंबित होते. ज्यापैकी मध्यम आणि लघु मुदतीचे कर्ज (अधिकर्ष कर्जाव्यतिरिक्त) रु.६६१३ कोटी होती. सन २०१५-१६ दरम्यान राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितचे कोणतेही कर्ज ताब्यात घेतले नव्हते. सन २०१६-१७ दरम्यान राज्य शासनाने रु.४९५९.७५ कोटीचे (मध्यम व लघु मुदतीच्या कर्जाच्या ७५ टक्के) विशेष रोखे उभारले आणि ही रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला कर्जे म्हणून दिली. उर्वरित रु.१६५३.२५ कोटी रक्कमेसाठी (मध्यम व लघु मुदतीच्या कर्जाच्या २५ टक्के) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितला राज्य शासनाच्या हमीने कर्ज उभारण्यास प्राधिकृत करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित यांना मध्यम व लघु मुदतीच्या कर्जाच्या ७५ टक्के रक्कम म्हणून सन २०१६-१७ मध्ये राज्य शासनाने रु.४९५९.७५ कोटीचे कर्जरोखे उभारले असून महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित यांना कर्ज (त्यावेळचे प्रलंबित कर्ज) म्हणून दिले आहे. उर्वरित २५ टक्के रक्कम रु. १६५३.२५ कोटीबाबत महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादीत यांच्या मध्यम व लघु मुदतीच्या कर्जाची परतफेड झाली असल्याने शासनाने हमी देण्याचा प्रयत्न उद्‌भवत नाही असे समितीस सांगण्यात आले. सदरहू वस्तुस्थिती पाहता विभागाने विज वितरण कंपन्यांच्या कार्यचालन व आर्थिक बदलावासाठी मंजूर केलेल्या उदय योजनेअंतर्गत वसूल करावयाचे कर्ज कालबद्ध पद्धतीने वसूल करण्याबाबत नियोजन करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.८.२.२ "८४४३ - नागरी ठेवी अंतर्गत शिल्लकींचा वाढता कल"

अभिप्राय व शिफारस

३.४५ २०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान वित्तीय वर्षाच्या अखेरीस मुख्य शीर्ष ८४४३ - नागरी ठेवी अंतर्गत असलेली अंतिम शिल्लक पाहता २०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान मुख्यशीर्ष ८४४३ - नागरी ठेवी अंतर्गत असलेल्या शिल्लकीपैकी जवळजवळ ६० टक्के भाग १०६ स्वीय ठेवीमधील शिल्लकींचा होता. तसेच जेथे राज्याच्या एकत्रिकृत निधीतून स्वीय ठेवी लेख्यांमध्ये निधी हस्तांतरित करण्यात येतो, तेथे वित्तीय वर्षाच्या अखेरीस असलेल्या शिल्लक रकमा एकत्रिकृत निधीमध्ये परत हस्तांतरित करणे आवश्यक असते. परंतु वित्तीय वर्षाच्या शेवटी जी रक्कम एकत्रिकृत निधीमध्ये हस्तांतरित करणे आवश्यक होती अशी रक्कम प्रत्यक्षात परिगणित करणे शक्य नव्हते. परिणामी ८४४३-नागरी ठेवी अंतर्गत असलेली प्रत्यक्ष दायित्वे देखील परिगणित करणे शक्य नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

या लेख्यांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग व जलसंपदा विभाग यांच्याकडील निधी अधिक प्रमाणात आहे. या दोन्ही विभागांमार्फत पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत असतात व त्यांना त्या त्या अर्थसंकल्पीय वर्षामध्ये खर्चाचे नियोजन करणे शक्य नसल्याने स्वीय प्रपंजी लेख्यामधील रक्कम वाढत जाणे स्वाभाविक आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला. तरीही महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप वस्तुस्थितीदर्शक असून त्याची योग्य ती दखल विभागाने घ्यावी व त्याअनुषंगाने निधीचे नियोजन करावे अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.८.२.३ "लेख्यामधील अखेरची शिल्लक व दुय्यम नोंदी मधील ताळमेळ न घेतलेल्या तफावती"

अभिप्राय

३.४६ २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांनुसार नागरी ठेवी व इतर नागरी ठेवी अंतर्गत ताळमेळ न घेतलेली शिल्लक रु. ५,९८६.०४ कोटी होती जी २००८-०९ ते २०१६-१७ या कालावधीशी संबंधित होती. यापैकी अनुदानित माध्यमिक आणि विशेष शाळांचा भविष्यनिर्वाह निधी लेख्यांमधील २०११-१२ ते २०१६-१७ या कालावधीशी संबंधित रक्कम (रु. ३,२८६.६९ कोटी) हा प्रमुख भाग होता ज्याचा मार्च २०१७ पर्यंत ताळमेळ घेतला गेला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.४७ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी लेख्यामधील अखेरची शिल्लक व दुय्यम नोंदी मधील ताळमेळ न घेतलेल्या तफावती यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. शालेय शिक्षण विभागातील शिक्षक आणि उच्च व तंत्रशिक्षण विभागातील शिक्षकांच्या भविष्यनिर्वाह निधीबाबतचा हा विषय असून उच्च व तंत्रशिक्षण विभागातील शिक्षकांचा भविष्यनिर्वाह निधी शालेय शिक्षण विभागाच्या उपशिर्षाखाली आणि शालेय शिक्षण विभागातील शिक्षकांचा भविष्यनिर्वाह निधी उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या उपशिर्षाखाली जमा झाल्याबाबतचा हा मुद्दा आहे. यामुळे रक्कम शासनखाती जमा आहे परंतु ती चुकीच्या लेखाशीर्षाखाली जमा आहे. एका उपशीर्षाखालील रक्कम दुसऱ्या उपशिर्षाखाली जमा झाल्याची बाब महालेखाकारांनी आक्षेप नोंदवेपर्यंत विभागाच्या लक्षात येऊ नये हीदेखील गंभीर बाब आहे. सन २०११-१२ ते २०१६-१७ पर्यंतच्या कालावधीतील हा विषय असून इतक्या मोठ्या कालावधीत विभागाने रकमेच्या खर्चाचा ताळमेळ (**Reconciliation**) न केल्यामुळे या बाबी लक्षात आल्या नाहीत. यात जवळजवळ रु. ३२८६ कोटी इतक्या रकमेचा समावेश असताना विभागाने याकडे वेळेत लक्ष दिले नाही. विभागांतर्गत लेखापरिक्षण यंत्रणादेखील अत्यंत कमकुवत असल्याचे यावरून स्पष्ट होते. गत ५

वर्षात याचे लेखापरिक्षणदेखील झालेले नाही. भविष्यनिर्वाह निधीची रक्कम शासनाच्या तिजोरीत जमा असून यात कोणतेही नुकसान झालेले नाही. मात्र तो अन्य विभागाच्या खात्यात जमा झालेला आहे. याअनुषंगाने शालेय शिक्षण व उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकत्रित बसून हा विषय निकाली काढणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्ही विभागाला Reconciliation करणे आवश्यक आहे. विभागाने स्वतः याकडे दुर्लक्ष केलेच परंतु महालेखाकारांनी निदर्शनास आणल्यावरदेखील विभागाने याकडे लक्ष दिले नाही. या प्रकरणी विभागाने एकत्रित बसून या रकमेचे समायोजन करावे. तसेच या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी व अशा बाबींची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.८.३ "राखीव निधीतील व्यवहार"

अभिप्राय व शिफारस

३.४८ महाराष्ट्रात विशिष्ट प्रयोजनांकरीता १८ राखीव निधी ठेवण्यात आले होते. ज्यापैकी नऊ निधीत व्यवहार केले जात होते आणि नऊ निधी अकार्यरत होते. या निधीतील ३१ मार्च २०१७ रोजीची एकूण संचयित शिल्लक रु. ३७,५१५.५६ कोटी (रु. ३७,४८६.५५ कोटी कार्यरत निधी व रु. २९.०१ कोटी अकार्यरत निधी) होती. परंतु या शिल्लकीतून फक्त रु. २७,८७७.४२ कोटींची (७४ टक्के) गुंतवणूक करण्यात आली होती. २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांच्या विवरण क्रमांक २२ मध्ये या निधीचे लेखे समाविष्ट आहेत असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत. अतः अकार्यरत राखीव निधींचा आढावा घेण्यासाठी राज्य शासनाने प्रभावी उपाययोजना करण्याची आवश्यकता असून सदर रु. २९.०१ कोटी अकार्यरत राखीव निधी योग्य ठिकाणी हस्तांतर करून हा लेखाशीर्ष बंद करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरू करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यांत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.८.४ "आकस्मिक दायित्वे"

परिच्छेद क्रमांक १.८.४.१ "हमीची स्थिती"

अभिप्राय

३.४९ हमी दिलेल्या कर्जदारांकडून कसूर झाल्यास राज्याच्या एकत्रिकृत निधीवर ही हमी संभाव्य दायित्वे ठरतात. २०१६-१७ च्या वित्तीय लेख्यांच्या माहितीनुसार मागील तीन वर्षात राज्य शासनाने ज्या कमाल रक्कमेसाठी हमी दिली होती ती रक्कम व त्यातील प्रलंबित हमी यांचा तपशील देण्यात आला आहे. राज्य विधानमंडळाने राज्य शासनाने द्यावयाच्या हमीची मर्यादा निश्चित केलेली नाही. महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ मध्ये देखिल अशी कोणतीही मर्यादा विहीत केलेली नाही. वर्ष २०१६-१७ दरम्यान राज्य शासनाने (अ) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक (रु. ४९५ कोटी) (ब) महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ मर्यादीत, मुंबई (रु. ४०० कोटी) , आणि (क) महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादीत, मुंबई (रु. ११० कोटी) अशा एकूण रु.१००५ कोटी रक्कमेच्या हमी दिल्या होत्या. २०१६-१७ च्या प्रलंबित हमी (रु.७,३०६ कोटी) या महसुली जमेच्या (रु. २,०४,६९३ कोटी) ३.६ टक्के आणि राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या (रु. २२,६७,७८९ कोटी) ०.३ टक्के होत्या. बाराव्या वित्त आयोगाने, राज्य शासनाने दिलेल्या हमी मधून निर्माण होणारी आकस्मिक दायित्वे पूर्ण करण्यासाठी निर्धारित हमी शुल्काद्वारे हमी शुल्क विमोचन निधी उभारण्याची शिफारस केली होती. राज्यात हमी विमोचन निधी उभारण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे वर्षे २००८-०९ च्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात सांगितले. परंतु २०१६-१७ च्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात असे नमूद करण्यात आले होते की (अ) कर्जदार आणि कर्जदाता या दोघांना अदेय लाभ होईल आणि (ब) ज्या प्रकरणांमध्ये कर्जाच्या हमी आवाहित करण्यात आल्या आहेत अशा प्रकरणांवर वैधानिक नियंत्रण कमी होईल या कारणांसाठी राज्य शासनाने हमी विमोचन निधी निर्माण न करण्याचा जाणीवपूर्वक निर्णय घेतला आहे. राज्य शासनाने संस्थांना दिलेल्या हमीसाठी हमी शुल्क आकारण्यात येत होते व ते 'संकीर्ण सर्वसाधारण सेवा' मध्ये लेखांकित केले जात होते. हमी शुल्काखालील जमा २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या रु. २९.०९ कोटीवरुन २०१६-१७ मध्ये रु. ९.८७ कोटीपर्यंत कमी झाल्या. राज्य शासनाने, महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्त महामंडळ मर्यादीतच्या रु. २०.२६ कोटी आवाहित हमींची पुर्तता करणे अद्यापही बाकी आहे. एकूण अंदाजित प्राप्त हमी शुल्कांपैकी (रु. १,४६४.५८ कोटी) वर्षभरात फक्त रु. ९.८७ कोटी प्राप्त झाले. महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादितने राज्य शासनाला प्रदान करावयाच्या हमी शुल्काच्या ज्या रकमेचे (रु. १.३१ कोटी) समभागातील गुंतवणुकीच्या रुपात पुस्तकी समायोजन करण्यात आले होते त्याचा समावेश प्राप्त हमी शुल्कात केला होता. परिणामी प्राप्त हमी शुल्कातील निव्वळ तुट रु.१,४५४.७१ कोटी होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार तसेच रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार राज्यात हमी विमोचन निधी उभारण्याचा प्रस्ताव दिनांक १८ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर केला असता महाराष्ट्र शासनाच्या हमी विमोचन निधी गठीत करणे व त्याची व्यवस्था करणे यासाठी मान्यता देण्यात आली आहे. त्याबाबतची अधिसुचना निर्गमित करण्यात येत आहे.

वित्त विभाग शासन दिनांक ५ नोव्हेंबर, १९९९ व शासन परिपत्रक दिनांक २८ जानेवारी २०१० नुसार शासन हमीवर घेतलेल्या कर्जाची परतफेड व हमी शुल्क वसुली याची जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागांच्या नियंत्रण अधिकाऱ्यावर राहील असे नमुद करण्यात आले आहे. त्यानुसार शासनाने कर्ज घेण्याकरीता दिलेल्या हमीवरील हमी शुल्क संबंधित महामंडळे/सार्वजनिक उपक्रम/सहकारी संस्था यांनी शासनाकडे भरणे आवश्यक आहे.

वित्त विभागाकडून प्रतिवर्षी संबंधित प्रशासनिक विभागांना हमीशुल्क वसुली करीता मागणीपत्र (Demand Notice) पाठविण्यात येते व पाठपुरावा चालू असतो असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला.

शिफारस

३.५० सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी हमीच्या स्थितीबाबत आकडेवारी नमूद केली असून सदर मुद्दा तीन विभागांशी संबंधित आहे. यामध्ये कापूस उत्पादक संघ आणि सहकारी पणन महासंघ यांना देण्यात आलेली थकहमीदेखील समाविष्ट आहे. ज्याची रक्कम जवळजवळ रु.४९५ कोटी इतकी आहे. यामध्ये नाबार्डचा ६० टक्के हिस्सा आहे. यात एक वर्षासाठी जी परतफेड करावयाची होती ती नाबार्डकडे झालेली आहे व आता शिल्लक राहिलेली रक्कम रु.९३.२७ कोटी इतकी आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ विविध पिकांची प्रोक्युअरमेंट करणारा नोडल महासंघ आहे. पणन महासंघाची शासन हमी दाखविली होती व ज्यावेळी नाफेडकडून निधी प्राप्त झाला त्यावेळी रु.११० कोटी बँकेला अदा करण्यात आले. तसेच महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक सहकारी पणन महासंघ यांची रु.२०० कोटी विजया बँक व रु.२०० कोटी अलाहाबाद बँकेची थकहमी आहे. सन २०१७ मध्ये कापूस खरेदी खूपच कमी झाल्यामुळे सदर हमी संदर्भातील शासन निर्णय रद्द करण्यात आला. सामान्यतः हमी वापरली गेली नाही तर विभाग हमीशुल्क माफ करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करतो व ती अंतर्गत बुक ॲडजेस्टमेंट असते. अशा एकूण अंदाजित प्राप्त हमीशुल्कापैकी वर्षभरात रु.९.८७ कोटी प्राप्त झाले असून रु.१४६४.५८ कोटी इतकी रक्कम प्रलंबित होती. तसेच पणन विभागाचा रु.४१० कोटीचा मुद्दा आहे. १२ व्या वित्त आयोगाने राज्य शासनाने दिलेल्या हमीमधून निर्माण होणारी आकस्मिक दायित्वे पूर्ण करण्यासाठी निर्धारीत हमीशुल्काद्वारे हमीशुल्क विमोचन निधी उभारण्याची शिफारस केली होती. ज्या संदर्भातील प्रक्रिया सुरू असल्याचे सन २००८-०९ च्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनात सांगण्यात आले. परंतु हा निर्णय सन २०१६-१७ मध्ये बदलण्यात आला व गॅरेंटी रिडमशन फंड निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतला व त्यासाठी विभाग २ टक्के गॅरेंटी फी वसुल करीत असते व शासन या फंडामध्ये जवळजवळ रु.१५०० कोटी टाकणार आहे. विभागाने हमी दिल्यानंतर २ टक्के फी वसुल करावयास पाहिजे. परंतु अनेकवेळा शासन या हमीच्या फी ची माफी देते. रकमेची माफी देण्याचे अधिकार विभागाला आहेत. त्याअनुषंगाने विभागाने योग्य तो निर्णय घ्यावा. मात्र ही सर्व प्रकरणे निकाली काढणे आवश्यक आहे. अतः यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेऊन ही प्रकरणे कालबद्ध पद्धतीने निकाली काढण्यात यावीत तसेच अशा प्रकरणांसंदर्भात एक धोरण निश्चित करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.१.८.४.२ "अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे"

अभिप्राय व शिफारस

३.५१ भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २९३ (३) अन्वये अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे अनुज्ञेय नाहीत. २००८-०९ च्या मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरण निवेदनानुसार राज्य शासनाने २००५-०६ या वर्षापासून अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे पूर्णपणे थांबविली होती. २००६-०७ ते २०१६-१७ दरम्यान कोणतीही अर्थसंकल्पाबाहेरील कर्जे घेण्यात आली नव्हती. तथापि, २०१५-१६ च्या शेवटी २००५-०६ च्या पूर्वीच्या अर्थसंकल्पाबाहेरील कर्जापोटी रु.५५० कोटी प्रलंबित होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

नियोजन विभागांतर्गत महाराष्ट्र पाटबंधारे वित्तीय कंपनी मर्यादित या उपक्रमाकरिता उभारण्यात आलेल्या अर्थसंकल्पबाह्य कर्जापैकी सन २०१६-१७ अखेर रु.५०.५० कोटीचे दायित्व शिल्लक असून सदर दायित्वाची परतफेडीच्या विवरणपत्रानुसार संपूर्ण परतफेड सन २०२२-२३ होणार असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. या परतफेडीसंदर्भात आवश्यक ती कार्यवाही कालबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्र.१.९ "ऋण व्यवस्थापन"

ऋणांची व्यवहार्यता व लोक ऋणांची परतफेड

अभिप्राय

३.५२ कर्जाची परतफेड करण्याची राज्याची क्षमता ही ऋण व्यवहार्यतेवरुन दर्शविली जाते. राज्य शासनाच्या ऋणाच्या प्रमाणाबरोबरच राज्याच्या ऋणाची व्यवहार्यता ठरविणाऱ्या विविध दर्शकाचे विश्लेषण करणेही महत्त्वाचे असते. २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील वेगवेगळ्या ऋण व्यवहार्यतेच्या निदर्शकांचे विश्लेषण पाहता व्याज प्रदाने आणि परतफेडीसाठी तरतूद केल्यानंतर निधीपैकी उपलब्ध निव्वळ निधीत २०१२-१३ मधील रु. ४,६३३ कोटीवरुन २०१४-१५ मध्ये रु.१,९७६ कोटी अशी तीव्र घट झाली. २०१५-१६ मध्ये वाढ होऊन ती रु. ५८२४ कोटी झाली आणि

२०१६-१७ मध्ये अधिक वाढ होऊन ती रु.१५,९८४ कोटी झाली. २०१२-१३ ते २०१६-१७ दरम्यान व्याज प्रदानांचे महसुली जमेशी गुणोत्तर १४.५ टक्के ते १३.३ टक्के होते. राज्याच्या कर्जाची परिपक्वता असे दर्शविते की, राज्याच्या एकूण कर्जाच्या जवळजवळ ५४ टक्के रक्कमेची पुढील सात वर्षात परतफेड करायची आहे. परंतु, राज्याने २०१८-२० कालावधी दरम्यान रु. ४३,९५२.१० कोटींच्या (२०१६-१८ च्या तुलनेत रु. ३०,२३५.०४ कोटीची वाढ) परतफेडीसाठी स्त्रोतांना चालना द्यावी. हे दायित्व पूर्ण करण्यासाठी जर निश्चित योजना नसेल तर विकासासाठी उपलब्ध असलेले साधनस्त्रोत घटतील.

त्याचप्रमाणे २०१२-१३ ते २०१६-१७ या कालावधीतील लोक ऋणावरील माहिती पाहता २०१२-१३ आणि २०१३-१४ दरम्यान संपूर्ण लोक ऋण जमा ऋण परतफेडीसाठी वापरण्यात आली होती. २०१५-१६ मध्ये ८२ टक्क्यांच्या तुलनेत २०१६-१७ च्या लोक ऋणांच्या जमेतून २०१६-१७ च्या लोक ऋणांच्या जमेतून लोक ऋणांची परतफेड ७४ टक्के होती. अशाप्रकारे २०१२-१७ दरम्यान ऋण परतफेडीवरील सरासरी खर्च रु. ३०,६५२ कोटी होता जो या कालावधीतील सरासरी लोकऋण जमाच्या ८९.१ टक्के होता, ज्यावरुन ऋणांचा मोठया टक्केवारीतील हिस्सा ऋण परतफेडीसाठी वापरला जात होता हे स्पष्ट होते. यावरुन असेही स्पष्ट झाले की प्रगतीला चालना देण्यासाठी विकासावरील खर्च भागवण्यासाठी ऋणांचा अतिशय अल्पसा हिस्सा उपलब्ध होता. २०१२-१३ मधील रु. १७,८३५.१४ हे दरडोई कर्ज वाढून २०१६-१७ मध्ये रु.२६,८५३.९१ झाले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.५३ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी ऋण व्यवस्थापनांतर्गत ऋणांची व्यवहार्यता व लोक ऋणांची परतफेड यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून त्या पृष्ट्यर्थ विस्तृत व वस्तुस्थितीदर्शक आकडेवारी नमूद केलेली आहे. महालेखापाल यांच्या लेख्यानुसार दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी राज्यावरील एकूण दायित्व रु.३९५८५८ कोटी दर्शविले आहे. राज्य शासनाच्या लेख्यानुसार सदर दायित्व रु. ३६४८१९ कोटी आहे. महालेखापाल यांनी दर्शविलेल्या दायित्वामध्ये बिनव्याजी ठेवींचा समावेश आहे. राज्य शासनाने घेतलेल्या कर्जापैकी कोणतीही थकबाकी राज्य शासनावर नाही.

राज्य शासनाकडून कर्जे मुख्यत्वे करून विकास कामासाठी उभारण्यात येतात. तथापि लोकहितासाठी उद्भवणाऱ्या आकस्मिक दायित्वामुळे उदा. (शेतकरी कर्ज माफी, नैसर्गिक आपत्ती, सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा इ. मुळे) विकास कामावरील खर्च कमी होण्याची शक्यता असते असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला. वास्तविकतः कर्जाची परतफेड करण्याची राज्याची क्षमता ही ऋण व्यवहार्यतेवरुन दर्शविली जाते. राज्य शासनाच्या ऋणाच्या प्रमाणाबरोबरच राज्याच्या ऋणाची व्यवहार्यता ठरविणाऱ्या विविध दर्शकाचे विश्लेषण करणेही महत्वाचे असते. परंतु ऋण व्यवहार्यतेच्या निदर्शकांचे विश्लेषण पाहता व्याज प्रदाने आणि परतफेडीसाठी तरतूद केल्यानंतर निधीपैकी उपलब्ध निव्वळ निधीत तीव्र घट झाली. त्यातही परतफेडीची मोठी रक्कम अद्याप प्रलंबित आहे. अशा परिस्थितीत रकमेच्या परतफेडीसाठी स्त्रोतांना चालना देण्यात यावी व दायित्व पूर्ण करण्यासाठी निश्चित योजना आखण्यात यावी. तसेच प्रगतीला चालना देण्यासाठी विकासावरील खर्च भागविण्यासाठी ऋणांचा पुरेसा हिस्सा उपलब्ध करण्यात यावा व महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपांची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.१० "राजकोषीय असमतोल"

परिच्छेद क्रमांक १.१०.१ "तुटीतील कल"

अभिप्राय

३.५४ महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियम (दूसरी सुधारणा), २०११ नुसार २०११-१२ पर्यंत महसुली तूट शुन्यापर्यंत खाली आणून त्यानंतर महसुली आधिक्य निर्माण करायचे होते. परंतू, महसुली खर्चाच्या १२ टक्के वाढीच्या तुलनेत महसुली जमेतील १८ टक्के वाढीमूळे प्रामुख्याने २०१२-१३ मध्ये रू. ४,२११ कोटी महसुली आधिक्य प्राप्त करणे शक्य झाले. महसुली खर्चातील तीव्र वाढीमुळे २०१३-१४ दरम्यान महसुली आधिक्य महसुली तूटीत रुपांतरीत झाले (रु.५,०८१ कोटी) २०१४-१५ दरम्यान मागील वर्षाच्या तूलनेत महसुली तूट २.४ पट वाढून रु. १२,१३८ कोटी झाली आणि २०१५-१६ मध्ये ती कमी होऊन रू.५,३३८ कोटी झाली व पुढे २०१६-१७ मध्ये ती रु. ८,५३६ कोटी पर्यंत वाढली. वर्ष २०१५-१६ मधील रु. २८,३६४ कोटी राजकोषीय तूट २०१६-१७ मध्ये वाढून उदय व्यतिरिक्त ती रु. ३३,६५७ कोटी झाली (उदय सम्मिलीत करून रु. ३८,६१६ कोटी).

२०१२-१३ दरम्यानचे प्राथमिक आधिक्य (रु. ५,३३६ कोटी), २०१३-१४ मध्ये (रु. ४,८११ कोटी) २०१४-१५ मध्ये (रु. ७,८६२ कोटी) २०१५-१६ मध्ये (रु. २,५९३ कोटी) आणि २०१६-१७ मध्ये (रु. ५,१२५ कोटी) प्राथमिक तुटीत परावर्तीत झाले. मागील वर्षाच्या तुलनेत राजकोषीय तुटीमधील वाढ (रु. ५,२९३ कोटी) व व्याज प्रदानातील वाढ (रु. २,७६१ कोटी) यामुळे २०१६-१७ दरम्यान प्राथमिक तूट वाढली.

वर्ष २०१६-१७ मध्ये एकत्रिकृत निधीच्या बाहेर व्यवहार घडणे, चुकीच्या शीर्षाखाली रक्कम अर्थसंकल्पीत व लेखांकीत होणे, राखीव निधी व ठेवी इत्यादीवरील व्याजासाठी तरतूद न करणे इत्यादी घडामोडी घडल्या होत्या. परिणामी, महसुली तूट रु. ९२६.२८ कोटीने आधिक प्रमाणात आणि रू.२,०३३.७१ कोटीने कमी प्रमाणात दर्शविली गेली होती, याच्या निव्वळ प्रभावामुळे महसुली तूट रु. १,१०७.४३ कोटींनी कमी दर्शविली गेली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

शिफारस

३.५५ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी राजकोषीय असमतोल अंतर्गत तुटीतील कल यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. तीन मुख्य राजकोषीय मापदंड जसे की महसूल,राजकोषीय व प्राथमिक तूट हे विनिर्दिष्ट कालावधीत राज्य शासनाच्या वित्तीय स्थितीतील एकंदर राजकोषीय असमतोलांचे प्रमाण दर्शवितात. शासकीय लेख्यांतील तूट, जमा व खर्चातील तफावत दर्शविते.तुटीचे स्वरुप हे शासनाच्या राजकोषीय व्यवस्थापनाच्या दूरदर्शीपणाचे द्योतक आहे. तसेच, ज्या मार्गाने तूट भरून काढली जाते व उभारलेले स्त्रोत वापरले जातात. ते शासनाच्या राजकोषीय स्वास्थ्याचे महत्वाचे निदर्शक आहेत. तुटीचा कल, स्वरूप, प्रमाण व तूट भरून काढण्यासाठी केलेली वित्तव्यवस्था व तसेच महाराष्ट्र राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम / नियमांतर्गत २०१६-१७ या वित्तीय वर्षासाठी तयार केलेल्या लक्ष्यांच्या तुलनेत महसुली व राजकोषीय तुटीच्या प्रत्यक्ष पातळीचे निर्धारण या भागात सादर केले आहे. महसुली तूट कमी करून महसुली आधिक्य निर्माण करण्याची आवश्यकता होती. मात्र महसुली खर्चातील तीव्र वाढीमुळे महसुली आधिक्य महसुली तुटीत रुपांतरित झाले. त्यामुळे प्राथमिक आधिक्य प्राथमिक तुटीत परावर्तीत झाले. यासाठी राजकोषीय तुटीतील वाढ व व्याज प्रदानातील वाढ या बाबीदेखील कारणीभूत आहेत. अशा परिस्थितीत निधीचे योग्य नियोजन करून महसुली तूट कमी करून महसुली आधिक्य निर्माण करण्याच्यादृष्टीने उपाययोजना करण्यात यावी व महालेखाकारांच्या आक्षेपांची गंभीर दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक १.१०.२ "राजकोषीय तुटीचे घटक व तिची भरपाई करण्याची पद्धत"

परिच्छेद क्रमांक १.१०.३ "तूट / आधिक्याचा दर्जा"

अभिप्राय व शिफारस

३.५६ राजकोषीय तुटीची भरपाई करण्याच्या पद्धतीत घटकात्मक स्थित्यंतर घडून आले. महसुली तुटीमधील वाढीमुळे मागील वर्षाच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये राजकोषीय तुटीमध्ये रु.५,२९२ कोटीची वाढ झाली. राजकोषीय तुटीच्या टक्केवारीच्या तुलनेत निव्वळ भांडवली खर्च २०१५-१६ मध्ये ८० टक्क्यावरून कमी होऊन २०१६-१७ मध्ये ७६ टक्के झाला. तसेच राजकोषीय तुटीशी महसुली तुटीचे गुणोत्तर व प्राथमिक महसुली तूट व भांडवली खर्चात (कर्जे व अग्रिमांसह) प्राथमिक तुटीचे अपघटन राज्यांच्या वित्तव्यवस्थेतील तुटीचा दर्जा निर्देशित करतात. राजकोषीय तुटीशी महसुली तुटीचे गुणोत्तर चालू खर्चासाठी कर्जाऊ निधीचा किती प्रमाणात वापर झाला हे दर्शविते. चालू वर्षात हे गुणोत्तर ०.२२ होते म्हणजेच २२ टक्के कर्जाऊ निधी चालू खर्चासाठी वापरण्यात आला होता. राज्याची ऋणेतर जमा महसुली वर्गातील प्राथमिक खर्चाच्या गरजा भागविण्यासाठी पुरेशी होती. परंतु भांडवली वर्गांतर्गतचे खर्च भागविण्यासाठी ती पुरेशी नसल्यामुळे २०१३-१७ दरम्यान प्राथमिक तूट निर्माण झाली. तथापि, २०१२-१३ दरम्यान महसुली आणि भांडवली अशा दोन्ही वर्गांतर्गतचे खर्च भागविण्यास ऋणेतर जमा पुरेशी असल्यामुळे प्राथमिक आधिक्य निर्माण झाले. प्राथमिक खर्चाशी भांडवली खर्चाची टक्केवारी २०१२-१३ मधील १२.६ टक्क्यावरुन कमी होऊन २०१६-१७ मध्ये ११.८ टक्के झाली. महालेखाकारांनी या परिच्छेदात उद्धृत केलेले मुद्दे वस्तुस्थितीदर्शक असून याची विभागाने गांभीर्याने दखल घ्यावी व आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

सर्वसाधारण शिफारस

३.५७ महालेखाकारांनी राज्य वित्त व्यवस्थेवरील या संपूर्ण अहवालामध्ये नमूद बाबींचा सांगोपांग व एकत्रितरित्या विचार करता प्रामुख्याने आढळून आले की, कर महसूल (आठ टक्के), केंद्र शासनाकडुन प्राप्त सहाय्यक अनुदाने (२८ टक्के), केंद्रीय करांचे हस्तांतरण (२० टक्के) यांतील वाढ आणि करेतर महसुलामध्ये (पाच टक्के), झालेली घट यांच्या निव्वळ परिणामामुळे मागील वर्षापेक्षा यावर्षी राज्यात महसुली जमेत (रु. २,०४,६९३ कोटी) ११ टक्क्यांनी वाढ झाली. महसुली जमा २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ९३ टक्के होती. राज्य शासनाच्या करेतर महसुली जमा राजकोषीय सुधारणा पथामध्ये केलेल्या प्रक्षेपणापेक्षा ४१ टक्क्यांनी आणि अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा ३६ टक्क्यांनी कमी होत्या.

राज्याचा महसुली खर्च मागील वर्षापेक्षा १२ टक्क्यांनी वाढला आणि २०१६-१७ च्या एकूण खर्चाच्या ८७ टक्के होता. योजनेतर महसुली खर्च महसुली खर्चाच्या ८० टक्के होता व महसुली जमांशी त्याची टक्केवारी २०१५-१६ मधील ८३ टक्क्यावरून वाढ होऊन २०१६-१७ मध्ये ८४ टक्के झाली. रु. १,७१,१४० कोटी हा योजनेतर महसुली खर्च अर्थसंकल्पीय अंदाज व राजकोषीय सुधारणा पथामधील प्रमाणशीर निर्धारणापेक्षा (रु. १,७५,१९३ कोटी) कमी राहिला. योजनांतर्गत महसुली खर्च व योजनेतर महसुली खर्च मागील वर्षापेक्षा अनुक्रमे १७ टक्के आणि ११ टक्क्यांनी वाढला. २०१५-१६ पेक्षा या वर्षात व्याज प्रदाने (रु. २८,५३२ कोटी) ११ टक्क्यांनी वाढली होती, ती चौदाव्या वित्त आयोगाच्या प्रक्षेपणापेक्षा (रु. २९,६९७ कोटी) कमी होती.

अशाप्रकारे, राज्य शासनाला राजकोषीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमात निश्चित केलेल्या मर्यादेत राजकोषीय तूट मर्यादित ठेवण्यात यश आले. तथापि, २०१६-१७ च्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये प्रक्षेपित केलेल्या रु. ३,६४५ कोटी

महसुली तुटीच्या तुलनेत, प्रत्यक्ष तुट रु. ८,५३६ कोटीची होती जी मागील वर्षीच्या तुलनेत, महसुली जमा (११ टक्के) आणि महसुली खर्च (१२ टक्के) यातील वाढीच्या दरांच्या फरकामुळे झाली होती. मागील वर्षाशी तुलना करता, राजकोषीय तुट (उदय व्यतिरिक्त रु. ३३,६५७ कोटी) वाढली होती आणि ती राज्याच्या सकल घरेलू उत्पादनाच्या १.५ टक्के होती. २०१६-१७ दरम्यान प्राथमिक तूट रु. ५,१२५ कोटी होती.

मागील वर्षाच्या तुलनेत सबसिडी वरील खर्च १८ टक्क्यांनी वाढला व तो महसुली खर्चाच्या जवळजवळ १० टक्के होता. मजुरीवरील (सहाय्यक अनुदानाचा घटक समाविष्ट करून) खर्च राज्याच्या स्वतःच्या राजकोषीय सुधारणा पथापेक्षा व अर्थसंकल्पीय अंदाजामधील प्रक्षेपणांपेक्षा कमी होता. स्थानिक संस्था आणि इतर संस्थांना दिलेले अर्थसहाय्य जे २०१६-१७ मध्ये महसुली खर्चाच्या ४७ टक्के होते. ते मागील वर्षापेक्षा १८ टक्क्यांनी वाढले होते.

राज्याचा भांडवली खर्च जो एकूण खर्चाच्या १० टक्के होता तो, मागील वर्षाच्या तुलनेत २०१६-१७ मध्ये १२ टक्क्यांनी वाढला, परंतु २०१६-१७ च्या मुळ अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा तो रु. ५,४५७ कोटीने (१८ टक्के) कमी होता.

२०१२-१७ दरम्यान शासकीय कंपन्या, संयुक्त स्कंध कंपन्या, आणि भागीदारी व वैधानिक महामंडळे इत्यादी मधील राज्य शासनाच्या गुंतवणूकीवरील सरासरी परतावा ०.०४ टक्के होता, तर याच कालावधीत शासनाने घेतलेल्या कर्जावर सरासरी ७.६ टक्के व्याज दिले होते.

मार्च, २०१७ ला राज्याची कर्जाची एकूण थकबाकी रु. ३,९५,८५८ कोटी होती. २०१२-१७ दरम्यान कर्जाच्या परतफेडीवरील सरासरी खर्च रु. ३०,६५२ कोटी होता जो त्याच कालावधीतील सरासरी लोक ऋण जमांच्या ८९.१ टक्के होता, ज्यावरून कर्ज परतफेडीसाठी कर्जाच्या मोठ्या टक्केवारीत रक्कम वापरली जात होती हे स्पष्ट होते. यावरून असेही दर्शविले गेले की प्रगतीला चालना देण्यासाठी विकास खर्च भागविण्यासाठी कर्जाच्या अगदी नगण्य भाग उपलब्ध होता. तसेच, २०१८-२० या कालावधी दरम्यान रु. ४३,९५२.१० कोटीच्या परतफेडीसाठी (२०१६-१८ या कालावधीच्या तुलनेत रु. ३०,२३५.०४ कोटीची वाढ) राज्याने स्त्रोतांना चालना द्यायला हवी. तसेच, हे दायित्व पूर्ण करण्यासाठी जर निश्चित योजना नसेल तर, विकासासाठी उपलब्ध असलेले साधनस्त्रोत घटतील.

मागील वर्षाच्या तुलनेत राज्य शासनाच्या रोख शिलकीत २४ टक्क्यांची वाढ झाली होती, ज्यातील मोठा भाग लोक लेख्यांतील शिलकींचा होता. २०१६-१७ च्या अखेरीस राज्याची रोख शिल्लक रु.६८,७५० कोटी होती, ज्यातील रु. ४४,११० कोटी रोख शिल्लक गुंतवणूक लेख्यांमध्ये होती. २०१६-१७ आणि २०१५-१६ दरम्यान राज्य शासनाला भारतीय रिझर्व बँकेत किमान रोख शिल्लक राखण्यात यश आले आणि राज्याला अर्थोपाय अग्रीमे घ्यावी लागली नाहीत. अतः महालेखाकारांनी राज्य वित्त व्यवस्थेवर सादर केलेला सदरहू अहवाल अत्यंत मार्गदर्शक असून त्यातील आकडेवारी ही वस्तुस्थितीवर आधारीत आहे. या सर्व बाबींची योग्य ती दखल वित्त विभागाने घ्यावी व आवश्यक ती उपाययोजना करावी व चुकीच्या बाबींची पुनरावृत्ती टाळावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

मंगळवार, दिनांक २८ मे, २०१९

लोकलेखा समिति

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २८ मे, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

कार्यकारी समिती प्रमुख

(१) श्री. राजेंद्र पाटणी, वि. स. स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(९) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१०) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(११) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१२) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१४) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उ. स. तथा नि. अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

विभागीय प्रतिनिधी :

वित्त विभाग :

श्री. राजगोपाल देवरा, प्रधान सचिव, वित्त विभाग (वित्तीय सुधारणा)

श्री. राजीवकुमार मित्तल, सचिव, वित्त विभाग (व्यय)

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग (ले. व को)

सहकार व पणन (सहकार) विभाग :

श्रीमती आभा शुक्ला, प्रधान सचिव, सहकार व पणन (सहकार) विभाग

शालेय शिक्षण विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग

कृषी व पदुम विभाग :

श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पदुम) विभाग

श्री. एकनाथ डवले, सचिव, कृषी व पदुम (कृषी) विभाग

जलसंपदा विभाग :

डॉ. संजय बेलसरे, सहसचिव, जलसंपदा विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्था अहवालातील प्रकरण क्रमांक १ (परिच्छेद क्रमांक १.१ ते १.१३) यासंदर्भात प्रधान सचिव, वित्त विभाग, प्रधान सचिव, सहकार व पणन (सहकार), अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पदुम) विभाग, सचिव, कृषी व पदुम (कृषी) विभाग व सहसचिव, जलसंपदा विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरू होऊन दुपारी २-१० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(४) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(५) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(६) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(८) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१६-२०१७ या वर्षाच्या राज्य वित्त व्यवस्था अहवालातील प्रकरण क्रमांक १ संदर्भात समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.